# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर ९** DSE - E 68

# राजकीय समाजशास्त्र

**(Political Sociology)**

**सत्र–६ पेपर १४** DSE - E 193

# सामाजिक मानवशास्त्र

**(Social Anthropology)**

**बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (९ व १४) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-61-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागाअंतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आणि समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी पेपर क्र. ९ (राजकीय समाजशास्त्र) व पेपर क्र. १४ (सामाजिक मानवशास्त्र) चा प्रमुख संपादक या नात्याने आपले मनःपूर्वक स्वागत करतो. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विषयाचा विद्यमान पदवी अभ्यासक्रम एकूण तीन वर्षाचा असून या विषयाची बी.ए. पदवी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सत्रपद्धतीनुसार एकूण सोळा पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. प्रथम वर्षासाठी पेपर क्र. १ व २, द्वितीय वर्षासाठी पेपर क्र. ३ ते ६ तर तृतीय वर्षासाठी पेपर क्र. ७ ते १६ हे पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. त्यामध्ये आतापर्यंत आपण पेपर क्र. १ ते ६ अभ्यासले असून बी.ए. च्या शेवटच्या वर्षासाठी पुढील पेपर्स क्र. ७ ते १६ यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

बी. ए. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सत्र ५ साठी पेपर क्रमांक ९ ''राजकीय समाजशास्त्र' आणि सत्र ६ साठी पेपर क्रमांक १४ ''सामाजिक मानवशास्त्र'' हे अतिशय महत्त्वपूर्ण असे पेपर आहेत. यामध्ये एकूण ८ घटक समाविष्ट केले आहेत. या सर्व घटकांचा अभ्यास केल्याने विद्यार्थ्यांना राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप, राजकीय समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, राजकीय समाजशास्त्रातील दृष्टीकोणाचा अभ्यास, भारतातील राजकीय पक्ष तसेच सामाजिक मानवशास्त्राचा परिचय, भारतातील आदिवासी समाज, आदिवासी समस्या, पारधी : महाराष्ट्रातील आदिवासी समूदाय इत्यादी घटकांची माहिती मिळणार आहे.

शेवटी प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–९ राजकीय समाजशास्त्र**
**पेपर–१४ सामाजिक मानवशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. सदाशिव पाटील**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड | १ | – |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २, ३ | १ |
| **डॉ. प्रभाकर रामराव निसर्गंध**<br>श्री. विजयसिंह यादव आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज,<br>पेठवडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ४ | ४ |
| **डॉ. विनोदकुमार धोंडीराम कुंभार**<br>पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगांव, जि. सांगली | – | २ |
| **डॉ. सरला आरबोळे**<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | ३ |

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९** | |
| १. | राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप | १ |
| २. | राजकीय समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १५ |
| ३. | राजकीय समाजशास्त्रातील दृष्टीकोणाचा अभ्यास | ३३ |
| ४. | भारतातील राजकीय पक्ष | ७२ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४** | |
| १. | सामाजिक मानवशास्त्राचा परिचय | ९५ |
| २. | भारतातील आदिवासी समाज | ११० |
| ३. | आदिवासी समस्या | १३७ |
| ४. | पारधी : महाराष्ट्रातील आदिवासी समूदाय | १७३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप
## (Nature of Political Sociology)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्ट्ये

१.३ अभ्यास विषयाची मांडणी

१.३.१ राजकीय समाजशास्त्राची व्याख्या आणि अभ्यास विषय

१.३.२ राजकीय समाजशास्त्राचा उदय

१.३.३ राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व

१.४ सारांश

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना (Introduction)

समाजशास्त्र हे एक सामान्य सामाजिकशास्त्र आहे. त्यामुळे समाशास्त्रात मानवी समाजाच्या संपूर्ण अंगाचा अभ्यास पद्धतशीर केला जातो. समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे. समाज हीच समाजशास्त्राची प्रयोगशाळा आहे. मानवी समाज विविध घटकांनी मिळून बनलेला आहे. मानवी समाजाच्या विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राचे कार्य विभाजन झाले आहे. उदा. औद्योगिक समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र, शहरी समाजशास्त्र इत्यादी.

मानवाच्या काही प्राथमिक व दुय्यम गरजा असतात या गरजांच्या पुर्ततेसाठी मानवाने सामाजिक संस्थांची उभारणी केली आहे. अशा संस्थांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राच्या शाखा निर्माण झाल्या आहेत म्हणून एमिल डुर्खीम म्हणतात, सामाजिक संस्थांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. उदा. धर्माचे समाजशास्त्र, कुटुंबाचे समाजशास्त्र, शिक्षणाचे समाजशास्त्र, आर्थिक समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र इत्यादी.

समाजशास्त्रात मानवाच्या सामाजिक संबंधाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो आणि राज्यशास्त्रात मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला

जातो. राज्याची शासनव्यवस्था सत्ता, अधिकार कायदे इत्यादीचा सविस्तर अभ्यास केला जातो. मानवाच्या सामाजिक संबंधाचा व मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. समाजशास्त्रातील शास्त्रशुद्ध अभ्यास पद्धतीचा वापर करून राजकीय घटनांमागील सामाजिक क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

## **१.२ उद्दिष्ट्ये** (Objectives)

१) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ, व्याख्या व स्वरूप आपल्याला समजेल.

२) राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय लक्षात येईल.

३) राजकीय समाजशास्त्राचा उगम व विकास कसा झाला हे समजेल.

४) राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व समजेल.

## **१.३ अभ्यासविषयाची मांडणी** (Presentation of Subject Matter)

राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप समजावून घेत असताना वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञानी राजकीय समाजशास्त्राच्या केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे

### **१.३.१ राजकीय समाजशास्त्राची व्याख्या** (Definition of Political Sociology)

१) **एस. एम. लिपसेट :** समाज व राजकीय व्यवस्था यांच्यातील सामाजिक संरचना व राजकीय संस्था यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.

२) **मायकेल रूश आणि फिलिप अल्यॉप :** राजकारण व समाज, राजकीय व सामाजिक संरचना आणि राजकीय व सामाजिक वर्तणूक यांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र म्हणतात.

३) **ससीमन :** राजकीय समाजशास्त्र हे राजकीय गोष्टीचा एक स्वतंत्र सामाजिक घटक म्हणून अभ्यास करणारे शास्त्र आहे.

४) **डाऊझे :** समाजशास्त्राच्या चौकटीत केलेला राजकीय वर्तणुकीचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.

५) **प्रा. मुख्योपाध्याय :** राजकीय समाजशास्त्र म्हणजे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्पर वैचारिक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रभाव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथ्यांकडे सामाजिक संदर्भातून पाहण्यात येते.

**६) मॉरिस जानोविट्स :** राजकीय समाजशास्त्र हे समाजातील सर्व संस्थात्मक विभागातील सत्तेच्या सामाजिक आधिष्ठानाशी संबंधीत शास्त्र आहे.

**राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय :**

राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्यावरून असे दिसून येते की, राजकीय समाशास्त्रात राजकीय व्यवस्था आणि समाज, राजकीय वर्तन आणि सामाजिक वर्तन, राजकीय संस्था आणि सामाजिक संरचना यांच्या परस्पर संबंधाचा व क्रिया प्रक्रियाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. यावरून खालील मुद्याचा राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासात समावेश होतो.

**१) राजकीय व्यवस्थेचा अभ्यास :**

राजकीय समाजशास्त्रात राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला जातो. राज्य ही एक राजकीय व्यवस्था असल्याने राज्याचा व राजकीय वर्तनाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. राजकीय व्यवस्थेत समाविष्ट असणाऱ्या विविध सामाजिक संस्था, संरचना, संघटना कायदा, कार्यकारी मंडळ, न्यायंडळ, नोकरशाही, राजकीय पक्ष, दबाव गट, सत्ता, शक्ति, अधिकार सामाजिक घडामोडी इत्यादीचा सविस्तर अभ्यास राजकीय समाजशास्त्राला करावा लागतो.

**२) राजकीय क्रिया–प्रक्रियांचा अभ्यास :**

राजकीय समाजशास्त्रात राजकीय क्रिया–प्रक्रियाचा अभ्यास केला जातो. राजकीय व्यवस्थेत सत्ता मिळविण्यासाठी मिळालेल्या सत्तेचे वाटप करण्यासाठी, सत्तेचा प्रभाव टाकण्यासाठी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी संघर्ष सोडवण्यासाठी ज्या क्रिया वापरल्या जातात त्यांनाच राजकीय क्रिया असे म्हणतात. अशा राजकीय क्रियाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. राजकीय क्रियांच्या विस्तारातून राजकीय प्रक्रिया निर्माण होतात. उदा. राजकीय व्यवस्थेत सत्ता मिळवणे, स्पर्धा संघर्ष सामर्थ्य अधिकार, प्रभाव यांचा वापर करून सत्ता मिळवणे, सत्ता मिळवण्यासाठी शक्तीचा, बळाचा वापर करणे, मिळालेली सत्ता टिकवून ठेवणे इत्यादी राजकीय क्रिया, प्रक्रियांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**३) राजकीय वर्तनांचा अभ्यास :**

समाजाच्या विविध क्षेत्रावर सत्ता मिळवण्यासाठी स्पर्धा लागलेली असते. स्पर्धेमध्ये बळाचा संघर्षाचा वापर केला जातो. यातून व्यक्ती व्यक्तीमध्ये किंवा समूहासमुहामध्ये जे परस्पर संघर्ष निर्माण होतात त्यांना राजकीय संबंध म्हणतात. राजकीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी व्यक्ती किंवा समूह जे वर्तन करतात त्याला राजकीय वर्तन असे म्हणतात. अशा राजकीय वर्तनाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**४) राजकीय संस्कृतीचा अभ्यास :**

संस्कृती म्हणजे लाकांची एकूण जिवनपद्धती होय. संस्कृती हे मानवसमाजाचे वैशिष्ट्य आहे. संस्कृतीनुसार लोकांचे जिवन आकाराला आलेले असते. प्रत्येक मानव समाजाला स्वतःची अशी राजकीय संस्कृती असते. राजकीय संस्कृतीचा समाजातील राजकीय व्यवस्था, सत्ता, संघटना, राजकीय संबंध, राजकीय क्रिया प्रक्रिया, राजकीय वर्तन इत्यादीवर प्रभाव पडत असतो. राजकारणाविषयी लोकांचे अनुभव,

श्रद्धा, मुल्ये, अभिवृत्ती दृष्टिकोण असतात. त्यालाच राजकीय संस्कृती असे म्हणतात. अशा राजकीय संस्कृतीचे योग्य आकलन करून घेण्यासाठी राजकीय संस्कृतीचे स्वरूप, अर्थ तिची वैशिष्ट्ये, प्रकार, संस्कृतीचा प्रभाव, तिच्यातील बदल, दलाला जबाबदार घटक इत्यादीचा सविस्तर अभ्यास राजकय समाजशास्त्राला करावा लागतो.

**५) राजकीय भरतीचा अभ्यास :**

राजकीय व्यवस्थेत विविध स्थाने व पदे असतात उदा. राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मंत्री, अमदार, खासदार निवडणुक आयोग, सचिव इत्यादी अशा पदावर विशिष्ठ व्यक्तिंचीच निवड केली जाते. व्यक्तिची निवड विशिष्ट पद्धतीने केली जाते. ज्या व्यक्तिच्या अंग विशेष गुणवत्ता, कौशल्य, कर्तृत्व आहे अशाच व्यक्तीची त्या पदावर नेमणूक केली जाते. व्यक्तीची नेमणूक करताना नियमांचे काटेकोर पालन केले जाते. पदानुसार व्यक्तींना काही हक्क व अधिकार प्राप्त होतात. त्याविषयी विशेष नियमने असतात. अशा नियमांनुसार राजकीय व्यवस्थेत विविध पदावर व्यक्तीची केलेली नेमणूक म्हणजे राजकीय भरती होय. अशा राजकीय भरतीच्या प्रक्रियेचे स्वरूप, नियम भरतीचे मार्ग, पद्धती, पद्धतीतील बदल इत्यादीचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात केले जाते.

**६) राजकीय समाजीकरणाचा अभ्यास :**

हरी जॉन्सन म्हणतात सामाजिक भूमिका पार पाडण्याचे शिक्षण म्हणजे सामाजीकरण होय. समाजीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती समाजाची संस्कृती शिकून आत्मसात करते. त्याप्रमाणे राजकीय व्यवस्थेत व्यक्ती राजकारणाचे धडे म्हणजेच राजकीय संस्कृती शिकते. राजकारणातील डावपेच, राजकीय वर्तन, स्पर्धा संघर्ष सत्ता, सत्तेचा वापर, श्रद्धा, मुल्ये, अभिवृत्ती इत्यादी गोष्टी व्यक्तीला शिकून आत्मसात कराव्या लागतात. त्यालाच राजकीय सामाजिकरण म्हणतात. अशा राजकीय समाजीकरणाचे स्वरूप, अर्थ, साधने, इत्यादीचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात करावा लागतो.

**७) राजकीय सहभागाचा अभ्यास :**

समाजातील काही व्यक्तींना राजकीय प्रक्रियेविषयी आवड असते. असे लोक राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात तर काही व्यक्ती राजकीय प्रक्रियेविषयी अलिप्त असतात. राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढावा म्हणून राजकीय पक्ष सामाजिक चळवळीतून लोकांचे प्रबोधन करतात. निवडणुका मतदान प्रक्रिया, प्रचार, निवडणूक, आचार संहिता, राजकीय विविध पदे, पदांना मिळणारी सत्ता इत्यादी गोष्टीचे ज्ञान व्यक्तींना राजकारणातील सहभागामुळे माहित होते. अशा राजकीय सहभागाचे स्वरूप, राजकीय सहभागाचे मार्ग, पद्धती, प्रकार, अलगता इत्यादी गोष्टींचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात केले जाते.

**८) राजकीय गतिशिलतेचा अभ्यास :**

राजकारणातील आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी राजकीय नेते, राजकीय पक्ष, राजकीय लोक दबावगट लोकांना राजकीय हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी जागृत करत असतात. म्हणजेच त्यांना गतिशील बनवत

असतात. त्यालाच राजकीय गतिशिलीकरण म्हणतात. अशा राजकीय गतिशिलीकरणाचा अर्थ, स्वरूप, माध्यमे, प्रभाव, परिणाम इत्यादींचा अभ्यास राजकीय समाजशास्त्राला करावा लागतो.

**९) राजकीय संप्रेषणाचा अभ्यास :**

राजकीय संप्रेषण म्हणजे राजकीय व्यवस्थेतील माहितीचे एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे होणारे संक्रम किंवा हस्तांतरण होय. अशा संप्रेषणामुळे राजकीय व्यवस्थेतील विविध घटकात परस्पर संबंध व समन्वय प्रस्थापित होतो. त्यामुळे राजकीय कार्य योग्य दिशेने पूर्ण होते. त्यासाठी संप्रेषन महत्त्वाचे असते. अशा संप्रेषणाचा अर्थ, स्वरूप त्यांचे घटक, संपेषणाची पद्धती, माध्यमे, संपेषणाची कार्ये, संप्रेषणाचे महत्त्व इत्यादींचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात करावे लागते.

**१०) राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास**

राजकीय परिवर्तन म्हणजे समाजाच्या रचनेत व कार्यात होणारा बदल होय. समाजामध्ये जसे परिवर्तन होते त्याप्रमाणे राजकीय व्यवस्थेतही परिवर्तन होत असते. परिवर्तन ही अढळ बाब आहे. राजकीय व्यवस्थेची संरचना राजकीय कार्य, राजकीय नेतृत्व, सत्ता, राजकीय भरती, सहभाग, राजकीय संस्कृती इत्यादीमध्ये परिवर्तन होत असते. अशा राजकीय परिवर्तनाचे स्वरूप, परिवर्तनाची वैशिष्ट्ये, परिवर्तनाची कारणे, परिवर्तनातील अडथळे इत्यादीचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात केले जाते.

## १.३.२ राजकीय समाजशास्त्राचा उदय

राजकीय समाजशास्त्रात राजकीय वर्तनाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास केला जातो. राजकीय समाजशास्त्र हे राज्यशास्त्र व समाजशास्त्र या दोन शास्त्राचा संयोग आहे. राज्यशास्त्र हे प्राचीन काळात उदयाला आलेले शास्त्र आहे. आणि समाजशास्त्र हे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात उदयास आलेले तरूण शास्त्र आहे. राजकीय घडामोडीमागील सामाजिक व्यवहाराचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याच्या या आग्रहातून राजकीय समाजशास्त्राचा पाया घातला गेला. युरोपीय विचारवंताना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याची गरज लक्षात आली.

लिपसेट एस. एन. यांच्या मते राज्यशास्त्राचा आरंभ राज्याने होतो आणि ते समाजाला कसे प्रभावित करते याचा अभ्यास होतो आणि राजकीय समाजशास्त्राचा आरंभ समाजाने होतो व त्याचा राज्यावर कसा प्रभाव होतो हे अभ्यासले जाते. सामाजिक अनुबंधन राजकीय घटना आणि व्यवहाराचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करणारे शास्त्र म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.

राजकीय समाजशास्त्र हे अलीकडे उदयाला आलेले शास्त्र असले तरी अगदी प्राचीन काळापासून राजकीय घटनाचा समाजाच्या संदर्भात अभ्यास केला आहे.

**१) प्लेटो :**

ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यांनी आपल्या 'रिपब्लिक' या प्रसिद्ध ग्रंथात मानवाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजेतून राज्याचा उदय झाला आहे असे मत मांडले. समाजातील सर्व घटकांचा विकास करणे समाजात न्याय व

सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राज्याचे कार्य व उद्देश आहे. आदर्श राज्याची कल्पना मांडून तिचे विवेचन समाजरचना, वर्गव्यवस्था शिक्षणव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था इत्यादी सामाजिक गोष्टीच्या संदर्भात केले पाहिजे असे विचार मांडले.

**२) ॲरिस्टॉटल :**

प्लेटो यांचा शिष्य ॲरिस्टॉटल यांनी आपल्या 'इथिक्स व पॉलिटिक्स' या दोन ग्रंथात राज्य, शासन, राज्यघटना, कायदा इत्यादीचा वास्तववादी दृष्टिकोनातून अभ्यास केला. ते म्हणतात राज्याचा उदय अत्यंत नैसर्गिकपणे झाला आहे. त्यांच्या मते प्रथम कुटुंब संस्था निर्माण झाली त्यातून आज्ञा देणारा व आज्ञा पाळणारा असे दोन वर्ग निर्माण झाले. पुढे कुटुंबाच्या विस्तारातून समुदाय, समुदायातून टोळी आणि टोळीतून समाज निर्माण झाला. समाजातून राज्य निर्माण झाले म्हणून ते म्हणतात. राज्याच्या निर्मिती पाठीमागे नैसर्गिक सामाजिक घटक जबाबदार आहेत तसेच ते मानवाला सामाजिक प्राणी मानतात. त्याप्रमाणे राजकीय प्राणी मानतात.

**३) सिसेरो :**

रोमन विचारवंत सिसेरो यांनी 'ऑन जस्टीस' या ग्रंथात राज्य, कायदा, न्याय इत्यादी राजकीय संकल्पनांचा समावेश सामाजिक गोष्टीच्या संदर्भात केला आहे.

**४) सेंट ऑगस्टीन**

रोमन तत्त्वज्ञ सेंट ऑगस्टीन यांनी 'सिटी ऑफ गॉड' या ग्रंथात संघर्ष युद्ध, शांतता, न्याय इत्यादी संकल्पनाची चर्चा समाजजीवनाच्या संदर्भात केली आहे. ते म्हणतात, समाजात विवेक असतो. विवेकाने राज्य निर्माण केले. दैवी शक्ती समाजात मार्गदर्शन करते. दैवी शक्ती चर्चमध्ये असते. मानवाचे भवितव्य व राज्य चर्चशी जोडलेले असते.

**५) कौटिल्य :**

प्राचीन भारतीय अर्थतज्ज्ञ कौटिल्य यांनी 'अर्थशास्त्र' या ग्रंथात राज्यशासन व प्रशासन यांची सामाजिक घटकांच्या संदर्भात चर्चा केलेली आहे.

वरीलप्रमाणे अनेक विचारवंतांनी राजकीय बाबींचा समाजाच्या संदर्भात मांडलेले विचार आदर्शवादी व काल्पनीक आहेत. त्यामध्ये वास्तवता नव्हती म्हणून अशा विचाराना विज्ञानाचा दर्जा प्राप्त होत नाही.

**ब) युरोपियन विचारवंतांचे योगदान :**

युरोपीय विचारवंताना समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता वाटली. त्यामध्ये थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रूसो, मॉंटेस्क्यू, सेट सायमन, निकोलो मॅकायव्हली, रॉबर्ट आवेन, एडमंड बर्क इत्यादी विचारवंतानी राजकीय घटकांचे सामाजिक गोष्टीच्या संदर्भात वर्णन व विश्लेषण केल्याने राजकीय समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी तयार केली. ती पुढीलप्रमाणे-

**१) जॉन लॉक :**

इंग्रज विचारवंत जॉन लॉक यांच्या मते 'सामाजिक करारातून' राज्याचा उदय झाला आहे. राज्य शासन, नागरीक, समाज यांच्यातील परस्परसंबंधांचे त्यांनी विवेचन केले आहे. त्यांनी मर्यादित सत्तेचे समर्थन केले आहे.

**२) निकोलो मॅकायव्हली :**

इटालियन विचारवंत मॅकायव्हली यांनी समाज व राज्य यांच्या संबंधाची चर्चा करून समाजाने उदारता दाखविली तर राज्य नष्ट होऊ शकते असे विचार मांडले. राजकर्तावर समाजातील कोणत्याच गोष्टीचे बंधन नसावे असे ते म्हणतात.

**३) माँटेस्क्यू :**

फ्रेंच विचारवंत माँटेस्क्यू यांनी 'स्पिरिट ऑफ लॉज' या ग्रंथात कायदा व सत्ता यांची सामाजिक गोष्टीच्या संदर्भात चर्चा केली. भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक कारणामुळे वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या शासनव्यवस्था उदयास आल्या आहेत असे विचार त्यांनी मांडले. सामाजिक घटक राजकीय जीवनात बदल घडवून आणतात. लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे राजकीय जीवनात बदल झाले.

**क) समाजशास्त्रज्ञांचे योगदान**

समाजशास्त्राच्या विकासाबरोबर समाजशास्त्राच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. राजकीय घटनाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करण्यासाठी राजकीय समाजशास्त्र ही शाखा निर्माण झाली. अनेक समाजशास्त्रीय विचारवंतानी राजकीय समाजशास्त्राच्या विकासात पुढीलप्रमाणे योगदान आहे.

**१) ऑगस्ट कॉम्ट :**

ऑगस्ट कॉम्ट यांनी राजकीय व सामाजिक व्यवहारात फरक करता येत नाही. राजकीय व्यवहाराचे आकलन होण्यासाठी समाजाचा उदय व विकास कसा झाला. राज्याची निर्मिती कशी झाली हे समजण्यासाठी सामाजिक प्रगतीचा अभ्यास केला पाहिजे असे विचार मांडले.

**२) कार्ल मार्क्स :**

जर्मन समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांनी इतिहासाचे द्वंद्वात्मक भौतीक आणि ऐतिहासिक भौतिकवाद दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. समाजातील उत्पादन संबंध, वर्गव्यवस्था व वर्गसंघर्ष, सामाजिक परिवर्तन, अतिरिक्त मुल्य, वर्गहिन समाज इत्यादी संदर्भात राज्याचे स्वरूप, कार्य, राजकीय सत्ता, कामगार वर्ग इत्यादी विषयी विवेचन केले आहे. ते म्हणतात, भांडवलशाही नष्ट करण्यासाठी कामगारानी राजकीय सत्ता हस्तगत केली पाहिजे. त्यामुळे वर्ग संघर्ष नष्ट होईल आणि वर्गहीन समाजाची निर्मिती होईल यालाच त्यांनी समाजवाद म्हटले आहे.

### ३) हर्बर्ट स्पेनर :

इंग्लंड समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांनी समाजाचा सेंद्रीय विचार मांडला ते समाजाला एक जीवपदार्थ म्हणतात. त्यांनी मानवी समाजाची (राज्याची) तुलना मानवी शरीराबरोबर केली आहे. ते म्हणतात उदय विकास ऱ्हास हे नियम राज्याला लागू पडतात. राज्यसंस्था व शासनसंस्था यांचा अभ्यास समाजशास्त्रात झाला पाहिजे. शासनसंस्थेला ते सामाजिक नियंत्रणाचे साधन मानतात.

### ४) एमील डुर्खीम :

समाजात कायदा सुव्यवस्था राखणे हे राज्याचे कार्य आहे. औद्योगिकरण, नोकरशाही, राष्ट्रवाद या घटकांच्या प्रभावामुळे राजकीय सत्ता सामान्य जनतेच्या हातात आली. राजकीय व्यवस्थेत बदल झाला की समाजरचनेत बदल होतो. असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी आपल्या विचारात पद्धती शास्त्राचा वापर केला.

### ५) मॅक्स वेबर :

जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांना राज्य, शक्ति, प्रभाव, सत्ता, नेतृत्व, नोकरशाही इत्यादी राज्यशास्त्रीय घटकांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. मूल्य विरहित विश्लेषणाचा व रचनात्मक कार्यवादाचा पुरस्कार वेबरने केल्यामुळे राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात त्यांचे कार्य पायाभूत समजण्यात येते. त्यांनी राजकीय व सामाजिक घटनांचे विश्लेषण वैज्ञानिक वस्तुनिष्ठ, अनुभवाधिष्ठित व मूल्यनिरपेक्ष अशा स्वरूपाचे आहे. म्हणून वेबर यांना राजकीय समाजशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते.

### ६) विल्फ्रेड पॅरेटो :

इटालियन समाजशास्त्रज्ञ विल्फ्रेड पॅरेटो यांनी श्रेष्ठजन सिद्धांत मांडला ते म्हणतात. राजकीय सत्ताही नेहमी श्रेष्ठजनाच्या हाती असते परंतु श्रेष्ठजन कायम नसतात. त्यांच्या गुणाचे पतन झाले की श्रेष्ठजनाचे कनिष्ठ वर्गात समावेश होतो.

### ड) अमेरिकन विचारवंत :

युरोपीयन विचारवंतांच्या विचारसरणीचा प्रभाव अमेरिकन विचारवंतांवर झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन समाजशास्त्रज्ञ टॉलकॉट पार्सन्स यांनी 'सामाजिक व्यवस्था' या ग्रंथात समाजव्यवस्था व सामाजिक व्यवस्था या संकल्पना समग्र समाजासाठी वापरून समाज ही एक व्यवस्था आहे असे विचार मांडले. पार्न्सनचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत प्रसिद्ध आहे. त्यांनी कार्यात्मक दृष्टिकोणातून मूल्ये, नियमने, श्रद्धात्मक व्यवस्था दर्जा व भूमिका, सत्ता आणि अधिकार यावर विपूल प्रमाणात लेखन केले आहे.

### २) रॉबर्ट मर्टन :

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ रॉबर्ट मर्टन यांनी 'संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोणाचा' पुरस्कार केला. समाजरचना, प्रकार्य, अपकार्य, व्यक्त व अव्यक्त कार्ये या संकल्पनाचा प्रभाव राज्यशास्त्रज्ञांवर पडला तर त्यांनी त्या संकल्पनाचा वापर राजकीय घटकाच्या विश्लेषणासाठी केला.

अशाप्रकारे राजकीय समाजशास्त्राच्या विकासात वरील विचारवंतांचे योगदान मौलिक आहे.

**सारांश :** वरीलप्रमाणे राजकीय समाजशास्त्र या नवीन शाखेचा विकास होत गेला. राजकीय व सामाजिक या दोन्ही गोष्टी परस्परांशी पूरक आहेत. पूर्वी राज्य आणि समाज यामध्ये भेद केला जात होता. परंतु समाजाशिवाय  राज्य निर्माण होवू शकत नाही हे स्पष्ट होत गेले. त्यानुसार विविध समाजशास्त्रज्ञांनी राजकीय समाजशास्त्राच्या विचारप्रवाहांचे परिस्थितीनुसार आपआपले विचार मांडले आहेत.

### १.३.३ राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व

राजकीय समाजशास्त्रात राजकीय व्यवस्था व सामाजिक व्यवस्था यांच्या आंतरसंबंधाचा पद्धतशीर व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे खालील गोष्टीवरून दिसून येते.

**अ) सैद्धांतिक महत्त्व** (Theoretical Importance)

सैद्धांतिक ज्ञान म्हणजे ज्ञानासाठी जान ज्ञानाच्या कक्षा वाढवण्यासाठी जे ज्ञान संपादन केले जाते त्याला सैद्धांतिक ज्ञान म्हणतात. सैद्धांतिकदृष्ट्या समाजाच्या राजकीय व्यवस्थेचे, व्यक्ती वर्तनाचे, समाजव्यवस्थेचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. तो पुढीलप्रमाणे महत्त्वाचा आहे.

**१) राजकीय व्यवस्थेची ज्ञान प्राप्ती**

राजकीय समाजशास्त्रात राजकीय व्यवस्थेचे परिपूर्ण अध्ययन केले जाते. त्यामुळे राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, प्रशासन कायदा, राजकीय व्यवस्थेचे प्रकार, राजकीय व्यवस्थेची कार्ये, लोकांचे राजकीय संबंध, राजकीय वर्तन, राजकीय संस्कृती, राजकीय क्रिया, प्रक्रिया, राजकीय समाजीकरण, राजकीय सहभाग, परिवर्तन इत्यादी विषयांचे सविस्तर व वैज्ञानिक ज्ञान प्राप्त होते. अशा ज्ञानाचा उपयोग राजकीय व्यवस्थेत निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी केला जातो. राजकारण, राजकीय क्रिया-प्रक्रिया इत्यादी विषयी चुकीच्या कल्पना, गैरसमज, पूर्वग्रह निर्माण झालेला असतो. अशा प्रश्नांच्या निर्मूलनासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग होतो.

**२) समाजव्यवस्थेची ज्ञान प्राप्ती**

समाज ही एक व्यवस्था आहे. वेगवेगळ्या घटकाच्या एकत्रीकरणामुळे समाजाला व्यवस्था प्राप्त झाली आहे. राज्यव्यवस्था हा एक समाजाचा घटक आहे. राज्यव्यवस्थेचा व सामाजिक घटकाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था यांच्यातील परस्परसंबंध कसे आहे, त्याचा परस्परावर कसा व कोणता प्रभाव पडतो, तसेच राजकीय व्यवस्थेवर समाजातील इतर घटकांचा उदा. अर्थव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, धर्मव्यवस्था इत्यादीचा कसा प्रभाव पडतो. राजकीय संबंधावर सामाजिक घटकाचा कोणता प्रभाव पडतो. इत्यादी प्रश्नांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. त्यासाठी समाजशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या विविध संकल्पना उदा. संस्कृती समाजीकरण दर्जा, भूमिका, परिवर्तन इत्यादिचा वापर केला जातो. साहजिक अशा अभ्यासामुळे समाजव्यवस्थेचे परिपूर्ण ज्ञान होते.

### ३) मानवी वर्तनाची ज्ञान प्राप्ती

मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. मानवी वर्तनाला वेगवेगळ्या बाजू असतात. उदा. धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, सामाजिक इत्यादी. त्याप्रमाणे मानवाचे राजकीय वर्तन हे मानवी वर्तनाचा भाग आहे. मानवाच्या राजकीय वर्तनावर वेगवेगळ्या मानवी वर्तनाचा प्रभाव पडत असतो. त्यानुसार मानवाचे राजकीय वर्तन आकाराला येते. मानवांच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जात असताना राजकीय समाजशास्त्राला मानवाच्या इतर वर्तनाचा अभ्यास करावा लागतो. त्यामुळे मानवी वर्तनाचे यथार्थ व परिपूर्ण ज्ञान प्राप्त होते. मानवी वर्तनाचे यथार्थ व परिपूर्ण आकलन होण्यासाठी राजकीय समाजशास्त्र उपयुक्त ठरते.

### ४) इतर शास्त्रांच्या आकलनासाठी उपयुक्त

राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास हा इतर शास्त्रांच्या आकलनासाठी उपयुक्त ठरतो. कारण राजकीय समाजशास्त्रावर मानसशास्त्र, संख्याशास्त्र, समाजशास्त्र, माहिती तंत्रज्ञान यासारख्या शास्त्रांचा प्रभाव पडतो. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राला इतर शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. उदा. राजकीय समाजशास्त्र हे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे एकत्रीकरण आहे. राजकीय समाजशास्त्रात राजकीय घटकांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. त्यामुळे राज्यशास्त्रातील विविध अध्ययन पद्धती, घटक, व्यवस्था यांचे ज्ञान प्राप्त होते. त्याप्रमाणे समाजशास्त्रातील विविध संकल्पना, अभ्यासपद्धती व दृष्टीकोन यांचे ज्ञान प्राप्त होते.

### ब) व्यावहारिक महत्त्व Practical Importance

राजकीय समाजशास्त्राचा सैद्धांतिक दृष्ट्या उपयोग होतो. त्याप्रमाणे व्यावहारिक दृष्ट्या उपयोग होतो. मानवी जीवनातील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी, धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी, राजकीय सहभाग वाढवण्यासाठी, राजकीय सुधारणेसाठी, लोकमताची जडणघडण करण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग पुढीलप्रमाणे होतो.

### १) प्रश्न व समस्यांची सोडवणुक करण्यासाठी

समाजात विविध सामाजिक समूह असतात, प्रत्येक समुहाचे हितसंबंध वेगवेगळे असतात. आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी प्रत्येक समूह राजकीय व्यवस्थेवर दबाव टाकीत असतो. त्यातून समूहासमूहात स्पर्धा वाढीस लागते. स्पर्धेतून संघर्ष निर्माण होतो. संघर्षातून काही प्रश्न व समस्या निर्माण होतात. अशा प्रश्नांच्या व समस्यांच्या निर्मुलनासाठी राजकीय समाजशास्त्राचे ज्ञान उपयुक्त पडते. समाजात विविध सामाजिक समूह कसे निर्माण होतात. प्रत्येकाचे हितसंबंध कोणत्या प्रकारचे असतात. समूह राजकीय व्यवस्थेवर कसा दबाव टाकतात. इत्यादी प्रश्नांचा वस्तुनिष्ठ अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. अशा अभ्यासातून प्राप्त झालेले ज्ञान समाजात निर्माण झालेल्या प्रश्नांच्या व समस्यांच्या निर्मुलनासाठी राजकीय व्यक्तीना उपयोगी पडते.

### २) धोरणांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी

राजकीय धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग होतो. समाजाच्या व राज्याच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. विविध योजनांना अपेक्षित यश मिळण्यासाठी योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित करावी लागते. कोणत्या समाजासाठी कोणती योजना योग्य आहे याचे ज्ञान राजकीय समाजशास्त्रातून प्राप्त होते. कारण राजकीय समाजशास्त्रात समाजाचा वस्तुनिष्ठ अभ्यास केलेला असतो. अशा अभ्यासातून समाजाच्या विकासासाठी कोणती योजना योग्य आहे याचे ज्ञान राजकीय समाजशास्त्रातून प्राप्त होते. अन्यथा समाजाचा अभ्यास न करता एखादी योजना लागू केली तर त्या योजनेला अपेक्षित यश प्राप्त होत नाही. कोट्यावधी रुपये खर्च करूनही विविध योजना यशस्वी होत नाहीत म्हणून विविध धोरणांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग होतो.

### ३) लोकमताची जडणघडण करणेसाठी

लोकमताची जडणघडण करण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग होतो. कोणत्याही राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त होण्यासाठी तिला अनुकूल लोकमत प्राप्त असावे लागते. तसेच राजकीय व्यक्तीना आपली सत्ता कायम टिकवून ठेवण्यासाठी लोकमताचा पाठिंबा मिळवावा लागतो. लोकमत म्हणजे काय, लोकमताची निर्मिती व जडणघडण कशी होते. लोकमतावर कोणत्या घटकांचा प्रभाव पडतो. लोकमतात बदल होतात काय? कसे बदल होतात. त्यांची कारणे कोणती? इत्यादी प्रश्नांची उकल राजकीय समाजशास्त्रात केली जाते. राजकीय समाजशास्त्रात प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग लोकमताची जडणघडण करण्यासाठी होतो.

### ४) राजकीय सहभाग वाढविण्यासाठी

लोकांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा उपयोग होतो. कारण अलिकडे राजकीय प्रक्रियेस अनिष्ठ वळण लागले आहे. राजकारणात गुंड, गुन्हेगारी लोकांचा मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहे. निवडणुकीत हमखास यश मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर केला जातो. त्यामुळे आजचे राजकारण धनवान, श्रीमंत लोकांचे झाले आहे. राजकीय व्यक्ती सत्ता प्राप्त करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करतात. मतदारांना जेवण, पैसा पुरविणे, मतदारावर दबाव टाकणे, मोठ्या भूलथापा मारणे इत्यादिमुळे सुशिक्षित, विद्वान, चारित्र्यसंपन्न व्यक्ती राजकारणाकडे तुच्छतेने पाहत आहे. राजकारणापासून आपण लांब राहिलेले बरे अशी त्यांची मानसिकता झाली आहे. लोकांची अशी मानसिकता निर्माण होणे राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या योग्य नाही. अशामुळे कल्याणकारी राज्याची निर्मिती होणार नाही. म्हणून राजकीय व्यवस्था, राजकीय प्रक्रिया इत्यादी विषयी लोकांच्या मनात असणारे गैरसमज पूर्वग्रह, उदासिनता दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय समाजशास्त्राने राजकीय व्यवस्था, राजकीय प्रक्रिया इत्यादिविषयी शास्त्रशुद्धरित्या प्राप्त केलेले ज्ञान लोकांना उपलब्ध करून दिले तर अशा ज्ञानाचा उपयोग लोकांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी होईल.

**५) राजकीय सुधारणा करणेसाठी**

राजकीय व्यवस्था, राजकीय क्रिया-प्रक्रिया, शासन प्रशासन, राजकीय पक्ष, विविध दबाव गट, निवडणूक प्रक्रिया इत्यादिमध्ये काही दोष, उणिवा असतात अशा उणिवांचे, दोषांचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात केले जाते. असे दोष, उणिवा इत्यादिचे निर्मुलन करण्यासाठी उपाय सुचविले जातात. त्यामुळे लोककल्याणकारी राज्यव्यवस्था, व्यक्तीस्वातंत्र्य, माहितीचा अधिकार, मानवी हक्क, कायद्याचे राज्य प्राप्त होण्यासाठी राजकीय, समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होतो.

अशा रितीने राजकीय समाजशास्त्राचा उपयोग व्यावहारिक दृष्टीकोनातून होतो. राज्य व समाज यांचे संबंध कसे असावे, राज्याने जनतेच्या कल्याणासाठी कोणते धोरणात्मक निर्णय घ्यावेत, वेगवेगळ्या समस्यांचे निराकरण कसे करावे यासाठी व्यावहारिकदृष्ट्या राजकीय, समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होतो.

## १.४ सारांश :

राजकीय समाजशास्त्र हे समाजशास्त्र व राज्यशास्त्र या दोन शास्त्रांच्या एकत्रीकरणातून उदयास आलेले तरुण सामाजिकशास्त्र आहे. समाजशास्त्रात सामाजिक संबंधाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो आणि राज्यशास्त्रात मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो. राजकीय समाजशास्त्रात सामाजिक व राजकीय परिस्थितीशी संबंधित असणाऱ्या विविध गोष्टींचा व्यापक अभ्यास केला जातो.

राजकीय समाजशास्त्र हे समाजशास्त्र व राज्यशास्त्र या दोन शास्त्रांच्या एकत्रीकरणातून उदयास आलेले तरुण सामाजिकशास्त्र आहे. समाजशास्त्रात सामाजिक संबंधाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो आणि राज्यशास्त्रात मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो. राजकीय समाजशास्त्रात सामाजिक व राजकीय परिस्थितीशी संबंधित असणाऱ्या विविध गोष्टींचा व्यापक अभ्यास केला जातो.

राजकीय समाजशास्त्रात राजकीय व्यवस्था आणि समाज, राजकीय वर्तन, सामाजिक वर्तन, राजकीय पक्ष, दबाव गट, निवडणुका, राजकीय चळवळी, मतदान प्रक्रिया, राजकीय संघर्ष, स्पर्धा, अधिकार, राजकीय सत्ता, राजकीय संस्कृती, राजकीय भरती, राजकीय समाजीकरण, राजकीय सहभाग, राजकीय परिवर्तन, राजकीय वर्तन, नियंत्रण इत्यादी गोष्टीचा अभ्यास केला जातो.

सदरच्या प्रकरणामध्ये राजकीय समाजशास्त्राचा उदय व विकास कसा होत गेला हे देखील स्पष्ट होते. अनेक विचारवंताचे योगदान राजकीय समाजशास्त्राच्या विकासाच्या कारणीभूत आहे. तसेच सैद्धांतिक दृष्टिकोनातून व व्यावहारिक दृष्टीकोनातून राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे दिसून येते. राजकीय समाजशास्त्र मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून किती विशाल व महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात येते.

## १.५ सरावासाठी प्रश्न

### अ) वस्तुनिष्ठ प्रश्न

**प्रश्न – योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा.**

१) .................. यांच्या मते सामाजिक संस्थांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.

अ) कार्ल मार्क्स ब) ऑगस्त कॉम्त क) एमील डुरखीम ड) डॉ. जी. एस. घुर्ये

२) राज्यशास्त्रात मानवाच्या ................. वर्तनाचा अभ्यास केला जातो.

अ) सामाजिक ब) राजकीय क) शासकीय ड) सांस्कृतिक

३) 'समाजशास्त्राच्या चौकटीत केलेला राजकीय वर्तणुकीचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.' अशी व्याख्या कोणी केली आहे.

अ) एस. एम. लिपसेट ब) ससामेन क) डाऊझे ड) मुख्योपाध्याय

४) .............. हा राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

अ) राजकीय व्यवस्था ब) कायदा क) प्रशासन ड) नियमने

५) रिपब्लिक हा ग्रंथ ............. यांनी लिहिला.

अ) सिसेरो ब) ॲरिस्टॉटल क) प्लेटो ड) एस. एम. लिपसेट

६) ................ यांच्या मते सामाजिक करारातून राज्याचा उदय झाला आहे.

अ) जॉन लॉक ब) मॉंटेस्क्यू क) कौटिल्य ड) सेट सायमन

७) कार्ल मार्क्स यांनी वर्गहिन सामाजाला ................ म्हटले आहे.

अ) वर्गसंघर्ष ब) समाजवाद क) द्वंद्वात्मक ड) सत्तासंघर्ष

८) ................. यांच्या मते उदय, विकास व ऱ्हास हे नियम राज्याला लागू पडतात.

अ) मॅक्स वेबर ब) एमील डुरखीम क) रॉबर्ट मर्टन ड) हर्बर्ट स्पेन्सर

९) राजकीय धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी ............. शास्त्राचा उपयोग होतो.

अ) समाजशास्त्र ब) राज्यशास्त्र क) राजकीय समाजशास्त्र ड) वरील सर्व

१०) राजकीय ज्ञानाचा उपयोग .............. केला जातो.

अ) राजकीय सहभाग ब) सत्ता प्राप्तीसाठी

क) उदासीनता दूर करण्यासाठी ड) पैसा मिळविण्यासाठी

११) ................ यांना राजकीय समाजशास्त्राचे जनक म्हणून संबोधले जाते.

अ) एमिल डुरखीम  ब) मॅक्स वेबर  क) जॉन सिमेल  ड) कार्ल मार्क्स

**ब) लघुत्तरी प्रश्न (टीपा द्या)**

१) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ

२) राजकीय समाजीकरण म्हणजे काय?

३) राजकीय संस्कृतीचा अभ्यास सांगा.

४) राजकीय संप्रेक्षण म्हणजे काय?

५) राजकीय समाजशास्त्रात प्राचीन विचारवंतांचे योगदान लिहा.

६) युरोपियन विचारवंतांचे योगदान सांगा.

७) समाजशास्त्रज्ञाचे योगदान स्पष्ट करा.

८) राजकीय समाजशास्त्राचे सैद्धांतिक महत्त्व सांगा.

९) राजकीय समाजशास्त्राचे व्यवहारिक महत्त्व सांगा.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) राजकीय समाजशास्त्राची व्याख्या देवून राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

२) राजकीय समाजशास्त्राचा उदय व विकास स्पष्ट करा.

३) राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व विशद करा.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) प्रा. चंद्रकांत खंडागळे – राजकीय समाजशास्त्र

२) डॉ. इनामदार एम. आर व डॉ. पुराणिक एस. एन. – राजकीय समाजशास्त्र (कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे)

३) बी. वाय. कुलकर्णी – राजकीय समाजशास्त्र (विद्या प्रकाशन, नागपूर)

४) डॉ. दि. का. गर्दे – आधुनिक राजकीय विश्लेषण

५) श. गो. देवगावकर – राजकीय समाजशास्त्र (श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर)


❑❑❑

# घटक – २
# राजकीय समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सत्तेचा अर्थ आणि स्वरूप

२.२.२ राज्याचा अर्थ आणि स्वरूप

२.२.३ नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरूप

२.२.४ सारांश

२.३ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.४ स्वाध्याय

२.५ अधिक वाचण्यासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे:

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला पुढील उद्दिष्टे समजून घेता येतील.

- सत्तेचा अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.
- राज्याचा अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.
- नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक:

समाजशास्त्र एक सामाजिक विज्ञान आहे. समाजशास्त्रचा अभ्यास समजून घेत असताना आपल्याला वेगवेगळ्या तार्किक मुद्द्यांच्या आधारे विविध संकल्पना समजून घ्याव्या लागतात. समाजशास्त्र समजून घेत असताना आपणास पायाभूत संकल्पना समजून घेणे गरजेचे असते, कारण त्या संकल्पना समाजशास्त्र मध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. समाजशास्त्रात कोणत्याही संकल्पनेचे स्पष्टीकरण देत असताना वैज्ञानिक आणि तार्किक दृष्टिकोन वापरला जातो. प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण अशाच काही संकल्पना समाजशास्त्र समजून घेत असताना पाहणार आहोत, यामध्ये सत्ता आणि राज्य त्याचबरोबर नागरी समाज यांचा अर्थ आणि स्वरूप याचे विश्लेषण करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन:

प्रस्तुत प्रकरणांमध्ये राजकीय समाजशास्त्र समजून घेत असताना आपणास राजकीय समाजशास्त्र संबंधित अनेक संकल्पनाचा आढावा घेणार आहोत. या संकल्पनेचा आढावा घेत असताना या संकल्पनेचे महत्त्व आणि प्रासंगिकता समजून घ्यावे लागेल. प्रस्तुत प्रकरणात कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, अँटोनी ग्राम्सी, हेगेल यांनी मांडलेल्या संकल्पनाचा अभ्यास सदरच्या प्रकरणांमध्ये करणार आहोत. त्याचबरोबर हायलँड, गार्नर, गेटेल, या प्रस्तुत विचारवंतांच्या संकल्पना आपणास समजून घ्यावे लागेल त्याचबरोबर त्यांनी केलेले तार्किक विश्लेषण ही समजून घेणारं आहोत. सदर प्रकरणांमध्ये  सत्तेचा अर्थ आणि स्वरूप,राज्याचा अर्थ आणि स्वरूप, नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरूप हे या विषयी माहिती घेणार आहोत.

### २.२.१–सत्तेचा अर्थ आणि स्वरूप:

सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे अशी शक्ती ज्याद्वारे व्यक्ती आपले प्रभुत्व इतरावर दाखवते किंवा आपल्या शक्तीचा प्रयोग करते. सत्ता म्हणजे एक विशेष विशिष्ट प्रकारचा प्रभाव आहे. व्यक्तीला मिळालेल्या मिळालेल्या शक्तीद्वारे समाजामध्ये शासक बनत असते आणि या आधारे आपले शासित संबंध समाजामध्ये प्रस्थापित करत असते. सत्ता म्हणजे आग्रही कृतीद्वारे फलित साध्य करून घेण्याची क्षमता असा अर्थ काढतात. यामध्ये किंवा समूह आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी निर्णय व विचारांना कार्यान्वित करण्याचे सामर्थ्य घेतो. दुसऱ्याच्या इच्छेविरुद्ध त्यांना प्रभावित करणे किंवा त्यांच्या वर्तनात नियंत्रित करण्याची क्षमता सत्तेमध्ये अंतर्भूत असते. समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबरने सत्तेला सामाजिक संबंधाचे अंग मांनले आहे. सत्तेचे स्वरूप सापेक्ष ते एका व्यक्तीकडून त्यावर दुसऱ्या वर्तनावर ती आपली इच्छा लादण्याच्या संभाव्यतेशी असते. तिचे स्वरूप सामाजिक आंतरक्रियेतं असते. मात्र त्यातून सत्तेचे निम्न असे विभाजन झाल्यामुळे समाजात असमानता निर्माण होते. कुटुंबापासून शासनापर्यंत दुसऱ्या शब्दात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्ता प्रत्ययास येते. युद्ध,राजकारण, आर्थिक क्रियाकलाप, धार्मिक संस्था म्हणजे सर्व ठिकाणी सत्तांनी सत्तेचे विभाजन दिसून येते.

शक्ती म्हणजे व्यक्तीची अशी क्षमता की जी, तो व्यक्ती आपली आकांक्षा किंवा इच्छा इतरावर लादतो. याच शक्तीच्या आधारे व्यक्ती कडून अपेक्षा केली जाते. शक्तीद्वारे व्यक्तीवर सक्ती केली जाते.

**सत्ता:**

''शक्तीचे कायदेशीर रूप म्हणजे सत्ता होय.'' एखादा तरूणाचा गट आंदोलन करणाऱ्या व्यक्ती समुदायास मारहाण करत असेल तर ती सामूहिक शक्ती झाली. त्या समूहास गुंडांचा समूह सुद्धा म्हणता येईल. पण तोच जर ती मारहाण पोलिसांनी केली तर ती सत्ता होईल, कारण त्यास कायदेशीर स्वरूप प्राप्त होईल. म्हणजेच शक्तीला जेव्हा कायदेशीर स्वरूप प्राप्त होईल तेव्हा ती सत्ता बनेल. वेबररच्या मते, ''सत्ता अगर अधिकार म्हणजे निश्चित आज्ञेचे पालन केले जाण्याची शक्यता होय.'' सत्तेचे समाजात असणारे स्थान हे अविभाज्य अंग आहे. परंतु सत्ता समाजात अस्तित्वात राहण्यासाठी काही समाज मांडणी कशी असावी लागतात ते असे की,

१) सत्ता प्रस्थापित होण्यासाठी कायद्याची मान्यता असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ तहसीलदार, जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी, आयुक्त यांना कायदेशीर मान्यता असते या सत्तेस तार्किक सत्ता म्हणू शकतो.

२) भारत हा विविधतेने समृद्ध असा देश आहे या महाकाव्य देशात अनेक परंपरा, पंथाचे धर्माचे लोक राहतात या परंपरा व्यक्ती समुदायाकडून वर्षानुवर्षे चालत आलेली असतात. त्यांना परंपरेने मान्यता दिलेल्या असतात. उदाहरणार्थ धर्मगुरू, पोप, संत इत्यादींचे अस्तित्व आजही नाकारता येत नाही, यांचा समावेश परंपरागत सत्ता मध्ये करता येईल कारण त्यांना परंपरेने मान्यता दिलेली आहे. सत्तेचे स्वरुप व्यापक असले पाहिजे त्यामध्ये समाजाचे हित जोपासता आले पाहिजे. थोडक्यात वेबरच्या मते, सत्ता अंतिमत शक्तीवर अवलंबून असते व त्याच्या कायदेशीर स्वरूप प्राप्त होणे गरजेचे असते. समाजाच्या राजकीय व सामाजिक व्यवस्थेसाठी सत्यस्वरूप कायदेशीर असावे लागते.

**सत्तेच्या काही व्याख्या:**

**हर्बर्ट हाईमन:** यांच्या मतानुसार, ''सत्ता म्हणजे निर्णय निर्णय घेण्याची शक्ती होय.''

**युनिस्कोच्या १९५५ च्यां रिपोर्ट नुसार:** सत्ता अशी शक्ती आहे जी की स्वीकृत, सन्माननीय,ज्ञात त्याचबरोबर औचित्यपूर्ण असते.

**बायर्सटेड यांच्या मतानुसार:** सत्ता शक्तीच्या प्रयोगातील संस्थात्मक अधिकार आहे ती स्वतः शक्ती नाही.

**रोवे यांच्या मतानुसार:** सत्ताही व्यक्ती किंवा व्यक्ती समूहच्या राजकीय निश्चयाचे निर्मिती तसेच राजकीय व्यवहारात प्रभावित करण्याचा अधिकार आहे.

**सत्तेचे स्त्रोत:**

**वेबरने सत्तेच्या दोन परस्पर विरोधी स्त्रोताचा निर्देश केला आहे:**

१) **औपचारिक हितसंबंधी व्यवहारातून दिसणारी सत्ता:** या सत्तेचा प्रभाव दोन्ही बाजूने चालतो सत्तेला आदेश देणे त्याचबरोबर नोकरशाहीतील एकत्रीकरण करण्याचा अधिकार आहे. या सत्तेच्या सिद्धांतानुसार काही उदाहरणे पाहता येते यामध्ये भांडवल दाराचा एक गट जास्तीत जास्त नफा मिळवण्याच्या हेतूने उत्पादित मालाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवतो.

२) सत्तेची प्रस्थापित प्रणाली ज्यादा आदेश देण्याचे अधिकार आणि पालन करण्याच्या अधिकाराचे निर्धरण केलेले असते. उदाहरणार्थ सैनिक त्याच्या वरच्या अधिकार्याचे आदेश मानण्यास बाध्य असतात. सत्तेमुळे अशी शक्ती प्राप्त होते सत्तेची चर्चा करताना आपणास अवैध तिचा विचार करावा लागतो. वेबरच्यामते वैधता हे सत्तेचे मूळ स्थान आहे.

**सत्तेचे प्रकार:**

आपण अभ्यासले आहे की अधिकाराचा संबंधित वेबरणे सत्तेचे प्रकार तीन सांगितले आहेत.

**१) परंपराधिष्टीत अधिकार व्यवस्था:**

**२) दैवी गुणाअधिष्ठित अधिकारी व्यवस्था:**

**३) कायदाधिष्टीत अधिकार व्यवस्था:**

**१) परंपराधिष्टीत अधिकार व्यवस्था:**

ही व्यवस्था परंपराच्या आधारे उभी आहे. कोणत्याही अधिकाराचा सन्मान केला पाहिजे असा त्याचा आधार आहे, ही अधिकार व्यवस्था शतकानुशतके म्हणजे पूर्वीपासून कार्यरत आहे. या सत्तेचे उदाहरण पाहताना आपणास पितृसत्ताक व्यवस्था, कुलपती व्यवस्था आणि अशा क्रमाने प्राप्त होणाऱ्या अधिकाराचे उदाहरण देता येईल. वेबरने कुलपती सत्तेस परंपराधिष्टीत अधिकारी व्यवस्थेचे विशुद्ध रूप मांडले आहे. परंपराधिष्ठित सत्तेच्या अंतर्गत पिढ्यान् पिढ्या त्यांना मिळणाऱ्या स्थानानुसार व्यक्तिगत सत्तेचा उपभोग घेतात. त्यांनी दिलेले आदेश रितीरिवाजानुसार असतात ते आदेश शासित आणि पालन केले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असतो, मात्र काही वेळा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात. आदेशाचे पालन करणाऱ्यांना प्रजा असे म्हटले जाते ही प्रजा व्यक्तिगत निष्ठेमुळे किंवा प्राचीन काळापासून त्या पदावर पावित्र्याची आणि सन्मानाची भावना असल्यामुळे आदेशाचे पालन करतात. परंपरागत सत्ताही एका चौकटीतच जन्म घेते. ती सत्ता वंश प्रति वंश हस्तांतरीत होत असते. यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळातील राजेशाहीचे उदाहरण देता येईल आजही नेपाळ, इंग्लंड, जपान या सारख्या देशात राजेशाहीचे प्रचालन असून परंपरा अधिष्ठित अधिकारी व्यवस्थेचे उदाहरण दिसून येते.

**२) दैवी गुणाअधिष्ठित अधिकारी व्यवस्था:**

या सत्तेच्या प्रकारांमध्ये सामान्य व्यक्तीपेक्षा काही व्यक्तींच्या मध्ये दैवी गुण असतात अशा अलौकिक गुणांमुळे त्या व्यक्ती इतरांच्या पेक्षा सर्वस्वी वेगळे ठरतात. दैवीगुणाअधिष्ठित अधिकार व्यवस्था आता ही कायदाधिष्टीत, परंपराधिष्टीत अधिकारी व्यवस्था पेक्षा वेगळी असते. दैवीगुणांमुळे अशा व्यक्ती सामान्य लोकांच्या भावनावर अधिकार स्थापित करतात. त्यासाठी ते विशिष्ट साधनांचा प्रचाराचा उपयोग करतात अर्थात असा अधिकार प्राप्त करण्यासाठी दीर्घ कालावधी लागतो. साधु, संत, योद्धे, धर्म संस्थापक, राजकीय नेतृत्वात अशा अलोकीक गुणांचा समुच्चय कवचित आढळतो. दैवीगुणसंपन्न व्यक्तीच्या चाहत्यांचा एक वर्ग असतो. कुणाच्या प्रचाराचे कार्य करतात यात भावनात्मक वर्तन समाविष्ट असते. दैवी गुणअधिष्टीत नेत्याच्या प्रवचन उपदेशाने समर्थक अत्यंत भावूक होतात. ते नेत्यांची पूजाअर्चा करतात त्याला शरण जातात आज्ञापालन करतात. यात तार्किकतेला वाव नसतो हा अधिकार संघटित नसतो. तसेच त्यात कर्मचारी शासकीय तंत्राची गरज नसते. नेता आणि अनुयायी यांचा निश्चित व्यवसाय नसतो तसेच ते कौटुंबिक जबाबदाऱ्या पासून दूर असतात. दैवीगुनाधिष्टीत अधिकारी व्यवस्थाही व्यक्तीगत गुणावर आधारलेले

असल्यामुळे संबंधित नेत्याचा मृत्यू किंवा भूमिका झाल्यास त्याच्या उत्तर अधिकाऱ्याचा प्रश्न उद्भवतो अशा परिस्थितीत जी व्यक्ती ते स्थान भूषवतील तिच्या अंगी चमत्काराची शक्ती नसेल तर दैवीगुणसंपन्न नेत्याचे विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी संस्था निर्माण केल्या जातात. त्यात आधुनिक साधनांचा उपयोग करण्यात येतो. दैवीगुणसंपन्न नेत्याचा मुलगा, मुलगी, पत्नी किंवा अधिकारात व्यक्ती याला तर परंपराधिष्ठित अधिकार व्यवस्था प्रत्ययास येते. काही समाजात दैवीगुणसंपन्न नेत्याचा वारस ठरवण्याचा पद्धती परंपरेने चालत आले आहेत. दैवीगुणसंपन्न पद्धतीमध्ये चीनमध्ये माओ, जर्मनीमध्ये हिटलर, इटलीमध्ये मुसोलिनी स्पेन मध्ये फ्रांको, भारतामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, महात्मा गांधी, सुभाष चंद्र बोस, युगोस्लाविया मध्ये मार्शल टिटो, आफ्रिकेत नेल्सन मंडेला, रशियात स्टॅलिन, लेनिन तर इराकमध्ये सद्दाम हुसेन इत्यादी व्यक्तीमत्त्वाचा समावेश होतो.

**३) कायदाधिष्टीत अधिकार व्यवस्था:**

प्रस्थापित किंवा प्रचलित कायद्याने न्याय ठरवलेले सत्ता किंवा प्रभुत्व म्हणजे कायदाधिष्ठित अधिकार होय. कायद्यांनी निर्धारित केलेल्या रीतीने कायदे करण्यात आले तर ते कायदे न्याय ठरतात आणि अशा कायद्यांनी मिळणारे अधिकार देखील न्याय ठरतात. हे अधिकार तार्किक किंवा कायदेशीर असतात. शासनाने केलेल्या नियमानुसार काही स्थाने निर्माण केली जातात. ही स्थाने स्पर्धात्मक पद्धतीने भरली जातात. या स्थानाशी संबंधित दर्जा अधिकार असतात. हे अधिकार लिखित स्वरूपाचे असतात. अर्थात त्यांना कायद्याचा आधार आसतो. त्या अधिकाराना परिभाषित केले जाते, या तार्किकसत्तेत सहभागी व्यक्तींना वेतन मिळते. कायदाधिष्टीत अधिकार व्यवस्थेला शासनाची मान्यता असल्यामुळे लोकही मान्यता देतात.आणि त्याप्रमाणे वर्तन करतात. म्हणजेच लोक आदेश आणि नियमांचे पालन करतात. कायदाधिष्टीत अधिकार हे आधुनिक समाजाचे वैशिष्ट्य आहे. नोकरशाहीत या अधिकाराचा समावेश असतो. वेबरच्या मते, ही मानवाची चिंतन आणि वैचारिक देणगी आहे. थोडक्यात पारंपारिक क्रियेचा संबंध परंपराधिष्ठित आधीकार कार्याशी, तार्किक क्रियेचा संबंध परंपराधिष्टीत अधिकार कार्याशी तार्किक क्रियेचा संबंध कायदाअधिष्ठित अधिकार व्यवस्थेशी आणि दैवीगुण निश्चित अधिकार व्यवस्थेचा संबंध भावनात्मक क्रियेसी असलेला दिसतो.

**सत्तेची कार्ये :**

१) सत्ता शासनाच्या विविध भागांमध्ये उत्पन्न झालेल्या तनावांमध्ये समन्वय साधण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते.

२) सत्ता शासनाच्या विविध भागांमध्ये कायदा सुव्यवस्था राखून ठेवते.

३) सत्ता नेहमीच आपले कार्य आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य निर्णय घेते.

४) सत्ता आपल्या अधिकाराचा सदुपयोग सतेच्या अधिपत्याखाली नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी करते.

५) सत्ता राष्ट्रीय विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असते.

याप्रकारे सत्ता आपले उद्दिष्ट आणि लक्ष्य साध्य करण्यासाठी विभागाअंतर्गत स्वतःच्या अधिपत्याखाली समन्वय समायोजन नियंत्रण आणि कायदे व्यवस्था राखून ठेवण्याचे काम करते.

### २.२.२ राज्याचा अर्थ आणि स्वरूपः

माणसाने स्वतःच्या विकासासाठी समाजामध्ये अनेक संस्थांची निर्मिती केली त्यामध्ये विवाह, कुटुंब, शिक्षण, धर्म आणि राज्य. समाजाच्या या विकासाबरोबर समाजातील निरनिराळ्या संस्थांचे संबंध कसे असावेत, निरनिराळ्या संस्थेमधील आंतरक्रिया कशा असाव्यात हे निश्चित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या नियमांची व ते नियमांच्या कार्यवाहीची आवश्यकता भासू लागली. विविध संस्था व व्यक्ती आंतरक्रिया पार पडत असताना काही वेळा अनेक संघर्ष निर्माण होऊ लागले. या संघर्षाबाबत नियंत्रण निर्माण करणाऱ्या आणखी काही महत्त्वाच्या संस्थांची गरज भासू लागली. ही संस्था या व्यवहारावर पूर्णपणे नियंत्रण ठेवू शकेल त्या गरजेपोटी राज्यसंस्था निर्माण झाली. समाजाची राजकीय संघटना असे राज्यसंस्थेचे स्वरूप असते. राज्याची निर्मिती लोककल्याण जनतेचे हित या हेतूने झाली. राज्याच्या संकल्पनेच्या बाबतीत आणि एक मत देत असल्याचेही दिसून येते अनेक विचारवंतांनी वेगळ्या मुद्द्यांच्या आधारे राजकीय संकल्पनेच्या व्याख्याचे स्पष्टीकरण दिले आहे. राज्य है आदर्शवादी वर्गीय व्यवस्था शक्ती व्यवस्था कल्याणकारी संस्था वैधानिक व्यवस्था सर्वाधिकारी संस्था अशा विविध संकल्पना नी राज्याला संबोधित केलेले आहे.

'राज्य' शब्दाचा अयोग्य वापर – सामान्य बोलल्या जाणार्या भाषेत राज्य हा शब्द सैलपणे वापरला जातो. उदाहरणार्थ, फेडरल सरकारच्या युनिट्स, आम्ही एखाद्या राज्याला राज्य म्हणून संबोधतो, उदा. भारतात पंजाब, राजस्थान, पश्चिम बंगाल इत्यादी आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) मधील न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया यांना राज्य म्हणतात, त्याचप्रमाणे, कधीकधी सरकारी हा शब्द जागोजागी वापरला जातो, कारण सरकारकडून मिळणाऱ्या मदतीला राज्य मदत म्हणतात आणि सरकारी महाविद्यालयाला राज्य महाविद्यालय म्हणतात, राजकारणात 'राज्य' या शब्दाचा विशेष अर्थ आहे. सरकारच्या जागी त्याचा वापर करणे चुकीचे आहे, तसेच संघाच्या घटकांसाठी राज्य हा शब्द वापरता येणार नाही.

**राज्याच्या व्याख्याः**

राज्य ही जागतिक स्तरावरील संस्था आहे. जगातील जवळजवळ संपूर्ण लोकसंख्या वेगवेगळ्या प्रदेशांच्या संघटित राज्यांमध्ये राहते. राज हा राज्यशास्त्राचा मुख्य विषय आहे. विविध लेखकांनी त्यांच्या विचारसरणीनुसार 'राज्य' या शब्दाची व्याख्या केली आहे. राज्याच्या काही महत्त्वाच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**हॉलंडच्या मते** – राज्य हे मानवांच्या समूहाचे नाव आहे जे एका निश्चित प्रदेशात राहतात आणि ज्यामध्ये एक वर्ग अनेक मोजणीच्या आधारे त्याच्या विरोधकांवर राज्य करतो.

**हॉलंडच्या व्याख्येमध्येः** राज्याचे काही आवश्यक घटक देखील समाविष्ट आहेत. त्याची व्याख्या राज्याच्या अंतर्गत सार्वभौमत्वाचे वर्णन करते, परंतु राज्याच्या बाह्य सार्वभौमत्वाचे वर्णन नाही. गिलख्रिस्ट

आणि डॉ. गार्नर यांच्या व्याख्या सर्वोत्कृष्ट मानल्या जातात कारण त्यामध्ये राज्याचे सर्व आवश्यक घटक असतात.

**गिलख्रिस्टच्या मते –** जेथे काही लोक एका विशिष्ट प्रदेशात संघटित सरकारच्या अधीन असतात आणि सरकारला अंतर्गत बाबींमध्ये त्यांचे सार्वभौमत्व व्यक्त करण्याचे साधन असते आणि ते बाह्य व्यवहारात इतर सरकारांपेक्षा स्वतंत्र असते, ते राज्य आहे.

**गार्नरच्या मते,** ''राज्य म्हणजे पृथ्वीच्या एका निश्चित भागात कायमस्वरूपी स्थायिक झालेल्या काही किंवा अधिक लोकांचा समूह आहे, जे बाह्य नियंत्रणापासून पूर्णपणे किंवा पूर्णपणे स्वतंत्र आहेत आणि ज्यांच्या आदेशाचे लोक नैसर्गिकरित्या पालन करतात असे संघटित सरकार आहे.''

**लास्कीच्या मते –** राज्यशासन संस्था आणि प्रजा यांच्यात विभागला गेलेला तसेच आपल्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात इतर सर्व संस्था वर नियंत्रण ठेवणारा प्रादेशिक समाज म्हणजे राज्य होय.

**गॅटेलच्या मते –** निश्चित भू-प्रदेशावर कायम वस्ती करून राहणारा बाह्य नियंत्रणापासून कायदेशीररीत्या स्वतंत्र असणारा, आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व व्यक्ती आणि गट यांच्यातील कायदे करून ते अमलात आणणारी शासनसंस्था असणारा लोकसमूह म्हणजे राज्य होय.

**ऑपन हेम:** जेव्हा लोक आपल्या स्वतःच्या सार्वभौम शासन संस्थेच्या नियंत्रणाखाली एका देशात स्थायिक होतात तेव्हा राज्य अस्तित्वात येते.

**मॅकआयव्हर:** राज्य म्हणजे दंड सत्ता अधिकारी सरकारने प्रसिद्ध केलेल्या कायद्याप्रमाणे विशिष्ट भूभागात राहणाऱ्या समाजात समाज व्यवस्थेसाठी आवश्यक असणारी सार्वदनिक परिस्थिती कायम ठेवणारे संघटना होय

State is an association which acting through law as promulgated by government endowed to this end with a power coercive maintains within a community Territorially demarcated the universal external conditions of the social order.

**कार्ल मार्क्स:**

राज्य शक्तीवर आधारित अशी यंत्रणा आहे की, ज्याची निर्मिती एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्याकरता केलेली आहे.या भारतीय राज्य शक्तीवर आधारित असून ती वर्गीय संघटना आहे, परंतु उदारमतवाद्यांना हे मत मान्य नाही. त्यांच्यामध्ये राज्याची विकृत स्वरूप स्पष्ट करणारी अशी आहे. कारण मागची व्याख्या राज्याचे स्वरूप स्पष्ट करण्यास योग्य वाटत नाही ती मर्यादित स्वरूपाचे आहे. आधुनिक काळातील अनेक विचारवंतांनी केलेले व्याख्यान अभ्यासला असता, राज्याच्या मूलभूत वैशिष्ट्य याबाबत स्पष्टता येते काही व्याख्याने राज्याच्या मूलभूत वैशिष्ट्ये याच्या व्याख्या येतच उल्लेख केल्याचे आढळते सदर व्याख्या यांच्या आधारे राज्य निर्माण होण्यासाठी खालील वैशिष्ट्यांची आवश्यकता आहे.

१) राज्य निर्मितीला निश्चित असा भूप्रदेश असला पाहिजे.

२)  त्या भूप्रदेशावर कायम वस्ती करून राहणारा लोकसमूह पाहिजे.

३)  त्या लोक समूहाची सामुदायिक इच्छा ज्याद्वारे व्यक्त होते आणि अमलात आणली जाते अशी सर्वोच्च सत्ता असले पाहिजे.

४)  तो समुदाय बाह्यनियंत्रणापासून मुक्त असला पाहिजे.

गार्नर यांनी आपल्या व्याख्येत स्पष्ट केल्या प्रमाणे राज्याचे चार घटक पाडले आहेत.

लोकसंख्या, भूप्रदेश, शासनसंस्था, सार्वभौमत्व यापैकी एकही घटक कमी असेल तर राज्याची निर्मिती होऊ शकत नाही.

**लोकसंख्याः**

कोणत्या ही सामाजिक संस्थेचे निर्मितीसाठी लोकसंख्या अतिशय महत्वाची भूमिका पार पाडते. सामाजिक व मानवासमोरची यातून राज्य ही संकल्पना निर्माण झाली. माणूस समाजातच राज्याची निर्मिती होते. म्हणूनच लोकसंख्या ही राज्याची निर्मितीची मूलभूत गरज आहे. लोकसंख्येच्या अस्तित्वाशिवाय राज्य संकल्पनेला महत्त्व राहत नाही याचाच अर्थ की लोकसंख्या हा राज्याचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. मानवाच्या सामाजिक जीवनाच्या गरजेतून राज्याची निर्मिती झाली. राज्याच्या व्याख्येत विशिष्ट भूप्रदेशावर कायमस्वरूपी वस्ती करून राहणारा लोकसमुदाय असा उल्लेख आढळतो. यावरून राज्याच्या अस्तित्वासाठी लोकसंख्या हा मूलभूत घटक मानला जातो. लोकसंख्या आवश्यक बाब असली तरीही किती असावी निश्चित नियम नाही, कारण जगामध्ये एका बाजूला चीन, भारत यासारख्या अतिविशाल लोकसंख्या असलेली राज्य आहेत, तर दुसऱ्या बाजूस मोन्याको सॅन मरिनो यासारख्या अगदी छोटी छोटी राज्य सुद्धा आहे. राज्याची लोकसंख्या किती असावी याबाब समाजशास्त्रज्ञामध्ये मतभेद आढळून येतात. आरिस्टाटल म्हणतो की, ''लोकसंख्या स्वयंपूर्ण होणे इतकी मोठी आणि सुव्यवस्थित राज्यकारभार होणे इतकी लहान असावी.'' राज्याच्या बाबतीत विचार करावयाची झाल्यास फक्त लोकसंख्या विषयी विचार करून चालत नाही तर लोकांच्या गुणवैशिष्ट्यांचा विचार करावा लागेल कारण लोकांच्या गुणवैशिष्ट्ये असून राज्याची बळकटी व दर्जा प्रतिष्ठा इत्यादी बाबीवरती त्याचा परिणाम होतो. नागरिक कर्तव्यदक्ष विचारी उद्योगी स्वाभिमान असतील तरच राज्य प्रगती करू शकते. लोकसंख्येचा राज्याचा आर्थिक आणि विकासावर फार मोठा प्रभाव पडतो राज्याची लोकसंख्या प्रदेशाच्या मानाने फारच कमी असेल तर काही प्रश्न राजासमोर उभे राहतात. उत्पादन नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर इत्यादी व त्याचा परिणाम राज्याच्या विकासावर त्याचा परिणाम होतो. याउलट राज्याची लोकसंख्या जास्तीत जास्त तर त्याचा विपरीत परिणाम राज्याच्या विकासात पडतो. राज्याला लोकांच्या नियंत्रणात ठेवणे अन्न, वस्त्र, निवारा शिक्षण इत्यादी आरोग्य इत्यादी सुख होईल पुरवण्यासाठी राज्याला जास्तीत जास्त शक्ती खर्च करावी लागते. बेकारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, राहणीमान पिंपरीत परिणाम होतो म्हणून वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, राज्याची लोकसंख्या फारच कमी असू नये तसेच जास्त असू नये राज्याची लोकसंख्या ही त्या प्रदेशातील उपलब्ध साधनसामग्री यांच्या समप्रमाणात असावी. अरिस्टोटल आणि रुसू म्हणतात त्याप्रमाणे राज्याला स्वयंपूर्ण बनवू शकेल

इतकी लोकसंख्या असावी प्राचीन ग्रीक विचारवंतांनी नागरिकांच्या नैतिक गुणाच्या विकासावर अधिक भर दिला आहे.

**भू-प्रदेश:**

भूप्रदेश हा राज्याचा दुसरा महत्वाचा आवश्यक घटक आहे. राज्याचा अधिकार विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांवर चालत असतो. त्यामुळे राज्याला विशिष्ट भूप्रदेश आवश्यक मानला जातो भटकंती करणाऱ्या समाजास राज्य म्हणून मान्यता मिळू शकत नाही. आधुनिक काळात भूप्रदेश हा राज्याचा आवश्यक घटक म्हणून मान्यता मिळाला असला तरी पूर्वीच्या कालखंडात शास्त्रज्ञांनी भूप्रदेश या घटकांची आवश्यकता असते असे मानत नव्हते पण आज आधुनिक विचारवंतांमध्ये या मताला तेवढा पाठिंबा मिळत नाही कारण तात्त्विक व व्यावहारिकदृष्ट्या विशिष्ट भूप्रदेश  हा एक आवश्यक घटक मानला जातो. भूप्रदेशाच्या आधारावरच लोकांमध्ये एकता परस्पर सहकार्य, बंधुभाव, राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते ती राज्यासाठी आवश्यक बळकटी आणणारी बाब ठरते. पूर्वीच्या काळी लहान भूप्रदेश असावा असे प्रतिपादन केले तरी अलीकडे संरक्षण आर्थिक विकास व्यापारात वाढ होण्याच्या दृष्टीने मोठ्या क्षेत्रफळाचे राज्य निर्माण करण्याकडे कल असतो असे दिसून येते. फ्रेंचतत्त्वज्ञ यांनी  भूप्रदेशाचा बाबतीत एक सूत्र दिले आहे.राज्याचा विस्तार राज्यकारभार व्यवस्थित कमी करता येणार नाही इतका मोठा नसावा आणि राज्य स्वयंपूर्ण होणार नाही इतका लहान नसावा भौगोलिक विस्तार, हवामान आणि नैसर्गिक साधन संपत्तीचा राज्याच्या विकासावर फार मोठा प्रभाव पडतो. भौगोलिक परिस्थितीला राष्ट्रशक्ती एक घटक मानले जाते. राज्याचा भूप्रदेश लहान असेल तर ते राज्य संरक्षणाच्या दृष्टीने कुमकुवत बनते. मर्यादित भूप्रदेशात असेल तर ते राज्य आपल्या अत्यावश्यक गरजा पूर्ण करता येत नाहीत छोट्या राज्यांना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या राज्यावर अवलंबून राहायला लागते. मोठी राज्य परिस्थितीचा गैरफायदा घेताना दिसतात राज्याची भूमी सुपीक असेल हवामान पोषक असेल खनिज पदार्थ कोळसा, पेट्रोलियम पदार्थ लोखंड इत्यादी विविध विपुल प्रमाणात असेल तर राज्याचा भूप्रदेश छोटा असून देखील झपाट्याने प्रगती साधता येईल. अमेरिका, जर्मनी इत्यादी देशांचा प्रदेशातील खनिज पदार्थाने प्रगत देशांमध्ये समावेश होऊन शक्तिशाली राज्य बनले. पदार्थाच्या नैसर्गिक उपलब्धतेमुळे जागतिक पातळीवर वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. भौगोलिक परिस्थितीचा राज्याची सैनिक शक्ती, उद्योग, व्यापार, व्यवसाय आणि मानवी स्वभाव व प्रवृत्ती यावरही प्रभाव पडतो. भूप्रदेश, नैसर्गिक सीमा या संरक्षणाच्या दृष्टीने राज्याला महत्त्वाच्या ठरतात. भौगोलिक परिस्थिती हवामान याचा परिणाम राज्याच्या प्रमुख व्यवसाय वरती पडतो. आधुनिक काळात वैज्ञानिक प्रगती वाहतुकीची दळणवळण साधने परस्पर सहकार्य आंतरराष्ट्रीय राजकारण इत्यादी गोष्ट भूप्रदेश या तत्वाला अधिक महत्त्व राहिलेली दिसत नाही. राज्याच्या भूप्रदेशात शेतीयोग्य व इतर जमीन, पर्वत, नद्या, जलाशय, हवामान, भूगर्भातील खनिज, प्रदेशावर अवकाश व प्रदेशाला लागून असणारा समुद्राचा पाच ते पंधरा किलोमीटरचा पर्यंतचा किनारा इत्यादी समावेश होतो.

**शासनसंस्था:-**

शासनसंस्था हा राज्याचा तिसरा महत्त्वाचा घटक आहे. शासनसंस्था हा घटक असल्याशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. लोकसंख्या हा राज्याचा व्यक्तिगत महत्त्वाचा मुलभुत पाया आहे. भूप्रदेश हा राज्याचा भौतिक मुलभूत पाया तर शासनसंस्था हा राज्याचा संघटनात्मक मूलभूत पाया मानला जातो. एखाद्या विशिष्ट भूप्रदेशात कायम वास्तव्य करणाऱ्या लोक समुदायास तोपर्यंत राज्याचे स्थान देता येत नाही. जोपर्यंत लोक समुदायाचा राजकीयदृष्ट्या सुसंघटित होत नाही म्हणजे राज्य निर्माण होण्यासाठी एखाद्या संघटनेची गरज असते. ती गरज शासनसंस्था आणि संघटना पूर्ण करते. राज्य हि अमूर्त संकल्पना मांडली जाते व शासनसंस्था आहे. त्याचे मूर्त स्वरूप मानले जाते.राज्याने संकलित केलेली उद्दिष्टे, शासनसंस्था पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असते. अभिव्यक्ती करण्याचे व त्यांना मूर्त स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य शासनसंस्थेकडून पार पाडले जाते. राज्याचा संबंध शासन संस्थेच्या माध्यमातून जनतेशी येतो म्हणजेच शासनसंस्था हे राज्याचे व्यावहारिक प्रारूप आहे. शासनसंस्था आहे राज्याचे असे माध्यम आहे की, ज्याद्वारे राज्याचे देश यथार्थ सामान्यतः धोरणे आणि सामान्य हिताची पूर्तता केली जाते. कोणत्याही समाजाच्या सामान्य गरजा असतात. संरक्षण अंतर्गत शांतता व सुव्यवस्था आणि समाजाच्या बाहेरील जगाशी संबंध ह्या त्या गरजा होय. त्या गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याचे अस्तित्व असते पण या गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याचे हे कार्य शासनसंस्था करते. संरक्षणासाठी सैन्याची उभारणी अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था यासाठी दडपशाहीचा वापर आणि बाह्य जगाशी संबंध ठेवण्यासाठी विदेशनीतिचे संचालन शासनसंस्था करीत असत ते कार्य पार पाडण्यासाठी शासनसंस्थेचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ हे तीन विभाग असतात. कायदेमंडळ कायद्याची निर्मिती करते, कार्यकारी केंद्र कायदा व सामान्यतः धोरणाची अंमलबजावणी करण्याचे कार्य करते, न्याय मंडळ न्याय देण्याचे कार्य करते. राज्यातील नागरिक प्रत्यक्षात राज्यकारभारात पूर्ण सक्रिय होऊ शकत नाही म्हणून राज्यकारभाराची जबाबदारी शासन संस्थावर असते. नवीन कायदे निर्माण करणे जुने कायदे रद्द करणे व हे प्रमुख कार्य शासन संस्थेचे करावे लागतात. शासन संस्थेचे निरनिराळे प्रकार असतात. उदाहरणार्थ, लोकशाही शासन व्यवस्था, हुकूमशाही शासन व्यवस्था, संसदीय शासन पद्धती अध्यक्षीय शासन पद्धती संघीय शासन राजेशाही इत्यादी शासन व्यवस्थेचे प्रकार पडतात.

**सार्वभौमत्व:**

सार्वभौमत्व किंवा सार्वभौम सत्ता हा राज्याचा सर्वात महत्वाचा आवश्यक घटक होय. सार्वभौमत्व असल्याशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. एखाद्या सामाजिक समूह संघटने राजकीय जगत असेल पण तो एकाद्या अन्य सामाजिक समूहाच्या नियंत्रणाखाली असेल तर त्याला राज्य संबंध येत नाही. सार्वभौमत्वाचा संबंध हा राज्याच्या अंतर्गत सार्वभौमत्व व बाह्य सार्वभौमत्व याच्याशी येत असतो. म्हणजेच अंतर्गत स्वातंत्र्य व बाह्य स्वातंत्र्य या संकल्पना इथे अभिप्रेत आहेत. सार्वभौमत्व हा राज्याचा आत्मा आहे. राज्याला सार्वभौमत्व प्राप्त झाल्यामुळे राज्यसंस्था समाजातील इतर संस्थेपासून वेगळी व अधिकाऱ्याने श्रेष्ठ संस्था म्हणून अस्तित्वात आले आहे. सर्वश्रेष्ठ व अंतिम निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होणाऱ्या सामाजिक संस्थेत समाजातील अन्य संस्थेच्या तुलनेने श्रेष्ठ मानले जाते. हे श्रेष्ठत्व सार्वभौमत्वामुळे राज्यात प्राप्त झाले

आहे. सार्वभौमत्व यामुळे इतर सर्व संस्थांना राज्याच्या अधीन राहून कार्य करावे लागते. अशा रीतीने सार्वभौम सत्ता हा राज्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण गुण आहे.  सत्ता हा राज्याचा आत्मा आहे जो पर्यंत सार्वभौम सत्ता असते तोपर्यंत राज्य अस्तित्वात असते, सार्वभौम सत्ता नष्ट झाली की राज्यही नष्ट होते. बोंदो यांच्या मतानुसार,सार्वभौम सत्ता नागरिक आणि प्रजा यांच्यावर चालणारी ही सर्वोच्च सत्ता आहे. जिच्यावर कायद्याची कोणतीही बंधने नसतात. जेलीने यांच्या मते,सार्वभौम सत्ता राज्याच्या असा गुन्हा आहे की, ज्याच्यामुळे राज्य स्वतःच्या व्यतिरिक्त दुसऱ्याची इच्छा किंवा कोणत्याही बाह्य सत्तेच्या आदेशाने मर्यादित झालेली नसते या व्याख्येवरून सार्वभौमत्वाचे दोन महत्त्वाचे गुण स्पष्ट होतात. एक सार्वभौमत्व निरंकुश असते व दुसरा म्हणजे सार्वभौमत्व हे आमर्यादित असते. सार्वभौमत्वाचे दोन लक्षणे दिसून येतात.

**१. अंतर्गत सार्वभौमत्व:**

अंतर्गत सार्वभौमत्व म्हणजे राज्य आपल्या भौगोलिक सीमांच्या आज सर्वोच्च किंवा सर्वश्रेष्ठ असते. राज्यांतर्गत अस्तित्वात असणाऱ्या सर्व संस्था व संघटना व्यक्ती यांच्यावर राज्याचे नियंत्रण प्रस्थापित झालेले असते. राज्याचे कायदे म्हणजेच राज्याच्या आज्ञा होत राज्यातील सर्वांना राज्याच्या आज्ञांचे पालन करावे लागते. या अज्ञानाचा भंग करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेत शिक्षा करण्याचा अधिकार राज्य संस्थेस प्राप्त होतो.

**बाह्य सार्वभौमत्व:**

बाह्य क्षेत्रात राज्य पूर्णता स्वातंत्र्य असते बाह्य सत्तेचे नियंत्रण राज्यावर नसते. आपली विदेश नीति, युद्ध, तह, शांतता, तटस्थता इत्यादी गोष्टी संबंधी राज्य स्वतः निर्णय घेते आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सर्व राज्यांचा दर्जा समान असतो. एक राज्य दुसऱ्या राज्यात आदेश देऊ शकत नाही किंवा दुसऱ्या राज्याच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू शकत नाही. सार्वभौम सत्तेसंबंधीच्या समस्या सरळ युद्धांना जन्म देतात. लास्कीच्या मते, आधुनिक राज्य प्रभुत्व संपन्न आसते त्यामुळे इतर राज्यात समोर ते स्वतंत्र असते राज्य आपली इच्छा अशा रीतीने अभिव्यक्त करते की कोणत्याही बाह्य सत्तेचा प्रभाव त्याच्यावर पडत नाही.

**सारांश:** राज्य या शब्दात विशिष्ट भूप्रदेश त्यात तर होणार लोक त्यांचे नियमन करणारे शासनसंस्था आणि सार्वभौमत्व याचा समावेश होतो.

### २.२.३ नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरूप:

'सिव्हिल' सोसायटीसाठी इंग्रजीत 'सिव्हिल' किंवा 'सोसायटी' असा शब्द वापरला जातो. नागरी म्हणजे नागरी. इतर अर्थ नागरिक, नागरी बाबी, सभ्य आणि सहकारी व्यक्ती, जबाबदार आणि सुसंस्कृत व्यक्ती यांच्याशी संबंधित आहेत. समाज म्हणजे समाज खरे तर नागरी समाज हा सुसंस्कृत, जागरूक आणि जबाबदार व्यक्तींचा समूह आहे. या अर्थाने ते राज्यापेक्षा वेगळे आहे, कारण राज्यात संपूर्ण संघटित आणि असंघटित क्षेत्र समाविष्ट आहे, तर सुसंस्कृत समाजात केवळ संघटित क्षेत्र समाविष्ट आहे. निरुत्तर, चोर,

हल्लेखोर असे सर्व प्रकारचे लोक राज्यांतर्गत येतात, तर सुसंस्कृत समाजात केवळ जबाबदार आणि योग्य कायदेशीर काम करणारे लोक येतात. यामागे राज्याची मुख्य भूमिका नागरी समाजाचीच आहे.

**नागरी समाजाची व्याख्या:–**

**एस.के दास–** सिव्हिल सोसायटी म्हणजे संघटित समाजावर राज्य चालते.

**जेफ्री अलेक्झांडर** – सिव्हिल सोसायटी ही एक सर्वसमावेशक छत्रीसारखी संकल्पना आहे जी राज्याबाहेर असलेल्या अनेक संस्थांच्या छायेखाली आहे.नागरी समाजाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत:

**नीरजा गोपाल जयल** – भारतातील नागरी समाज हा संघटित गटाच्या अर्थाने नव्हे तर राज्याविरुद्ध विकसित झालेला मानला जातो.

१. हे संघटित समाज दाखवते, २. हे गैर–राज्य संस्थांना संदर्भित करते, ३. त्यात भाग समाविष्ट आहे, ४. यामध्ये राज्य आणि कुटुंब यांच्यातील गट येतात. म्हणजेच नागरी समाज हा राजकीय आणि नैसर्गिक समाज यांच्यातील समाज आहे, ५. हा विचार मुक्त समाज आहे, ६. म्हणूनच हा पुरोगामी समाज आहे, ७. त्यामुळे राजकीय–प्रशासकीय बाबींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो, ८. त्यामुळे सत्तेच्या निरंकुशतेला आळा बसतो, ९. तो  बौद्धिकदृष्ट्या प्रगत आहे, १०. त्यामुळे जनमत तयार होते, ११. हे राज्य नियंत्रण कमी करण्यासाठी बहु–संस्थाकरण (एकाधिक संस्थांची निर्मिती) करण्यास अनुकूल आहे, १२. हे दडपशाहीच्या विरोधात स्वयंसेवीपणाचे समर्थक आहे, १३. त्यामुळे ही नैतिक आणि मूल्यावर आधारित व्यवस्था आहे.

**नागरी समाजाची भूमिका:**

नागरी किंवा सुसंस्कृत समाज ही संकल्पना उत्तर आधुनिक युगातील लोकप्रिय संकल्पना आहे. राज्य आणि नागरिकाची पारंपारिक धारणा कोलमडली आहे आणि दोघांमध्ये व्यापक भेद निर्माण झाला आहे.

पहिले राजकीय तत्वज्ञानी जी.एफ. हेगेल यांनी राज्यातून नागरी समाजाची संकल्पना मांडली. नंतर कार्ल मार्क्स, फेडरिक एंजल्स यांसारख्या साम्यवादी विचारवंतांनी नागरी समाजाची संकल्पना पुढे नेली. विसाव्या शतकात अँटोनियो ग्राम्सी यांनी या संकल्पनेचे विस्तृत विश्लेषण मांडले.

खरं तर, आधुनिक समाजात तीन मुख्य क्षेत्रे आहेत:

१. सरकार २. बाजार आणि ३. नागरी समाज

तिसरे क्षेत्र म्हणजे नागरी किंवा नागरी समाज पहिल्या दोन क्षेत्रांवर लोकशाही जागरूकतेने नियंत्रण ठेवते.

देशाच्या विकासात आणि कल्याणात नागरी समाजाची भूमिका महत्त्वाची असते. त्याची उपस्थिती अस्तित्वावर नियंत्रण ठेवते आणि त्याची सक्रियता अस्तित्वाला लोकाभिमुख दिशा देते.

नागरी समाजाच्या भूमिकेचे पैलू पुढीलप्रमाणे आहेत.

१. समानतेवर आधारित सार्वजनिक कल्याणाचा प्रचार करणे.

२. यासाठी आर्थिक-सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांच्या-समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करणे.

३. प्रशासनात लोकसहभाग विकसित करणे.

४. सरकारी योजना आणि सार्वजनिक समस्यांची माहिती जनतेला सरकारपर्यंत पोहोचवणे.

५. प्रशासकीय यंत्रणेवर सामुदायिक जबाबदारीची प्रणाली लागू करा. त्यामुळे प्रशासनातील हुकूमशाही आणि भ्रष्टाचाराला आळा बसला असता.

६. प्रशासन लाभार्थीभीमुख बनवा. त्यांच्याद्वारे प्रशासनाचे लक्ष्य गट निश्चित करणे सोपे होते.

७. ते स्थानिक विकासासाठी स्थानिक संसाधनांचे शोषण सुनिश्चित करण्यात मदत करतात. यातून समाजाच्या स्वावलंबनाचा विकास होतो.

८. ते स्थानिक सरकारला सक्षम करतात. त्यांचे पूरक म्हणून काम करा.

९. ते स्थानिक पातळीवर सार्वजनिक चौकीदार आहेत.

१०. ते लोकांमध्ये राजकीय-प्रशासकीय चेतना निर्माण करतात.

११. ते लोकांच्या मागण्यांचे आयोजन करतात.

१२. ते परस्पर मदतीद्वारे स्वावलंबी तत्त्वाचे समर्थन करतात.

१३. प्रा. राजकृष्णाच्या मते, ते गरिबांचे दुःखदूर करण्यात आणि ग्रामीण गरिबांच्या संपर्कात राहण्यात अधिक चांगले आहेत. तसेच त्यांची कार्यपद्धती सरकारच्या तुलनेत लवचिक आहे.

नागरी समाज हा सरकारचा विरोधक नसून ती पूरक व्यवस्था आहे. नागरी समाज असा उल्लेख सर्वप्रथम कोणी केला तर तो सिसिरोने केला आणि हेगेल यांनी ही संकल्पना लोकप्रिय केली. खऱ्या अर्थाने नागरी समाजाचा विकास विसाव्या शतकात झाल्याचे दिसून येते. नागरी समाज म्हणजे असा समाज जो स्वतंत्र नागरिकांनी बनलेला असतो, आणि नागरिकांना कायदेशीर अधिकार प्राप्त झालेला असतो. परंतु नागरी समाजामध्ये विवेकी विचार आला प्राधान्याने महत्व दिले जाते. परंतु ज्याप्रमाणे विचार प्रणाली असेल त्याप्रमाणे नागरी समाजाचा अशी देखील बदलत जातो. नागरी समाजाची कल्पना अलीकडे मोठ्या प्रमाणावर विकसित करतानाचे दिसून येते. नागरी समाज ही कल्पना ग्रीक तत्त्वज्ञ यांनी मांडलेल्या राज्यायासंबंधीच्या विचारांमध्ये दिसते. कारण अरिस्टोटल असे म्हणतो की, माणूस हा समाजशील तसेच राजकीय प्राणी आहे म्हणून माणूस समाजाशिवाय एकटा राहू शकत नाही. तो समाजात राहूनच एकमेकांच्या सहकार्याने आपल्या जीवनाची पूर्ती करू शकतो. त्याच बरोबर राज्यांमध्ये मानवाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी निरनिराळे समुदाय अस्तित्वात येतात आणि आपले उद्देश साध्य करत असतात. हे समुदाय राज्यातच शक्य असतात

त्याशिवाय त्यांना आपला उद्देश पूर्ण करणे शक्य नसते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची राज्य हे साधन असून मानवाच्या सर्वांगीण विकास हे राज्याचे ध्येय असते. त्यामुळे तर राज्य ही एक सर्वोच्च संस्था आहे. राज्य म्हणजे कुटुंब आणि खेडी यांचा समुदाय या समुदायात सुखी व स्वयंपूर्ण जीवन जगता येते, अशी अरिस्टोटल यांची भूमिका होती. म्हणून तो राज्याला प्रथम, तर व्यक्तीला दुय्यम महत्त्व देतो, परंतु तो जो राजकीय अधिकाराबद्दल सांगतो, त्यामध्ये फक्त पुरुषांना तो अभिप्रेत धरतो त्यामध्ये स्त्रीया व गुलाम यांना समावेश करत नाही. अशाप्रकारे नागरी समाजाचा विचार करता अरिस्टोटलने मर्यादित स्वरूपात विवेचन केले आहे. रोमन साम्राज्य मध्ये सीसेरो यांनी असे म्हटले की, राज्य ही जनतेची सामूहिक इच्छा आहे. जनता म्हणजे केवळ एकत्र राहणारा जमाव अथवा समुदाय नव्हे, तर परस्परांना साहाय्य करण्याच्या भावनेने आणि विनिमय व परस्परांचे अधिकार यासंबंधी विशिष्ट सहमती दर्शवून संघटित होणाऱ्या लोकांना जनता असे म्हटले पाहिजे, कारण जनता केवळ भीतीमुळे किंवा दुर्बलतेमुळे संघटित होत नाही. समाजामध्ये राहतो हे मानव आणि निसर्ग प्रवृत्ती आहे. अशाप्रकारे नागरी समाजाचा उल्लेख सर्वप्रथम सीसेरोने केल्याचे दिसून येते. आधुनिक काळामध्ये नागरी समाजाची संकल्पना विकसित झाली आहे. नव्या नागरी समाज संकल्पनेत व्यक्तीला समाजात राहून आपले हित साधणारा घटक मानण्यात आले. तसेच व्यक्तीही समाजशील आहे, असा विचार उदयास आला. त्याचबरोबर जगामध्ये स्वातंत्र्य, समता आणि कायद्याचे राज्य आधारावरती राजसत्तेला आव्हान देण्यास सुरुवात झाली. त्यातून समाजामध्ये विविध खुल्या आणि भूमिगत चळवळ निर्माण झाल्या आहेत. ससूचनांची नवी माध्यमे तसेच वृत्तपत्रे आणि ग्रंथ जन्मत तयार करण्यास हातभार लावला आणि या चळवळी राज्यसंस्थेचे विरुद्ध असंतोष व्यक्त करू लागले या गोष्टींना नागरी समाजाची प्रथम अवस्था असे म्हणता येईल. नागरी समाज हा स्वतंत्र असला पाहिजे त्यासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे व्यक्ती स्वातंत्र्यासाठी खाजगी मालमत्तेचा अधिकार असला पाहिजे. हेगेलने नागरी समाजाची कल्पना विस्ताराने मांडली एवढेच नव्हे तर ती लोकप्रिय केली आहे. हेगेलची नागरी समाजाची कल्पना उदारमतवादी विचाराप्रमाणे व्यक्तीला स्वायत्त अस्तित्व आणि व्यक्तीचे हक्क आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी नाही, तर हि ती राज्याला सर्वोच्च मानणारी आहे. हेगेलने १९२१ सालीं ''द फिलोसोफी ऑफ राईट'' (The Philosophy of right.) या ग्रंथात नागरी समाजाची कल्पना आभारी आहे. हेगेलच्या मते, आधुनिक राज्य हे कुटुंब, नागरी समाज आणि राज्य या तीन संस्थांमध्ये विभागलेले असून ते वेगवेगळ्या तत्त्वावर आधारलेले आहेत. कुटुंब हे प्रेमाच्या व सुखाच्या आधारावर असून हेगेल त्याला वाद म्हणतो. नागरी समाज म्हणजे कुटुंबाचा प्रतिवाद आहे. कुटुंबात त्यागाची भावना असते व समाजात स्पर्धा व संघर्ष असतो. समाजात प्रत्येक व्यक्ति आपला स्वार्थ पाहतो. त्यामुळे त्यातून संघर्ष निर्माण होतो म्हणून तो संघर्ष निवारण्यासाठी परस्पर प्रेमाची आवश्यकता वाटू लागते. या परस्पर प्रेमातून राज्याची निर्मिती होते. कुटुंब व समाज यांच्या समन्वयातून राज्याची निर्मिती झाली आहे. राज्याला हेगेलने सर्वोच्च स्थान दिले आहे. हेगेलच्या मते, नागरी समाजाच्या, न्याय प्रशासन, व पोलीस यांचा राज्याशी घनिष्ठ संबंध असतो. नागरी समाज यावर आधारलेला असतो. कारण नागरी समाज म्हणजे राज्याचे असे स्वरूप आहे की, ज्यामध्ये समाजाला स्वतंत्र व्यक्तीचा समूह मांनले जाते, त्यामुळे तेथे व्यक्तीला प्राप्त झालेल्या स्वातंत्र्य हे अपूर्ण आणि आवश्यक असते. संपूर्ण स्वातंत्र्यासाठी समूहात एकता असणे आवश्यक आहे. नागरी समाजातील व्यक्तीला

मिळणारे स्वातंत्र्य केवळ औपचारिक आणि तो पोकळ आहे. हेगेलच्या मध्ये नागरी समाजात व्यक्तीला स्वातंत्र्य असून आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आदर करणे हीच त्याची मर्यादा आहे. नागरी समाजात निर्माण झालेल्या समस्येचे निराकरण करण्याचे कार्य राज्याच्या आहे. हेगेलच्या मते, राज्यसंस्था सर्व प्रकारच्या अंतर विरोधाचे आणि समस्येचे निराकरण करते.

**हेगेलने मांडलेल्या नागरी समाजाचे स्वरूप खालीलप्रमाणे:**

१) नागरी समाज हा वैश्विक कुटुंब आहे, कारण प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य इतर व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे.

२) नागरी समाजामध्ये जगण्याच्या गरजा वर आधारित संस्था निर्माण झालेल्या आहेत ज्या गरजा पूर्ण करण्यासाठी कार्य करतात.

३) नागरी समाजात व्यक्ती स्वहितासाठी कार्य करत नसून राज्याच्या विकासासाठी कार्यकर्ते अशा प्रकाराने हेगेल नागरी समाजाला महत्त्व न देता राज्याला महत्त्व दिले आहे. सेबाइनच्या शब्दात, हेगेलचे राज्य हे उपयुक्ततावादी संस्था नसून, सार्वजनिक सेवा देण्याची, कायद्याच्या अंमलबजावणीची आणि आर्थिक व औद्योगिक हितसंबंध जोपासण्याचे कार्य स्वराज्य संस्था पारपाडते. नागरी समाज निरीक्षण आणि नैतिक आयुष्यासाठी राज्यावर अवलंबून राहतो. राज्य आपल्या नैतिक उद्देशाच्या पूर्तीच्या साधनासाठी नागरी समाजावर अवलंबून असते. राज्य व नागरी समाज एकमेकावर अवलंबून असले तरी एक दुसऱ्यापासून ते भिन्न आहेत. राज्य साधन नसून साध्य आहे, म्हणजे हेगेलच्या मांडणीनुसार नागरी समाजाची निर्मिती राज्याची उच्च नैतिक उद्दिष्टे आणि ती साध्य करण्यासाठी झालेली असते. उदारमतवादी विचारवंतांनी नागरी समाजाला महत्व दिले तर हेगेले राज्यसंस्थेला महत्व दिले.

**नागरी समाजाविषयी मार्क्सचे विचार:**

हेगेल प्रमाणेच मार्क्सने ही राज्य आणि नागरी समाजाच्या संदर्भात मांडणी केली आहे, कारण मार्क्सच्या मते, राज्य हे नागरी समाजापेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही, तसेच राज्य हे नागरी समाजातील हीच संबंधापासून तथ्य स्वतंत्र राहू शकत नाही. तसेच राज्य हे नागरी समाजातील अंतर विरोध किंवा वर्गरचना हे राज्यसंस्थेवर प्रतिबिंबित आहे. मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजव्यवस्था, राज्यसंस्था ही भांडवलदारांच्या हातातील बाहुले आहे. तर एंजल्स यांच्यामते, भांडवलदारांना राज्यसंस्था प्राधान्य देऊन कामगारांचे शोषण करते. राज्य म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गात शोषण करणारे यंत्र असल्यामुळे नागरी समाजामध्ये विषमता निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्य संस्थेद्वारे अंतर्विरोध दुर होतील आणि माणसाला आपले स्वातंत्र्य प्राप्त करता येईल असे म्हणणे चुकीचे आहे. नागरी समाज आणि राज्यसंस्था यांच्यातील द्वैत नष्ट होण्यासाठी नागरी समाजाला बळ देऊन उपयोगाचे नाही, कारण त्यामधून वर्गीय विषमताच वाढेल. तसेच राज्यसंस्थेला बळ देऊन चालणार नाही, कारण राज्यसंस्थेची सत्ता जास्त दूर होईल म्हणून जोपर्यंत राज्यसंस्था राहील तोपर्यंत समाजामध्ये कधीही शांतता प्रस्थापित होणार नाही. व्यक्तीला स्वातंत्र्य मिळणार नाही त्यामुळे समाजातील खाजगी संबंध नष्ट केले पाहिजे. वर्गाचा नाश केला पाहिजे तेव्हा राज्यसंस्था

नावाच्या परोपजीवी संस्थेची आवश्यकता राहणार नाही जर समाजात वर्ग नसतील तर राज्यसंस्था नसेल तर खऱ्या अर्थाने नागरिकांना स्वातंत्र्य मिळेल.

**नागरी समाजाविषयी ग्रामसीचे मत:**

विसाव्या शतकामध्ये आँटीनोग्रामसीने नागरी समाजाच्या संकल्पनेला भरीव योगदान दिले. मार्क्स ने राज्यसंस्था ही भांडवलदार वर्गाच्या हातातील हत्यार आहे आणि या हत्यारांच्या सहाय्याने तो वर्ग समाजाचे शोषण करत असते असे मत मांडले, तर ग्रामसीने नागरी समाज व राज्यसंस्था याचे स्वरूप परस्परसंबंध याची मांडणी केली आहे. त्यात राज्य संस्थेबरोबर नागरी समाजाला महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्या मते, समाजात वर्गीय संघर्ष हा एकमेव संघर्ष नसून भाषा-संस्कृती, राष्ट्र, लिंगभाव, श्रेष्ठत्व, शहर व ग्रामीण भाग इत्यादी घटकांच्या आधारावर ती संघर्ष निर्माण होतात. त्यात भांडवलदार वर्ग प्रभावी असतो, त्यामुळे भांडवलदार आणि इतर संघटना यांच्यामध्ये वर्चस्वासाठी संघर्ष चालू असतो. नागरी समाजात वेगवेगळे वर्ग, गट, संघटना यांच्यात परस्परसंबंध भीषण स्वरूपाच्या असतात. या संघटना राज्यसंस्थेच्या विरोधात संघर्ष करतात. ग्रामस्थांच्या मते, राज्यसंस्थेची शासन यंत्रणा, सेना, पोलिस, नोकरशाही, तुरूंग, न्यायालय या सर्वदमन करणाऱ्या यंत्रणाचा समावेश होतो परंतु ज्या संस्था त्याबरोबर भांडवल विकासाला मदत करते आणि सत्ताधारी भांडवलशाही वर्ग हा शोषित बहुजन समाजाकडून आपल्या सत्तेला अधिक मान्यता प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. ग्रामसिने राजकारणामध्ये सुवश क्रांती, परिस्थितीचे युद्ध व चळवळीचे युद्ध या संकल्पना वापरल्या आहेत. सुवश क्रांती भांडवलशाही वर्चस्ववादी शक्तींना बळकट करते, आणि त्याचा वापर करून भांडवलदार आपले वर्चस्व टिकवण्याचा प्रयत्न करतात. परिस्थितीचे युद्ध याचा अर्थ क्रांतिकारक शक्तीने आपल्या जागी राहून संघर्ष करणे व आपली शक्ती संघटित करणे व वाढवणे. हा संघर्ष दीर्घकाळ चालणारा संघर्ष आहे. तर चळवळीचे युद्ध हे त्वरित चढाई करून विजय मिळवण्यासाठी संघर्ष आहे. पश्चिम युरोपातील क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी आधी नागरी समाजात मूलभूत बदल करून आणावा लागला आणि भांडवलशाहीच्या बाजूने झुकलेल्या सामाजिक शक्तीना समाजाच्या बाजूने झुकावे लागले. त्यासाठी साम्यवाद आणणे आवश्यक असून ग्रामसिने साम्यवादाकडे जाण्यासाठी क्रांतिकारक टप्प्याचा विचार केला. प्रथम लोकशाही क्रांतीनंतर समाजवादी क्रांती आणि शेवटी साम्यवादी क्रांती असे टप्पे आहेत. या प्रक्रियेमध्ये राज्यसंस्था विरून जाईल. नागरी समाजात बदल होईल आणि अनुशासन आवर्ती आधारित सय्यद स्वयंशासित राज्यविहीन समाज निर्माण होईल. अशाप्रकारे नागरी समाज प्रस्थापित करण्याबाबतचे विवेचक ग्रामसिने केले आहे.

## २.२.४ सारांश:

समाजशास्त्र एक सामाजिक विज्ञान आहे. समाजशास्त्र समजून घेत असताना सदरच्या प्रकरणांमध्ये आपण सत्तेचा अर्थ आणि स्वरूप, राज्याचा अर्थ आणि स्वरूप, त्याचबरोबर नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरुप या विषयी माहितीयाचे माहितीचे विश्लेषण केले आहे. मानवी प्रगतीसाठी राज्याची भूमिका, त्याचबरोबर सत्तेचे महत्त्व आणि नागरी समाजाची संकल्पना समजून घेणे किती महत्त्वाचे आहे. याचे विवेचन

प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेले आहे. त्याचबरोबर विचारवंतांनी दिलेल्या व्याख्या आणि सिद्धांत याचाही आढावा आपण घेतला आहे. राजकीय समाजशास्त्र समजून घेत असताना या सिद्धांतांचे आणि संकल्पना चे महत्व विस्तारितपणे मांडले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्नः**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राज्यशासन संस्था आणि प्रजा यांच्यात विभागला गेलेला तसेच आपल्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात इतर सर्व संस्थावर नियंत्रण ठेवणारा प्रादेशिक समाज म्हणजे राज्य होय. ही व्याख्या कोणाची आहे.

२) कोणत्या समाजशास्त्रज्ञाने  सत्तेला सामाजिक संबंधाचे अंग मांनले आहे?

३) कोणत्या सत्तेचे स्वरूप हे तार्किक आणि बौद्धिक असते या सत्तेला विवेकी सत्ता असेही म्हटले जाते.

४) राज्य शक्तीवर आधारित अशी यंत्रणा आहे की ज्याची निर्मिती एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्याकरता केलेली आहे. हे विधान कोणाचे?

५) लोकसंख्या, भूप्रदेश, शासन संस्था, सार्वभौमत्व कोणी राज्यनिर्मितीचे चार घटक पाडले आहेत.

६) शासनसंस्थेचे तीन महत्वाचे विभाग कोणते?

७) सिव्हिल सोसायटी ही एक सर्वसमावेशक छत्रीसारखी संकल्पना आहे जी राज्याबाहेर असलेल्या अनेक संस्थांच्या छायेखाली आहे. ही व्याख्या कोणाची?

८) राज्य हे नागरी समाजापेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही, तसेच राज्य हे नागरी समाजातील हीच संबंधापासून तथ्य स्वतंत्र राहू शकत नाही. तसेच राज्य हे नागरी समाजातील अंतर विरोध किंवा वर्ग रचना हे राज्यसंस्थेवर प्रतिबिंबित आहे हे विधान कोणाचे आहे?

९) द फिलोसोफी ऑफ राईट हा ग्रंथ कोणाचा?

## २.३ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरेः

१) लास्कीच्या

२) मॅक्स वेबर

३) कायदाधिष्टीत

४) कार्ल मार्क्स

५) गार्नर

६) कायदेमंडळ,कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ.

७) जे.फ्री. अलेक्झांडर.

८) मार्क्स.

९) हेगेल.

## २.४ स्वाध्याय:

१) सत्तेचा अर्थ आणि स्वरूप याची चर्चा करा.

२) राज्याचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

३) नागरी समाजाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

## २.५ अधिक वाचण्यासाठी पुस्तके:


१) Bendix, R.and S.M.Lipset. class, status and power .London RKP ,1966.

२) Bharva, R. Secularism and its critics New Delhi.1999.

३) Desai, .R. State and Society in India Essay in dissent. Bombay: popular publication, 2000.

४) Berth, H. H. and C.W.Mills (End). From Max Weber : Essay in sociology.London:RKP,1948.

५) mills, C.W. The Power Elite.NY: OUP, 2000.

६) Kolhi, The State and poverty in India: The politics of reform.cambridge: Cambridge University p. 1999.


❑❑❑

# घटक - ३
# राजकीय समाजशास्त्रातील दृष्टीकोनाचा अभ्यास

**घटक संरचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ सत्तेवरील दृष्टीकोन : वेबरप्रणीत, मार्क्सवादी, आंबेडकरवादी.

३.२.२ राज्यावरील दृष्टिकोन : उदारमतवादी, बहुलतावादी, अभिजन सिद्धांत, उत्तर आधुनिकतावादी

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे:

सदर घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

१) सत्तेवरील दृष्टिकोन: वेबरप्रणित, मार्क्सवादी, आंबेडकरवादी समजून घेता येईल.

२) राज्यावरील दृष्टिकोन: उदारमतवादी, बहुलतावादी, अभिजन सिद्धांत, उत्तरआधुनिकतावादी दृष्टिकोन समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक:

राजकीय समाजशास्त्र हा विषय अत्यंत महत्वाच्या अनेक राजकीय जाणीवेचा परिचय करून देतो. व्यक्तीच्या वैयक्तीक जीवनात राजकीय जाणीवेचे आकलन या विषयाच्या माध्यमातून होत असते. सदर घटकात आपण सत्तेचे महत्व तसेच मॅक्स वेबर यांच्या सिद्धांतातील तार्किक दृष्टिकोनाचे अध्यन करणार आहोत कारण राजकीय समाजशास्त्राचा जनक असे वेबरला म्हंटले जाते म्हणून या मध्ये सत्ता, शक्ती, सत्तेचे प्रकार इत्यादी. त्याच बरोबर कार्ल मार्क्स यांचा मार्क्सवादाचा इतिहास याचा ही आढावा या घटकातून घेणार आहोत. पुढील घटकात डॉ. आंबेडकर यांचे राजकीय सत्तेबाबतचा विचार समजून घेणार आहोत. व्यक्तीचा सामाजिक स्तर बदलण्यासाठी सत्तेचे असणारे महत्व आणि जाणीव यावर ते मानवता उत्थानासाठी महत्वपूर्ण

असा संदेश देतात याचे सविस्तर विवेचन केले आहे. शेवटचा मुद्धा आहे तो राज्यावरील दृष्टीकोन या मध्ये उदारमतवाद म्हणजे काय,बहुलतावादाचे सविस्तर स्पष्टीकरण, पॅरेटो यांच्या अभिजन सिद्धांताचे विश्लेषण, उत्तर आधुनिकतावादी दृष्टीकोन या विषयी सविस्तर स्पष्टीकरण केले आहे.

## ३.२ विषय विवेचन

प्रस्तावनेत माहितीचे विश्लेषण केल्या प्रमाणे या घटकात तुम्ही राजकीय समाजशास्त्रातील तुम्ही महत्वाचे दृष्टीकोन आणि महत्वाच्या संकल्पनाचे विश्लेषण माहिती करून घेणार आहात. पहील्या भागात तुम्ही सत्तेवरील दृष्टीकोन: वेबरप्रणीत, मार्क्सवादी, आंबेडकरवादी तसेच दुसऱ्या भागात राज्यावरील दृष्टिकोन: उदारमतवादी, बहुलतावादी, अभिजन सिद्धांत, उत्तर आधुनिकतावादी इत्यादी संकल्पना व सिद्धांत याचे सविस्तर विश्लेषण समजून घेणार आहात.

### ३.२.१ सत्तेवरील दृष्टीकोन : वेबरप्रणीत, मार्क्सवादी, आंबेडकरवादी.

मॅक्स वेबर हा जर्मन समाजशास्त्रज्ञ. समाजशास्त्र मध्ये मॅक्सवेबरची मांडणी विवेकी विचारावर आधारित आहे. वेबरला राजकीय समाजशास्त्राचा जनक मानले जाते. त्याने राजकारण, सत्ता, शक्ती या विषयी आपले महत्वपूर्ण असे विचार मांडले. शक्तीची संकल्पनाही त्याची राज्य व राजकारणाविषयी चर्चेतील मध्यवर्ती संकल्पना आहे.

**१) शक्तीचे सर्व व्यापकत्व:**

वेबर म्हणतो समाजात समाजात कायदा व सुव्यवस्था राखणे व त्याचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे हे राज्याचे कार्य आहे व हे कार्य पार पाडण्यासाठी राज्याकडे शक्ती असते. भौतिक शक्तीचा वापर करण्याची मक्तेदारी केवळ राज्याकडे असते. त्याच्या मते, राज्य ही एक अशी संरचना आहे की जिला सफलतापूर्वक कायदेशीरपणे भौतिक शक्तीचा वापर करण्याची अधिकार अथवा सत्ता असते. एखाद्यास देहदंड देण्याचा, शांतता प्रस्थापित करण्यासाठी ही शक्तीचा वापर करण्याचा इतर देशांची युद्ध करण्याचा अधिकार केवळ राज्यात येत असतो. त्यामुळे राज्याकडे अधिकृत अशी शक्ती असते व त्याच शक्तीचा वापर करीत असतात. उदाहरणार्थ धर्म संघटनेत किंवा चर्चमध्ये शक्ती असते तिचा वापर करीत असताना पोप अथवा पादरी आपल्या परीने अधिकारांचा वापर करत असतात. आध्यात्मिक शक्ती बरोबरच पादरी हे ख्रिस्ती अनुयायावर प्रभाव व दबाव टाकीत असतात. धर्मसंकट नेहमीप्रमाणेच कुटुंब, शिक्षण संस्था, आरोग्य संघटना आर्थिक संघटना व सांस्कृतिक संघटना इत्यादी संघटनाकडे शक्ती असते व या संघटनांच्या व्यक्ती सत्ताधारी व पदाधिकारी आसतात ते त्या शक्तीचा वापर करीत असतात. वेबरच्या मत ते ज्या संस्था संघटना व्यक्तीत शक्ती व प्रभाव असतो त्या सर्व राजकीय संघटना आहेत. वेबरच्या दृष्टिकोनातून शक्तीही राज्याबरोबर सर्व मानवी संस्था-संघटना असते व त्यामुळे शक्ती ही सर्वव्यापी आहे शक्ती नाही अशी एक हि संघटना नाही.

## २) शक्ति भेद

सर्व संघटनाकडे शक्ती असते. तथापि शक्तीचे स्वरूप व प्रमाण सर्वत्र सारखे नसते. वेगवेगळ्या संघटनातील शक्तीमध्ये भेद असतो. राज्याची शक्तीही इतर संघटनातील शक्ती पेक्षा अधिक श्रेष्ठत्व व प्रभावी असते. कारण राज्याची शक्तीही भौतिक स्वरूपाची आहे शक्तीचा शक्तीने बलप्रयोगाद्वारे वापर करण्याची सत्ता राज्याकडे असते. राज्याची शक्ती पोलीस प्रशासन लष्कर संस्था मध्ये असते त्याना राज्याची इच्छा हेतू पूर्ण करण्यासाठी हिंसक शक्तीचा वापर करण्याचे अधिमान्यता असते. इतर संघटनाकडे प्रभाव शकते असली तरी त्यांना भौतिक व हिंसक मार्गाने शक्तीचा वापर करण्याची सत्ता नसते. यादृष्टीने त्यांची शक्ती राज्याच्या शक्तीच्या तुलनेत मर्यादित व निम्न दर्जाची असते.

## ३) शक्तीचा अर्थ:

शक्तीतील सर्व व्यापकत्व व शक्ती यातील भेद स्पष्ट केल्यानंतर वेबरने शक्तीचा अर्थ स्पष्ट केला आहे. तो म्हणतो शक्ती हि एक अनुभवजन्य अभिव्यक्ती आहे. व ती प्रत्यक्ष व्यवहारात पाहता येते. शक्तीचा उपयोग सामाजिक संबंधात होतो म्हणून शक्तीचा अर्थ तो सामाजिक संबंधांच्या संदर्भात स्पष्ट करतो. तो म्हणतो, सामाजिक संबंधात जेव्हा एखादी व्यक्ती अशा स्थितीत आहे की, इतरांचा विरोध असतानाही ती आपली इच्छा पूर्ण करते तिची ही स्थिती म्हणजे शक्ती होय.

शक्तीचा अर्थ स्पष्ट करताना वेबर शक्ती व प्रभाव यातील भेद स्पष्ट करतो. तो म्हणतो प्रभावात आज्ञा अंतर्भूत आहे. प्रभावशाली व्यक्ती आज्ञा देते व या अज्ञात व्यक्ती असतेच मात्र शक्तीमध्ये आज्ञा असली पाहिजे असे नाही. वेबरने शक्ती व सत्ता यामधील फरक स्पष्ट केला आहे तो म्हणतो शक्तीमध्ये सत्ता असली पाहिजे असे नाही मात्र सत्यामध्ये शक्ती अनिवार्यपणे असते. शक्तीस जेव्हा व्यक्तीची वा समुदायाची संमती व मान्यता म्हणजे अधिमान्यता किंवा वैधता मिळते तेव्हा शक्तीचे सत्तेत रूपांतर होते याचा अर्थ असा की सत्ता हा शक्तीचा एक प्रकार आहे. शक्ती अधिमान्य नसते सत्ता मात्र आधीमान्यच असते.

## ४) शक्तीचा स्त्रोत:

वेबरने शक्तीचे दोन स्त्रोत उगमस्थाने सांगितलेली आहेत. अ) एखाद्या अधिकृत पदामुळे शक्ती प्राप्त होत असते. उदाहरणार्थ. जिल्हाधिकारी हे अधिकृत पद आहे या पदास राज्याने मान्यता दिलेले असते जी व्यक्ती या पदावर येते तिला त्या पदाची शक्ती प्राप्त होते दर व्यक्ती त्या पदावर असेपर्यंत ती त्या पदाचा शक्तीचा वापर करतात असते.

### ब) व्यक्तीच्या अंगी असलेल्या असाधारण गुणामुळे:

Extraordinary Quality:

व्यक्तीला शक्ती प्राप्त असते तिच्या ह्या शक्तीस राज्याची अधिमान्यता असते. त्या व्यक्ती आपल्या शक्तीचा वापर करत असतात. तसेच काही असाधारण गुणामुळे सुद्धा शक्ती प्राप्त होत असते. उदाहरणार्थ स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या केंद्रीय मंत्रिमंडळात महात्मा गांधी कोणत्याही पदावर नव्हते तथापि त्यांच्या अंगच्या

गुणांमुळे त्यांना शक्ती प्राप्त झालेली होती ते तिचा वापर करत होते. व्यक्तीच्या आमचे असाधारण गुण लोप पावली की, या प्रकारची शक्ती लोप पावते.

**५) शक्तीसाठी संघर्ष:**

वेबरने सामाजिक स्तरीकरणाचे तीन आधार मांडलेले आहेत. वर्ग, दर्जा, आणि शक्ती यासंदर्भात त्यांनी शक्ती म्हणजेच राजकीय शक्ती असा अर्थ घेतला आहे. राजकीय शक्ती धारण करणाऱ्या व्यक्ती शासक बनतात अशी शक्ती नसणाऱ्या व्यक्ती ह्या शासित बनतात. शासित व्यक्ती ह्या सतत शासकांच्या शक्तीतील काही हिस्सा आपणास मिळावा म्हणून प्रयत्न करत असतात. त्यामुळे समाजात शक्ती प्राप्त करण्यासाठी सतत संघर्ष सुरू असतो. जेथे शक्य आहे तेथे तिच्या प्राप्तीसाठी संघर्ष आहे. अधिकारी तंत्र शासकीय पक्ष इत्यादी असा संघर्ष आढळतो.

**६) सत्तेचे प्रकार:** वेबरने शक्तीचे सत्तेचा रूपात तीन प्रकार केले आहेत.

**१) परंपरागत सत्ता:** समाजात पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरा नुसार प्राप्त होणारी सत्ता म्हणजे परंपरागत सत्ता होय. या सत्तेची व्याख्या व कार्यक्षेत्र निश्चित करणे कठीण आहे. राजा नंतर त्याच्या ज्येष्ठ पुत्रास राजपूत प्राप्त होणे हे परंपरागत सत्तेचे एक महत्त्वाचे उदाहरण. कुटुंब प्रमुखाची सत्ता देखील याच प्रकारची. ही सत्ता वैयक्तिक स्वरूपाचे असते. सत्ताधारी व्यक्तीच्या अज्ञान इतर व्यक्ती पाळीत असतात. त्यांच्या सत्तेस आव्हान देणे अयोग्य मानले जाते. मानव परंपराप्रिय असल्याने तो परंपरागत नियमांचे पालन करतो. उदारमतवादी लोकशाही असलेल्या इंग्लंडमध्ये राजास दिलेली नामधारी सत्ता हा हाऊस ऑफ लोर्ड असलेला अधिकाऱ्याचा आधार परंपरा हाच आहे.

**२) चमत्कारिक सत्ता :** एखाद्या व्यक्तीच्या अंगी असलेल्या असाधारण गुणामुळे तिला प्राप्त होणारी सत्ता म्हणजे चमत्कारिक सत्ता होय. अशा गुणांमुळे त्या व्यक्तीस लोकांवर मोठा प्रभाव पडतो. या मुळे तिला मान सन्मान प्राप्त होतो. या व्यक्तीच्या आज्ञा तिचे आदेश पाळल्या जातात. यातून तिच्या प्रभास व शक्तीस आदी मान्यताप्राप्त होते. वेबरच्या मते संकट काळात असा चमत्कारिक नेतृत्वाचा उदय होतो त्यांचे गुण व कर्तुत्व लोकांना अद्भुत अलौकिक व जादुई स्वरूपाचे वाटते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप लोकांवर पडते त्यांच्या भोवती एक वलय तयार होते तो आपणास संकटमुक्त करेल अशी लोकांची धारणा होते. त्यातून असते त्याच्या प्रभावास शक्तीस मान्यता देतात व त्याची शक्ती सत्तेचे रूप धारण करते. मात्र ही सत्ता अनेकदा अस्थायी असते. ही सत्ता परंपरागत किंवा कायदेशीर सत्तेत रूपांतरित होऊ शकते. येशू ख्रिस्त, मोहम्मद पैगंबर, लेनिन माओ इत्यादी.

**क) कायदाधिष्टीत सत्ता:**

कायद्याने प्राप्त होणाऱ्या या सत्तेस कायदेशीर वा वैधानिक सत्ता म्हणतात. कायदे हे विवेकाधिष्ठित असल्याने वेबर या सत्तेस विवेकी सत्ता असे म्हणतो. समाजात कायद्याने विविध सत्तास्थाने किंवा अधिकार पदे असतात. अशा पदावर येणाऱ्या व्यक्तींना त्या पदाची सत्ता प्राप्त होते. तिचे आदेश पाहतात या सत्तेची

वैशिष्ट्य म्हणजे तिची व्यक्तिगत कार्य व दुसरे म्हणजे तिचे पदानुसार पार पाडायचे कार्य व्यक्तीची पदानुसार व स्वेच्छा नुसार पाडू शकते. तथापि तिचे पदानुसार पाडायचे कार्य त्यापदानुसर असलेल्या सत्तेनुसारच नियमास अनुसरून पार पाडावे लागते. त्यामुळे तिची व्यक्तिगत इच्छा महत्वाचे नसते. वेबर म्हणतो कायदेशीर सत्तेमुळे व्यक्तीला साधन संपत्ती प्राप्त होते त्यावर तिची मालकी नसते पण ती तिच्या नियंत्रणात असते. व्यक्ती जोपर्यंत पदावर आहे तोपर्यंत तिला ही साधनसंपत्ती वापरता येते राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, सरपंच, जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्राचार्य, कुलगुरू या पदाधिकाऱ्यांची सत्ता ही कायदेशीर सत्ता आहे.

**ब) मार्क्सवादी दृष्टिकोण:**

मार्क्सवाद म्हणजे प्रख्यात क्रांतीवादी तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) याने आणि त्याचा मित्र व अखेरपर्यंतचा सहकारी फ्रेड्रिख एंगेल्स याने प्रतिपादन केलेले विचार व तत्त्वप्रणाली. मार्क्सवाद हा शास्त्रीय समाजवादाचा मूलाधार आहे. मार्क्सच्या पूर्वीसुद्धा समाजवादाचा प्रचलित होऊ लागला होता. औद्योगिक क्रांती झाली आणि वाढत्या उद्योगाबरोबर कामगारांची व सामान्य जनतेची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची बनत गेली. तेव्हा म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात व एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात समाजवादाचा  उदय व प्रसार झाला.

त्या वादाचा इंग्लंड व फ्रान्समध्ये अनेक नामवंत विद्वानांनी व समाजधुरीणांनी जोरदार पुरस्कार केला. त्या विचारवंतांमध्ये रॉबर्ट ओएन, चार्ल्स फौरिएर, प्रूदाँ, सेंट सायमन वगैरे प्रमूख होते. त्या विचारांना कार्लाइल, डिकन्स, रस्किन आदी लेखकांचाही पाठिंबा होता. या समाजवादाच्या प्रणेत्यांनी केवळ समाजवादी समाजाचे भव्य चित्र रेखाटले. तो अस्तित्वात आणण्याचा शास्त्रशुद्ध मार्ग दाखविला नाही. म्हणून त्यांना यूटोपिअन (अस्थिता दर्शवादी) म्हटले जाते. टॉमस मोर याने सोळाव्या शतकात आपल्या यूटोपिया (Utopia) या पुस्तकात एका आदर्श समाजाचे चित्र रेखाटले, त्यावरून हा शब्द रूढ झाला.

**समाजवाद**

मार्क्सने आपल्या पूर्वीच्या समाजवाद्यांची कल्पनाविश्वात रमणारे म्हणून हेटाळणी केली व त्याची विचारापेक्षा आपला विचार वेगळा आहे, हे दाखवण्यासाठी त्याला शास्त्रीय वा वैज्ञानिक हे विशेषण लावले. मार्क्सचा विचार वेगळा आहे हे खरे, पण तोच केवळ एक समाजवादी विचार आहे, अशी जी समजूत करून देण्यात आली ती मुळीच खरी नाही. मार्क्सपूर्व विचारातही समाजवाद आहेच आणि त्यातील नीती व न्याय यांवरील भर जर मार्क्सवादात अंतर्भूत झाला असता, तर मार्क्सवाद अधिक कल्याणकारक ठरला असता.

मार्क्सवाद एकोणीसाव्या शतकात वाढला. त्याचे पहिले विशदीकरण १८४८ साली प्रसिद्ध झालेल्या साम्यवादी जाहीरनाम्यात (द कम्यूनिस्ट मॅनिफेस्टोत) आढळते. जाहीरनामा मार्क्स व एंगेल्स दोघांनी मिळून लिहीला; पण त्यात मार्क्सचाच अधिक हात होता. या सुमारास भांडवलशाहीचा यूरोपमधील अनेक देशांत विकास होऊन तिची गोड व कटू फळे समाजाच्या पदरात पडू लागली होती; गोड फळे वरिष्ठ वर्गाच्या हाती, तर कडू फळे श्रमजीवी सामान्य जनतेच्या हाती. कामाचा दिवस शक्यतितका वाढवून आपल्या मर्जीनुसार कामावर लावलेल्या मजूराला पगार देणे व आपला नफा वाढवणे हे भांडवलदारांचे धोरण होते.

या व्यवस्थेविरुद्ध कामगारांमध्ये तीव्र असंतोष मजला होता. तो असंतोष फुलवून त्याचे क्रांतिकारक उठावात रूपांतर करता येईल, अशी मार्क्सची, त्याच्या मित्रांची व इतर समाजवाद्यांची कल्पना होती. १८४८ हे युरोमधील क्रांतीचे वर्ष. त्यावर्षी यूरोपमधील अनेक देशांत क्रांतीकारक उठाव झाले. त्या उठांवात सामील होण्याचे आवाहन साम्यवादी जाहीरनाम्याने कामगारांना केले. जाहीरनामाच्या शेवटी मार्क्स लिहीतो, जगातील कामगारांनो, एक व्हा; शृंखलांखेरीज तुमच्या जवळ गमावण्यासारखे असे दुसरे काही नाही. जाहीरनामा मार्क्सने पूर्व वयात लिहिला असला, तरी मार्क्सवाद म्हणून नंतर प्रसिद्धी पावलेल्या विचारप्रणालीची सर्व प्रमूख तत्त्व त्याच्यामध्ये दृष्टीस पडतात.

उत्तरवयात त्या तत्त्वांचा परिपोष करणारी मार्क्सने अनेक विद्वत्ता प्रचुर पुस्तके व पुस्तिका लिहिल्या. त्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे तो तीन खंडी दास कॅपिटल हा ग्रंथ. फर्स्ट इंटरनॅशनलने (इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशनने) ''दास कॅपिटल ग्रंथ कामगार वर्गाचे बायबल म्हणून गौरविला.'' पहिला खंड मार्क्सच्या आयुष्यात १८६७ या वर्षी प्रसिद्ध झाला. पुढचे दोन खंड त्याच्य मृत्यूनंतर एंगेल्सने प्रसिद्ध केले. या ग्रंथात भांडवलशाहीच्या उत्पत्तीचा व विकासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास असून तिच्या अंगभूत गुणधर्माप्रमाणे ती कामगारांचे वाढते शोषण कसे करते व त्यामुळे इतिहासक्रमानुसार येणाऱ्या पुढच्या अवस्थेला म्हणजे क्रांतीला समाज कसा तयार होतो, ते दाखवले आहे.याखेरीज अनेक महत्त्वाची लहानमोठी पुस्तके व पुस्तिका त्याने व त्याचा सहकारी मित्र फ्रीड्रिख एंगेल्स (१८२०-१८९५) याने साम्यवाद व तत्संबंधी विषयांवर लिहिली. याखेरीज त्याचे त्या त्या प्रसंगांना धरून लेख, पुस्तीका व पत्रव्यवहार आहे. यामध्ये एंगेल्सच्या पुस्तकांचाही समावेश होतो; कारण मार्क्सवादाच्या उभारणीत मार्क्सइतकाच त्याचाही हात होताच. हे सर्व लिखाण मूळ जर्मनमध्ये लिहिले गेले. फ्रेंच आणि इंग्रजीमध्ये त्याची भाषांतरे झाली. जगातील सर्व प्रमूख भाषांमध्येही त्याचे अनुवाद प्रसिद्ध झाले.

मार्क्सवाद रशियन बोल्शेविक क्रांती झाल्यानंतर सबंध जगभर पसरला आहे. ज्या देशांत मार्क्सवादी क्रांती झाली, तिथे म्हणजे सोव्हिएट युनियन, पूर्व यूरोपियन साम्यवादी राष्ट्रे, चीन आणि क्यूबा येथे त्याला सर्वश्रेष्ठ धर्माची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. तिथे मार्क्सवादावर टीका करणे अगर त्याच्यातील उणिवा दाखवून देणे राज्यविरोधी वा समाजविघातक कृत्य समजले जाते. मार्क्सवादाचा उल्लेख केल्याखेरीज तिथे कुणालाही राजकारणात किंवा समाजकारणात स्थान लाभत नाही. सर्व साम्यवादी देशांत आज ही परिस्थिती आहे.

साम्यवादी देशांत व पक्षात मार्क्सवादाचा अभ्यास चालू आहे. तो श्रद्धेने, भावभक्तीने आणि कडक शिस्तीखाली. पण इतरत्र म्हणजे भांडवलशाही जगातही अर्थशास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, वैज्ञानिक व राजकरणी यांच्यामध्ये मार्क्सवादाचा अभ्यास चालू आहे. सर्वांना तो पटतोच असे नाही, काहींना त्याच्यामध्ये मानवी जीवनाचा आदर्श दिसतो व प्रेरणा मिळते, काहींना त्याची मूळ भूमिका व दृष्टी विपर्यस्त आहे असे वाटते, काहींना त्याचे विवेचन व सिध्दांत बिनबुडाचे आहेत असे आढळते.

**टीकात्मक परीक्षण**

तर काहींना मार्क्सने हेटाळणी केलेला कल्पनाजगातील आदर्शवाद वा यूटोपिआ पुन्हा मार्क्सवादामध्ये निराळ्या युक्तिवादावर आधारलेला-अवतरलेला आहे असे दिसते. अशा तऱ्हेची अनुकूल वा प्रतिकुल व अर्धवट अनुकूल व प्रतिकुल टीका आज मार्क्सवादावर काही थोडे साम्यवादी देश सोडले, तर संबंध जगभर चालू आहे. शंभरदीडशे वर्षे होऊन गेली, तरी मार्क्सवादाबद्दलचे कुतूहल संपले नाही, हे एक त्याचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. कारण जगाच्या राजकारणात त्याला वैशिष्ट्यपूर्णस्थान प्राप्त झाले आहे.

मार्क्सवादाचे अनेक पैलू आहेत, त्यापैकी आर्थिक व राजकिय अधिक गाजले, तरी मूलभूत आहे तो तत्त्वज्ञान हा त्याच्या अभ्यासाचा मूळ विषय. अर्थकारणाला व राजकारणाला तात्त्वीक बैठक हवी, असा त्याचा आग्रह होता. त्याने जी बैठक सुचविली ती भौतीकवादाची. मार्क्स हा हेगेलचा उत्तमअभ्यासक होता. त्याचा विरोध-विकासवाद त्याला पटला; पण हेगेलच्या विचारमंथनाचा मूळ पाया जो केवळ तत्त्वचैतन्यवाद वा भाववाद, तो त्याला पटला नाही. केवळ चैतन्य मूळ नसून भौतीक वस्तू किंवा जड द्रव्य (मॅटर) मूळ आहे,

असा त्याचा आग्रह होता. ही भौतीक वस्तू स्थिर व स्थानी नसून ती सतत बदलणारी, सदैव गतिमान असते. या वस्तूंच्या व्यापारातून वा विरोध-विकासातून विश्व निर्माण होऊन प्रणी व नंतर मनुष्य निर्माण झाला, मनुष्यांनी समाज निर्माण केला. भौतीक जीवनाची भौतीक साधने निर्माण करीतच मनुष्य जगतो; निर्माणपद्धती जशी असते तसे विशिष्ट सामाजिक संबंध निर्माण होतात. उत्पादनपद्धती बदलते त्याबरोबर सामाजिक संबंध बदलतात; म्हणजे समाजिक वर्ग बदलतात. उत्पादनपद्धती व सामाजिक विशिष्ट संबंध हा भौतिक सामाजिक पाया; हा पाया जसा असेल त्या प्रकारच्या मानसिक संस्कृतीचा इमला उभारला जातो; कायदा राज्यव्यवस्था, काव्य कला, साहित्य, धर्म इ. मानसिक संस्कृतीत समाजवादी अवस्थेपासून अनेक रूपांतरे होत बदलत गेला आहे.

**मार्क्सची तत्त्वज्ञाबद्दलची भूमीका**

समाज मनुष्यनिर्मित असल्याकारणाने योग्य ऐतिहासिक परिस्थितीत बदलू शकतात. म्हणून योग्य परिस्थिती निर्माण करून कामगारवर्ग भांडवलशाहीतून समाजवादी समाज निर्माण करू शकतील, असा हा सर्वसाधारणपणे मार्क्सचा भौतिकवादी, कार्यशीलतेवर भर देणारा, तात्त्विक दृष्टिकोन आहे. मार्क्सवादाचे अर्थकारण व राजकारण यांना तो पायाभृत आहे. आतापर्यंत तत्त्वज्ञांनी केवळ, जग समजावून घेण्याचा प्रयत्न केला; आपली जबाबदारी जग बदलणे ही आहे; ही मार्क्सची तत्त्वज्ञाबद्दलची भूमीका होती. समाजव्यवस्था बदलत असते आणि हा बदल उत्पादनसाधने. उत्पादनपद्धती व त्या पद्धतींत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलांमुळे घडून येतो; हा मूळ सिद्धांत होय; यालाच ऐतिहासिक भौतिकवाद (हिस्टॉरिकल मटीरिअलिझम) असे म्हणतात. इतिहास घडतो व बदलतो तो भौतीक कारणांमुळे; आजूबाजूच्या परिस्थितीमुळे, वस्तूंच्या उत्पादनाची व विनिमयाची साधने व पद्धती बदलल्यामुळे. त्यांमध्ये दैवी योजना

नसते किंवा महान व्यक्तींचे कर्तृत्वही महत्त्वाचे नसते. या सिद्धांतानुसार मार्क्सने त्याच्या काळापर्यंतच्या मानवेतिहासाची संगतीही स्थूलमानाने लावून दाखविली.

अगदी सुरूवातीला जीवनार्थ मनुष्यप्राणी टोळ्या करून भटकत होता. नंतर तो स्थिर समाज बनवून एका ठिकाणी राहू लागला. या काळात वर्गविरहित समताप्रधान समाजव्यवस्था रूढ होती. कारण त्यात सर्व संपत्ती सार्वजनिक होती; तिला मार्क्सने प्राथमिक साम्यवाद (प्रिमिटिव्ह कम्युनिझम) असे नाव दिले आहे. त्यानंतर खाजगी संपत्ती निर्माण होऊ लागली, त्याबरोबर आर्थिक वर्ग निर्माण होऊ लागले; वर्गकलहासही लगेच प्रारंभ झाला. त्यानंतरचा आतापर्यंत जो मानवी समाजाचा इतिहास घडत आला; तो वर्गकलहाचा इतिहास होय. याचे मुख्य उदाहरण यूरोपचा प्राचीन काळापासूनचा इतिहास होय. शेती व कुटीरोद्योग सुरू झाले; खाजगी संपत्ती निर्माण झाली; श्रमीकदासवर्ग तयार झाला; या अवस्थेत उत्पादन बव्हंशी गुलामांकडून करवून घेतलं जात असे. समाजात शांतता स्थापण्याकरिता राज्यसंस्था आली. शेती खाजगी मालकीची झाली; व्यापार वाढला, जमीन हेच त्या काळात उत्पादनाचे सर्वांत प्रमुख साधन होते.

जमिनीचे मालक सत्ताधीश झाले आणि त्यांच्या नेतृत्त्वाखाली सरंजामशाही वाढली; राजसत्ता बळकट झाली. लाखो शेतमजूर शेतावर काम करत होते. त्यांना मालकीमध्ये भाग नव्हता व मजुरी केवळ पोटापुरती मिळत असे. सरंजामशाहीत व्यापारी वर्ग तयार झाला. महानद्या व सागर यांच्यातून वाहतूक व व्यापार सुरू झाला; व्यापारी वर्ग निर्माण झाला. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उत्पादनसाधनांत तंत्रविज्ञानातील शोधामुळे अभूतपूर्व औद्योगिक क्रांती झाली. व्यापारी भांडवलाचे यंत्रोद्योगाच्या भांडवलात रूपांतर झाले. वाफेच्या शक्तीवर चालणारी अनेक यंत्रे निर्मांण झाली. त्या यंत्रांवर ज्यांनी आपली मालकी प्रस्थापित केली ते समाजामध्ये सत्ताधारी झाले. तेच आजचे भांडवलदार. त्यांनी राजारजवाडे आणि जमीनदार यांना सत्ताभ्रष्ट करकून त्या जागी आपले राज्य प्रस्थापित केले, ही भांडवलशाही क्रांती.

ती वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या वेळी घडून येते. पण इतिहास इथेच थांबला नाही. तो पुढे चाललेला आहे. भांडवलशाहीच्या अंगभूत नियमांनुसार कामगार वर्ग मोठा प्रबळ बनतो; भांडवलदारांना समाजाच्या गरजेस पुरेस उत्पादन वाढवता येत नाही अशी स्थिती उत्पन्न होते, तेव्हा भांडवलशाही उत्पादन-पद्धत समाजाच्या प्रगतीच्या मार्गातील घोंड ठरते व मग कामगारांच्या नेतृत्वाखाली क्रांती होते; राजकीय सत्ता कामगारवर्ग काबीज करतो; लुबाडणारे लुबाडले जातात; समाजवादी क्रांती घडून येते. वर्गहीन समाज अस्तित्वात येतो. राज्यसंस्थेची गरज हळूहळू संपते; राज्यसंस्था सुकत जाऊन गळून पडते. तात्पर्य, इतिहासाच्या शक्तीमुळे विकासाच्या नियमानुसार समाजवाद स्थापन होणे अटळ आहे; असा मार्क्सवादाचा अंतिम निष्कर्ष आहे

**भांडवलशाही अर्थव्यवस्था**

वर उल्लेखिलेले भांडवलशाहीचे अंगभूत नियम मार्क्सवादाच्या आर्थिक विचारात आढळतात. त्याने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे खोल तर्कशुद्ध चिंतन केले. भांडवलशाही उत्पादन नफ्यासाठी होते. उत्पादनाचा सर्व खर्च वजा जाता जे उरेल तो हा नफा होय. म्हणून उत्पादनाचा खर्च कमी करण्याकडे भांडवलदारांचे

सदोसदी लक्ष असते. मजुरी ही उत्पादन खर्चातील महत्त्वाची बाब असते. विशेष यातायात न करता त्याला ती कमी अगर जास्त करता येते. मजुरी कमी करण्याचा एकच मार्ग नाही, ती कमी करण्यासाठी कामाचे तास अगर गती अगर उत्पादन वाढवता येते. म्हणजे तेवढ्याच मजुरीत कामगारांकडून अधिक काम म्हणजे उत्पादन करवून घेण्यात येते. या ना त्या निमित्ताने कामगारांची संख्याही कमी करता येते. या कामी नवनवीन यंत्रांचा उपयोग होतो. अशा श्रम वाचविणाऱ्या म्हणजे कमी कामगारांकडून अधिक उत्पादन मिळवणाऱ्या यंत्रांच्या शोधात भांडवलदार नेहमीच असतो. श्रमाची उत्पादकता वाढवून नफा मिळविणे हेच उद्योजकाचे मुख्य उद्दिष्ट असते.

कामगाराला जगण्यापुरता आणि कुटुंब निर्वाहापुरता कामगाराच्या श्रमातून निर्माण झालेल्या संपत्तीतला भाग दिला जातो. कामगाराने निर्माण केलेल्या संपत्तीतील उरलेला भाग मालक आपल्याकडे ठेवतो, तोच नफा. नफा म्हणजे शोषण वा पिळवणूक. नफा हेच अतिरिक्त मूल्य. अशा रीतीने स्वतःचा नफा वाढविण्याचे भांडवलदारांचे उद्योग नेहमीच कामगारांच्या मुळावर येतात. स्पर्धेत टिकावयाचे तर असे उद्योग त्यांना सदोदित करावे लागतातच. म्हणजेच सकृतदर्शनीदेखील कामगारांचे व भांडवलदारांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. यातूनच तेढ व वर्गकलह सुरू होतो व त्याचे पुढे वर्गयुद्धात रूपांतर होते. मार्क्सवादामध्ये वर्गकलह आणि वर्गयुद्ध यांना मोठे महत्त्वाचे स्थान आहे. वर्गकलहामुळेच मानवसमाजाचा इतिहास घडतो, अशी मार्क्सची धारणा आहे. साम्यवादी जाहीरनाम्यात त्याने म्हटले आहे की, आतापर्यंतचा समाजाचा सर्व इतिहास वर्गकलहांचा इतिहास आहे. भांडवलशाही जगात वर्गकलह सतत वाढतच जाणारा आहे आणि त्या कलहातूनच क्रांती होऊन समाजवाद निर्माण होणार आहे. हा कलह कसा आणि का वाढत जातो, ते ते मार्क्सने दास कॅपिटल आदी ग्रंथातून स्पष्टपणे आणि सविस्तर दाखविले आहे

भांडवलशाहीमध्ये उत्पादनाची साधने एका व्यक्तीच्या म्हणजे भांडवलदाराच्या मालकीची असतात. उदरनिर्वाहासाठी कामगाराला काम शोधावे लागते. भांडवलदारच हे काम त्याला देऊ शकतो. म्हणून कामगार त्याला आपली श्रमशक्ती विकतो; श्रमशक्ती ही एक अजब चीज आहे. ती सर्व मूल्य निर्माण करते. शेती श्रमाने निर्माण होते. सर्व उत्पादनसाधने मानवी श्रमाने घडविलेली असतात, उपभोगाची वा जीवनाची सर्व साधने मानवी श्रमातून निर्माण होतात. तात्पर्य वस्तूंमध्ये मूल्य निर्माण होते ते श्रमशक्तीच्या वापरामुळे; यालाच श्रममूल्याचा सिद्धांत असे म्हणतात. म्हणजे कामगार आपल्या श्रमांनी सर्व मूल्ये निर्माण करतात; परंतु सर्व मूल्य त्यांच्या हाती येत नाही; त्याचा अल्प भागच येतो. त्याच्या हातात उरते ते फक्त मजुरीच्या रूपाने मिळणारे मूल्य.

**अपरिवर्तनिय कायदा**

मजुरीचाही अपरिवर्तनिय असा कायदा आहे. मार्क्सने तो डेव्हिड रिकार्डो या इंग्रजी अर्थशास्त्रज्ञाकडून घेतला. या कायद्याप्रमाणे स्वतःच्या व कुटुंबियांच्या जगण्यासाठी–संतती जगविण्यासाठी जरूर तेवढीच मजुरी कामगाराला मिळू शकते. श्रमातून निर्माण झालेल्या मूल्याचे दोन भाग; एक भाग कामगाराचे वेतन व दुसरा शिल्लक भाग म्हणजे अतिरिक्त मूल्य; ते नफा म्हणून उत्पादन साधनावरील मालकीमुळे भांडवदाराच्या पदरात

पडते. यांत्रीक शोधामुळे उत्पादन सारखे वाढत जाते; त्यामुळे अतिरिक्त मूल्य वा नफा अधिकाधिक निर्माण होतो. तो पदरात पडल्यामुळे भांडवलदार वर्ग अधिकाधिक श्रीमंत व सामर्थ बनतो आणि कामगार वर्ग व तो यांच्यामधील दरी वाढत जाते.

याचवेळी भांडवलशाहीच्या नियमानुसार इतर काही प्रक्रिया घडत असतात आणि त्यामुळे कामगारांची परिस्थिती अधिकाधिक दयनीय होते. भांडवलाचा संचय वाढणे आणि ते एकत्रित होणे हा भांडवलशाहीचा नियमच आहे. आपसांतील स्पर्धेमुळे छोटे भांडवलदार आणि त्यांचे मोठे उद्योग येतात. यालाच भांडवलदारी स्पर्धा म्हणतात; उलट खाजगी भांडवलातील अनेक भागीदार यांच्यामध्ये सहकार्य होते. नवनवीन यंत्रे आल्यामुळे कामगारांची गरज कमी होते आणि त्यांमधील बेकारी वाढते. यंत्रनिर्मित औद्योगिक उत्पादन वाढल्यामुळे अनेक हस्तव्यवसाय नष्ट होतात व ते चालवणारे कारागीर नोकरीवर जगणारे कामगार बनतात. खेड्यांतूनही कामगारांमध्ये सारखी भर पडत असते. या सर्वांचा मिळून बेकारांचा एक मोठा तांडा तयार होतो आणि त्याचा मजुरीच्या दरावर विपरीत परिणाम होतो. कमी दरात कामगार उपलब्ध होतात.

अशा रितीने समाजामध्ये दोन वर्ग तयार होतात : एक श्रीमंत भांडवलदारांचा आणि दुसरा गरीब आणि दिवसेंदिवस अधिकाधिक गरिब होणाऱ्या कामगारांचा. कालानुक्रमे मधले वर्ग नष्ट होतात वा दुर्बल होतात; आणि भांडवलदार व कामगार हे दोनच वर्ग युद्धाच्या पवित्र्यात एकमेकांसमोर उभे ठाकतात. भांडवलशाही समाजाच्या अखेरच्या परिस्थितीचे हे मार्क्सवादी भविष्य आहे.

वस्तुत कामगारांची गरिबी वाढत जाणे, भांडवलदारांच्याही फायद्याचे नसते. कामगारांची क्रयशक्ती म्हणजे माल विकत घेण्याची कुवत कमी झाली की मालाचा उठाव होत नाही. माल पडून राहतो, मग उत्पादन बंद करावे लागते. यालाच आर्थिक अरिष्ट म्हणतात. असे अरिष्ट दर पाच सात वर्षानी येते. दुसरे अरिष्ट पहिल्या अरिष्टापेक्षा अधिक तीव्र व व्यापक असते. अरिष्ठाच्या या चक्रातून सुटण्यासाठी भांडवलशाही परदेशी बाजारपेठा धुंडाळू लागते. यातूनच वसाहतवाद व साम्राज्यवाद उद्भवतो. मग राष्ट्राराष्ट्रांमधील स्पर्धा सुरू होते आणि भांडवलदारी राष्ट्रामधील जागतिक युद्धाची शक्यता निर्माण होते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजयी होण्यासाठी घरातील, देशातील स्पर्धा बंद करावी लागते.

**भांडवलशाहीची चौकट**

एकेक महान उद्योदसमूह म्हणजे मक्तेदाऱ्या निर्माण होतात. ही स्पर्धा बंद केली जाते. किंमती चढ्या ठेवण्याकरिता व्यापारी साठेबाजी चालू होते. उत्पादनावर व भावावर नियंत्रणे लादावी लागतात. या अडचणीत सापडलेली भांडवलशाही संख्येने वाढलेल्या कामगारांना पुरेसे काम देऊ शकत नाही व समाजाला हव्या त्या वस्तू रास्त किंमतीत पुरवू शकत नाही. म्हणून भांडवलशाहीची चौकट मोडून त्या पलीकडे जाणे क्रमप्राप्त ठरते.

भांडवलशाहीची चौकट मोडण्याचा व त्या पलीकडे जाण्याचा मार्गही मार्क्सवादाने दाखवून दिलेला आहे. क्रांती अटळ आहे, हा मार्क्सवादाचा सिद्धांत. समाजातील अत्यंत नाडलेला, पिडलेला वर्ग जो कामगारांचा, तो ही क्रांती घडवून आणिल. कामगार सुरूवातीला आपले कारखाना निहाय संघ बनवतात. ते

संघ या घडीच्या मागण्या मिळवण्यासाठी असतात. हलके हलके ते संघटन वाढत जाते व त्याला राष्ट्रव्यापी स्वरूप प्राप्त होते. लवकरच कामगार राजकीय मागण्याही करू लागतात. त्यासाठी ते आपला राजकीय पक्षही बनवतात. राजसत्ता हस्तगत करण्याची आवश्यकता त्यांना भासू लागते. दरम्यान त्यांची दुरावस्था, गरिबी, बेकारी वगैरे वाढलेली असते. मग क्रांती करून भांडवलशाही व तिचे राज्य उलथून पाडण्याखेरीज दुसरा मार्ग त्यांच्यापुढे उरत नाही. कामगारवर्ग भांडवलदारवर्गापुढे लढाईसाठी उभा ठाकतो. यावेळी कामगारवर्गाचे सामर्थ्य व संख्याबल खूप वाढलेले असते व भांडवलदारवर्गाचे खूप कमी झालेले असते.

भांडवलशाहीचा पराभव होतो आणि तिच्या जागी कामगारांचे राज्य येते. ही क्रांती शसस्र क्रांती असते आणि तिच्यामध्ये रक्तही सांडावे लागते. इंग्लंडसारख्या अपवादभूत देशांमध्येच ती शांततेनेही पार पडू शकेल असे मार्क्सला कालांतराने वाटू लागले. (पुढे लेनिनचे मत पडले की तोही अपवाद शक्य नाही) ही रक्तरंजित क्रांती यशस्वीपणे पार पाडावयाची म्हणजे कामगारांची जय्यत तयारी हवी. त्याचा शिस्तबद्ध व लढाऊ असा पक्ष हवा. तोच साम्यवादी पक्ष. असा पक्ष यूरोमधील औद्योगीक क्रांती झालेल्या प्रत्येक देशात उभा राहावा असे मार्क्सवादाचे उद्दिष्ट होते. विसाव्या शताकात मर्क्सवादाचा जगभर प्रसार झाला आणि अनेक देशांत मार्क्सवादी साम्यवादी पक्ष निर्माण झाले.

क्रांतीनंतर जी वर्गहीन समाजव्यवस्था निर्माण होईल तिच्याबद्दल मार्क्सने फारसे काही लिहिलेले नाही. साम्यवाद ताबडतोब स्थापन होणार नाही, हा इशारा मात्र त्याने स्पष्टपणे दिलेला आहे. संक्रमण काळात कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होईल असे मार्क्सने एके ठिकाणी जाता जाता लिहिले आहे. त्याच्या आधाराने नंतरचे बरेच मार्क्सवादी सध्या साम्यवादी देशांत रूढ झालेल्या हुमशाहीचे समर्थन करतात.

कामगारांची हुकूमशाही हे त्यांच्या दृष्टिने मार्क्सवादाचे एक महत्त्वाचे अविभाज्य अंग होय. मार्क्सला कामगारांच्या हुकूमशाहीला एवढे महत्त्व द्यायचे असते, तर त्याने त्या कल्पनेचा संपूर्ण ऊहापोह केला असता; एका वाक्यात नुसता उल्लेख करून थांबला नसता. शिवाय हुकूमशाहीची ही कल्पना मार्क्सवादाच्या एकंदर संकल्पनेशी विसंगत आहे. लोकशाहीला मार्क्सवादामध्ये मोठे महत्त्वाचे स्थान आहे. शेवटची क्रांतीदेखील बहुसंख्याकांची अल्पसंख्याकांविरुद्ध असेल, हे मुद्दाम आवर्जून सांगितले आहे. क्रांतीकारक साम्यवादी पक्ष संकुचित पंथ बनू नये, असा मार्क्सचा आग्रह होता. शेवटी त्याला नको होते तेच घडले ही गोष्ट वेगळी.

शासन व शोषण विरहित स्वतंत्र व समान व्यक्तींचा स्वातंत्र समाज हे मार्क्सवादाचे अंतिम उद्दिष्ट आहे. राज्य व शासन लागते ते वर्गीय समाजात; वर्ग नष्ट झाले, वर्गीय पिळवणूक नष्ट झाली, राज्याची व शासनाची गरज उरत नाही. मग माणसावर राज्य करायचे नसते, तर वस्तूंचे वाटप करायचे असते, प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे धन मिळावे व त्याच्या कुवतीप्रमाणे काम त्याने द्यावे, हे साम्यवादाचे स्वप्न होते; आणि अद्याप तरी स्वप्नच उरले आहे. एवढेच नव्हे, तर त्या भांडवलशाहीचे मरण मार्क्सवादाने सव्वाशे वर्षापूर्वी अपेक्षिले होते, ती आज देखील जिवंत असून उत्पादनाची नवनवीन तंत्रे व क्षेत्रे हस्तगत करत आहे. म्हणजेच इतिहास वेगळ्या चालीने चालला असून, त्या चालीचा व मार्क्सवादी भाकितांचा मेळ जमत नाही.

मार्क्सवादाची काही भाकिते खरी ठरली नाहीत. त्यांपैकी एक-दोन भाकितांचा उल्लेख या ठिकाणी प्रस्तुत ठरेल. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या भांडवलशाही देशांत कामगार क्रांती अगोदर घडून येईल. असा मार्क्सवादाचा अंदाज होता. त्याप्रमाणे इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स अगर अमेरिका या देशांत कामगार क्रांती अगोदर घडून यायला हवा होती; पण ती घडली १९१७ साली औद्योगीक दृष्ट्या मागासलेल्या रशियात. त्यानंतर पासष्ट वर्षे उलटून गेली तरी त्या चार देशांत साम्यवादी क्रांतीची चिन्हे दिसत नाहीत. यावरून धडा घ्यायचा तो एवढाच की उद्योगधंदे वाढले की कामगार क्रांतीप्रवण होतात, असे नाही.

**भांडवलशाहीच्या वाढी**

दुसराही एक अंदाज खोटा ठरला तो हा की भांडवलशाहीच्या वाढीबरोबर कामगारांचे दैन्य व दारिद्र्य वाढेल, ते घडलेले नाही. उलट कामगारांची परिस्थिती सुधारली आहे. त्यामुळे वर्ग कलह हा मर्यादित प्रमाणातच तेथे चालतो. त्यांची राहणी सुधारली आहे, त्यांचे खाणेपिणे, कपडेलत्ते सुधारले आहेत. त्यांच्यासाठी कल्याणाच्या अनेक सोई व कायदे झाले आहेत. मार्क्सच्या काळात या गोष्टीला नुकतीच सुरूवात झाली होती. त्यात नंतर लोकशाहीच्या दडपणाखाली खूपच भर पडली. सर्वसाधारण जनतेबद्दल हे विधान असते, तर गोष्ट वेगळी; पण विधान आहे, ते कामगारांच्याबद्दल. ज्या पुढारलेल्या देशांतील कामगारांचा मार्क्सने अभ्यास केला, त्यांच्या बाबतीत तर ते मुळीच खरे ठरले नाही. मार्क्सचे असेच आणखी एक विधान खरे ठरले नाही, ते म्हणजे भांडवलशाहीच्या अंतिम अवस्थेत मध्यम वर्ग नाहीसा होणार व दोनच वर्ग राहणार; एक भांडवलदारांचा आणि दुसरा कामगारांचा. समाजाचे असे स्पष्ट विभत्तीकरण झाले नाही. भांडवलदार व कामगार नसलेला मध्यम वर्ग अस्तित्वात आहे एवढेच नव्हे, तर त्याचे महत्त्व वाढले आहे आणि वाढत आहे.

पण काही भाकिते खरी ठरली नाहीत, हा महत्त्वाचा मुद्दा नाही. कुणीही समाजशास्त्रज्ञ ज्योतिषी नसतो आणि त्याने काढलेले काही निष्कर्ष चुकिचे ठरले, तर त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान चुकीचे ठरत नाही. मार्कवादाच्या बाबतीत अत्यंत खेदाची गोष्ट ही आहे, की व्यक्तीस्वातंत्र्यवादी म्हणून ते तत्त्वज्ञान अस्तित्वात आले त्याच्या आधाराने ज्या नवीन राजवटी निर्माण झाल्या, त्या सर्व व्यक्तीस्वतंत्र्यविरोधी ठरल्या आहेत. मार्क्सवादाचे जे मोठे अपयश आहे ते हे आहे.

मार्क्सवादाविरुद्ध हल्ली खूप टिका होते. ती टिका केवळ भांडवलशाही मानणाऱ्यांकडून होते असे नाही. खुद्द मार्क्सवांद्यामध्ये देखील त्या तत्त्वज्ञानावर टीका फरणारे पुष्कळ निघाले आहेत. रशिया इ. साम्यवादी देशांत मार्क्सवादाविरुद्ध टीक करणे शक्य नाही; पण तिथेही काही धाडसी टीकाकार निर्माण झाले आहेत; त्यांना अर्थातच शासनाच्या रोषाला बळी पडावे लागले.

भारतातील पहिले प्रसिद्ध मार्क्सवादी एम. एन. रॉय यांचाही या बाबतीत उल्लेख करता येईल. वर्गवादांमध्ये गुंतून पडल्यामुळे मार्क्स व्यक्तीला विसरला, हा त्यांनी घेतलेला आक्षेप मूलगामी स्वरूपाचा आहे. मार्क्सवाद्यांमध्ये एक अधिक जहाल व क्रांतीकारक गट निर्माण झाला आहे. त्याला 'न्यू लेफ्ट' असे म्हणतात. त्यामध्ये हर्बर्ट मार्क्यूज, चेगेव्हेरा, फ्रान्स फनान इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या दृष्टीने विकसित

देशांतील औद्योगीक कामगार आता क्रांतीकारक राहिला नाही; तो क्रांतीकारक वारसा ते तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, विद्यार्थ्यांना व इतरांना देतात. काही टीकाकार मार्क्सच्या उत्तर आयुष्यातील विचारांपेक्षा पूर्वायुष्यातील विचारांना अधिक महत्त्व देतात. त्या विचारांत सर्वात महत्त्वाचा विचार आहे, तो परात्मवादाचा (एलिनेशन); त्यांमध्ये मानवतावाद देखील आहे. तोच खरा मार्क्सवाद असेही त्यांच्यापैकी काहीजण म्हणतात. इतरही अनेक टीकाकार आहेत; पण त्यांचा इथे उल्लेख करण्याचे कारण नाही.

मार्क्सवादाचे भांडवलदारी किंवा समाजवादी किंवा इतर असे कितीही टीकाकार झाले, तरी मार्क्सवादाने बजाविलेले ऐतिहासिक कार्य कुणालाही नाकारता येत नाही. मार्क्सवादाने समाजवादाला पहिल्या प्रथम शास्त्रीय बैठक दिली आणि त्याच्या पूर्तीसाठी क्रांतीचा मार्ग कसा चोखाळावा ते दाखवून दिले.

कार्ल मार्क्सला संघर्षवादी विचाराचा प्रनेता म्हणून ओळखले जाते. मार्क्सच्या चिंतनाने समाजशास्त्रात एक विचारांची वैशिष्ट पूर्वक बैठक प्रदान केली. त्याचे विचार अनुभवसिद्ध ज्ञानावर आधारित होते. त्याने समाजातील शोषित वर्गाचे अध्ययन केले. त्यांच्या दारिद्र्य यासाठी उत्तरदायी असणारा शोषक वर्ग प्रत्येक कालखंडात कसा कार्यात होता याचे विश्लेषण त्यांनी ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांततुन केले.मार्क्सने उत्पादनातील संबंध, उत्पादन प्रणाली यातील अन्वय साधला. वर्ग म्हणजे काय. समाजातील उत्पादन पद्धती बदलल्या म्हणजे वर्ग कसा बदलत जातो. शोषक वर्गाचे शोषितांचे स्वरूप यांचे विवेचन केले आहे. मार्क्सने त्यांच्या सिद्धांत आतून समाजातील वास्तवतेचे चित्रण करून दिले आहे. मार्क्सच्या चितनावर हेगेलचा प्रभाव असला तरी त्याची मांडणी ही स्वतंत्र आहे.

**वर्ग संघर्ष:**

आहे रे वर्गाकडून नाही रे वर्गाचे शोषण होते. त्यातून दोन वर्गातील संघर्ष तीव्र होतो. या संघर्षात श्रमशक्ती (नाहीं रे वर्ग) आर्थिक शक्तीचा (आहे रे वर्ग) नाश करते व समाज एका युगातून दुसऱ्या विभागात प्रवेश करतो. मार्क्स म्हणतो, या शक्तीतील म्हणजे वर्गातील संघर्षातून आजपर्यंत साम्यवादी युग, सरंजामशाहीचे युग अशी तीन युगे होऊन गेले आहेत. सध्याचे युग हे भांडवल शाही चे युग आहे. या युगात भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग आहेत. भांडवलदार वर्गाकडे आर्थिक शक्ती व कामगार वर्गाकडे श्रमशक्ती आहे. भांडवलदार वर्ग राजकीय शक्तीच्या जोरावर कामगारांचे प्रचंड शोषण करतो. परिणामी त्यांच्यात संघर्ष उद्भवणार आहे. पण हा संघर्ष उद्भवण्याची वाट न पाहता सर्व कामगारांनी एकत्र येऊन क्रांती द्वारे भांडवलशाही व भांडवलदार वर्ग नष्ट करावा असे मार्क्स म्हणतो.

**५) समाजवादी युग:**

भांडवलशाही नष्ट झाल्यावर कामगारांच्या हाती राजकीय शक्ती येईल व त्या आधारावर ती हुकूमशाही भांडवलदार वर्गाकडून होणाऱ्या प्रतीकात्मक शक्तीचा बिमोड होईल. शेवटी श्रमशक्ती विजय होईल. भांडवलदार वर्ग नष्ट झाल्याने समाजात केवळ कामगार वर्ग असेल एक वर्ग असते म्हणजे एक वर्ग नसणे होय. वर्ग नसल्याने शोषण करणारे राज्या यासारखे साधंन ही हळूहळू विरून जाईल. व समान वर्ग विहीन व

राजवीर हित बनेल ह्या अवस्थेत उत्पादन साधने ही समाजाच्या म्हणजे लोकशाहीच्या मालकीची होतील. या अवस्थेला मार्क्सने समाजवादाचे युग म्हटले.

**क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्तेबाबतचा दृष्टिकोन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या प्रमुख शिल्पकारांपैकी एक आहेत. याबाबतचं त्यांचं योगदान आपल्याला त्यांची भाषणे आणि लेखन यांचे जे राज्य शासनानं २२ खंड प्रकाशित केलेले आहेत त्यातून बघायला मिळतं. त्यांचे विचार आणि त्यांनी केलेल्या विविध चळवळी आजही प्रेरणादायी ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणात फार व्यापक भूमिका घेतली होती. 'कोणत्याही एका जातीचा पक्ष असू नये' असे त्यांचे मत होते. 'अस्पृश्यांना राजकीय अधिकार प्राप्त झाल्याशिवाय त्यांचे उत्थान होऊ शकत नाही', असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना 'सत्ताधारी जमात बना' असा आदेश दिला होता. त्यासाठी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र त्यांच्या अनुयायांना दिला. बाबासाहेबांचा हाही मंत्र त्यांच्या अनुयायांनी कधी अमलात आणला नाही. ते शिकले, परंतु संघटित होऊन त्यांनी संघर्ष केला नाही. संघटित होण्याऐवजी ते फुटतच राहिले. केवळ व्यक्तिगत अहंकारामुळेच ते एकत्र आले नाहीत. समाधानाची बाब म्हणजे सामान्य दलित जनता संघटित राहिली. स्वयंस्फूर्तपणे प्रत्येक संकटकाळी या जनतेने एकजुटीचे दर्शन घडविले.

१९३५ साली प्रांतिक विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यावेळी अस्पृश्य, शेतमजूर, शेतकरी, कामगार आणि इतरांच्या कल्याणासाठी ऑगस्ट १९३६ मध्ये बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. अशी व्यापक भूमिका घेतलेल्या पक्षाने मुंबई प्रांतात अस्पृश्यांसाठीच्या १५ जागांपैकी १३ जागा जिंकल्या. खेड्यांची जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत या देशाचीही सुधारणा होऊ शकत नाही, असे या पक्षाचे धोरण होते. बाबासाहेबांना वाटत होते की भारतातील अस्पृश्यांच्या सर्व संघटनांचे विलीनीकरण करून अस्पृश्यांच्या हक्कांसाठी देशपातळीवर प्रभावी संघटना स्थापन करावी. १५ जुलै १९४२ रोजी नागपूर येथे यासाठी परिषद बोलावण्यात आली. या परिषदेत 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना करण्यात आली. एन. शिवराज शे.का.फे. चे पहिले अध्यक्ष निवडले गेले. या परिषदेला मद्रास, बंगाल, हैदराबाद, संयुक्त प्रांत, पंजाब, आंध्र इत्यादी भागांतून प्रतिनिधी आले होते. बाबासाहेब म्हणत असत– राजकारणात आपण अल्पसंख्य आहोत. समविचारी पक्षांशी आपण युती करून सत्तेवर आले पाहिजे. आपले तत्त्वज्ञान आणि सिद्धांताला पूरक अशा पक्षाशी युती करायला हरकत नाही. भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष आणि देशाचे कायदामंत्री म्हणून राज्यघटनेच्या निर्मितीचे ते प्रमुख शिल्पकार ठरले. बुद्धधम्मविषयक चिंतनातून त्यांनी भारतीय गणराज्यांच्या प्राचीन वारशाला लोकशाहीची नवी झळाळी दिली. आज प्रामुख्यानं आपण त्यांचं राजकिय तत्वज्ञान, चिंतन आणि त्यांचं राजकीय द्रष्टेपण यांचा विचार करणार आहोत.

भारत हा जगातला सर्वात मोठा लोकशाही देश आहे. आपल्या आधी, बरोबर आणि नंतर स्वतंत्र झालेले अनेक देश लोकशाही टिकवू शकले नाहीत. हुकुमशाही किंवा लष्करी राजवट त्यांच्या वाट्याला आली. आपल्या शेजारच्या एका देशात अलिकडेच डॉ. आंबेडकरांची जयंती साजरी करण्यात आली. तेव्हा

तिथल्या सर्व विचारवंतांनी आवर्जून एक मुद्दा पुन्हापुन्हा मांडला. त्यांच्या घटनेच्या कमकुवतपणामुळे त्यांची लोकशाही मृतप्राय झाली. भारताची राज्यघटनाच इतकी मजबूत होती, आहे की तिच्या लोकशाहीची प्रगल्भता दिवसेंदिवस वर्धिष्णू होत आहे. तिथले सगळे वक्ते म्हणत होते, काश, हमारा संविधान लिखने के लिये हमे भी एक बाबासाहब डॉ.. अंबेडकर मिलते. हमेभी एक बाबासाहब भीमराव अंबेडकर चाहिए. हमेभी भारत जैसा प्रजातंत्र चाहिए! बाबासाहेब आंबेडकर यांची थोरवी सांगणारी ही घटनाच एव्हढी बोलकी आहे की त्यावर कोणतेही भाष्य करण्याची गरज नसावी.

भारतीय राज्यघटनेत प्राचीन भारतीय परंपरा आणि सर्वंकष परिवर्तन यांचा समतोल साधण्याचं फार अवघड काम बाबासाहेबांनी केलं. खरंतर हे भीमधनुष्य पेलणं सोपं नव्हतं. संविधानाच्या रूपानं एक राजकीय-सामाजिक क्रांतिकारी विधानच त्यांनी अस्तित्वात आणलं. त्यातून भारताच्या आधुनिकीकरणाला जोरदार चालना मिळाली. भारतीय राज्यघटना ही भारतीय समाजाची आधुनिकीकरणाची शक्तीशाली प्रेरणा ठरावी हा प्रमुख राजकीय उद्देश डोळ्यांपुढे ठेवून त्यांनी संविधानाची सगळी उभारणी केली. लोकशाही जीवनपद्धती आणि सामाजिक क्रांती हे एकसंधत्वाचे महत्वाचे धागे त्यांनी एकमेकात गुंफले. त्यासाठी लोकशाही, प्रातिनिधिक सरकार, व्यक्तिस्वातंत्र्य, कायद्यापुढे सर्वांची समानता या गोष्टी फार क्रांतिकारी ठरल्या. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या वैश्विक मुल्यांवर आधारित नवभारताची जडणघडण करण्याची कामगिरी त्यातूनच साकारली गेली. राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता अबाधित राखण्याचं आव्हान संविधानानं पेललं.

आपल्या राज्यघटनेची सुरूवात आम्ही भारताचे लोक या शब्दांनी व्हायला हवी असा विचार जेव्हा बाबासाहेबांनी मांडला तेव्हा अनेक सदस्यांनी देवाच्या नावानं अशी संविधानाची सुरूवात करावी अशी दुरूस्ती सुचवली. काहींनी तर त्यासाठी विविध देवदेवतांची नावंही सुचवली. बाबासाहेब मात्र लोकांवर ठाम राहिले. ही देवलोकाची राज्यघटना नसून लोकशाही भारताची घटना असल्याचं स्पष्ट करून बाबासाहेबांनी दुरूस्ती नाकारली. शेवटी हा विषय मतदानाला टाकण्यात आला. आणि शेवटी मतदानात लोकांचा विजय झाला. संसदेला भारताच्या राज्यघटनेत काळानुरूप दुरूस्त्या करण्याची व्यवस्था आहे. मात्र अशी दुरूस्ती करताना घटनेच्या मूळ चौकटीला हात लावता येणार नाही अशी व्यवस्था त्यांनी करून ठेवल्यानेच भारतात लोकशाही जाऊन तिथे कधीही हुकूमशाही, राजेशाही अथवा लष्करशाही येऊ शकत नाही. गोलखनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालयानेही त्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे.

२७ जानेवारी १९१९ रोजी साऊथबरो आयोगासमोर आपली साक्ष नोंदवताना बाबासाहेबांनी सर्वप्रथम प्रौढ मतदान पद्धतीची मागणी केली. सायमन आयोग आणि गोलमेज परिषदेत त्यांनी ही मागणी लावून धरली. भारतीय संविधानात मताधिकारासाठी शिक्षणाची अट घालावी असा काही सदस्यांचा आग्रह होता. बाबासाहेबांनी त्याला ठामपणे विरोध केला. शाळेच्या जगातील साक्षरता महत्वाची असली तरी जगाच्या शाळेतले सामान्य लोकांचे सामुहिक शहाणपण आणि भारतीय राजकीय साक्षरता लक्षात घेता सर्वांना मताधिकार दिला जाण्याची गरज त्यांनी लावून धरली. अमेरिकेसारख्या देशातही महिलांना मताधिकारासाठी

खूप मोठा लढा द्यावा लागला. भारतीय महिलांना मताधिकार आणि समान कामाला समान दाम ही व्यवस्था संविधानानेच दिली.

डॉ. आंबेडकर हे कायदेतज्ञ होते. राजकिय विचारवंत होते. जागतिक राजकीय विचारांचा आणि राजकारणाचा त्यांचा गाढा व्यासंग होता.

३ आक्टोबर १९४५ रोजी पुण्यातील अहिल्याश्रमात आंबेडकर स्कूल ऑफ पोलिटिक्स या संस्थेचे उद्घाटन करताना राजकारणाला ते किती महत्व देतात ते त्यांनी भाषणात नमूद केले होते. ते म्हणाले होते, व्यक्तीमात्राच्या स्वातंत्र्याचे मापन करण्याचे मुलभूत माप म्हणजे राजकारण होय. राजकीय सत्ता ही सर्व समस्या सोडवण्याची गुरूकिल्ली असल्याचे त्यांचे विधान प्रसिद्धच आहे.

बाबासाहेबांच्या राजकीय योगदानाची चर्चा करताना ती दोन पातळ्यांवर करावी लागते. एका पातळीवर त्यांनी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी केलेले राजकारण आणि दुसऱ्या पातळीवर सर्वच भारतीयांसाठी आणि अंतिमत: मनुष्यजातीच्या मुक्तीसाठी केलेले योगदान समजावून घ्यावे लागते. ह्या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. त्यांनी भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच अस्पृश्यतेचा प्रश्न राजकीय पातळीवर नेला आणि त्यांच्यासाठी राजकीय हक्कांची मागणी केली. संविधानात ते मिळवूनही दिले. सामाजिक न्यायासाठी प्रतिनिधित्व मिळावे यासाठी शिक्षण, सरकारी नोकऱ्या आणि पंचायत राज्य ते संसद येथे राजकीय आरक्षण मिळवून दिले. त्यामुळे दलितांचे मुक्तीदाता हा त्यांचा पैलू अनेकदा प्रखरपणे मांडला जातो, ठळकपणे पुढे येतो. मात्र त्यांचे महिला, इतर मागासवर्गिय, कामगार, शेतकरी आदींच्या मुक्तीचे राजकारण तुलनेने दुर्लक्षित राहते. त्यांनी आपला पहिला राजकिय पक्ष स्थापन केला तेव्हा तो सर्वांसाठी खुला होता. आयुष्याच्या शेवटी त्यांना आर.पी.आय.ची स्थापना करायची होती. त्यासाठी त्यांनी लिहिलेले खुले पत्र त्यांच्या विशाल राजकीय विचारांची उंची सांगून जाणारे आहे.

डॉ. आंबेडकरांनी १५ आगष्ट १९३६ रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या ध्येय धोरणांमधून त्यांचा राजकीय विचार किती व्यापक होता याचीच प्रचिती येते. अस्पृश्यता निवारणाचा लढा जरी अस्पृश्य श्रमजिवी जनतेला स्वतंत्रपणे लढावा लागणार असला तरी आर्थिक लढ्यात मात्र स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी – कामगार वर्गाचे हितसंबंध एकजीव असल्याची पक्षाची राजकीय भुमिका होती. हा लढा लढताना जात – पात – धर्म – प्रांत हे सारे भेद मनात न आणता मजूर तेवडे एक ही वर्गभावना मनात ठसवून आपला पक्ष काम करील असे त्यांनी त्यांनी जनता पत्रातून स्पष्ट केले होते.

निवडणूक जाहीरनाम्यात या पक्षाने कुटूंब नियोजनासाठी कायदा करण्याचे आश्वासन दिले होते. हा राष्ट्रीय हिताचा प्रश्न निवडणुकीच्या जाहीरनाम्यात आणणारा तो पहिला आणि एकमेव पक्ष होता. ह्या पक्षाला १८ जागा मिळाल्या. विधीमंडळातील तो दुसर्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरला. सत्तेवर येता आले नाही तरी बाबासाहेबांनी कुटूंब नियोजनासाठी अशासकीय विधेयक आणले. १० नोव्हेंबर १९३८ साली त्यावर विधीमंडळात चर्चा झाली. जन्मदर महत्वाचा नसून पोषण दर महत्वाचा असतो. लोकसंख्येचा वाढणारा भस्मासूर देशाला परवडणारा नसून भारतीय नागरिकांनी एक किंवा दोन अपत्यांवरच थांबले पाहिजे आणि

मुलामुलींचे उत्तम पालनपोषण केले पाहिजे असे विधेयकात म्हटलेले होते. छोटे कुटुंब असणारांना पुरस्कार आणि सवलती दिल्या जाव्यात मात्र मुलामुलींचे लटांबर जन्माला घालणारांना कठोर शिक्षा करण्यात यावी असेही त्यांचे मत होते. देशात त्यावेळी दुसरा कोणताही राजकीय नेता किंवा पक्ष या विषयावर बोलायला तयार नव्हता. इतर सर्वच पक्ष बाबासाहेबांचा द्रष्टेपणा ओळखायला कमी पडल्याने हे विधेयक फेटाळले गेले. १९५२ सालच्या निवडणूकीतही बाबासाहेबांनी हा विषय त्यांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या जाहीरनाम्यात मांडला होता.

बाबासाहेबांना नियतीने त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीची जाणीव होती. खोतीविरोधी शेतकरी परिषदेत ते म्हणाले होते, माझा जन्म सर्व साधारण जनतेची जबाबदारी घेण्यासाठीच असावा. मीदेखील मजूरवर्गापैकी एक असून इम्प्रूमेंट ट्रस्टच्या चाळीत राहतो. इतर ब्यारिस्टरांप्रमाणे मलादेखील बंगल्यात रहाता आले असते, पण माझ्या शेतकरी व अस्पृश्य बंधूंकरता चाळीत राहूनच काम केले पाहिजे. याबद्दल मला केव्हाही वाईट वाटत नाही.

माणसाचा वर्ग बदलला की वर्गजाणीवही बदलते. ते म्हणत, राजकारण हे वर्गीय जाणिवेवरच उभे असायला हवे. वर्गीय जाणिवेशिवाय केले जाणारे राजकारण ही भोंदूगिरी आहे. मात्र भारतीय समाजात केवळ संपत्ती हीच सत्तेचा एकमेव स्त्रोत होऊ शकत नाही.तिच्याबरोबरच धर्म आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचाही विचार करायला हवा. जातीची नेमकी व्याख्या त्यांनी केली होती. बंदीस्त वर्ग म्हणजे जात. मानवी प्रगतीच्या आणि पर्यायाने देशाच्या प्रगतीच्या आड येणारी, कार्यक्षमता मारणारी जातीव्यवस्था संपविल्याशिवाय भारत राष्ट्र म्हणुन उभे राहू शकणार नाही. प्रत्येक जात हे एक स्वतंत्र राष्ट्र असते. जात श्रेणीबद्ध विषमता निर्माण करते. ते केवळ कामाचे वाटप नसून ते काम करणारांचे जन्मावर आधारित वाटप आहे. गुणवत्ता आणि क्षमता यांना या व्यवस्थेत थारा नाही. म्हणून त्यांनी जातीनिर्मुलनासाठी स्त्रीपुरूष समता, सर्वांना शिक्षण, संसाधनांचे फेरवाटप, आंतरजातीय विवाह आणि धर्म चिकित्सा ही पंचसुत्री दिली. संसदीय लोकशाहीची जीवनमुल्ये जनतेने शिरोधार्य मानावीत यासाठीच त्यांनी धर्मांतर चळवळीचे जन आंदोलन उभारून सारा भारत बौद्धमय करण्याचा संकल्प सोडला होता.

१९५२ च्या निवडणूक जाहीरनाम्यात ते म्हणतात, शे.का.फेडरेशनला अनुसुचित जाती आणि इतर मागासवर्ग यांच्याबरोबर हातात हात मिळवून काम करायचे आहे. या दोघात जागृती करून त्यांना बलवान करायचे आहे. लोकांची इच्छा असेल तर आपण शे.का.फेडरेशनचे नाव बदलून अ.भा.मागासवर्गीय फेडरेशन असे करू. मुंबई प्रांताचे आमदार असताना स्टार्ट कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी १९३० साली सर्वप्रथम ओबीसी प्रवर्गालाही संरक्षण दिले जाण्याची शिफारस केली होती. त्यांनी केंद्रीय कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला तेव्हा हिंदू कोड बिल अर्थात महिला अधिकार कायदा पास व्हावा आणि इतर मागासवर्गियांसाठी आयोग नेमला जावा या प्रमुख मागण्या केल्या होत्या. त्यांनी १९४६ साली 'शूद्र पुर्वी कोण होते?' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी ओबीसी प्रवर्गाची जनगणना व्हायला हवी अशी मागणी केली होती. केंद्र सरकारने अलिकडेच केलेली जातवार आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक पाहणी ही त्याच मागणीची परिपुर्ती आहे.

२० जुलै १९४२ रोजी ते ब्रिटीश सरकारच्या मंत्रीमंडळात कामगार, सार्वजनिक बांधकाम, उर्जा आणि पाटबंधारे खात्यांचे मंत्री झाले. त्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी देशातील पंधरा धरणांच्या कामांची सुरूवात केली. देशातील मोठ्या नद्या एकमेकींना जोडण्याची योजना त्यांचीच. देशातील जनतेला पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगधंदे आणि जलप्रवास व जलपर्यटन यासाठी मुबलक पाणी मिळण्यासाठी त्यांनी योजना आखल्या, जल साक्षरता मोहीम चालवली. वीजनिर्मितीशिवाय उद्योगधंदे वाढू शकत नाहीत आणि शेती उत्पादनही वाढू शकत नाही म्हणून उर्जेच्या निर्मितीवर त्यांनी भर दिला.

देशाची प्रगती मोजण्याची फूटपट्टी काय असावी याबाबत आपले मत सांगताना ते म्हणाले होते, ज्या देशात स्त्रियांची प्रगती झालेली असेल तोच देश प्रगत मानला पाहिजे. राजकारणात व पक्षसंघटनेत स्त्रियांना अग्रक्रम दिला पाहिजे याबाबत ते आग्रही होते.

राजकिय लोकशाहीचे आपण सामाजिक लोकशाहीत रूपांतर करायला हवे. सामाजिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाही टिकणार नाही. सामाजिक लोकशाही हा जीवनमार्ग आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जीवनमुल्यांशिवाय आपले राष्ट्रीय आरोग्य वाढीस लागणार नाही असे ते सतत सांगत असत. घटना सभेतील त्यांच्या शेवटच्या भाषणात ते म्हणाले होते, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह हे मार्ग आपण दूर ठेवले पाहिजेत. विभुतीपूजा जगात कोणत्याही देशात नसेल इतकी भारतीय राजकारणात आहे. व्यक्तीपुजेचा हा मर्ग अध:पतन आणि अंतिमत: हुकुमशाहीकडे जात असतो. २६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत.राजकारणात आपल्याकडे समता राहील. परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्व आपण नाकारीत राहणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात जर अशीच विषमता राहिली तर आपली राजकीय लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेव्हढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

२० मे १९५६ ला व्हाइस ऑफ अमेरिका या नभोवाणी केंद्राला दिलेल्या ‘भारतीय लोकशाहीचे भवितव्य या विषयावरिल मुलाखतीत ते म्हणाले होते, लोकशाही ही सहजीवनाची एक पद्धत आहे. लोकांनी निर्मिलेल्या समाजात सामाजिक संबंध तसेच लोकांच्या परस्परातील सहजीवनात लोकशाहीची मुळे शोधावी लागतात. जातीव्यवस्थेने श्रेणीबद्ध विषमता निर्माण केलेली आहे. जातींचा दर्जा समान नसतो. त्या एक दुसरीच्या वर उभ्या असतात. त्या एकमेकींच्या द्वेष करतात. त्यांच्यात चढत्या क्रमाने द्वेष आणि उतरत्या क्रमाने तिरस्कार, तुच्छता असते. तिचा घातक परिणाम म्हणजे परस्पर सहकार्याची भावना नष्ट होते. ही

भावना लोकशाहीला नकार देते. जातीव्यवस्थेचे बळी असणारांना शिक्षण दिल्याशिवाय भारतीय लोकशाहीला भवितव्य असणार नाही.

१२ मे १९५६ ला बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी रशियन साम्यवादी शासनव्यवस्थेवर टिका केली होती. यातील हिंसा आणि रक्तरंजित मार्ग घातक ठरतील असे ते म्हणाले होते. प्रेम, अंधश्रद्धाविरोध आणि समता शिकवणारा बुद्धाचा मार्ग हाच यावरचा उपाय असल्याचे ते म्हणाले होते. बौद्ध धम्मातील संघ हे साम्यवादी संघटनच आहे. त्यामध्ये खाजगी मालमत्तेला जागा नाही, आणि हे परिवर्तन हिंसेतून आलेले नाही. हा बदल मानसिक परिवर्तनातून झालेला आहे. दारिद्र्य पूर्वीही होते आणि पुढेही राहणार आहे. हे कारण पुढे करून मानवी स्वातंत्र्याचा बळी देणे सुज्ञपणाचे नाही. बुद्धधम्म ही एक सामाजिक तत्वप्रणाली आहे. तिचे पुनरूज्जीवन शाश्वत घटना ठरेल. रशियात १९८० च्या दशकात झालेले राजकीय परिवर्तन बघता बाबासाहेबांचा इशाराच खरा ठरला असे म्हणावे लागते.

आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून ३ आक्टोबर १९५४ ला केलेल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव हे तत्वज्ञान फ्रेंच राज्यक्रांतीतून मला मिळालेले नसून मला ते बुद्ध धम्मातून मिळाले आहे, असे त्यांनी सांगितले.

आपले राज्यकर्ते प्रामाणिक असतील तरच भारतीय संविधान यशस्वी होईल अन्यथा नाही असाही ईषारा त्यांनी दिला होता.

राजकीय विचारधारा म्हणून त्यांची समाजवादावर भिस्त असूनही ते उदारमतवादी लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. उच्च शिक्षणासाठी कोलंबिया विद्यापिठात न्यू यार्कला असताना आणि लंडन स्कूल ओफ इकोनोमिक्समध्ये असताना त्यांच्यावर उदारमतवादी विचारवंतांचा संस्कार झालेला होता. कायद्याचे राज्य Rule of Law ही संकल्पना आंबेडकरांच्या राजकिय विचारांचा केंद्रबिंदू होता. प्रत्येक भारतीय नागरिकाने संवैधानिक नितीमत्ता अंगी बानवली पाहिजे म्हणजेच संविधानबाह्य वर्तन कोणीही करता कामा नये, यावर त्यांचा कटाक्ष होता. एक व्यक्ती एक मत यापेक्षा एक व्यक्ती एक मुल्य यावर त्यांचा भर होता. सामाजिक लोकशाहीची मुल्ये त्यांनी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये समाविष्ट केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मोफत आणि सार्वत्रिक असावे ही ४५ व्या कलमातील तरतूद त्यांना मुलभूत अधिकारात आणायची होती. ती त्यांना आणता आली नाही. मात्र त्यासाठी त्यांनी १० वर्षांची त्याला मुदत घातली होती. पुढे १ एप्रिल २०१० ला शिक्षण हक्क कायदा आणून सर्व शिक्षण मोहिमेद्वारे आपण जे केले ते त्यांना तेव्हाच हवे होते, यावरून त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो.

पर्याप्त प्रतिनिधित्व देण्यासाठी त्यांनी अनुसुचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गियांना आरक्षण देण्याची तरतूद केली.मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षण ५०%पेक्षा असता कामा नये असे त्यांनी ३० नोव्हेंबर १९४८ ला घटना परिषदेत निक्षून सांगितले होते. पुढे बालाजी खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबतचे निर्देश देऊन बाबासाहेंबाचेच मत योग्य असल्याचे अधोरेखित केले. आरक्षणामागे समान संधीसाठी विशेष संधी असे समतेचे तत्वज्ञान असून राजकीय आरक्षण १० वर्षांवजी जास्त काळ द्यावे

लागेल असे भाकीत त्यांनी केले होते.या मुदतवाढीसाठी सहा वेळा घटना दुरूस्ती करावी लागली यावरून त्यांचे मतच देशाने प्रमाण मानायला हवे होते हे लक्षात येते.

४ एप्रिल १९३८ रोजी मुंबई प्रांताच्या विधीमंडळात तळमळीने आणि राष्ट्रभावनेने बोलताना डॉ.बाबासाहेब म्हणाले होते, "I do not like what some people say, that we are Indian first and Hindus afterwards or Muslims afterwards. I am not satisfied with that, I frankly say that I am not satisfied with that. I do not want that our loyalty as Indians should be in the slightest way affected by any competitive loyalty whether that loyalty arises out of our religion, out of our culture or out of our language. I want all people to be Indian first, Indian last and nothing else but Indians." सर्व देशवासियांनी आपली ओळख फक्त भारतीय म्हणून सांगण्याचा हा दिवस अजुनही उगवलेला नसल्याने बाबासाहेबांचे हे स्वप्न अजूनही अधुरे आहे.

शोषित, वंचित समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी राजकीय सत्ता आवश्यक असते हे ओळखून दलित उपेक्षितांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मुक्तीसाठी ते राजकीय सत्ता हस्तगत करण्याच्या हेतूने निवडणुकांच्या राजकारणाकडे बघतात. निवडणुकीतील पराभव हे खेळातील पराभवासारखे असतात, त्याने नाउमेद न होता पुन्हा नव्या जोमाने खेळायचे असते असे ते म्हणतात. दलितांनी व मागासवर्गियांनी आपली करारपात्रता Bargaining Power वाढविल्याशिवाय त्यांना समान वाटा मिळाणार नाही असे ते स्पष्ट सांगतात. आंबेडकरांची सत्तासंकल्पना संघर्षातून नव्हे तर समन्वयातून साकार होणारी आहे. त्यांच्या राजकारणाचा संपूर्ण रोख समाजबदलावर होता. त्यांचा सत्तासंपादनाचा मार्ग संसदीय स्वरूपाचा असून तो मुख्यत: राखीव जागांशी संबंधित आहे. ते त्यासाठी दलित, आदीवासी, इतर मागास वर्गिय यांची व्यापक एकजूट व्हावी यासाठी झटत राहिले. आपल्या लोकशाहीने दलितांच्या हिताला संरक्षण पुरविण्याची प्रगल्भता दाखवावी असे आंबेडकरांना वाटत असे. व्यक्तीच्या मुलभूत हक्कांना संरक्षण देणे हे राज्यसत्तेचे प्रमुख कार्य ते मानतात. बळकट विरोधी पक्ष, वृत्तपत्र स्वातंत्र्याचे जतन आणि निवडणुकांद्वारेशांततामय मार्गाने सत्तांतर यावर त्यांचा सारा भर होता.विरोधी पक्षाचा वचक नसेल तर तो सत्तेचा गैरवापर करील या भुमिकेतून ते द्विपक्षीय पद्धतीचा पुरस्कार करतात. तुल्यबळ दोन पक्ष असतील तेव्हा मागास वर्गियांनी तराजूतील पासंगाचे राजकारण करावे असे ते सांगतात. संघटित शक्तीच्या बळावरच सत्ता आणि भौतिक लाभ त्यांना मिळवता येईल असा आशावाद ते व्यक्त करतात. आपल्याला जातीय बहुमत नको तर विचारांचे बहुमत हवे असे ते म्हणतात. वरिष्ठवर्णियांच्या दयाबुद्धीवर विसंबण्यापेक्षा राजकीय बहुमताच्या आधारे वाटचाल करा असा सल्ला ते देतात. धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना त्यांनी स्विकारली होती. धर्मांतरामागे त्यांची प्रेरणा अध्यात्मिक असण्यावजी महान लोकशाहीवादी बुद्धाचा स्विकार ही होती. राज्यसमाजवादाची आणि वर्गिय राजकारणाच्या आपल्या भुमिकेला काहीशी मुरड घालून त्यांना संवैधानिक संसदिय मार्गाने प्रवास करावा लागला.

आपण जर एकाच विषयावर दोनदा किंवा अधिकवेळा बोललो अथवा लिहिले असेल आणि त्यात विसंगती असेल तर त्यातील कालानुक्रमे शेवटी आलेले मत प्रमाण मानावे असे सांगून ते म्हणतात, जबाबदार माणसाकडे पुनर्विचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धाडस असलेच पाहिजे.

बाबासाहेब 'भाषावार प्रांतरचनेवरील विचार' या विषयावरील लेखनात इमर्सनला उद्धृत करुन म्हणाले होते, द्वेषबुद्धीने माझ्यावर टिका करणाऱ्या आणि माझ्या विसंगतीचेच भांडवल करू पाहणाऱ्या माझ्या टिकाकाराला मी सरळ उत्तर देत आहे. विचारातील सातत्य, सुसंगती, तोचतोचपणा  हा गाढवाचा सद्गुण आहे असे इमर्सनने म्हटले आहे. सुसंगती राखून मला गाढव व्हायचे नाही. सुसंगतीच्या नावाखाली एकेकाळी व्यक्त केलेल्या मताला कोणताही विचार करणारा माणूस स्वत:ला जखडून घेणार नाही. सुसंगतीपेक्षाही जबाबदारी जास्त महत्वाची असते. जबाबदार माणसाकडे एकदा शिकलेले विसरून जाण्याचे, पुनर्विचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धैर्य असले पाहिजे. अर्थात तसे करण्यासाठी त्याच्याजवळ पुरेशी आणि सबळ कारणे असली पाहिजेत. कारण विचारविश्वात अंतिम असे, शेवटचा शब्द म्हणून काही नसते.

To a critic who is a hostile and malicious person and who wants to make capital out of my inconsistencies my reply is straight. Emersson has said that consistency is the virtue of an ass and I don't wish to make an ass of myself. No thinking Human being can be tied down to a view once expressed in the name of consistency. More Important than consistency is responsibility. A responsible person must learn to unlearn what he has learned.  A responsible person must have the courage to rethink and change his thoughts.Of course there must be good and sufficient resons for unlearning what he has learned and for recasting his thoughts.There can be no Finality in Thinking.

यावरून आंबेडकरवाद हा परिवर्तनशील राजकीय विचार होता हे स्पष्ट होते.

बाबासाहेब आज असते तर त्यांनी आजच्या समस्यांवर काय तोडगा काढला असता याचा अंदाज करता येतो. कायदे मंत्रीपदाचा राजीनामा देताना त्यांनी भारताच्या आर्थिक धोरणांबद्दल आणि परराष्ट्र धोरणांबद्दल प्रश्न उपस्थित केले होते आणि चीन व काश्मीरबाबतची पाकिस्थानची डोकेदुखी हे पुढच्या काळातील फार तापदायक समस्या असतील असे भाकीत केले होते. ते पुढे किती अचूक ठरले ते आपण पाहिले आहे.

बाबासाहेबांचा द्रष्टेपणा लक्षात घेऊनच दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला यांनी आणि नेपाळने आपली राज्यघटना बनवताना बाबासाहेबांच्या विचारांचा सखोल अभ्यास केला होता.

आज बाबासाहेब हे सामाजिक न्याय आणि लोकशाही विचारधारेचे प्रतिक बनले असून डॉ. रामचंद्र गुहा यांच्यासारख्या थोर इतिहासकाराने तसेच नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनी आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार म्हणून बाबासाहेबांचा गौरव केला आहे.

बाबासाहेबांच्या साहित्याच्या खंड १७ ते २२ चे संपादन करताना त्यांचे द्रष्टेपणा पुस्तकांच्या पानापानांवर आढळून आले. त्यातून आपला मार्ग आपण शोधायला हवा.

### ३.२.२ राज्यावरील दृष्टिकोन : उदारमतवादी, विविधतावादी, अभिजन सिद्धांत, उत्तर आधुनिकतावादी

**A) उदारमतवादी:**

समाजाच्या वा राज्याच्या कोणत्याही नागरिक व्यक्तीला किंवा सर्व नागरिकांना व्यक्तिशः स्वातंत्र्याचा हक्क मिळाला पाहिजे व त्याकरिता राज्य व सार्वजनिक संस्था यांचे धोरण व व्यवहार व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काला बाध येणार नाहीत, अशा पद्धतीने व धोरणाने चालले पाहिजेत, असा दृष्टिकोन म्हणजे उदारमतवाद होय. सांप्रदायिक विचारप्रणाली हे स्वरूप उदारमतवादाला नाही. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे व्यक्तित्वाचा अनिर्बंध आविष्कार हे मुख्य मूल्य होय. स्वतःस व समाजास उपयुक्त असा आत्माविष्कार करण्याची माणसात पात्रता असते ज्या संस्था व राजकीय धोरणे अशा आत्माविष्काराचे व स्वातंत्र्यावरील निष्ठेचे संवर्धन करतात, त्यांची स्थापना वा पुरस्कार करणे हेच योग्य होय, असा उदारमतवादाचा आशय आहे.

ह्या आशयास अनुसरून उदारमतवादी विचारसरणी व व्यवहार पुढील दोन मूलभूत गोष्टींवर भर देतात : (१) स्वेच्छातंत्र सत्ताधारित्वाची नापसंती व (२) व्यक्तिचा अनिर्बंध आविष्कार. धर्मसंस्थांच्या व परंपरावादी सत्ताधाऱ्यांच्या अनियंत्रित सत्तेला उदारमतवादी विरोध करीत आले आहेत. धर्मश्रद्धेऐवजी बुद्धिवादाचा आश्रय करून वैचारिक प्रचारस्वातंत्र्याला त्यांनी उचलून धरले आहे. सामाजिक व राजकीय नियंत्रण व्यक्तिनिरपेक्ष असावे म्हणजे संपत्ती, सामाजिक दर्जा इत्यादिकांवर व्यक्तींच्या व्यवहाराचे नियंत्रण करणारे नियम आधारलेले असू नयेत, व्यक्तींना समान वागणूक मिळावी, कायद्याचे राज्य असावे व देशादेशांत अनिर्बंध व्यापार चालावा.

उदारमतवादाचे प्रात्यक्षिक स्वरूप असे आहे. व्यक्तींना स्वातंत्र्याची वाढ करण्याकरिता व योग्यता दाखविण्याकरिता संधी मिळावी, म्हणून स्वातंत्र्याची अधिकाधिक समान वाटणी व्हावी आर्थिक मक्तेदारी व वरिष्ठ वर्गांचे विशेषाधिकार रद्द व्हावेत निरनिराळ्या संधींचा विस्तार व्हावा, राज्याचा हस्तक्षेपही कमी व्हावा. उदारमतवादाचे असे प्रत्यक्षीकरण झाल्याने विज्ञान, तंत्र, नवे नवे उपयुक्त प्रयोग ह्यांची वाढ होऊन इंग्लंड, पश्चिम यूरोप व अमेरिका ह्यांमध्ये आर्थिक व सामाजिक प्रगती झाली. पश्चिम यूरोपातील आधुनिक राज्यांनी नवी धोरणे अंमलात आणल्यामुळे उद्योगी व सुशिक्षित वर्गाची वाढ झाली भांडवलशाही आर्थिक पद्धती स्थिरावली व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्राप्तीबरोबर व्यक्ती व गट यांच्यात जबाबदारीची जाणीव उत्पन्न झाली आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करण्याची प्रेरणा मिळाली. अगणित नव्या संस्था व उद्योग उभे राहिले. संकुचित दृष्टिकोन मावळू लागला आणि विश्वबंधुत्वाची भावना निपजली व निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रांत एक नवीन अभिजनवर्ग तयार झाला. उदारमतवादाच्या वातावरणात भांडवलशाही समाज निर्माण होऊन आर्थिक व सांस्कृतिक क्रांती झाली. परंतु बहुजनसमाजाचे जीवन कष्टाचेच राहिले. उदारमतवादात व्यक्तींवरील बंधनांचा निरास हे निषेधात्मक तत्त्व प्रधानता पावले. परंतु तेवढ्याने सामान्य जनांना संपन्न आर्थिक व सांस्कृतिक जीवन लाभले नाही. तशा जीवनाकरिता आवश्यक असलेली विधायक तत्त्वे सांगणारा

क्रांतिकारक समाजवादी विचार एकोणिसाव्या शतकात वाढून प्रभावी होऊ लागला. उदारमतवादाचा प्रभाव कमी होऊन, उदारमतवादी पक्षांच्या व व्यक्तींच्या हातातील राजकीय सत्तेची सूत्रे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ढिली होऊ लागली व तशा पक्षांचा पराभव होऊ लागला. ह्यानंतर उदारमतवादाचा संपूर्ण त्याग करणारा समाजवाद पुढे आला. समाजवादात समाजहिताकरिता उभ्या रहावयाच्या संस्थांची नवीन बंधने निर्माण होणार, हे दिसू लागल्यावर उदारमतवादाचे रूपांतर लोकशाहीप्रधान समाजवादात झाले. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ब्रिटनमधील मजूरपक्षाशी सहानुभूती असलेल्या विचारवंतांचा व मजूरपक्षीय नेत्यांचा फेबियन समाजवाद होय.

**ऑक्सफर्ड शब्दकोश:** उदारमतवादी ही राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान असून ते व्यक्तीचे हक्क नागरी स्वातंत्र्य लोकशाही व मुक्त उपक्रम यांना चालना देते.

**उदारमतवादाची तत्वे:**

राज्य शासन किंवा राजकीय सत्तेच्या संदर्भात उदारमतवादाची मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) **अमर्यादित सत्ता:** limited power

उदारमतवाद अनुसार राज्याची व शासनाची सत्ताही अमर्यादित निरंकुश व अनिर्बंध नाहीतर ती मर्यादित व नियंत्रित स्वरूपाची आहे. या सत्तेचा आधार हा शक्ती नसून लोकांची संमती आहे.

२) **हक्क व स्वातंत्र्याचे संरक्षण:**

आपल्या नागरिकांच्या हक्काचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व संवर्धन करणे हे राज्याचे मुख्य कार्य आहे. त्यांच्या हक्कावर व स्वातंत्र्यावर इतर व्यक्ती संस्था स्वतः राज्य व शासन यांच्याकडून आक्रमण होणार नाही याची काळजी राज्याने घ्यावी.

३) **लोकशाही राज्यव्यवस्था:**

समाजात लोकशाही राज्यव्यवस्था असावी जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधी याद्वारे राज्यकारभार चालविला जावा लोकांना मुक्तपणे राजकीय प्रक्रियेत सहभाग घेण्याची व्यवस्था असावी निवडणुका मुक्त वातावरणात घेतल्या जाव्यात.

४) **विविध संस्थांचे सहअस्तित्व:**

राज्यात विविध प्रकारच्या संस्था संघटन समूह असतात त्यांना आपापल्या कार्यक्षेत्रात कार्य करण्याचे स्वातंत्र्य स्वायत्त असावी राज्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात लहरीपणा करू नये त्यांचे सहअस्तीत्व राज्याने मान्य करावे. co-existence.

५) **विरोधकांना मान्यता:**

लोकशाही राज्यव्यवस्थेत अनेक राजकीय पक्ष वा संघटना असतात त्यापैकी सत्तारूढ पक्षाने विरोधी पक्षात याचा त्याच्या मताचा व विचारसरणीचा आदर करावा. त्याच्या विरोध करण्याच्या हक्क मान्य करावा.

विरोधी पक्ष संघटना व्यक्ती गट इत्यादी ने केलेली विधायक टीका लक्षात घेऊन आपल्या धोरणात निर्णयात इष्ट ते बदल सुधारणा कराव्यात.विरोधकांची बहुमताच्या जोरावर सत्ता रुड पक्षाने दडपून टाकू नये.

**उदारमतवादी दृष्टिकोन:**

उदारमतवादी एक व्यापक अशी विचारसरणी अथवा तत्वज्ञान असून ती मानवी जीवनाचा इतर सर्व क्षेत्राबरोबर आर्थिक सामाजिक सांस्कृतिक धार्मिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रात लागू केली जाते. राज्याचे स्वरूप सत्ता कार्यक्षेत्र राज्य व नागरिक यांचे परस्परसंबंध इत्यादी गोष्टी कशा असाव्यात याबाबतचे मत म्हणून उदारमतवादाची चर्चा राज्यशास्त्रात व राजकीय समाजशास्त्रात केली जाते.

**उदारमतवादाचा अर्थ:**

''उदारमतवाद म्हणजे परमत सहिष्णुता होय. म्हणजे इतरांच्या आचारविचारांचा मग ते आपल्या पेक्षा वेगळी किंवा विरोधी असले तरी आदर-सन्मान स्वीकार करणे हे होय.'' यावरून उदारमतवादी ही व्यक्तीच्या आचार-विचार स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी विचारसरणी व तत्वज्ञान आहे असे म्हणता येते. liberal हा शब्द आणि खडच् या दोन शब्दापासून बनलेला आहे. त्यापैकी लिबरल हा शब्द liber या लॅटिन शब्दापासून आला आहे त्याचा अर्थ free म्हणजे मुक्त स्वातंत्र्य असा आहे. ism म्हणजे वाद किंवा मत या विचारसरणीचा असा अर्थ होतो. राज्याच्या संदर्भात विचार करताना उदारमतवादी राज्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या राज्य असा अर्थ घेतला जातो. राज्याने आपल्या नागरिकांच्या हक्काचे व स्वातंत्र्याची संरक्षण व संवर्धन करावे जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सत्ताधाऱ्यांनी अवाजवी हस्तक्षेप व दडपशाही करू नये असे उदारमतवाद प्रतिपादन करतो.

**उदारमतवादाची व्याख्या:**

१. उदारमतवादी ही मानवी हक्क व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी व मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील राज्याच्या लहरी किंवा अवाजवी हस्तक्षेप विरोध करणारी विचारसरणी आहे.

**उदारमतवाद:**

व्यक्तिस्वातंत्र्य सर्वोच्च मूल्य मानणारी व व्यक्तीस जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळेल अशा रीतीने समाजाचे संपादन करणे ही मूलभूत ध्येय मानणारी विचार प्रणाली म्हणजे उदारमतवाद होय. उदारमतवाद प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रतिष्ठा व नैतिकता मूल्य महत्त्वाचे मानतो. राज्यसंस्था धर्मसंस्था परंपरेच्या सत्तेस त्यामुळे उदारमतवादी विचारसरणी विरोध करते.

हॉबहाऊसने उदारमतवादाची नऊ तत्वे सांगितली आहेत.

१) कायद्याचे राज्य व कायद्यासमोर समानता.

२) जबाबदार शासन.

३) विचार, भाषण, लेखन, संघटन धर्म स्वातंत्र्य.

४) व्यवसाय स्वतंत्र व समान संधीचे तत्व

५) आर्थिक स्वातंत्र्य: अर्थव्यवस्थेतील शासन संस्थेच्या हस्तक्षेपास विरोध.

६) अधिकारवादी कुटुंबास विरोध, स्त्री-पुरुषांना समान स्वातंत्र्य.

७) राष्ट्रीय स्वतंत्र

८) आंतरराष्ट्रीय राजकारणात सामर्थ्याचा वापरास व परकीय हस्तक्षेपास विरोध.

९) राजकीय स्वातंत्र्य जनतेचे सार्वभौमत्व अधिकारान्वये खुल्या निवडणुकीत निवडणूकित निवडून आलेले शासन.

**उदारमतवादी विचारसरणी:**

उदारमतवादाचा उदय इंग्लंडमधील रक्तहीन राज्यक्रांतीनंतर झाला. भांडवलशाही व्यवस्थेचे समर्थन करण्याची व मध्यम वर्गाच्या वर्चस्वाचा पाठिंबा देण्याचे ऐतिहासिक कार्य १८ व १९ व्यां शतकात या विचार प्रणालीने बजावले. काळा प्रमाणे व भांडवल शाळेच्या गरजेप्रमाणे या विचारसरणीत बदल झालेला आहे. रक्तही राज्यक्रांती व अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध फ्रेंच राज्य क्रांती च्या काळात उदारमतवादाने क्रांतीकारक रूप धारण केले. नैसर्गिक हक्क व सामाजिक कराराच्या सिद्धांतावर व्यक्ती स्वातंत्र्याचे मूल्य आधारलेले होते. जनतेला क्रांती करण्याचा हक्क असतो असे लॉक ने मांनले होते. बेथम व जॉन स्टुअर्ट मिलच्या काळात उदारमतवादाने मवाळा रूप धारण करून प्रतिनिधिक शासन संस्थेद्वारा व्यक्तिस्वातंत्र्याची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न केला व खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. उपयुक्तवाद्यांयांच्या आधाराने स्वातंत्र्याचे समर्थन करण्यात आले. भांडवल शाळेतून उदयास आलेल्या मध्यमवर्गाच्या काळात राजकीय सत्ता प्राप्त झाली, परंतु त्याचे भांडवल शाळेतून उदयास आलेल्या कामगार वर्गाची शक्ती निर्माण झाल्यामुळे अतिरेकी व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह धरणारा हा सनातनी उदारमतवाद मागे पडला व कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली होती. स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात येण्यासाठी राज्यांना हस्तक्षेप करावा लागतो असे म्हणणारा आधुनिक उतारमतवाद पुढे आला. परंतु कल्याणकारी राज्य आर्थिक नियोजनामुळे जेव्हा राज्याचा हस्तक्षेपाचा अतिरेक झाला, तेव्हा सनातनी उदारमतवादाचा उदय झाला, तू पुन्हा खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करू लागला. याप्रमाणे उदारमतवादी विचारसरणी मध्ये बदल घडत आला.

**इ) बहुलतावादी दृष्टीकोन :**

सार्वभौमत्वाच्या एकलवादी कल्पनेच्या विरोधात जी विचारधारा उदयास आली, तिला आपण राजकीय बहुसंख्याकवाद किंवा बहुलतावाद म्हणतो. अशाप्रकारे बहुलवाद ही सार्वभौमत्वाच्या अद्वैतवादी कल्पनेविरुद्धची प्रतिक्रिया म्हणता येईल. जी राज्याचे अस्तित्व टिकवून ठेवू इच्छित असली तरी राज्याचे सार्वभौमत्व संपवणे आवश्यक मानते.बहुलतावाद विचारसरणीनुसार, राज्य हे सार्वभौम आहे आणि निरपेक्ष नाही. समाजात अस्तित्वात असलेल्या इतर अनेक समुदायांचे अस्तित्व राज्याच्या सत्तेला मर्यादा घालते. व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ राज्याचे सदस्यत्व स्वीकारत नाही, तर राज्यासह इतर अनेक

समुदाय आणि संघटनांचे सदस्यत्व स्वीकारते. अशा स्थितीत संपूर्ण सत्ता एकाच राज्याला देता येणार नाही. विद्वान हेसिओने या संदर्भात लिहिले आहे की बहुलवादी राज्य हे असे राज्य आहे ज्यामध्ये केवळ एकच शक्तीचा स्रोत नसून ते वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये विभागलेले आहे आणि विभागले गेले पाहिजे. प्रख्यात बहुलतावादी सिद्धांतकार: अनेक लेखक आणि विचारवंतांनी बहुलतावादी विचारधारा मांडली आहे, ज्यात गियर्क, मैटलँड, फिगिस, डिग्विट, क्रेव्ह, पॉल बंकर, ए. डी. लिंडले, डर्खम, मिस फॉलेट, अर्नेस्ट बार्कर, जी. D.H. Cole आणि Harald Lasky यांची नावे ठळकपणे घेता येतील. बहुलतावादची प्रमुख धारणा पुढीलप्रमाणे-

**१) राज्य केवळ एक समुदाय आहे:**

बहुलवादी राज्याला सार्वभौमिक, सर्वशक्तिमान आणि नैतिक संस्था म्हणून स्वीकारत नाहीत. त्यांच्या मते, समाजाची सद्यस्थिती आणि रचनेच्या आधारे राज्य हे दुसरे काही नसून इतर समाजांप्रमाणेच एक समुदाय आहे. मानवी जीवनाच्या गरजा बहुआयामी आहेत आणि राज्य माणसाच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे राज्याव्यतिरिक्त इतर समाजालाही उपयुक्त अस्तित्व आहे. राज्याचे कार्य प्रामुख्याने जीवनाच्या राजकीय पैलूशी संबंधित आहे आणि बहुलतावाद्याच्या मते, ते स्वतःच्या क्षेत्रापुरते मर्यादित असले पाहिजे, जेणेकरून इतर समुदाय व्यक्तीच्या जीवनातील सर्व पैलूंचा मुक्तपणे विकास करू शकतील.

**२) बहुलतावादी राज्य आणि समाज यांच्यात फरक करतात:**

आदर्शवाद्यांप्रमाणे, बहुलवादी राज्य आणि समाज यांना एक मानत नाहीत तर त्यांना भिन्न एकके म्हणून स्वीकारतात. बहुलवाद राज्याला इतर समुदायांप्रमाणेच एक समुदाय मानतो आणि समाजाला राज्यापेक्षा खूप व्यापक संस्था मानतो. राज्य हा समाजाचा एकमेव भाग आहे जो उद्देश आणि व्याप्तीच्या दृष्टीने समाजाशी सहकार्य करू शकत नाही

**३) बहुलवाद नियंत्रित राजेशाहीवर विश्वास ठेवतात:**

बहुलवाद अमर्यादित सार्वभौमत्व नाकारतो आणि सार्वभौमत्वाला अंतर्गत आणि बाह्य दोन्ही मर्यादित मानतो. अंतर्गत क्षेत्रातील राज्याची शक्ती त्याच्या स्वतःच्या स्वभावानुसार आणि नागरिकांच्या आणि समुदायांच्या अधिकारांद्वारे मर्यादित आहे आणि बाह्य क्षेत्रातील राज्याची शक्ती आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे आणि इतर राष्ट्रांच्या अधिकारांद्वारे मर्यादित आहे. अशाप्रकारे बहुलवाद हा राज्याच्या हुकूमशाही सत्तेला, अंतर्गत आणि बाहेरून विरोध करतो.

**४) बहुलवादानुसार, कायदा स्वतंत्र आणि राज्यापेक्षा श्रेष्ठ आहे:**

बहुलवादी सार्वभौमत्वाच्या पारंपारिक प्रतिपादकांच्या विरूद्ध, कायदा स्वतंत्र आणि राज्यापेक्षा श्रेष्ठ मानतात. फ्रेंच विचारवंत डिग्विट आणि डच विचारवंत क्रॅव्ह यांची मते या संदर्भात उल्लेखनीय आहेत. दुग्वियांच्या म्हणण्यानुसार, 'कायदा हा राजकीय संघटनेपासून स्वतंत्र, त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आणि पूर्ववर्ती आहे. सामाजिक ऐक्य किंवा संघटना किंवा मानवाचे परस्परावलंबन कायद्याशिवाय शक्य नाही. राज्याचे व्यक्तिमत्त्व

ही केवळ कल्पना आहे. कायदा राज्याला मर्यादा घालतो, राज्य कायद्याला मर्यादा घालत नाही.'' असे मत क्रॅबे यांनी व्यक्त केले आहे. हे देखील वाचा: अधिकारांचा अर्थ आणि व्याख्या

**५) बहुलवाद विकेंद्रीकरणावर विश्वास ठेवतो:**

बहुलवाद आदर्शवादी तत्त्वज्ञानाप्रमाणे केंद्रीकृत अवस्थेवर विश्वास ठेवत नाही, परंतु तो विकेंद्रीकरणाला राज्याच्या वास्तविक उपयुक्ततेचा आधार मानतो. बहुलवादानुसार, स्थानिक समस्याही कमी महत्त्वाच्या नसतात आणि या स्थानिक समस्या सत्तेच्या केंद्रीकरणाच्या पद्धतीने सोडवता येत नाहीत. बहुलतावावाद्यांच्या दृष्टिकोनातून, राज्याने व्यावसायिक प्रतिनिधित्वाच्या व्यवस्थेच्या आधारे केंद्रीकृत शक्तीचे विकेंद्रीकरण केले पाहिजे आणि इतर समुदायांमध्ये विभागले पाहिजे आणि अशा प्रकारे एक संघीय सामाजिक संस्था स्थापन केली पाहिजे.

**६) बहुलवादी व्यवस्थेत व्यक्ती मुक्त होणार नाही:**

राज्याचे नियंत्रण इतर समाजाकडून काढून टाकल्यास व्यक्तीला त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी स्वातंत्र्याचे वातावरण उपलब्ध होईल, हा बहुलवाद्यांचा गैरसमज आहे. ती अशी गोष्ट नाही. जे समाजाच्या स्वातंत्र्याच्या नावाखाली राज्याच्या नियंत्रणाला विरोध करतात, ते त्यांच्या हातात सत्ता आल्यावर व्यक्तीच्या हक्कांचे उल्लंघन करून राज्याच्याही पुढे जाऊ शकतात. मध्ययुगात, चर्चने मतभेदांना कठोरपणे दडपले होते आणि ब्रेनी आणि गॅलिलिओ यांना त्यांच्याच देशवासीयांच्या हातून तीव्र छळ सहन करावा लागला होता.

**७) बहुलवाद ही लोकशाही विचारधारा आहे:**

बहुलवाद हा लोकशाही व्यवस्थेला विरोध करत नसला तरीही तो राज्याच्या सध्याच्या स्वरूपाचा विरोध करत नाही. बहुलवाद आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हिंसक पद्धतीचा वापर कधीच स्वीकारत नाही. सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यांचा व्यावसायिक प्रतिनिधित्व आणि गुप्त मतदानावर विश्वास आहे.

**८) बहुलवाद व्यावसायिक प्रतिनिधित्वावर विश्वास ठेवतो:**

बहुलतावादी विचारवंत जी. डी. एच. कोल हे लोकशाहीतील व्यावसायिक प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचे विशेष समर्थक आहेत. बहुलवादी प्रादेशिक प्रतिनिधित्वाची प्रणाली अन्यायकारक आणि सदोष मानतात, कारण प्रदेशाच्या आधारावर निवडून आलेल्या लोकांना वास्तववादी प्रतिनिधित्व करता येते. अशा परिस्थितीत प्रतिनिधित्वाची ही पद्धत योग्य म्हणता येईल, ज्याचा आधार व्यवसाय आहे. एखाद्या शेतकऱ्याचे हित त्याच्या शेजारी राहणाऱ्या वकिलाद्वारे मांडले जाऊ शकत नाही, जसे दूरच्या भागातील शेतकरी, ज्याला त्याच्या अडचणी समजतात. या कारणास्तव, बहुसंख्याकांच्या मते, मतदारसंघ हे व्यवसायाच्या आधारावर ठरवले पाहिजेत.

**बहुलतावादाचे महत्त्व**

राज्यसत्तेच्या विखंडित स्वरूपाचे अतिशयोक्तीपूर्ण चित्र आणि संघटनांचे महत्त्व मांडूनही, बहुलतावादी तत्त्वज्ञानात बरेच सत्य आहे. गाटीलच्या शब्दात, बहुलवाद ही कठोर आणि सैद्धांतिक घटनावाद आणि ऑस्टिनच्या सार्वभौमत्वाच्या तत्त्वाविरुद्ध एक समयोचित आणि स्वागतार्ह प्रतिक्रिया आहे.

बहुलतावाद अराजकीय संघटनांच्या वाढत्या महत्त्वावर भर देतो, या समुदायांच्या योग्य कार्यामध्ये राज्याच्या हस्तक्षेपाचा इशारा देतो आणि प्रस्तावित करतो की, केवळ या समुदायांना राज्याने मान्यता दिली पाहिजे असे नाही तर या समुदायांना त्यांच्या क्षेत्रात अधिक स्वायत्तता दिली पाहिजे. सध्याच्या काळातील मानवी जीवनाच्या अतिरेकी गरजा लक्षात घेऊन बहुलवादाचा हा विचार प्रशंसनीय म्हणता येईल. बहुलवादाचा हा विचार योग्यरित्या स्वीकारल्याने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास तर होईलच पण राज्याची कार्यक्षमताही वाढेल.

**उ) अभिजन सिद्धांत**

जन्मजात स्वरुपाच्या आणि स्वकष्टाने संपादित केलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या गुणवत्तेमुळे विशिष्ट क्षेत्रात विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्यांना समाज एक विशेष दर्जा किंवा प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतो. असा विशिष्ट दर्जा व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या समूहाला समाजशास्त्रज्ञांनी व राज्यशास्त्रज्ञांनी शिष्टजन किंवा अभिजन अथवा श्रेष्ठजन अशा संज्ञा दिलेल्या आहेत. इंग्रजीत एलिट ही एकच संज्ञा त्यासाठी रूढ आहे.

**अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन :** अभिजन ही संज्ञा गुणनिर्देशक स्वरुपाची आहे. स्वतःचे अनुभव, अभिरुची, सौंदर्यदृष्टी, सराव इत्यादींच्या आधारे आपले प्राविण्य संबंधीत व्यक्ती विकसित करते. काही वेळा आनुवंशिक गुणविशेषांची जोडही या प्रक्रियेत लाभते. अशा व्यक्तींना सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त होऊन त्या व्यक्ती समाजाच्या भूषण ठरतात. मात्र अभिजनवर्गातील सदस्य आपले वेगळेपण कायम टिकविण्याचा प्रयत्न करतात. या व्यक्ती समाजात फारशा मिसळत नाहीत. आपल्या श्रेणीतील सदस्यांच्या बरोबर मिसळण्याचा व त्यांच्याशी संपर्क ठेवण्याचा त्या विशेष प्रयत्न करतात. सांस्कृतिक मूल्य व्यवस्था जतन करण्याची खास जबाबदारी अशा अभिजनवर्गाकडे असते.

शिष्टजन (इंग्रजीत 'रिस्पेक्टेबल' किंवा 'ऑनरेबल') ही संज्ञा समाजातील सभ्य व प्रतिष्ठित सदस्यांच्या संदर्भात वापरली जाते. वयोवृद्ध व्यक्ती, परंपरेने विशेष दर्जा धारण करणारी खानदानी घराणी, न्यायव्यवस्थेतील सदस्य, जातपंचायतीतील सदस्य, महाजन वर्गातील सदस्य इत्यादींना अनुभवाच्या आधारे समाजव्यवस्थेने सामूहिक स्वरुपाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली असते. या शिष्टजनांचे समाजव्यवस्थेवर नैतिक प्रभुत्व असते. त्यांचे आचारविचार, वर्तन व कृती शिष्टाचाराला व सभ्यतेला अनुसरून असतात, अशी समाजाची धारणा असते. सामाजिक संगटन, सामाजिक स्वास्थ्य आणि सामाजिक मूल्ये प्रस्थापित करण्यात व त्यांचे संवर्धन करण्यात शिष्टजनांची भूमिका विधायक स्वरुपाची असल्याने समाज या शिष्टजनांना मानाचे स्थान प्राप्त करून देतो. सभ्यता, शिष्टता व नैतिकता या संज्ञा संस्कृतिनिदर्शक असल्याने शिष्टजन ही

संज्ञा संस्कृतिनिदर्शक स्वरुपाचा आशय स्पष्ट करते. पारंपरिक समाजव्यवस्थेत तसेच लहान आकारमान असलेल्या समाजात शिष्टजनांचे स्थान विशेष महत्त्वाचे मानले जात असे. परंतु गुंतागुंतीच्या व अतिपरिवर्तनवादी आधुनिक समाजात शिष्टजनांचे महत्त्व कमी होत चालले आहे. समाजाचे होत जाणारे नैतिक अधःपतन त्यास कारणीभूत मानले जाते.

श्रेष्ठत्वाच्या जाणिवेशी निगडीत असलेली श्रेष्ठजन ही संज्ञा समाजाच्या राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात प्रामुख्याने वापरली जाते. ही संज्ञा श्रेष्ठतानिदर्शक स्वरुपाचा आशय सूचित करते. श्रेष्ठजनवर्ग आपले श्रेष्ठत्व, प्रभुत्व आणि अस्तित्व दीर्घकाळ टिकविण्याकडे विशेष लक्ष देतो. प्रामुख्याने सत्ता, संपत्ती व अधिकार इत्यादींच्या बळावर प्रभाव प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा श्रेष्ठजनांत दिसून येते. जातिनिष्ठ समाजव्यवस्थेतील उच्चजातीय समुदाय, राजकीय सत्ता संपादन करणारा राजकारणी लोकांचा वर्ग, प्रशासकीय यंत्रणेतील उच्चपदाधिकारी, धार्मिक क्षेत्रातील पुरोहितांचा वर्ग, शेतीप्रधान समाजव्यवस्थेतील जमीनदारांचा व वतनदारांचा वर्ग, वर्गीय समाजव्यवस्थेतील भांडवलदार, सावकार व श्रीमंतांचा वर्ग, औद्योगिक, व्यापारी क्षेत्रांतील बडे उद्योगपती व व्यापारी यांसारख्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील श्रेष्ठजनांचे वर्ग आढळतात. एलिट या इंग्रजी संज्ञेचा संबंध प्रामुख्याने श्रेष्ठजन या संज्ञेशी निगडीत आहे. सामाजिक, राजकीय आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर श्रेष्ठजनांचे केलेले विवेचन हे नकारात्मक दृष्टिकोनावर आधारलेले आहे; याउलट अभिजनांचे आणि शिष्टजनांचे विवेचन हे सकारात्मक दृष्टिकोनावर आधारलेले आहे.

अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन या तीनही संज्ञांचा गर्भितार्थ जरी वेगवेगळा असला, तरी त्यांची फलनिष्पत्ती संघटित समाजव्यवस्थेवर आधारलेली आहे. लोकशाही समाजव्यवस्थेचा, व्यवसायाच्या विशेषीकरणाचा व स्पर्धात्मक जीवनपद्धतीचा जसाजसा विकास होऊ लागला, तसतसे अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन यांच्याविषयीचे निकष बदलू लागले, असे दिसून येते. सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन यांच्याकडून विशिष्ट प्रकारच्या आचारविचारांची अपेक्षा समाज बाळगू लागला. सामाजिक उद्दिष्टपूर्ती, समायोजन, एकात्मता, सामाजिक व्यवस्थापन व तणावनिवारण इ. बाबतींत समाज या तीनही वर्गांकडून विशिष्ट अपेक्षा करतो. सामाजिक व राष्ट्रीय कल्याणाच्या दृष्टीने विशेष योगदानाची अपेक्षा या तीनही वर्गांकडून करण्यात येते. म्हणून समाजरचनेच्या चौकटीत कार्यात्मक दृष्टीकोनातून अनेक समाजशास्त्रज्ञांनी व राज्यशास्त्रज्ञांनी अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन यांचे ऐतिहासिक व तुलनात्मक स्वरुपाचे विवेचन केलेले आहे.

**शिष्टजनांचे वर्गीकरण :** समाजरचनेच्या व सामाजिक संबंधांच्या पार्श्वभूमीवर तसेच सामाजिक नेतृत्वाच्या जाणिवेतून शिष्टजनांचे (एलीट्स) वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) प्रज्ञावंतांचा वर्ग :** (स्ट्रॅटेजिक क्लास). समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत केवळ चातुर्य, गुणवत्ता, पात्रता, अनुभव व कार्यक्षमता इ. निकषांवर ज्यांनी विशेष प्रावीण्य मिळविलेले आहे व ज्यांच्या कर्तृत्वाबद्दल समाजाला विशेष अभिमान वाटतो आणि ज्यांच्याकडून समाज व राष्ट्र विशेष योगदानाची अपेक्षा बाळगतो, अशा उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा अंतर्भाव या वर्गात करता येईल. सत्ता, संपत्ती,

अधिकार, लिंग, जन्म, वंश, भाषा, धर्म व जात इ. निकषांवर सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त न होता केवळ गुणवत्तेच्या निकषावर सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करणाऱ्याना या वर्गात अंतर्भूत केले जाते. संगीत, साहित्य, ललित कला, क्रीडा, उद्योग, व्यापार, विज्ञान, सत्वशील राजकारण, निःपक्षपाती व निर्भीड प्रशासन, बुद्धिप्रामाण्यवाद यांसारख्या क्षेत्रांतील नामवंतांची गणना या वर्गात होते.

**२) महाजन वर्ग :** अनुवंशिकतेच्या व परंपरेच्या आधारावर ज्या घराण्यांनी सामाजिक स्वास्थ्य, सामाजिक संरक्षण व सामाजिक कल्याण साध्य करण्यात सामाजिक नीतिमत्ता, सभ्यता, शिष्टाचार, सामाजिक मूल्ये इ. निकषांवर विशेष भूमिका वठविलेली आहे, त्यांचा या वर्गात समावेश केला जातो. या पारंपरिक घराण्यांना ऐतिहासिक, राजकीय व आर्थिक वारसा प्राप्त झाल्याने नीतिमत्तेच्या आधारावर विशेष स्वरुपाची प्रतिष्ठा समाजव्यवस्थेने प्राप्त करून दिली. बदलत्या सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरांत नीतिमत्तेचा व मूल्यभावनांचा जसाजसा ऱ्हास होऊ लागला, तसतसे या वर्गाचे अस्तित्व हळूहळू कमी होऊ लागले. उदा., सरदार, सरंजामदार, वतनदार, जमीनदार, खानदानी घराणी इत्यादी.

**३) सत्ताधीश जाती :** (रुलिंग कास्ट्स). वांशिक श्रेष्ठत्वाच्या शुद्ध रक्ताच्या भ्रामक कल्पनांमुळे तसेच विशिष्ट जातीत व कुळात जन्म घेतल्याच्या आणि व्यवसायाच्या प्रतवारीच्या निकषांवर व आनुवंशिकतेवर आधारलेल्या अनेक जातिसमुदायांचा सत्ताधीश जातीत अंतर्भाव होतो. श्रेष्ठत्वाच्या जाणिवेतून कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या अनेक जातिसमुदायांवर सांस्कृतिक प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न उच्च जातिसमुदाय करीत असतात. भारतातील प्राचीन वर्णव्यवस्था व नंतर निर्माण झालेली जातिव्यवस्था यांतून ही परिस्थिती निर्माण झाली. सामाजिक, धार्मिक, वांशिक, श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या या विषमता निर्माण करणाऱ्या घटकांचा लाभ उठवून राजकीय सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न जसजसे होऊ लागले, तसतसे सत्ताधीश जातिसमुदायांचे समाजव्यवस्थेवर प्रभुत्व प्रस्थापित होऊ लागले.

**४) सत्ताधीश वर्ग :** (रुलिंग क्लास). आर्थिक व व्यावसायिक विषमतेच्या आधारांवर उभा राहणारा सत्ताधिशांचा एक वर्ग सर्वच समाजांत उदयास येऊ लागला. भांडवलाच्या आधारावर व्यवसायाच्या विशेषीकरणाला जसजसी चालना मिळू लागली, तसतसा उद्योगपतींचा व भांडवलदारांचा वर्ग उदयास येऊ लागला. परिणामतः राजकीय समाजव्यवस्थेवर उद्योगपतींचे व व्यापारांचे प्रभुत्व प्रस्थापित होऊ लागले. उत्पादनप्रक्रियेवर, श्रमिक संघटनेवर व अर्थव्यवस्थेवर उद्योगपतींच्या, भांडवलदारांच्या व व्यापाऱ्याच्या वर्गांचे वर्चस्व वाढत राहिल्याचे दिसून येते.

वरील चार वर्गांत जरी शिष्टजनांचे (एलिट्स) वर्गीकरण करण्यात आलेले असले, तरी राजकीय श्रेष्ठजनांचा वर्ग विशेषपणे अभ्यासविषय ठरलेला आहे. मात्र सामाजिक प्रगतीच्या, स्वास्थ्याच्या व मूल्यांच्या दृष्टीने विचार केल्यास प्रत्येक समाजाला अभिजन व शिष्टजन या वर्गांची नितांत आवश्यकता भासत असते.

**संक्षिप्त ऐतिहासिक आढावा :** मानव समाजाच्या भटक्या अवस्थेपासून श्रेष्ठजनांच्या संकल्पनेला मान्यता प्राप्त झालेली दिसते. प्राचीन काळातील मानवी टोळक्यांच्या नेत्यांचा अंतर्भाव श्रेष्ठजनांत होतो. सबळ व दुर्बल यांतील परस्परसंबंध लक्षात घेतल्यास सबळांचा श्रेष्ठजनांत समावेश करता येईल. प्लेटोने आपल्या

रिपब्लिक या ग्रंथात तत्त्वज्ञ राजाची जी कल्पना विशद केलेली आहे, तिचा अंतर्भाव अभिजन वर्गात करता येईल. राजा ह फक्त राज्यकर्ता नसून तो स्वतःच्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांमुळे व अनुभवांमुळे तत्त्वज्ञ राजाची भूमिका वठवीत असतो. मध्ययुगीन कालखंडात सरदार, सरंजामदार, वतनदार, महाजन इ. वर्गांतील श्रेष्ठ–ज्येष्ठ व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाच्या व अनुभवाच्या बळावर जी उल्लेखनीय प्रगती केली, त्यामुळे तत्कालीन समाजव्यवस्थेत त्यांना आदराचे व मानाचे स्थान प्राप्त झाले. कार्ल मार्क्सने भांडवलदारांचा, जमीनदारांचा व सावकार वर्गाचा श्रेष्ठजनात समावेश केलेला आहे. सत्ता, संपत्ती व अधिकार यांच्या असमान वाटपामुळे मूठभर भांडवलदार, जमीनदार व सावकार बहुसंख्य श्रमिकांचे शोषण करीत असतात. असे क्रांतिकारी विचार मार्क्सने ज्या पद्धतीने मांडले, त्यांतून श्रेष्ठजनांच्या संकल्पनेच्या विचाराला अधिकाधिक चालना मिळू लागली. मार्क्स वेबरने श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या तत्त्वावर प्राधिकार (ऑथॉरिटी) तसेच अधिकारतंत्राचे किंवा नोकरशाहीचे (ब्यूरॉक्रसी) जे विवेचन केलेले आहे, त्याचा संबंध अभिजन व श्रेष्ठजन या दोन्ही संकल्पनांशी आहे; कारण अधिकारतंत्राच्या रचनेतील पदाधिकाऱ्यांची निवड गुणवत्ता, पात्रता व अनुभव यांच्या निकषांवर स्पर्धात्मक परीक्षा व मुलाखत यांद्वारे केली जाते. तसेच त्याच रीतीने बढती देण्याची तरतूदही त्यांत असते. कर्तव्यतत्परता, कार्यक्षमता व अनुभव यांच्या आधारावर हुकुमांची व आज्ञांची अंमलबजावणी नियमांच्या चाकोरीत राहून तत्परतेने करण्याइतपतची क्षमता नोकरशाहीकडे असल्याने तिचा अभिजन वर्गात समावेश होतो. तथापि लालफितीचा बडगा, भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई, आधिकारचा गैरवापर यांसारख्या अनेक समस्यांनी नोकरशाही ग्रासलेली असते. अशा समस्या निर्माण होण्यास समाजव्यवस्थाही कारणीभूत ठरत असते; म्हणून नोकरशाही व समाजव्यवस्था यांच्यातील संबंधांच्या पार्श्वभूमीवर नोकरशाहीची गणना श्रेष्ठजनात करावी लागेल. आपल्या अधिकारपदाचे व अधिकाराचे स्थान काय आहे, याची जाणीव ठेवून त्यानुसार आपणास योग्य तो मान व प्रतिष्ठा समाजाने द्यावी, अशी अपेक्षा नोकरशाही करते.

लोकशाही समाजव्यवस्थेत सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत राजकीय श्रेष्ठजनांचे प्रभुत्व प्रस्थापित होत असते. सत्तांतरामुळे राजकीय श्रेष्ठजनांत फेरबदल होत असले, तरी सत्ता काबीज करण्याची त्यांची महत्वाकांक्षा नष्ट होत नाही. ‘एलिट’ या इंग्रजी संज्ञेचा वापर राजकीय श्रेष्ठजनांच्या संदर्भात करण्यात येतो हे खरे; तथापि सदाचार, सद्विचार, सत्वशीलता, सद्वर्तन, चारित्र्य इ. निकषांवर राजकीय नेत्यांचा उदय होत असेल, तर त्यांची गणना राजकीय श्रेष्ठजनांपेक्षा राजकीय अभिजनांत किंवा राजकीय शिष्टजनांत जरुर करता येईल.

बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अभिजन, शिष्टजन व श्रेष्ठजन यांचा गर्भितार्थ लक्षात घेतल्यास या संज्ञांचे निकषही बदलत गेल्याचे दिसून येते. ऐतिहासिक, तुलनात्मक व कार्यात्मक दृष्टींनी या वर्गांचा अभ्यास करण्यावर अनेक विचारवंतांनी जरी भर दिलेला असला, तरी आधुनिक काळात समाजशास्त्रीय, राज्यशास्त्रीय व मानसशास्त्रीय दृष्टीकोनांतून त्यांचा अभ्यास करण्याकडे संबंधितांनी विशेष लक्ष दिलेले आहे.

**व्हिलफ्रेडो पॅरेटोचे विचार :** व्हिलफ्रेडो पॅरेटो या इटालियन समाजशास्त्रज्ञाने १९३५ साली श्रेष्ठजन व त्यांचे अभिसरण या सिद्धांताचे मार्मिक विवेचन केले. समाजातील ज्या व्यक्तींमध्ये बौद्धिक, शारीरिक व

नैतिक गुणवैशिष्ट्ये प्रभावी व परिणामकारक स्वरुपाची असतात, त्यांच्याकडे राजकीय सत्ता केंद्रित होत असते, असे पॅरेटोचे मत आहे. या वर्गासाठी तो राजकीय श्रेष्ठजन अशी संज्ञा वापरतो.

राजकीय श्रेष्ठजनांत दोन प्रवृत्तींचे नेते असतात. एक प्रवृत्ती सिंहासारखी तर दुसरी लांडग्यासारखी असते, असे वर्णन पॅरेटो करतो. राजकीय सत्तेच्या बळावर आपल्या इच्छेनुसार समाजाला वागविण्याची क्षमता असलेला राजकीय श्रेष्ठजनांचा एक गट असा अस्तित्वात असतो, त्याबरोबरच कपटी राजकीय श्रेष्टजनांचा दुसरा गटही अस्तित्वात असतो. एक वर्ग सत्ता, अधिकार व संपत्तीला प्राधान्य देतो; तर दुसरा वर्ग युक्ती, कुटिल राजनीती व बौद्धिक चातुर्याला अधिक महत्त्व देतो. मानवसमाजातील राजकीय स्थित्यंतरे अथवा सत्तांतरे या दोन गटांतील संघर्षातून घडून येतात. राजकीय स्थित्यंतरे ही नेहमीच राजकीय श्रेष्ठजनांतील गुणवैशिष्ट्यांच्या कमतरतेमुळे व ऱ्हासामुळे घडून येतात, असा त्याचा दावा आहे. प्रथम सत्ताधिष्ठित राजकीय श्रेष्ठजन नंतर कपटी राजकीय श्रेष्ठजन व पुन्हा सत्ताकांक्षी राजकीय श्रेष्ठजन अशा चक्राकार पद्धतीने राजकीय सत्तांतर होत असते; कारण या दोन्ही प्रकारच्या श्रेष्ठजनांकडे जी गुणवैशिष्ट्ये असतात, ती समाजातील बहुसंख्य लोकांकडे नसतात. समाजातील राजकीय व्यवस्थेत प्रभुत्व प्रस्थापित करणारा व श्रेष्ठत्व सिद्ध करणारा अल्पसंख्य समूह म्हणजे राजकीय श्रेष्ठजन होय. या वर्गांचे अस्तित्व अनियंत्रित राजेशाहीत, हुकूमशाहीत तसेच साम्यवादी व लोकशाही समाजव्यवस्थांत आढळून येते. ते सार्वत्रिक असते. सत्तेच्या अभिसरणाची प्रक्रिया ही न संपणारी आहे. मानवसमाजात जोपर्यंत विविधता व असमानता अस्तित्वात आहे, तोपर्यंत श्रेष्ठजनांच्या अभिसरणाची प्रक्रिया अखंडपणे चालू राहते, असा दावा पारेअतोने केलेला आहे.

**जी. मॉस्काचे विचार :** जी. मॉस्का (१८५८-१९४१) या इटालियन समाजशास्त्रज्ञाने १९३९ साली प्रकाशित केलेल्या 'रुलिंग क्लास' (इं. शी.) या ग्रंथात राजा व प्रजा, राज्यकर्ते व प्रजा, शासक व शासित यांतील फरक विशद केलेला आहे. राजा, राज्यकर्ते व शासक यांना प्रजेपेक्षा जे वेगळे व श्रेष्ठस्थान प्राप्त झालेले असते, त्यास त्यांच्याकडे असणारी वैयक्तिक गुणवैशिष्ट्ये हीच बऱ्याच अंशी कारणीभूत असतात, असे मॉस्काचे मत आहे. शासक वर्गाकडे जबरदस्त संघटनक्षमता आणि सत्ता संपादन करण्याचे कौशल्य असते व त्याच्याच बळावर ते समाजाचे राजकीय नेतृत्व करीत असतात. आपले नेतृत्व व सत्ता अबाधित राखण्यासाठी ते समाजातील विविध स्तरांतील लोकांशी हातमिळवणी करीत असतात. या वर्गाला जे श्रेष्ठत्व प्राप्त झालेले असते, त्यास त्याच्या गुणवैशिष्ट्यांपेक्षा त्या त्या काळातील सामजिक परिस्थिती ही बऱ्याच अंशी कारणीभूत असते, यावर मॉस्काने भर दिलेला आहे. राजकीय श्रेष्ठजनांसाठी आवश्यक असणारे गुण सर्वत्र सारखेच असले, तरी कालमानानुसार व परिस्थितीप्रमाणे त्यांचे निकष बदलत असतात, असा विचार मॉस्काने मांडलेला आहे.

**उत्तर आधुनिकतावादी**

उत्तर आधुनिकतावाद हे एक तत्त्वज्ञान, संशोधन पद्धती आहे, उत्तर आधुनिकतावाद या विचारसरणीचा विकास झाला. जगाच्या पातळीवर जे प्रश्न निर्माण झाले त्यातून आधुनिक वादाचा विकास झाला.

आधुनिकतावादाची चिकित्सा म्हणजे उत्तरआधुनिकता होय. आपण जे जग पाहत असतो ते कोणत्या दृष्टिकोनातून पहावे याचा अर्थ दृष्टीकोण हे उत्तर आधुनिकतावाद देते. अमेरिका या देशात या संकल्पना जुन्या नाहीत. Arnold toynbee यांनी या शब्दाचा पहिल्यांदा प्रयोग केला. त्यानंतर १९७९ मध्ये ल्योतार्ड Jean Francois Lyotard यांनी आपल्या The Postmodern Condition या पुस्तकात आक्रमक उत्तरआधुनिकतावाद विचार पहिल्यांदा मांडले. मार्क्स, वेबर, दुरखाईम सिद्धांत ल्योतार्ड यांच्या दृष्टीने मिथक आहेत. त्यामुळे त्यांनी सांगितलेल्या गोष्टीवर कोणीही विश्वास ठेवणार नाही. उत्तर आधुनिकतावाद ही संकल्पना यासाठी अस्तित्वात आली आहे की, समाजामध्ये या मित्रांनी जो चुकीचा संदेश पसरवला आहे तो दूर करणे हा तिचा उद्देश आहे असे विचार मांडले आहेत.

**उत्तर आधुनिकतावाद अर्थ:**

उत्तरआधुनिकतावाद आजची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे अवघड आहे. उत्तरआधुनिकता वादाचा अभ्यास करणाऱ्या ल्योतार्ड, मिचेल फोको, जोक्सि डेरिडा, बोड्रीलॉर्ड, फेड्रिक जमसेन इ. विचारवंतांनी या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला आहे. यावरून उत्तरआधुनिकतावाद आजचे मुख्य तत्त्व समजावून घेता येईल. काही प्रमुख विचारवंतांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१. रिचार्ड गोट:**

उत्तर आधुनिकता म्हणजे आधुनिक तेपास व मुक्ती देणारे विखंडित आंदोलन आहे ज्यामध्ये बहु संस्कृती असणाऱ्या लोकांचा निवास असेल.

**२. जिम. मेकगूगन**

उत्तर आधुनिकतावाद आधुनिक सामाजिक संस्था कमजोर करून ग्लोबल समाज निर्माण केला जातो.

**३. ल्योतार्ड:**

उत्तरआधुनिकता केवळ विशिष्ट लोकांच्या हातातील साधन नसून, विशिष्ट गोष्टीबद्दल संवेदनशील करून विद्यार्थ्यांनी या गोष्टीचा स्वीकार करण्याची योग्यता निर्माण करण्याचे लक्ष उत्तरआधुनिकतावादाचे असते.

**उत्तर आधुनिकतावादची वैशिष्ट्ये**

**१. सांस्कृतिक प्रारुप:**

उत्तरआधुनिकता हे सांस्कृतिक आरोप आहे सामाजिक आर्थिक राजकीय प्रक्रियेशी ते जोडले गेले आहे जीवनाच्या वेगवेगळ्या शैलीतून म्हणजे साहित्य कला इत्यादीतून ते अभिव्यक्त होते.

**२. बहुआयामी**

हेही उत्तर आधुनिकतेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामध्ये विखंडन दिसून येते उत्तर आधुनिकता समाजातील विविधता आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारची समानता नाही.

**३. विखंडन:**

उत्तर आधुनिकतावाद आचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये विखंडन दिसून येते. उत्तर आधुनिक समाजात विविध आहे त्यामध्ये समानता नाही.

**४. स्थानिक गोष्टीवर भर:**

उत्तरआधुनिकतावाद स्थानिक स्तरावर भर दिला जातो. त्याचे विश्लेषण स्थानिक स्तरावर कार्य करणाऱ्या कडून केले जाते. जे विश्लेषक आहेत ते स्थानिक राजकारणातील शक्ती संबंध स्थानिक संदर्भाचा आधार घेऊन विश्लेषण करतात.

**५. स्थानिक वृत्तांतच्याविरुद्ध:**

ल्योतार्ड, फुको सारखे उत्तर आधुनिकतावाद विचारवंत या गोष्टींना विरोध करतात त्या महान आहेत मग त्या भाषा असो सिद्धांत असो की वृत्तान्त.

**६. स्थानिक स्वयत्तेवरभर**

उत्तरआधुनिकता स्थानिक स्वायत्त वर भर देते या विचारधारेचा आग्रह आहे की स्थानिक पातळीवर बहुविध विश्लेषकांच्या आधारावर राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण झाले पाहिजे. स्थानिक लोक आधुनिकतेला भार समजतात. त्यामुळे उत्तरआधुनिकता स्थानिक स्तरावर या बाहेरून आलेल्या तत्त्वाचा स्वीकार करतनाही.

**६. सखोलतेचा अभाव:**

या विचारसरणीत सखोल त्याचा अभाव आहे या विचारसरणीचा दृष्टिकोन समोर आहे त्यावर उपाय सुचवने आहे.

**उत्तर आधुनिकतावादाची कारणे:**

आधुनिकतेला उत्तरआधुनिकता हा एक पर्याय मानला जातो. आज परंपरागत समाज आधुनिक समाजाच्या रूपात बदलला आहे. युरोप अमेरिका नव्हे तर तिसऱ्या जगातील देश आधुनिक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अजूनही कोणत्याही समाजाला पूर्णपणे आधुनिक समाज म्हणता येत नाही. उत्तरआधुनिकता कोणत्याही देशाच्या संपूर्ण जीवनात आलेले नाही. आज सुद्धा अमेरिका किंवा फ्रान्सच्या भागात परंपरा प्रभावशाली असलेल्या दिसतात. उत्तर आधुनिक तिच्या कारणाचा उपा हो जॉर्ज रित्झर यांनी त्यांच्या Post modern Social Theory, Sociology and sociological Theory. या पुस्तकात केलेला आहे. त्यांनी अशी कोणती कारणे आहेत की जी आधुनिकता किंवा त्यावर आधारित सिद्धांतांचे खंडन करून उत्तरआधुनिकतावादाचां विकासाला यावर प्रकाश टाकला आहे. जॉर्ज रित्झर् यांनी उत्तरआधुनिकतावाद याची काही कारणे सांगितली आहेत.

**१. आधुनिक समाजात मूलभूत बदल:**

बोड्रीलॉर्ड यांच्या मतानुसार आजच्या आधुनिक समाजाची संरचना बदल आहे. हा समाज जीर्ण जुना आहे. अशा अवस्थेत समकालीन सिद्धांत त्याची व्याख्या करू शकत नाही. त्यामुळे आधुनिक समाजाची अवस्था पाहता उत्तर आधुनिक तिची गरज वाटू लागते.

**२. आधुनिकतेची निरंतरता:**

काही विचारवंत उत्तरआधुनिकता म्हणजे आधुनिकतेची निरंतरता मानतात. उत्तर आधुनिकता ही काही नवीन जीवनशैली नाही किंवा विचारसरणी नाही तर ती आधुनिकतेच्या विकासातील एक प्रक्रिया आहे. जेव्हा समाजात जटिलता निर्माण झाली, औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात होऊ लागले तेव्हा समाजाला उत्तर आधुनिकतेचे स्वरूप प्राप्त करणे आवश्यक वाटू लागले.

**३. आधुनिकतेतून पर्यावरणीय समस्या:**

उत्तर आधुनिकतावाद विचारवंतांच्या मते प्रदूषण व पर्यावरण समस्येचा जो राक्षस समोर उभा आहे. तो आधुनिकतेमुळे उभा आहे. पर्यावरणाच्या प्रश्नांचे उत्तरदायित्व या आधुनिक समाजाकडे जाते. मेकीबेन यांच्या मतानुसार, आधुनिक समाजानेच सृष्टीचा नाश केलेला आहे. उत्तरआधुनिकता समाजाच्या या विचारधारेत क्रांतिकारी बदल करण्याचा प्रयत्न करते.

**४. आधुनिक समाजातून समस्यांची निर्मिती:**

उत्तर आधुनिकतावाद विकसित होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे परंपरागत समाजातून आधुनिक समाजापर्यंत काळात लोकांच्या समस्येत वाढ झालेली दिसते. उत्तर आधुनिकतावाद यांच्या मते, अशी आधुनिकता काय कामाची व्यक्तीचे जीवन नरक बनवते. आधुनिक सभ्यतेने शहरीकरण, झोपडपट्टी यांना जन्म दिला.

**५. रूढीवादी सीमांना विरोध:**

आधुनिक समाज अशा प्रकारे संघटित झाला आहे की, त्यामध्ये एक रूढीवाद आला आहे. कोण काय खाणार, काय परिधान करणार हे आधुनिकतेच्या मापदंडामध्ये बांधले गेलेले आहे. सिद्धांत, संस्कृती, साहित्य, नृत्य इत्यादी एका सभेत बांधले गेले आहे. आधुनिकतेच्या अशा रूढीवादी सीमा उत्तरआधुनिकतावाद यांना मान्य नाही. आधुनिकतेच्या अशा सीमा तोडण्याचा प्रयत्न उत्तरआधुनिकता करते.

**६. आधुनिकता समाजाला खूश ठेवण्यात अपयशी:**

आधुनिक कालखंडात असे वातावरण निर्माण झाले की, वैज्ञानिक क्रांती ने मनुष्य सुखी व समाधानी होईल. आपल्या सर्व समस्या वर विज्ञान उपाय योजेल व सर्व समस्या विज्ञान सोडवेल. परंतु हा भ्रम होता. आज अनेक नव्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. ज्या आधुनिकतेने सोनेरी स्वप्न दाखवले होते त्याने

अंधारात नेले. आज ज्याच्या जवळ सत्ता आहे तोच शक्तिशाली आहे. यातूनच आधुनिकतेचे स्थान निर्माण झाले.

**७. वैज्ञानिक समाजशास्त्राला पर्याय.**

उत्तर आधुनिकतावाद वैज्ञानिक समाजशास्त्राला विरोध करतो. उत्तर आधुनिकतावादयांचे म्हणणे आहे की, आधुनिक काळात ज्या समस्या निर्माण झाल्याने त्याकडे विज्ञान केवळ पाहत आहे. विज्ञानाने या समस्या वर उपाय शोधणे तर दूर त्याने नव्या समस्या निर्माण केल्या. विज्ञान आणि आपल्या तात्त्विक व नैतिक समस्या रंगवून सांगितल्या. यातून समजले जात आहे की विज्ञान आपल्या समस्यावर उपाय शोधू शकत नाही. त्यासाठी उत्तर आधुनिकता हा एक पर्याय आहे.

**८. महान वृत्तांताकडून स्थानिक गोष्टींची अपेक्षा:**

आधुनिक काळात महान वृत्तांत आखडून स्थानिक गोष्टीची अपेक्षा झालेलली असते. या महान वृत्तांत आणि स्थानिक वृत्तांच्या बाबतीत कोणतीही माहिती दिलेली नाही. स्थानिक लोकांचे जमिनीशी नाते असते, त्यांचे सुख-दुख त्यांची संस्कृती या बाबत महान वृत्तांत आणि मौन बाळगले आहे. ही परिस्थिती उत्तर आधुनिकतावादाला मानली नाही त्यामुळे महान वृत्तांताची अपयश हे उत्तर आधुनिकतावादाचे एक कारण आहे.

## ३.३ सारांश:

सामाजशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे. समाजात घडणाऱ्या घटना चे वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्यन करते.प्रस्तुत घटकात अतिशय महत्वपूर्ण माहितीचे सविस्तर विश्लेषण केले आहे. सत्तेवरील दृष्टीकोनात वेबर च्या विवेकी विचार याचे स्पष्टीकरण केले आहे. या मध्ये सत्ता म्हणजे काय, सत्तेचे प्रकार याचा आढावा घेतला आहे. वेबरला राजकीय समाजशास्त्राचा जनक मानले जाते. त्याने राजकारण, सत्ता, शक्ती या विषयी आपले महत्वपूर्ण असे विचार मांडले. शक्तीची संकल्पनाही त्याची राज्य व राजकारणाविषयी चर्चेतील मध्यवर्ती संकल्पना आहे. त्यानंतर मार्क्सवादाची चर्चा केली आहे या मध्ये मार्क्सवाद हा शास्रीय समाजवादाचा मूलाधार आहे. मार्क्सच्या पूर्वीसुद्धा समाजवादाचा प्रचलित होऊ लागला होता. औद्योगिक क्रांती झाली आणि वाढत्या उद्योगाबरोबर कामगारांची व सामान्य जनतेची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची बनत गेली. तेव्हा म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात व एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात समाजवादाचा उदय व प्रसार झाला.

त्या वादाचा इंग्लंड व फ्रान्समध्ये अनेक नामवंत विद्वानांनी व समाजधुरीणांनी जोरदार पुरस्कार केला. त्या विचारवंतांमध्ये रॉबर्ट ओएन, चार्ल्स फौरिएर, प्रूदाँ, सेंट सायमन वगैरे प्रमूख होते. त्या विचारांना कार्लाइल, डिकन्स, रस्किन आदी लेखकांचाही पाठिंबा होता. या समाजवादाच्या प्रणेत्यांनी केवळ समाजवादी समाजाचे भव्य चित्र रेखाटले. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्ता बाबतचा दृष्टिकोन याचे विश्लेषण केले आहे त्यांच्या मते कोणत्याही एका जातीचा पक्ष असू नये अश्पृशयना राजकीय

अधिकार मिळाल्या शिवाय त्यांचे उत्थान होणार नाही असे त्यांचे मत होते.म्हणून त्यांनी आपल्या अनुयाना सत्ताधारी जमात बना असा संदेश दिला होता. त्यासाठी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र त्यांच्या अनुयायांना दिला. सदर घटकाच्या दुसऱ्या भागात उदारमतवाद, बहुलवाद, अभिजन सिद्धांत त्याच बरोबर उत्तर आधुनिकतेच्या बाबतीत महत्वाची अशी चर्चा केली आहे.

**१) शक्तीचे सर्व व्यापकत्व:**

वेबर म्हणतो समाजात समाजात कायदा व सुव्यवस्था राखणे व त्याचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे हे राज्याचे कार्य आहे व हे कार्य पार पाडण्यासाठी राज्याकडे शक्ती असते. भौतिक शक्तीचा वापर करण्याची मक्तेदारी केवळ राज्याकडे असते. त्याच्या मते राज्य ही एक अशी संरचना आहे की जिला सफलतापूर्वक कायदेशीरपणे भौतिक शक्तीचा वापर करण्याची अधिकार अथवा सत्ता असते

**३.४ (अ) स्वयं अध्ययन प्रश्न**

खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा

१) Das Kapital हा ग्रंथ कोणी लिहिला.

२) Post Modern Social Theory हा ग्रंथ कोणी लिहिला.

३) जॉर्ज रित्झर् यांनी उत्तरआधुनिकतावादाची कोणती काही कारणे सांगितली आहेत.

४) उत्तरआधुनिकता केवळ विशिष्ट लोकांच्या हातातील साधन नसून, विशिष्ट गोष्टीबद्दल संवेदनशील करून विद्यार्थ्यांनी या गोष्टीचा स्वीकार करण्याची योग्यता निर्माण करण्याचे लक्ष उत्तरआधुनिकतावादाचे असते. हि व्याख्या कोणाची.

५) सामाजिक संबंधात जेव्हा एखादी व्यक्ती अशा स्थितीत आहे की इतरांचा विरोध असतानाही ती आपली इच्छा पूर्ण करते तिची ही स्थिती म्हणजे शक्ती होय.व्याख्या कोणाची.

६) साम्यवादी जाहीरनामा केव्हा प्रसिद्ध करण्यात आला?

७) साम्यवादी जाहीरनामा कोणी मिळून लिहीला.

८) भाषणे आणि लेखन हे प्रकाशित ग्रंथ कोणाचे ?

९) जगातील कामगारांनी एकत्र व्हा असा संदेश कोणी दिला.

१०) स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना कोणी व केव्हा केली.

११) शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र त्यांच्या अनुयायांना दिला हा संदेश कोणी दिला.

### ३.४ (ब) स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१) कार्ल मार्क्स

२) जॉर्ज रित्झर

३) १. आधुनिक समाजात मूलभूत बदल, २. आधुनिकतेची निरंतरता, ३. आधुनिकतेतून पर्यावरणीय समस्या, ४. आधुनिक समाजातून समस्यांची निर्मिती, ५. रूढीवादी सीमांना विरोध, ६. आधुनिकता समाजाला खूश ठेवण्यात अपयशी, ७. वैज्ञानिक समाजशास्त्राला पर्याय, ८. महान वृत्तांताकडून स्थानिक गोष्टींची अपेक्षा

४) ल्योतार्ड.

५) max weber

६) १८४८ साली.

७) मार्क्स व एंगेल्स

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

९) कार्ल मार्क्स

१०) ऑगस्ट १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

## ३.५ सरावासाठीचे प्रश्न:

खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.

१) वेबरप्रणीत दृष्टीकोनाची चर्चा करा?

२) मार्क्सवाद म्हणजे काय याचे विश्लेषण करा ?

३) डॉ. आंबेडकरांचा सत्तेबाबतच्या विचाराचे स्पष्टीकरण करा.

४) उदारमतवाद म्हणजे काय?

५) बहुलतावादी विचाराचे परीक्षण करा?

६) अभिजन सिद्धांताचे विवेचन करा.

७) उत्तर आधुनिकतावादी दृष्टीकोनाची चर्चा करा.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके.

संदर्भ :

१. Marx, Karl, Das Kapital, 3 Vols., Berlia, 1867, 1885, 1894.

२. Marx, Karl, Economic and Philosophic Manuscripts of 1844, New York, 1969.

३. Marx, Karl; Engels, Friedrick, Trans. Moore, Samuel, The communist Manifesto, Baltimor, 1967.

४. Marx, Karl; Engels, Friedrick, The Holy Family, Moscow,1956.

५. Marx, Karl, Contribution to the Critlque of Political Economy, London, 1959.

६. Marx, Karl, Poverty of Philosophy, New York, 1963.

७. McGovern, . F. Marxism, London, 1980.

८. Mc-Lellan, D. S. Marxism fter Marx, New York, 1980.

९. Parkin, Frank, Marxism and Class Theory, London, 1979.

१०. Seliger, Martin, The Marxist Conception of Ideology : a Critical Essay, Cambridge, 1979.

११. Strachey, John. The Nature of Capitalist Capitalist Crisis, Toronto, 1935.

१२. गाडगीळ, पी. वा. मार्क्सचा भौतिकवाद, पुणे, १९४०.

१३. जोग, वि. स. मार्क्सवाद आणि मराठी साहित्य, नागपूर, १९८१.

१४. पाध्ये, प्रभाकर, मानव आणि मार्क्स, पुणे, १९८०.

१५. मार्क्स, कार्ल; तुळपुळे, वसंत, अनु. तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य, पुणे, १९८२.

१६. मार्क्स, कार्ल; तुळपुळे, वसंत, अनु. भांडवल (कॅपिटल) : मांडवली उत्पादनाची मूलगामी मीमांसा, खंड १-३, पुणे, १९७०-८०.

लेखक - व. भ. कर्णिक

स्रोत - मराठी विश्वकोश

❑❑❑

## घटक – ४
# भारतातील राजकीय पक्ष
(Political Parties in India)

**घटक संरचना –**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ राजकीय पक्ष : वैशिष्ट्ये आणि सामाजिक रचना

४.२.२ दबावगट आणि हितसंबंध गट

४.२.३ भारतातील प्रमुख राजकीय पक्ष आणि त्यांची तत्त्वे

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सरावासाठीचे प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

सदर घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास–

१) राजकीय समाजशास्त्र या ज्ञान शाखेचा भाग म्हणून राजकीय पक्षांचा अर्थ, वैशिष्टे आणि रचना समजून घेता येईल.

२) राजकीय व्यवस्थेत हितसंबधी गट व दबावगट यांचे वैशिष्टे आणि महत्त्व जाणून घेता येईल.

३) भारतातील प्रमुख राजकीय पक्ष आणि त्यांची तत्त्वे विशद करता येतील.

## ४.१ प्रस्तावना:

राजकीय सहभागावर प्रभाव टाकणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे राजकीय पक्ष होय. आधुनिक काळात सर्वच राज्य व्यवस्था मध्ये राजकीय पक्षांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जगात लोकशाहीची स्थापना झाल्या नंतर राजकीय पक्षाचे महत्व अधिकच वाढू लागले; म्हणूनच राजकीय पक्षांना लोकशाही

शासन प्रणालीचा आत्मा असे संबोधले जाऊ लागले. प्रा. मुनरोच्या मते, लोकशाही शासन हे एक प्रकारचे पक्षीय (राजकीय) शासनच आहे. राजकीय पक्षाचे महत्व विशद करतांना मैक आईव्हर म्हणतात कि, ज्या देशात पक्ष पद्धती अस्तित्वात नाही, त्या देशात फक्त क्रांतीनेच सरकार बदलता येते, तर पक्ष पद्धतीमुळे क्रांतीची आवश्यकताच पडत नाही. उलट संविधानिक पद्धतीने आणि विधायक मार्गाने समाजात परिवर्तन घडवून आणता येते.

## ४.२ विषय विवेचन :

राजकीय पक्ष राजकीय जीवनामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण विषय आहे. व्यक्तीला असणारा राजकीय हक्क हा एक संविधानिक अधिकार आहे. लोकशाही मार्गाने मिळालेल्या हक्काद्वारे समाजाचे सामाजिक कल्याण साधतात. या संविधानिक अधिकारात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वाचे पालन केलेले असते. वास्तविकपणे या तत्त्वाचा आदर्शपद्धतीने अवलंब केल्यास अनेक सामाजिक समस्यांचे निर्मूलन होऊ शकेल आणि आदर्श अशी सामाजिक आणि राजकीय, आर्थिक लोकशाही प्रस्थापित होईल. सदर प्रकरणामध्ये राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये आणि सामाजिक रचना, दबावगट आणि हितसंबंधगट, भारतातील प्रमुख राजकीय पक्ष आणि त्याची तत्त्वे याचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

### ४.२.१ राजकीय पक्ष : वैशिष्ट्ये आणि सामाजिक रचना

राजकीय पक्षाचा अभ्यास अनेक विचारवंतानी विविध दृष्टीने केलेला आहे. त्या पैकी संस्थात्मक दृष्टीकोन आणि वर्तनवादी दृष्टीकोन यांचा विशेष उल्लेख करता येईल. १९५० च्या पूर्व काळात राजकीय पक्षाची ध्येय धोरणे, कार्यक्रम, जाहीरनामे, संघटना इ. घटकांना अनुसरून जी मांडणी करण्यात आली तिचा अंतर्भावसंस्थात्मक दृष्टीकोनात करता येतो तर १९५० नंतर प्रत्यक्ष राजकीय व्यवहार लक्षात घेऊन जी मांडणी करण्यात आली तिचाअंतर्भाव  हा वर्तनवादी दृष्टीकोनात करता येईल. काही महत्त्वपूर्ण व्याख्या पुढील मांडण्यात आलेल्या आहेत.

**मैकआईव्हर :** राजकीय पक्ष म्हणजे अशा लोकांचा समूह आहे कि जो नैतिक मूल्यांनी आणि विधायक कार्यांनी प्रेरित झालेला असेल आणि शासनाच्या बळकटीसाठी नैतिक सिद्धांताचा उपयोग करीत असेल.

**एडमंड बर्क :** राजकीय तत्त्वज्ञानाच्या आणि भूमिकेच्या बाबतीत एकमत असलेला आणि संघटीतरित्या राष्ट्रीय हितासंबंधी जपणूक करणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय.

**न्यूमन :** सक्रिय राजकीय सहभाग कर्त्याचे आवाज उठविण्यासाठी केलेलं संघटन कि ज्या द्वारे सरकारच्या शक्तीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होतो आणि जनतेचा पाठिंबा प्राप्त करण्यासाठी भिन्न प्रकारच्या विचारसरणीच्या संघटनांशी स्पर्धा केली जाते त्यालाच राजकीय पक्ष म्हटले जाते.

**गिलक्राइस्ट:** राजकीय पक्ष म्हणजे अश्या लोकांचा समूह कि जे समान राजकीय विचार बाळगतात आणि राजकीय संघटन करून शासन निर्धारण प्रक्रीयेत सहभागी होण्याचा प्रयत्न करतात.

**राजकीय पक्षाची वैशिष्टे :**

**१) एक समान राजकीय विचारधारा :** एक समान राजकीय विचारधारा हे राजकीय पक्षाचे महत्वपूर्ण वैशिष्टे असते. कोणताही राजकीय पक्ष हा विचारधारे शिवाय परिपूर्ण मानला जात नाही. विशिष्ट राजकीय पक्षातील नेतृत्व, कार्यकर्ते आणि अनुयायी हे विशिष्ट अशा विचारसरणीचा स्वीकार करून त्या नुसार आपल्या राजकीय पक्षाची बांधणी आणि कार्यक्रम आखत असतात. जसे कि महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीला अनुसरून भारतामध्ये राजकीय पक्ष काम करत आहेत. काही राजकीय पक्ष हे एका पेक्षा अनेक विचारसरणीचा एकत्रित वापर करत असतात. जसे कि भारतातील कॉंग्रेस पक्ष हा आम्ही गांधीवादी आहोत अशी भूमिका घेण्या बरोबरच अनेक वेळा आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राम मनोहर लोहिया यांच्याही विचारसरणी मानतो अशी भूमिका घेतो.

**२) प्रत्येक राजकीय पक्षाचे निश्चित असे धोरण असते :** राजकीय पक्षाला फक्तविचारसरणी असून चालत नाही तर ती विचारसरणी कशी अमलात आणावयाची या करिता एक धोरणअसावे लागते. निश्चीत अशा धोरणाशिवाय कार्यक्रम बनविता येणे कठीण बनते. एकच विचारसरणी असलेल्या वेगवेगळ्या पक्षाचे धोरणे मात्र भिन्न असतात. धोरण किती प्रभावी व कालसुसंगत बनविले आहे त्या वरच राजकीय पक्षाचे यश अवलबून असते.

**३) राजकीय व्यवस्थेला मार्गदर्शन करणारा विधायक लोकांचा समूह :** राजकीय पक्ष हा शासकीय व्यवस्थेला अनुसरून विशेषतः लोकशाही शासन प्रक्रियेत राजकीय व्यवस्थाच नव्हे तर संपूर्ण शासकीय व्यवस्थे बरोबरच सामजिक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि गतिमान करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. राजकीय पक्षा मध्ये ज्या लोकांचा/ नागरिकांचा समावेश होत असतो ते लोक शासकीय प्रणालीवर विश्वास ठेवत असल्याने हा विधायक नागरिकांचा समूह असतो. राजकीय पक्षातील हा विधायक लोकांचा समूह राजकीय व्यवस्थेला मार्गदर्शन करण्याची भूमिका पार पाडत असतो.

**४) शासकीय निर्णय निर्धारण प्रक्रियेचा भाग :** शासन जनतेच्या हितासाठी समाज नियंत्रणासाठी, समाज सुधारणेसाठी काही निर्णय घेत असते. शासनाच्या अशा निर्णय प्रक्रियेत राजकीय पक्ष कधी सत्ता पक्ष म्हणून, कधी विरोधी पक्ष म्हणून कधी दबावगट म्हणून कार्य करीत असतात. राजकीय पक्ष हे शासनाच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेचे केंद्रीय घटक असतात.

**५) राजकीय उद्दिष्टांप्रती आणि विचारधारेवर वरती संपूर्ण श्रद्धा :** राजकीय पक्षातील नेतृत्व, कार्यकर्ते आणि अनुयायी आपल्या राजकीय पक्षाच्या उद्दिष्टे आणि त्याच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणारी तत्वज्ञान आणि विचारधारेवरती आपली श्रद्धा ठेवत असतात. प्रत्येक राजकीय पक्षाचे आपले निर्धारित असे उद्दिष्टे असते आणि त्या नुसार विचारधारा हि असते. या दोन्हीवरती राजकीय पक्षातील लोक किती श्रद्धा ठेवतात यावर या पक्षाचे योगदान आणि गतिमानता अवलबून असते.

**६) सत्ता काबीज करण्याची इच्छा आणि प्रयत्न :** राजकीय पक्ष मूलतःराजकीय सत्ताहस्तगत करण्याच्या उद्दिष्टाने निर्माण झालेले असतात. आपल्या विचारधारेला अनुसरून समाजाची निर्मिती करायची असेल तर सत्ता प्राप्त करणे हा एक महत्वाचा मार्ग बनतो म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष सत्ता प्राप्त करण्याचे कसोशीने प्रयत्न करीत असतो. राजकीय व्यवस्था कोणतीही असो त्या व्यवस्थेतील राजकीय पक्ष सत्ता काबीज करण्यासाठी प्रसंगी आपले सर्वस्व पणाला लावतात. लोकशाही शासन प्रणालीत त्यांना त्या करिता अधिक संधी असते.

**७) सत्ताधारी आणि विरोधी पक्ष :** शासन चालविणाऱ्या पक्षाला सत्ताधारी पक्ष म्हणतात तर ज्यांना सत्ता मिळाली नाही परंतु विधिमंडळात संधी मिळाली असे पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करीत असतात. आपल्या पक्षाच्या ध्येय धोरणाला अनुसरून सत्ताधारी राजकीय पक्ष शासनाची धोरणे, कायदे, बनवीत असतो. त्यानुसार कार्यक्रमांची आखणी करीत असतो तर विरोधी पक्ष हा समाजाचे प्रश्न विधीमंडळात व विधी मंडळाच्या बाहेर निर्माण करून त्या नुसार जनतेचे कल्याण करण्याचा प्रयत्न करीत असतो.

**अ) भारतीय राजकीय पक्षाची वैशिष्टे :**

लोकशाही राजकीय प्रणालीचा अत्यावश्यक घटक म्हणून राजकीय पक्ष काम करत असतात. स्वातंत्र्यानंतर भारतातही राजकीय पक्षाचे महत्व अधिकच वाढले, परंतु पश्चिमेकडील देशातील राजकीय पक्षा मध्ये आणि भारतातील राजकीय पक्षात काही अंतर दिसते. भा. ल. भोळे म्हणतात कि, 'ज्या समाजात राजकीय व्यवस्था उत्कांत होत जाते आणि एकेका विचारसरणी मधून पक्ष आकारला येत जातात. भारतातील राजकीय पक्ष निश्चित, सुसंगत, व सातत्यपूर्ण स्वरूप धारण करू शकले नाहीत. एवढेच काय, आज अस्तित्वात असलेले राजकीय पक्ष नष्ट झाले तरच आदर्श भारतीय राज्य अस्तित्वात येऊ शकेल. असा ठाम विश्वास बाळगणारे काही विचारवंत आजही या देशात आढळतात. म. गांधीची ग्राम राज्य संकल्पना हि पक्ष विरहीत आहे. जय प्रकाश नारायण ही त्याच विचाराचे होते.

वरील बाबी लक्षात घेऊन भारतातील राजकीय पक्षाचे काही वैशिष्टे पुढील प्रमाणे पाहता येतील :

**१) बहुपक्ष पद्धत :** चीन सारख्या साम्यवादी देशात एक पक्ष पद्धती तर इंग्लड, अमेरिकेत व्दिपक्ष पद्धती आहेत. भारताच्या पक्षीय राजकारणाचे ठळक वैशिष्टे म्हणजे बहुपक्ष पद्धत होय. भारतातील विविधता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या घटना, समस्यामुळे अनेक राजकीय पक्षाची निर्मिती झाली. १९९६ च्या निवडणूक आयोगाच्या आकडेवारी नुसार नोंदणी झालेल्या राजकीय पक्षाची संख्या ५२१ होती. २३ सप्टेंबर २०२१ च्या भारत सरकारच्या निवडणूक आयोगा नुसार ०८ हे राष्ट्रीय तर ५८ राज्य स्तरीय पक्ष असून नोंदणीकृत (अमान्यताप्राप्त) पक्षाची संख्या २७९६ एवढी आहे.

**२) संमिश्र राजकीय पाया :** भारतीयपक्ष पद्धतीमध्ये पक्ष प्रवेश, प्रशिक्षण, व पदधारण ई. यांचे स्पष्ट असे नियम किंवा पद्धतीचा वापर होतांना दिसत नाही. या राजकीय पक्षाचा सामाजिक, सांकृतिक पाया स्पष्ट दिसत नाही. बहुतेक सर्वच राजकीय पक्षाचे सदस्य हे बहुजिनसी आहेत. जात, धर्म, भाषा इ. बाबींवर

आधारलेले अनेक समूह प्रत्येक राजकीय पक्षात आढळतात. हे समूह आपल्या समूहाच्या हिताच्या रक्षणासाठी पक्षाच्या अंतर्गत दबाव निर्माण करतात. अशा पक्षाचा सामाजिक पाया शोधणे कठीण बनते.

**३) अंतर्गत ऐक्याचा अभाव :** भारतातील राजकीय पक्षाचा पाया बहूजिनसी असल्याने त्यांच्या मध्ये एकात्मतेचा अभाव दिसतो. वैचारिक एकसंघता आढळत नाही. जात, धर्म, संस्कृती, प्रदेश इत्यादीच्या आधारावर पक्षात गट आढळतात. त्यामुळे भारतातील राजकीय पक्षात अंतर्गत ऐक्याचा अभाव दिसतो. काँग्रेस, भाजपा, कम्युनिस्ट असो कि रिपब्लिकन पक्ष असो या सर्वच पक्षात अंतर्गत भेद दिसतात.

**४) राजकीय पक्षाचे एकवर्गी स्वरूप** : राजकीय पक्षाचे स्वतंत्र वैचारिक अधिष्टान हे त्यांच्या स्वतंत्र राजकीय, सामाजिक, आर्थिक जानिवातून निर्माण होतात. असे स्वतंत्र अधिष्टान असलेले राजकीय पक्ष भारतात दिसत नाहीत. सर्वच राजकीय पक्षाचा तोंडवळा सारखाच दिसतो. अनेक वेळा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे सारख्याच तत्व, मुल्यां बरोबरच सारख्याच सध्या आणि साधनांचा पुरस्कार करताना दिसतात. भारतातील बहुतेक राजकीय पक्षाचा वर्ग हा शहरी, मध्यमवर्गीय, आणि पांढरपेशा दिसतो. त्यामुळे भारतातील राजकारण हे मध्यम वर्गाचे किंवा त्यांच्या हिताचे दिसते.

**५) राजकीय पक्षाची वैचारिक संदिग्धता :** वैचारिक दृष्ट्या भारतातील राजकीय पक्षांचे वर्गीकरण करावयाचे असल्यास डावे- उजवे, पुरोगामी- प्रतिगामी, गांधीवादी- साम्यवादी, धर्मनिरपेक्ष - धर्माधीष्टीत इ. स्वरूपाने करता येईल. परंतु भारतातील कोणताही प्रमुख राजकीय पक्ष या विचारधारेचे पालन काटेकोरपणे करतांना दिसत नाही. या बाबतची अनेक उदाहरणे देता येतील जसे कि, ब्राम्हणवादास विरोध हा प्रमुख वैचारिक आधार घेऊन उदयास आलेली बहुजन समाज पार्टी ब्राम्हणांना सोबत घेऊन 'सर्वजण हिताय- सर्वजण सुखायचा नारा देत आहे. राम मंदिराचा प्रमुख विचार घेऊन पाया निर्माण करणारी भारतीय जनता पार्टी म. गांधींच्या नावे सद्भावना कार्यक्रम करीत आहे. मार्क्सवादी पक्ष सत्तेत असतांना भांडवलदाराना सोई सुविधा पुरवीत आहे. या वरून हेच स्पष्ट होते कि भारतातील राजकीय पक्ष हे वैचारिक दृष्ट्या संदिग्ध आहेत.

**६) प्रादेशिक पक्षाचे महत्व :** अखिल भारतीयत्वचा अभाव असलेले अनेक प्रादेशिक पक्ष भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. प्रादेशिक अस्मिता व स्थानिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी विविध प्रादेशिक पक्षाची निर्मिती झाली आहे. असे प्रादेशिक पक्ष आपल्या प्रदेशाची अस्मिता जपताना इतर प्रदेशातील पक्षा समन्वय करताना फारसे दिसत माहित. तमिळनाडूतील द्रमुक, पंजाब मधील अकाली दल, आंध्रप्रदेश मधील तेलगु देसम, महाराष्ट्र मधील शिवसेना यांचा प्रमुख उल्लेख करता येऊ शकेल.

**७) राजकीय पक्षाचे सत्ताभिमुख आणि सत्ता केन्द्री स्वरूप :** भारतातील राजकीय पक्ष हे सत्ताधारी असो कि विरोधी यांचे कार्ये हे नेहमी सत्ताभिमुख पद्धतीने चाललेले असते. ते नेहमी सत्तेत प्रवेश करण्याचा आणि त्यालाच चिकटून राहण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असतात. सत्तेत असलेल्या पक्षा कडून कितीही गंभीर चुका झाल्या तरी तो कोणतीही किंमत मोजून सत्तेत राहण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यावश्यक मूल्यात्मक राजकारणा पेक्षा हे पक्ष मोर्चा- बंद इ. सारख्या भडक मार्गाचा

अवलंब करून सत्तेच्या जवळ जाण्याचा पर्यंत करीत असतात. थोडक्यात सत्ता प्राप्त करणे हेच त्यांचे सर्वस्व आहे अशीच त्यांची वागणूक असते.

**८) काँग्रेस पक्षातून इतर पक्षाची निर्मिती :** भारतीय राजकीय पक्षाची निर्मिती हि प्रामुख्याने काँग्रेस पक्षातील फुटीतून निर्माण झालेली दिसते. असंतुष्टता, वैचारिक मतभेद, महत्वाकांक्षा इ. मुळे वेगवेगळ्या काळात काँग्रेस पक्षातून बाहेर पडले. जयप्रकाश नारायण, आचार्य कृपलानी, अशोक मेहता इत्यादीनी काँग्रेस चा त्याग करून 'समाजवादी पक्षाची स्थापना केली. राजगोपालाचारी यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. शामाप्रसाद मुखर्जी यांनी जन संघाची स्थापना केली; तर जनता दल, जनता पक्षातील मोरारजी देसाई, व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर हे पूर्वी काँग्रेस पक्षात होतेच. अलीकडच्या काळात शरद पवार यांचा 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तर ममता बैनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष यांची हि निर्मिती काँग्रेस पक्षातून झाली आहे. थोडक्यात भारतीय राजकारणातील अनेक प्रमुख पक्षाची निर्मिती हि काँग्रेस पक्षातून झाली आहे हे वास्तव आहे.

**९) पक्षाचे विभूतीपुजक स्वरूप :** भारतीय राजकारणात सामाजिक आणि धार्मिक जीवनात असलेली विभूती पूजा येणे स्वाभाविकच आहे. भारतातील बहुतेक सर्वच पक्ष हे विशिष्ट व्यक्तींनी निर्माण केलेले आणि त्यांच्या वलयात चालणारे आहेत. नेतृत्व हे त्या पक्षाचे औपचारिक दृष्ट्या कोणाकडे जरी असले तरी निर्णय मात्र विशिष्ट व्यक्ती किंवा कुटुंब घेते. त्या व्यक्ती नंतर त्या व्यक्तीचे जैविक वारसदार हे त्या वलयाच्या केंद्रस्थानी येतात. काही वेळा असे नेतृत्व संपले तर पक्ष हि संपला जातो. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, जनता दल आणि त्या पासून निर्माण झालेले इतर पक्ष, बहुजन समाज पार्टी पासून ते वर्तमात सत्तेत असणारा भारतीय जनता पक्ष हि त्यास अपवाद नाही.

**१०) अपक्षाची मोठी संख्या :** भारतात बहुपक्ष पद्धतीचा परिणाम म्हणून २०२१ च्या नोंदणी नुसार नोंदणीकृत मात्र अमान्यताप्राप्त-२७९६ राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत. तरी सुद्धा अपक्ष उमेदवाराची संख्या लक्षणीय आहे. १९५७ च्या निवडणुकीत ४२ उमेदवार निवडून आले होते; १९८४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत ३८०० अपक्ष उमेदवार निवडणुकीत होते. निवडणुकीत स्वतंत्र लढणाऱ्या उमेदवाराला विचारसरणी आणि कार्यक्रम हि स्वतंत्र असतो. अनेक प्रसंगात हे उमेदवार संधि साधूची भूमिकाच घेतात.

**११) पक्ष पद्धतीचे प्रादेशीकरण :** राजकीय पक्षामध्ये राष्ट्रीयत्वा पेक्षा प्रादेशिकता अधिक प्रमाणात दिसते; त्यामुळे प्रादेशिकता विषयक प्रश्न आणि विचारधारा यांचा हि प्रभाव त्या पक्षावर पडतो. तृणमूल काँग्रेस, बहुजन समाज पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष इ. पक्ष राष्ट्रीय राजकारणात प्रभावी भूमिका पार पाडत असले तरी त्यांच्या कार्यक्रमावर प्रादेशिकता तेवढीच प्रभावी आहे.

**१२) शिक्षित आणि व्यावसायीक वर्गाच्या हाती प्रमुख सूत्रे :** भारत हा खेडे, कृषी, आणि परंपरांचा प्रभाव असणारा देश आहे; परंतु येथील राजकारणावर मात्र पांढरपेशा, शहरी, शिक्षित, व्यावसाईक वर्गाचा प्रभाव आहे. सर्वच राजकीय पक्षाचा मतदार हा खेडूत असला तरी त्याच्या मुख्यालय, कार्यक्रम, नेतृत्व, कार्यकर्ते यांचे केंद्रीकरण मात्र त्या शहरी शिक्षित आणि व्यवसाईक वर्गाच्या हाती असते.

थोडक्यात भारतातील राजकीय पक्ष यांच्या मध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्षाची औपचारिक लक्षणे दिसत असली तरी त्यांच्या मध्ये स्वतंत्र पणे वरील वैशिष्टे ठळकपणे नमूद करता येतात.

**ब) राजकीय पक्षाची रचना :**

आधुनिक काळात प्रत्येकराजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षांना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. राजकीय पक्षाचा जन माणसावर प्रभाव पडण्यासाठी त्या पक्षाची क्षमता, योग्यता वाढविण्याची गरज असते. कोणत्याही राजकीय पक्षाला आपली क्षमता, योग्यता वाढविण्यासाठी त्यांना पक्षाच्या रचनेवर आणि त्याच्या कार्यावर लक्ष केंद्रित करावे लागते; म्हणजेच राजकीय पक्षाच्या योगदानात त्या पक्षाच्या रचनेचे महत्त्वाचे स्थान असते. राजकीय पक्ष कोणत्या पद्धतींना अनुसरून निर्माण झाला आहे त्यावर त्या पक्षाची रचना सुद्धा अवलंबून असते.

**राजकीय पक्षाच्या रचनेचे वर्गीकरण :**

मॉरीस यांनी त्या पक्षाच्या रचनेला अनुसरून त्यांची चार गटात विभागणी केली आहे.

**अ) अंर्तवर्तुलात असणारे पक्ष :** अंर्तवर्तुळ असणाऱ्या पक्षाची सदस्य संख्या अतिशय मर्यादित असते. या पक्षात सदस्य संख्ये पेक्षा गुणवत्तेला जाणीवपूर्वक महत्व दिले जाते. व्यक्तिगत गुणवत्ता व स्थानिक प्रभाव असलेले लोक पक्षाचे सदस्य म्हणून निवडून घेतलेले असतात.

**ब) शाखा आधारित पक्ष :** शाखात्मक पक्ष रचनेत सदस्य संख्या अमर्याद असते. त्यावरून त्यांना 'जनता पक्ष' असेही म्हटले जाते. मतदार संख्येच्या आकृतिबंधानुसार किंवा भौगोलिकदृष्ट्या त्याची रचना ठरविली जाते. पक्षाच्या विभागीय स्तरावर धोरणे आणि कार्यक्रम ठरविले जातात आणि पक्षाचे प्रतिनिधी सुद्धा याच स्तरावर ठरविले जातात. या राजकीय पक्षाच्या विशाल स्तराला नियंत्रित करण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणी असते.

**क) गाभा आधारित पक्ष :** अशा स्वरुपाच्या राजकीय पक्षा मध्ये गरजेला महत्व दिले जाते. पक्षाचे क्षेत्रात्मक घटक यामध्ये महत्त्वाची भूमिका पडत असतात. पक्षाची सदस्य संख्या मर्यादित असते. पक्ष नेतृत्वाला महत्व प्राप्त झालेले असले तरी केंद्रीय समिती ही महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. त्या प्रमाणेच पक्षाप्रती  निष्ठा अनन्यसाधारण महत्त्वाची बनते.

**ड) लढाऊ कार्यकारी पक्ष :** अश्या स्वरुपाचे पक्ष/संघटनाची संरचना हि सैन्याच्या रचनेच्या धरतीवर आधारित असते. या पक्षात शिस्तीला खूप महत्त्वाचे स्थान असते. अशा पक्षाची विचारसरणी क्रांतीकारक स्वरुपाची असते. प्रशिक्षणाला या पक्षात महत्त्वाचे स्थान असते.

मॉरीस यांनी मांडलेल्या पक्ष संघटने वर आधारित राजकीय पक्ष सर्वत्रच आढळतील असे नव्हे तर काळ, प्रसंग, प्रदेश आधारित त्याचे स्वरूप भिन्न दिसते. काही ठिकाणी या पैकी एक किंवा मिश्र स्वरुपाची पक्ष रचना आढळते.

**भारतातील राजकीय पक्षाची रचना :**

मॉरीस यांनी मांडलेल्या पक्ष संघटनेच्या विवेचना नुसार काळ, प्रसंग, प्रदेश नुसार राजकीय पक्षाची रचना बदलू शकते.भारतातही वरील पक्ष रचना मिश्र स्वरुपात आढळत असली तरी तिचा कल हा शाखा या प्रकाराकडे अधिक दिसतो. असे असले तरी यांच्या या प्रकारची सर्वच वैशिष्टे भारतातील राजकीय पक्षाना लागू पडतात असे नव्हे. भारतातील संसदीय लोकशाहीची प्रक्रियेचा भाग म्हणून भारतातील राजकीय पक्षाच्या औपचारिक स्वरुपात काही प्रमाणात समानता आढळते त्याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

**१) केंद्रीय कार्यकारिणी :** अखिल भारतीय पक्षाची केंद्रीय कार्यकारिणी हि राष्ट्रीय पातळीवर असते; तर इतर पक्षामध्ये त्या पक्षाच्या स्तरानुसार तिचा स्तर आढळतो. मुख्यतः राष्ट्रीय 'अध्यक्ष' हा या केंद्रीय कार्यकारिणीचा प्रमुख असतो; त्या शिवाय महा सचिव, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष. प्रवक्ते इ. पदे किंवा जबाबदारी हि महत्त्वाची मानली जाते.

पक्षाची धोरणे ठरविणे, कार्यक्रमाची आंखणी करणे, प्रशिक्षण देणे, कनिष्ठ स्तरावरील जबाबदारी निश्चित करणे इ. महत्त्वपूर्ण कामे केंद्रीय कार्यकारिणीला करावी लागतात. कोणत्याही पक्षात या कार्यकारिणीची स्थान सर्वोच्च असते आणि पक्षाच्या सदस्यांना नियंत्रित करणे आणि मार्गदर्शन करणे हि महत्त्वाची भूमिका ते पार पाडीत असतात.

**२) प्रदेश किंवा क्षेत्रीय कार्यकारिणी :** राष्ट्रीय स्तरावरील पक्षाकरिता हा स्तर महत्त्वाचा असतो कारण हा स्तर कोणत्याही बाबीचे अंमलबजावणी करण्याची प्रमुख जबाबदारी या स्तरावर असते.पाया या हि स्तरावर प्रादेशिक किंवा स्थानिक पक्षात हा स्तर आणि केंद्रीय स्तर यात फार मोठे अंतर आढळत नाही. राष्ट्रीय स्तराप्रमाणेच अध्यक्ष, महा सचिव, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष. प्रवक्ते इ. महत्त्वाची असतात. काही पक्षामध्ये राज्य प्रभारी हे पद हि महत्त्वाचे मानले जाते. मुख्यतः राज्याचा प्रभारी हा केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्याच्या नियंत्रणा करिता नेमलेला असतो. केंद्रीय स्तराप्रमाणेच राज्य किंवा प्रदेश स्तरावर पक्षाची धोरणे ठरविणे, कार्यक्रमाची आखणी करणे, प्रशिक्षण देणे, कनिष्ठ स्तरावरील जबाबदारी निश्चित करणे इ. महत्त्वपूर्ण कामे यांना करावी लागतात.

**३) जिल्हा कार्यकारिणी :** कोणत्याही पक्षात मध्येहा स्तर सर्वात महत्त्वाचा मानला जातो; कारण केंद्रीय आणि राज्य स्तरावरील सर्व संसाधने पुरविण्याचे काम या कार्यकारणी असते. या अर्थाने हि कार्यकारिणी खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष अमलबजावणी करणारी कार्यकारिणी असते. म्हणूच या कार्यकारिणी ला कोणत्याही पक्षाचा मूलभूत पाया मानला जातो.

**४) तालुका किंवा स्थानिक कार्यकारिणी :** पक्ष जनते पर्यंत पोहोचवण्यासाठी आणि जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी हि कार्यकारिणी महत्त्वाची असते. कोणत्याही पक्षातील अनुयायी, कार्यकर्ते, नेतृत्व यांची सुरवात याच कार्यकारिणी पासून होत असते.

अलीकडील काळात पक्षाची यंत्रणा अधिक सूक्ष्म पद्धतीने काम करीत आहे. त्या करिता गाव पातळी बरोबरच मोहल्ला/गल्ली पातळीवर संघटन पोह्चिण्याचे कार्य होत आहे. काही पक्षा मध्ये तर बूथ स्तरावर सुद्धा कार्यकारणी करून आपल्या पक्षा विचार मांडून जनतेचा पाठिंबा घेतला जातो.

जवळपास सर्वच पक्षात या रेषात्मक रचणे प्रमाणेच गुणात्मक रचना सुद्धा असते. त्या मध्ये विविध सामाजिक स्तराला सामावून घेण्यासाठी मागासवर्गीय सेल, अल्पसंख्याक सेल, महिला आघाडी इ. चा अंतर्भाव या रचनेत असतो. या शिवाय विविध कौशल्य आधारित सेल हि आढळतात जसे कि माहिती- जन संपर्क सेल, प्रशिक्षण विभाग, सांस्कृतिक विभाग इ. वरील सर्व घटक हे राजकीय पक्षाच्या मुख्य रचनेचे भाग नसले तरी अनेक वेळा ते साह्यभूत घटक म्हणून महत्त्वाची जबाबदारी पार पाडीत असतात.

**४.२.२ दबावगट आणि हितसंबंध गट** Pressure groups and Interest groups:

राजकीय पक्षा प्रमाणेच राजकीय व्यवस्थेत विशेषतः लोकशाही शासन प्रणालीत दबाव गटमहत्त्वाचे योगदान देत असतात. बहुतांश वेळा राजकीय पक्ष आणि दबावगट हे एक नाण्याच्या दोन बाजू म्हणून काम करतात; म्हणूनच राजकीय व्यवस्था समजून घेताना दबाव गट समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

समान हित संबंध असणारे लोक समूहाने आचार-विचार,कृती करत असतात. राज्य निर्मिती नंतर अशा समविचारी गटांची निर्मिती व प्रभावशीलता ठळकपणे दिसू लागली. औद्योगिक क्रांती नंतर त्याचे महत्व अधिकच वाढले. दबाव गट हि संकल्पना सर्वप्रथम आर्थर बेंटले या अमेरिकन विचारवंताने आपल्या 'दि प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट' (The Process of Government) १९०८ या ग्रंथात विशद केली. कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये दबाव गटाची भूमिका महत्वाची असते. दबाव गटाचा प्रभाव हा शासकीय व राजकीय व्यवस्थेवर पडत असतो. त्यांच्या निर्णय प्रक्रियेवर हि दबाव गटाच्या भूमिकेचा प्रभाव असतो. दबाव गटाच्या विविध सामाजिक राजकीय विचारवंतानी मांडलेल्या व्याख्या पुढील प्रमाणे पाहता येतील.

**दबाव गटाच्या व्याख्या आणि अर्थ :**

**१) डेव्हिड ट्रुमन :** समान धारणा असणाऱ्या सभासदाच्या समूहाला दबाव गट असे म्हणता येईल, असा गट जेंव्हा शासनावर आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा तो दबाव गट म्हणून ओळखला जातो.

**२) झिंगलर :** जो हितसंबधी गट आपल्या व्यक्तींना औपचारिक स्वरुपाची शासकीय पदे मिळवून न देता शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतात अशा गटांना दबाव गट असे म्हणतात.

**३) लिझरसर :** समाजातील अशा लोकांची पक्ष विरहीत संघटना कि, ज्यात जनता एकत्र येऊन आपले अस्तित्व व आदर्श यांचे संरक्षण करून विशिष्ट उद्दिष्टे, तत्वे, साध्य करण्याचा प्रयत्न ज्या गटा मुळे करतात त्यांना दबाव गट असे म्हणतात.

**४) ओडीगार्ड :** दबाव गट म्हणजे एका पेक्षा अधिक उद्देश किंवा स्वार्थ बाळगणाऱ्या लोकांचे संघटन आहे कि, जे आपल्या हिताच्या रक्षणासाठी शासना वर प्रभाव पाडतात.

वरील व्याख्या वरून हे स्पष्ट होते कि, दबावगट हा समाजाचे  स्वाभाविक वर्तन आहे. ज्या मध्ये विशिष्ट उद्देश असणारा किंवा समान हित संबध असणारा सुमह आपल्या उद्देश पूर्तिसाठी शासन आणि राजकरणावर दबाव टाकण्याचा सतत प्रयत्नशील असतो. भारतामध्ये असे दबावगट हे जात, धर्म, प्रदेश, भाषा, संस्कृती बरोबरच विचारधारेच्या आधारावर बनलेले आहेत.

**दबावगटाची वैशिष्टे :**

अनेक सामाजिक राजकीय विचारवंतानी दबावगटाला संकल्पित करण्याबरोबरच त्याचे वैशिष्टे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे; त्या पैकी काही महत्त्वाच्या वैशिष्ट्याची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

**१) विशिष्ट हितसंबधाची जोपासना :** कोणताही दबावगट निर्माण होण्याकरिता जी महत्वाची भूमिका असते ती म्हणजे समाजाच्या हिताचे रक्षण करणे; म्हणूनच तर विशिष्ट हितसंबंध रक्षणासाठी सामूहिकरीत्या प्रयत्न करणारा गट निर्माण होतो. हा गट आपल्या समूहात आपल्या उद्देशाच्या संबंधाने जागृती करीत असतो. या जागृतीच्या आधारावरच तो आपल्या समूहाच्या हिताची जोपासना करण्याचा प्रयत्न करीत असतो.

**२) मिश्र सांस्कृतिक स्वरूप :** अनेक दबावगटांचे स्वरूप हे सांस्कृतिक भिन्नतेचे दिसते. आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी अनेक संकृतीचे लोक हे काही कालावधी करिता किंवा आपले उद्दिष्टे साध्य होईपर्यंत एकत्र येत असतात. जसे कि शेतकऱ्यांचा दबावगट हा शेती हा मुद्दा घेऊन आपला दबाव निर्माण करतो. अशा वेळी भिन्न-भिन्न संस्कृतीचे शेतकरी आपल्या शेतीविषयक हितसंबंधाची जोपासना करण्यासाठी एकत्र कार्य करीत असतात.

**३) वैचारिक बांधिलकीचा अभाव :** दबावगटामध्ये नेहमीच वैचारिक समानता असेल असे नव्हे. अनेक विचारधारा असणारे लोक आपल्या हित संबंधाच्या जपवणुकीसाठी आपला दबावगट निर्माण करतात. भ्रष्टाचार निर्मूलन करण्यासाठी अनेक विचार प्रवाहाचे लोक एकच दबावगट निर्माण करून शासनावर प्रभाव निर्माण करतात.

**४) संविधानिक व असंवैधानिक मार्गा चा अवलंब :** दबावगट आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी संविधानिक मार्गाचा अवलंब करीत असतात. जसे कि, निवेदन देणे, शासन-प्रशासन सोबत चर्चा करणे, जागृती द्वारे दबाव निर्माण करणे, ई. त्याच प्रमाणे काही प्रसंगी हे दबावगट आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी हे असंवैधानिक/घटनाबाह्य  मार्गाचाही अवलंब करताना दिसतात. हिंसाचार या मार्गाचा हि अवलंब होतांना दिसतो.

**५) राजकीय पक्षासी संबंधित परंतु प्रत्यक्ष सहभाग नाही :** आपल्या समस्या, भूमिका संबंधी शासन-प्रशासन आणि राजकीय पक्ष यांच्या वरती दबाव निर्माण करण्यासाठी कोणताही दबाव गट हा निर्माण होतो व कार्यरत हि राहतो. त्यामुळे राजकीय पक्षाचा त्याचा नेहमीचा संबंध येणे स्वाभाविकच आहे. अनेक दबाव गट आणि कोणत्यातरी राजकीय पक्षाची तत्वज्ञान, विचारधारा, कार्यप्रणाली आदर्श समान असू शकतात.

अश्या वेळी त्यांची जवळीकता हि असतेच. व्यावहारिक पातळीवर राजकीय पक्षाला हे दबाव गट मदतच करीत असतात; परंतु ज्या प्रमाणे राजकीय पक्ष निवडणूक आणि इतर बाबी मध्ये कार्यरत असतो त्या पासून हे दबाव गट अलिप्त असतात.

**६) दबाव गटाचे अस्थाई स्वरूप :** दबाव गटाचे स्वरूप हे मुख्यत्वे करून हा गट कोणत्या हित संबधाना अनुसरून निर्माण झाला आहे त्या नुसार असते. डॉक्टर-प्राध्यापक-वकील-सामाजिक विचारवंत/कार्यकर्ते यांचे दबावगट हे त्यांच्या हितसंबंधी संरक्षणासाठी कार्ये करत असतात. त्यामुळे त्या गटांचे स्वरूप एक सारखे नसते किंवा ते बहुतांश वेळा दीर्घ स्वरूपी नसते. हे स्वरूप काळनुरूप बदलत असते.

**७) दबावगट हा व्यक्ती सापेक्ष असतो :** दबावगट हे जसे विशिष्ट विचारधारेला अनुसरून कार्ये करीत असतात; त्या प्रमाणे ते नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्याही प्रभावात कार्ये करीत असतात. म्हणजेच दबाव गट व्यक्ती निरपेक्ष असत नाहीत. ज्या व्यक्तीच्या ते प्रभावात असतात त्या व्यक्ती म्हणजे त्या गटाचे नेतृत्व, गटाचे विचार् मांडणारे विचारवंत, समाजसुधारक ई. व्यक्तींचा प्रभाव दबाव गटांवर असतो. त्या व्यक्तींचा विचार हाच त्या दबाव गटाचा विचार बनतो.

**८) जागतिकीकरणा नंतर दबावगटा चे स्वरूप हि जागतिक बनले :** जागतिकीकरणा नंतर अनेक बाबींचे जागतिकीकरण झाले. जसे कि उद्योग, सामाजिक आंदोलने ई. त्याच प्रमाणे दबावगटचे हे स्वरूप जागतिक बनत चालले आहेत. समाजमाध्यमे त्या करिता अतिशय महत्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसते. महिलांच्या दबावगट आणि त्यांच्या कार्ये प्रणालीवर पाश्चात्य देशातील दबावगटांचा प्रभाव दिसतो. कामगारांच्या बदलत्या कार्य प्रणाली या जागतिकीकरणा नंतरच्या बदलत्या परिघात आलेल्या दिसतात.

**दबावगटाचे राजकीय महत्व :**

राजकीय व्यवस्थेमध्ये मध्ये दबावगटाचे महत्व नेहमीच राहिले आहे. लोकशाहीच्या विकासाबरोबरच राजकीय पक्ष आणि दबाव गट यांचेही महत्व अधिकच जाणवू लागले. या विषयीची मांडणी अनेक समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. विचारवंत यांनी मांडण्याच्या प्रयत्न केला आहे. सांसदीय राजकारणात तर दबावगट अतिशय महत्वाची भूमिका बजावत असतात त्या विषयी फायझर म्हणतात कि,दबावगट हे एक प्रकारचे 'निनावी साम्राज्य' आहेत. या प्रमाणेच इतर काही मुद्यांची चर्चा खालील प्रमाणे करता येईल.

**१) लोकशाहीचे महत्वाचे साधन :** बिअर यांच्या मते, 'दबाव गट हे लोकशाही प्रणालीचे अविभाज्य अंग बनले आहे' त्यांचे हे विधान इंग्लड च्या लोकशाही संबधी असले तरी सर्व देशातील लोकशाही प्रणालीत कमी अधिक प्रणालीत हे खरेच आहे. लोकशाही प्रक्रीये मध्ये जनतेच्या सहभाग महत्वाचा मनाला जातो. दबावगट हे प्रत्यक्ष सांसदीय राजकारणात राजकीय पक्षा सारखी भूमिका घेत नसले तरी ते समाजाची भूमिका राजकीय पक्षा प्रयत्न पोहचवीत असतात; त्यामुळे एक अर्थाने लोकशाहीची प्रक्रियाच गतिमान होताना दिसते.

**२) जनतेच्या हिताचे रक्षण :** मूलतः कोणताही दबावगट हा संबधित गटाच्या हिताच्या रक्षणासाठीच निर्माण झालेला असल्याने त्याचे सर्वाधिक महत्व हे जनतेच्या म्हणजेच संबधित समूह/ गटाच्या रक्षणाच्या दृष्टीने अधिक आहे. आपल्या समुहाचे/गटाचे हित संबध जोपासण्यात हे गट यशस्वी ठरले तर त्यांचे महत्व अधिकच वाढते; शिवाय हितसंबंध जोपासण्यात ते कमी पडले तर त्यांचे महत्व स्वाभाविकपणे कमी होते.

**३) जनतेच्या समस्या शासना पर्यंत पोहचविणे :** कोणत्याही राजकीय व्यवस्थे मध्ये जनता आपल्या समस्या बद्दल गंभीर असली तरी ते शासना पर्यंत हि समस्या पोहचत नाही तो पर्यंत ती सोडवायची कि नाही याचा निर्णय शासन घेत नाही. अशा वेळी शासना पर्यंत आपली समस्या मांडण्याचे काम हे दबावगट करीत असतात. त्या करिता ते विविध मार्गाचा अवलंब करतांना दिसतात.

**४) शासन आणि जनता या मधील दुवा :** ज्या प्रमाणे समाजातील समस्या शासना पर्यंत पोहचविण्याचे कार्य दबावगट करतात त्याच प्रमाणे शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचत आहेत का ? त्यांची योग्य अमलबजावणी होत आहे का इ. बाबीचे मूल्यमापन दबावगटाकडून केले जाते त्या मुळे दबाव गटाची भूमिका दुहेरी बनते. एका बाजूला समाजातील प्रश्न, भावना, विषय शासना पर्यंत मांडणे व ते पूर्ण करण्यासाठी दबाव तयार करणे त्या प्रमाणेच शासनाच्या योजनेचे जनते मध्ये जाऊन मूल्यमापन करणे.

**५) शासन प्रक्रिया नियंत्रित व संतुलित ठेवणे :** दबावगट हि शासनाच्या क्रिया- प्रक्रिया वरती प्रभाव टाकणारी संघटना असून शासनाला नियंत्रित व संतुलित ठेवण्याची जबाबदारी पार पडतात. अनेक प्रसंगा मध्ये ते आपल्या सूचना,सल्लया द्वारे शासन प्रक्रिया सदृढ करण्याचे काम करीत असतात. शासनाची भूमिका, निर्णय जर जनतेच्या हिताच्या आड येत असतील तर शासना सोबत संवाद साधून प्रसंगी संघर्ष करून शासनाच्या प्रक्रियेवर प्रभाव ठेवत असतात.

**६) धोरणात्मक निर्णयावर प्रभाव :** शासन अनेक धोरणात्मक निर्णय घेत असते. हि धोरणे समाजाच्या हित संबंधाच्या आड येत असेल तर ती धोरणे बदलण्यास भाग पडतात. केंद्रातील शासनाने बनविलेली शेतकरी कायदे हे शेतकरी विरोधी आहेत म्हणून शेतकरी संघटना यांनी आंदोलना द्वारे प्रभाव टाकून ती कायदे परत घेण्यास लावली. अनेक प्रसंगी समाजाच्या हित संवर्धन करण्यासाठी शासनावर दबाव टाकून नवीन धोरणे, कायदे, कार्यक्रम बनविण्यास दबाव निर्माण करतात.

**७) संघटित सामर्थ्याचा अविष्कार :** दबाव गट हे आपल्या भूमिका अतिशय प्रभावीपणे सादर करत असतात. त्यामध्ये संघटित सामर्थ्याचे अतिशय मोलाचे योगदान असते. दबाव गटाचे स्वरूप संघटित असल्यामुळेच त्यांच्या मध्ये धैर्ये निर्माण होत असते. आपल्या हिताचे रक्षण करताना किंवा आपल्या भूमिका समर्थपणे मांडताना त्यांचे संघटित असणे हीच त्यांची मुख्य गुणवत्ता असते.

वरील बाबी वरून हे स्पष्ट होते कि दबाव गट हे आपल्या हिताच्या रक्षणासाठी शासन- प्रशासन यांच्या प्रक्रिया वर आपला प्रभाव ठेवत असतात म्हणून समाजाप्रती त्यांचे महत्व अधिका अधिक वाढते. लोकशाही प्रक्रियेला ते आपल्या म्हणजेच लोकांच्या सहभागाने गतिमान बनवितात म्हणून शासनाच्या दृष्टीने हि त्यांचे महत्व अधिक आहे.

## हितसंबंधी गट: वैशिष्टे आणि राजकीय महत्व

### हितसंबंधी गटाच्या व्याख्या आणि अर्थ :

राजकीय व्यवस्थेचा भाग म्हणून ज्या प्रमाणे राजकीय पक्ष आणि दबावगट महत्त्वाचे आहेत त्याच प्रमाणे हितसंबंधी गट हि महत्त्वाचे ठरतात. दबाव गट आणि हित संबंधी गट या संकल्पना समान वाटत असल्या तरी त्यांच्या मध्ये काही भेद आहेत.

समाज जीवनात अनेक समूह, विचारधारा, धर्म, संस्कृती यांचा प्रभाव असतो. हा प्रत्येक समूह आपल्या हित संबाधाच्या रक्षणासाठी नेहमी प्रयत्नशील असतो. राजकीय प्रक्रियेत या करिता ते अनेक कृती कार्यक्रम घेऊन आपला प्रभाव निर्माण करीत असतात. लोकशाही प्रक्रियेत प्रतिनिधित्वाचा मुद्धा फार महत्वाचा असतो हे गट राजकीय प्रक्रियेत आपला प्रतिनिधी पाठविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. जो राजकीय पक्ष त्यांच्या हिताच्या रक्षणासाठी प्रयत्नशील राहील किंवा हमी देईल त्या राजकीय पक्षाला ते निवडणूक प्रक्रियेत मदत करीत असतात.

नेहमीच हित संबधी गट हे औपचारिक असतात असे नव्हे तर अनेक वेळा ते अनौपचारिक पद्धतीने आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. काही हित संबधी गट हे दीर्घकाळ कार्यरत असतात तर काही हितसंबधी गट हे मर्यादित विषया पुरते निर्माण होतात आणि विषय संपला कि ते गट संपुष्टात येतात. जसे धर्म, संस्कृती साठी काम करणारे गट दीर्घकाळ काम करीत असतात; तर विशिष्ट समस्या निर्मुलनासाठी काम करणारे गट कामाची पूर्तता झाली कि संपुष्टात येतात. जसे कि रस्ते, धरणे इ. मुळे निर्माण होणाऱ्या समस्येतून वाचण्यासाठी निर्माण झालेले हित हितसंबाधी गट.

राजकारणाच्या प्रक्रियेचा महत्वपूर्ण भाग म्हणून आणि राजकीय पक्षांना मदत करण्या बरोबरच त्यांना नियंत्रित करण्यात हित संबधी गटाचे महत्व असते.

### ४.२.३ भारतातील प्रमुख राजकीय पक्ष आणि त्यांची तत्त्वे :

Major Political Parties in India and Their Principles

राजकीय सहभागावर सर्वात जास्त प्रभाव टाकणारा घटक म्हणजे राजकीय पक्ष होय. जनतेच्या इच्छा–आकांक्षा शासना पर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम राजकीय पक्ष करीत असतो. राजकीय पक्षा जवळ संघटन शक्ती आणि विशिष्ट कार्यक्रम असल्यामुळे राजकारण गतिशील बनवते. भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप पाश्चात्य व साम्यवादी पक्ष पद्धती पेक्षा वेगळे आहे. लोकशाही विशेषतः संसदीय लोकशाही प्रक्रियेत कारभार हा जनतेच्या संमती आणि टीकेतून चालतो. या करिता जनतेचे प्रतिनिधी म्हणून राजकीय पक्षांना लोक पाठिंबा देतात किंवा देत नाहीत. ज्या राजकीय पक्षांना लोकांचा पाठिंबा मिळतो तो राजकीय पक्ष सत्ताधारी बनतो; तर ज्यांना कमी पाठिंबा मिळतो ते विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षाच्या कार्यावरती नियंत्रण ठेवतात. ज्या पक्षांना कायदेमंडळात स्थान मिळत नाही असे पक्ष संसदेच्या बाहेर जनतेचे प्रश्न घेऊन

शासनावर आपला दबाव आणि प्रभाव निर्माण करतात. भारतीय राजकारणातील अश्या काही महत्त्वपूर्ण राजकीय पक्षा विषयीचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

भारतातील राजकीय पक्षाचे विवेचन करताना त्यांची मुख्य चार गटात विभागणी करता येते. अ) राष्ट्रीय पक्ष ब) प्रादेशिक पक्ष क)स्थानिक पक्ष आणि ड) तात्पुरते पक्ष अशा प्रकारे सर्वसाधारणपणे भारतातील राजकीय पक्षाचे वर्गीकरण करता येईल. त्यानुसार काही प्रमुख राजकीय पक्ष आणि त्यांच्या तत्त्वज्ञान, विचार प्रणालीचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**अ) राष्ट्रीय पक्ष किंवा राष्ट्रव्यापी पक्ष**

सर्व सामान्यपणे ज्या राजकीय पक्षाचे जाळे अखिल भारतीय पातळीवर आहे, ज्यांचा उद्देश, जाहीरनामा, कार्यक्रम व्यापक अशा राष्ट्रीय मुद्यांना अनुसरूच आहे व शिवाय त्यांना देश भरातील अनेक मतदार संघातून पाठिंबा मिळत असतो, अश्या राजकीय पक्षांना राष्ट्र व्यापी पक्ष म्हणता येईल .

भारत शासनाच्या निवडणूक आयोगाच्या "The Election Symbols (Reservation and -llotment) Order 1968' नुसार राष्ट्रीय पक्ष बनण्यास काही निकष ठरविण्यात आले आहेत, त्या मध्ये वेळोवेळी बदल हि होत गेले आहेत. त्या नुसार राष्ट्रीय पक्ष निर्धारित होण्यासाठी खालील निकषा पैकी कोणताही एक पूर्ण करावा लागतो.

१) विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत किमान ०४ किंवा अधिक राज्यात किमान ६% मते पडली पाहिजेत, आणि लोकसभेत किमान चार जागा निवडून आल्या पाहिजेत.

२) विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत किमान २% जागा निवडून आल्या पाहिजेत या जागा किमान ३ राज्यातून असावयास हव्यात.

३) या पक्षाला चार राज्यात प्रादेशिक पक्षाचा दर्जा प्राप्त हवा.

वरील पैकी कोणताही एक निकष पूर्ण करणाऱ्या राजकीय पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळतो. सप्टेंबर २०२१ नुसार भारतात सध्या ०८ पक्षांना राष्ट्रीय दर्जा प्राप्त आहेत्यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे सांगता येईल:

**ब) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (काँग्रेस पक्ष) :**

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील सर्वात दीर्घकाळ सत्तेत राहिलेला पक्ष म्हणून काँग्रेस पक्षाचे स्थान फार महत्त्वपूर्ण आहे. १८८५ ला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची (इंडिअन नेशनल काँग्रेसची) स्थापना झाली. प्रारंभिक अभिजन वर्गाची हि संघटना १९२० नंतर स्वातंत्र्याच्या आंदोलनात अग्रणी राहिली. स्वाभाविकच स्वातंत्र्योत्तर काळातील ७४ वर्षात भारतीय राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसने आपले स्थान अढळ बनविले. स्वातंत्र्याच्या आंदोलनात सर ऑलम ह्यूम, दादाभाई नौरोजी, लाल लजपतराय, मोहनदास गांधी, सुभाषचंद्र बोस, वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू, राजेंद्र प्रसाद इ. महत्वपूर्ण नेत्यांच्या नेतृत्वाखाली खाली या पक्षाची

वाटचाल झाली. स्वातंत्र्याच्या नंतर मात्र या पक्षाचे नेतृत्व पंडित नेहरू नंतर, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी इ. गांधी कुटुंबीयांच्या भोवतीच केंद्रित राहिले.

भारतीय राजकारणात सर्वात अधिक काळ सत्ताधारी पक्ष म्हणून काँग्रेस पक्ष महत्त्वाचा असला तरी १९७७ च्या अपयशा नंतर या पक्षात मोठ्या प्रमाणात फाटाफूट झाली. सामुदायिक नेतृत्व आणि पक्षांतर्गत लोकशाहीच्या मुद्द्यावर यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग, ब्रम्हानंद रेड्डी  इ. भर देताच पक्षात फुट पडली आणि इंदिरा काँग्रेस निर्माण झाली. १९८० साली इंदिरा गांधी यांचे राजकीय पुनरागमन होताच त्यांचाच पक्ष अधिकृत काँग्रेस पक्ष ठरला. १९८४ साली इंदिरा गांधी हत्या झाल्या नंतर पक्षाची आणि शासनाची सर्व सूत्रे हि त्यांचा मुलगा राजीव गांधी यांच्याकडे गेली. १९९१ साली राजीव गांधी यांची कारकीर्द संपली आणि नरसिंहराव हे पक्ष अध्यक्ष आणि प्रधानमंत्री बनले. गांधी कुटुंबाच्या बाहेरचे नेतृत्व मिळाल्या नंतर सुद्धा पक्षातील फाटाफूट सुरुच राहिली. २००३ नंतर सोनिया गांधी यांच्या पक्षातील प्रभावा नंतर पक्षाने पुरोगामी पक्षा सोबत आघाडी करून पुन्हा मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वात सत्ता स्थापन केली. सोनिया गांधी यांनी स्वतः ला पंतप्रधान पदा पासून दूर ठेवल्या नंतर पक्षाध्यक्षाचे पद अधिक सन्मानित व अधिकाराचे झाले.

**काँग्रेस पक्ष संघटना आणि रचना:**

काँग्रेस पक्षाच्या संघटनेत, अखिल भारतीय काँग्रेस समिती, कार्यकारी समिती, प्रदेश समिती, जिल्हा समिती, शहर समिती, ग्राम समिती इत्यादी विविध पातळीवरील रचना आहे. अखिल भारतीय काँग्रेस समिती मध्ये प्रदेश समितीचे सदस्य असतात. ही संपूर्ण देशाची समिती असून सर्व प्रदेश समित्यांवर नियंत्रण ठेवते. कार्यकारी समिती ही महत्त्वाची समिती असून पक्षाच्या ध्येय धोरणाच्या अमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्ये हि समिती करते.

**काँग्रेसपक्षाचे ध्येय धोरणे आणि कार्यक्रम :**

१) भांडवलदारी आणि समाजवादी अशा दोन्ही व्यवस्था स्वीकार म्हणजेच मिश्र अर्थ व्यवस्थेचा पुरस्कार काँग्रेस पक्षाने केला.

२) सार्वजनिक उद्योगधंद्यात वाढ करणे आणि संपत्तीच्या केंद्रीकरणाला आळा घालण्याचे धोरण, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करून संपत्तीचे विकेंद्रीकरण आणि समान वाटपाचे धोरण या पक्षाने स्वीकारले आहे.

३) शेती सुधारणा, गरिबी निर्मुलन, रोजगार निर्मिती इ. कार्याला प्राधान्य देणे.

४) देशातील सर्व लोकांना शिक्षण उपलब्ध करून देणे, साक्षरता वाढविणे,  शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडून आणणे.

५) जागतिक शांतता, परराष्ट्राशी मैत्री आणि सलोखा, साम्राज्यवादा पासून अलिप्त इ. महत्वपूर्ण धोरणाचा स्वीकार काँग्रेस पक्षाने केलेला आहे.

काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत बरेच अंतर दिसते. १९४७ पूर्वीच्या ६२ वर्षाची परंपरा असलेला हा पक्ष घराणेशाही, व्यक्ती पूजा, एकाधिकारशाहीच्या चक्रात अडकलेला दिसतो.

अनेक धोरणाच्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या अभावामुळे, पक्ष नेतृत्व आणि कार्यकर्ते यांच्या बांधिलकी विषयी जनते मध्ये निराशा आढळून येते. वर्तमान काँग्रेस पक्षाने सत्ता गमावली असली तरी समाजाच्या सर्व स्तरात पोहचलेला पक्ष म्हणून आजही त्याचे महत्व आहे.

**क) भारतीय जनता पक्ष (भाजपा):**

वर्तमान भारतीय राजकारणात सर्वात प्रभावी राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाचा उल्लेख करता येईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) या संघटनेचा वैचारिक वारसा चालविणारा राजकीय प्रवाह म्हणून हि भाजपा या पक्षाकडे पहिले जाते. अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी यांच्या प्रधानमंत्री म्हणून राजकीय उंची पर्यंतच्या राजकीय प्रवासाची सुरवात डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या राजकीय प्रवेशा पासून सुरू करावी लागते.

०८ एप्रिल १९५० रोजी झालेला नेहरू-लियाकत करार डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांना न आवडल्या त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यांनी २१ ऑक्टोबर १९५१ रोजी दिल्ली येथे जनसंघ या नव्या पक्षाची स्थापना केली. डॉ. मुखर्जी यांच्या निधनानंतर या पक्षावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) चे नियंत्रण ठळकपणे दिसू लागले. १९७५ ची आणीबाणी, १९७७ ला जनता पक्षात सहभाग आणि सत्ता स्थापना हा भाजपाच्या उदया पूर्वीचा महत्त्वाचा भाग होता.

**भाजपाची स्थापना आणि प्रवास :** १९८० मध्ये जनसंघ हा जनता पक्षातून बाहेर पडला आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष (भाजपा) या राजकीय पक्षाची स्थापना झाली. १९८४ मधील इंदूर चे राष्ट्रीय अधिवेशन भाजपाच्या वैचारिकता स्पष्ट करणारे आणि भविष्यातील योजनाचे सुतोवाच करणारे ठरले. यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) आणि भाजपा यांच्या नात्याची बांधिलकी हि स्पष्टता केली. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत दोन जागांवर यश मिळाले. या पूर्वी उत्तर भारतातील अनेक राज्यातील विधानसभा मध्ये त्यांना काही प्रमाणात यश मिळाले होते.

१९९० मध्ये गुजरात मधील सोमनाथ मंदिर ते उत्तर प्रदेशातील आयोध्या हा १०००० किलोमीटर प्रवास करणारी रथयात्रा हि भाजपा ची वैचारिक भुमिका स्पष्ट करणारी होती. त्याचा परिणाम म्हणून १९९१ मधील लोकसभा निवडणुकीत हा पक्ष लोकसभेतील सर्वात दुसरा मोठा पक्ष ठरला. त्याच प्रमाणे उत्तर प्रदेशामध्ये कल्याणसिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. पुढे भाजपा ने १९९९ ते २००४ या कालावधीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली काही इतर राजकीय पक्षांना सोबत घेऊन सरकार चालविले. भाजपा वर्तमान राजकारणात सर्वात मोठा पक्ष म्हणून २०१४ ते २०२१ पर्यंत म्हणजे आज पर्यंत पूर्ण बहुमतात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शासन करीत आहेत.

भाजपाची धोरणे आणि कार्यक्रम :-

१) समान नागरी कायदा लागू करणे.

२) जम्मू काश्मीर संबधी ३७० हे कलम रद्द करणे.

३) आयोध्या येथे राम मंदिर बांधणे.

४) भूक, भय आणि भ्रष्टाचार नाहीसा करणे.

५) छोटी राज्य निर्माण करणे व राज्यांना अधिक स्वायत्ता देणे.

६) राष्ट्रीय सुरक्षेस महत्व देणे. इ.

भाजपाने आपल्या ध्येय आणि धोरणा बद्दल आपण अधिक बांधील आहोत या विषयी त्यांनी ३७० हे कलम रद्द करून जनतेमध्ये विश्वास निर्माण केला आहे. असे असले तरी, अल्पसंख्याक बद्दलच्या धोरणामुळे आणि धर्मवादी राजकारणा मुळे धर्मनिरपेक्ष पक्ष आणि जनता यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यास हा पक्ष अयशस्वी ठरला आहे.

**ड) बहुजन समाज पक्ष (बसपा)**

स्वातंत्रोत्तर भारतीय राजकारणात कॉंग्रेस आणि भाजपा या राजकीय प्रवाहा नंतर आंबेडकरोत्तर काळात बहुजन समाज पक्ष (बसपा) हा फुले- शाहू- आंबेडकरी विचारांचा पक्ष म्हणून अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसतो. ब्रिटीश काळातील स्वतंत्र मजूर संघ आणि सेड्यूल्ड काष्ट फेडरेशन या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय पक्षांचे तत्कालीन राजकारणात फार महत्त्वाचे स्थान होते. 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील राजकीय पक्ष होता; परंतु त्यांच्या महापरीनिर्वाणा नंतर त्या पक्षात फाटाफूट झाली. आंबेडकरी अनुयायी प्रचंड निराश झाला. नवशिक्षित आणि नवीन नोकरदार यातून विविध मार्ग शोधत होता.

१४ एप्रिल १९८४ रोजी बहुजन समाज पक्षाची स्थापना कांशीराम यांनी केली. बहुजन समाज पक्षाची स्थापना होण्या पूर्वी १९७८ ला 'बामसेफ' (BMCEF- ll India SC, ST, OBC and Minorities Employees Federation) ची स्थापना डी.के. खापर्डे आणि कांशीराम केली होती. हि एक कर्मचारी ची संघटना आहे; परंतु कर्मचारी यांच्या हिता पेक्षा समाजहितासाठी काम करते. या संघटने कडून ८५% बहुजन विरुद्ध १५ शेटजी, भटजी, लाटजी अशी वैचारिक मांडणी करण्यात आली. १९८१ ला समाजातील संघर्षा विरुद्ध लढण्यासाठी DS4-दलित, शोषित, समाज, संघर्ष, समिती या संघटनेची स्थापना केली.

बहुजन समाज पक्षाच्या प्रत्यक्ष स्थापने नंतर उत्तर भारत हे मुख्य कार्य क्षेत्र निवडले. बहुजन समाजात सामाजिक व राजकीय जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न या पक्षाने केला. प्रारंभिक काळात कोणत्याही राजकीय पक्षा सोबत युती न करण्याचे धोरण त्यांनी अवलंबले; परंतु नंतर निवडणुकी नंतर सत्ता स्थापन करण्यासाठी मात्र त्यांनी समाजवादी पक्ष व बीजेपी सोबत युती केली. बसपाने उत्तर प्रदेश मध्ये १९९५ , १९९७ , २००२ आणि २००७ मध्ये चारवेळा मायावती यांच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन केली. मायावती या अनुसूचित जाती मधील देशातील पहिल्या मुख्यमंत्री बनल्या. १४ व्या लोकसभेत १४ तर १५ व्या लोकसभेत २१ खासदार निवडून आले. वर्तमान लोकसभेत २०१९ बसपा चे १० खासदार आहेत. कांशीराम

यांच्या मृत्यू नंतर त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष बनल्या. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात अनेक जिल्ह्याची नावे बहुजन महामानवाची दिली, महामानवाच्या नावे स्मारके बनविले त्याच प्रमाणे महिला सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था इ. महत्त्वपूर्ण कामे केली.

बहुजन समाज पक्षाचे धोरण :-

१) समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मुल्य- शिद्धांत वर श्रद्धा

२) बहुजन समाजाचे सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक सक्षमीकरण करणे.

३) बहुजन समाजाला संविधानिक अधिकार प्राप्त करून देणे

४) मनुवादी व्यवस्थेने ज्यांना शोषित केले त्याची शोषणा पासून मुक्तता करणे त्या साठी म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामासामी इ. च्या मार्गाचा अवलंब करणे

बहुजन हिताय बहुजन सुखाय या बुद्धाच्या विचारावर निर्माण झालेला पक्ष २००४ नंतर सर्व जण हिताय सर्वजण सुखाय ची भूमिका घेऊ लागला. बहुजन समाज च्या परिवर्तना साठी निर्माण झालेला हा पक्ष ब्राम्हण सम्मेलने भरवू लागला; त्यामुळे फुले- आंबेडकरी राजकारणात नवे पर्याय शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली. बसपाने डॉ. आंबेडकर यांच्या नंतर च्या राजकारणात फार महत्त्वाचे योगदान दिले असले तरी त्यांना उत्तर भारताच्या बाहेर फारसे यश मिळाले नाही.

**इ) भारतीय साम्यवादी पक्ष (सी.पी. आय. किंवा भाकप)**

भारतातील साम्यवादी पक्षाचा इतिहास सर्वसाधारणपणे १९२५ पासून सुरु होतो. राजकीय पक्ष म्हणून साम्यवादी पक्षाची औपचारिक सुरवात १९३३ पासून झाली. जागतिक महायुद्धा विषयी काँग्रेस आणि साम्यवाद्या मध्ये दोन स्वतंत्र प्रवाह बनले. काँग्रेस पक्ष हा ब्रिटीश साम्राज्यशाही चे हित जोपासतो, तो लोकशाही आणि लोक कल्याणाच्या विरोधी आहे अशी प्रखर भूमिका साम्यवादी पक्षाने घेतली. १९५७ च्या निवडणुकीत या पक्षाला चागले यश मिळाले मात्र १९६२ च्या चीन युद्धाविषयी मतभेदातून पक्षात १९६७ मध्ये फुट पडली. त्या पैकी एक गट म्हणजेच भारतीय साम्यवादी पक्ष (सी.पी. आय. किंवा भाकप) होय. भारतातील कामगार वर्गामध्ये पर्याप्त जागृती नसल्यामुळे क्रांती साठी इतर लोकशाही मानणाऱ्या घटकांना सोबत घेऊन काम केले पाहिजे हि भूमिका १९६७ पासूनच घेण्यास सुरवात केली. काँग्रेस पक्षाला आपण अमेरिका व साम्राज्यवादी ताकती पासून आपण दूर करू शकतो असा विश्वास या पक्षाला होता. याच पार्श्वभूमीवर त्यांनी इंदिरा गांधी यांना पाठिंबा दिला. १९७१ ची निवडणूक सोबत लढविली. १९७५ च्या आणीबाणीचे या पक्षाने फक्त समर्थनच केले नाही तर त्याच्या समर्थांनासाठी विशेषतः इंदिरा गांधी यांच्या समर्थनासाठी हा पक्ष जोरकस पणे मैदानात उतरला.

१९७७ च्या निवडणुकीत या पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही; परिणामी तत्कालीन पक्षाध्यक्ष कॉ. डांगे यांनी राजीनामा दिला आणि आणीबाणीला समर्थन देणे आपली चूक होती हि भूमिका घेतली. १९८१ नंतर काँग्रेस पक्षाच्या विरोधात भूमिका घेतली ती पुढे बराच काळ राहिली. २००४ नंतर मात्र पुन्हा

धर्मनिरपेक्ष पक्षाचे युपीए (United Progressive Alliance)चा भाग बनला तो आज पर्यंत आहे. वर्तमान लोकसभेत (२०१९) या पक्षाचे फक्त ०२ खासदार आहेत.

भाकप जरी कष्टकरी- कामगार-शेतकरी -शेतमजूर यांच्या हक्काची भूमिका घेऊन लढत असला तरी निवडणुकीच्या पातळीवर त्यांना फार यश मिळालेले दिसत नाही.

**ई) मार्क्सवादी साम्यवादी पक्ष (सी.पी. एम. किंवा माकप)**

जुलै १९६० ला आंध्रप्रदेश मध्ये या पक्षाची स्थापना झाली. लोकसभेतही या पक्षाने आपला ११ खासदारांचा गट बनविला. कामगार क्रांतीचा कर्मठ पुरस्कार आणि काँग्रेस विरोध या मुख्य भूमिकेवर हा पक्ष वेगळा राहिला. भाकप च्या काँग्रेसधार्जिण्या आणि वर्ग समन्वयवादी भूमिकेचा त्यांनी विरोधच केला. आपली क्रांतिकारक लढाऊ भूमिका घेऊन हा पक्ष लोकशाहीच्या प्रक्रियेचा भाग बनू इच्छीत होता. परिणामी १९६७ मध्ये माकप मध्ये जहाल गट निर्माण झाला. संसदीय मार्गाने क्रांती घडणे शक्य नाही असा त्या जहालवादी गटाचा मत प्रवाह होता. प.बंगाल मधील नक्षलबारी येथील शेतकरी उठावा नंतर माकपने २०० जहालाना पक्षातून काढले. बाहेर काढलेले जहाल गट त्या नंतर नक्षलवादी म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९७५ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या सोबत आणीबाणी च्या विरोधात यांनी आंदोलन केले. पुढे जनता सरकार मध्ये सहभागी पक्ष बनला. १९७७ ला हा पक्ष प.बंगाल मध्ये सत्तेत आला. १९८२ नंतर या पक्षाने डाव्या लोकशाही पक्षाची आघाडी उभारण्याचा प्रयत्न केला. आपल्या जाहीरनाम्यात वाढती विषमता, बेरोजगारी, भूसुधार, किमान वेतन इ. मुद्द्याचा आग्रह धरला; मात्र प. बंगाल मध्ये १९७७ पासून ते २००७ पर्यंत दीर्घकाळ सत्तेत राहूनही त्या राज्यात ते हे धोरण राबवू शकले नाहीत उलट अनेक आर्थिक उदारीकारांचे निर्णय घेऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाजूने भूमिका घेणे त्यांना महागात पडले. वर्तमान लोकसभेत (२०१९) या पक्षाचे फक्त ०३ खासदार आहेत.

**उ) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :**

काँग्रेस पक्षातून बाहेर पडून अनेक राजकीय पक्ष निर्माण झाले त्या पैकी अलीकडच्या काळातील महत्वाचा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उल्लेख करता येईल. सोनिया गांधी यांची प्रधानमंत्री म्हणून नियुक्ती होऊ म्हणून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली १० जून १९९९ मध्ये निर्माण झाला. सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा मुद्दा उपस्थित करून शरद पवार, पी.ए. संगमा आणि तारिक अन्वर इ. महत्त्वपूर्ण काँग्रेस मधील नेते काँग्रेस मधून बाहेर पडले. त्या नंतर च्या पहिल्या निवडणुकीत (१९९९) त्यांना महाराष्ट्रात चांगले यश मिळाले. या निवडणुकीत त्यांना विधानसभेत ५८ जागा मिळाल्या तर लोकसभेत ०८ जागा मिळाल्या.

राष्टवादी पक्षाच्या जाहीरनामात म. गांधी यांचा वारसा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालवेल तसेच लोकशाही आणि धर्म निरपेक्षता या मूल्याची जोपासना करेल असे वचन देण्यात आले. त्या बरोबरच काही महत्त्वपूर्ण मुद्दे त्यांनी आपल्या जाहीरनामात दिले आहेत ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) देशातील सर्वोच्चपदी भारतात जन्मलेला व्यक्ती राहील त्या करिता नागरिकत्वाच्या कायद्यात बदल करण्यात येईल.

२) संरक्षण विभागाचे अत्याधुनिकरण आणि वेगळा वेतन आयोग याची हमी देण्यात आली आहे.

३) सर्वसमावेशक महिला धोरण आणि अल्पसंख्याकासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्यात येईल.

४) मुक्त अर्थ व्यवस्थेच्या स्वीकृती बरोबरच सार्वजनिक उद्योगांना महत्व देण्यावर भर देण्यात येईल.

५) सहकार, सेवाभावी संस्था, असंघटीत कामगार इ च्या सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येईल.

इतर राजकीय पक्षा प्रमाणेच या पक्षाच्या ध्येय धोरण आणि अंमलबजावणी अंतर दिसते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निर्माण होताना त्याचे स्वरूप राष्ट्रीय असले तरी पुढील काळात या पक्षाला महाराष्ट्राच्या बाहेर फारसे यश मिळाले नाही.

**ऊ) अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस पक्ष :**

अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस पक्षाची स्थापना १९९८ ला ममता बैनार्जी यांच्या नेत्तृत्वा खाली झाली. काँग्रेस पक्षातून बाहेर पडून वर्तमान राजकारणात आपला प्रभाव निर्माण करणाऱ्या मोजक्या राजकीय पक्षा पैकी एक पक्ष म्हणजेच अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस पक्ष होय. तृणमूल काँग्रेस पक्षाने प्रारंभा पासूनच आपला प्रभाव हा राजकारणात निर्माण केला; विशेषतः प. बंगाल मध्ये त्यांनी २००५ नंतर आपला राजकीय भूमिका अतिशय गतिमान केल्याचे दिसते. २००९ च्या निवडणूकीत या पक्षाने लोकसभेच्या १९ जागा मिळवून लोकसभेत ६ व्या क्रमांकावर राहिला.

वर्तमान राजकारणात या पक्षाचा प्रभाव निर्माण होण्यात नंदीग्राम आंदोलनाचा प्रमुख वाटा आहे. २००६ ला प. बंगाल मधील नंदीग्राम या ठिकाणी भूमी अधिग्रहणाच्या विरोधी भूमिकेचे नेतृत्व या पक्षाने केल. या भूमी अधिग्रहणामुळे ७०००० लोकाच्या जीवनावर परिणाम पडणार होता. या ठिकाणी मोठा २००७ ला हिंसाचार झाला ज्या मध्ये १४ लोक मृत्युमुखी पडले. या नंतर या पक्षाने आपली पकड प.बंगलाच्या राजकारणावर अधिक मजबूत केली.२०२१ च्या प.बंगलाच्या विधानसभा निवडणूकीत यश संपादन करून ममता बैनार्जी या तिसऱ्यांदा मुख्यमंत्री बनल्या. वर्तमान लोकसभेत या पक्षाचे २२ खासदार असून तो सध्या देशातील सर्वात मोठा चौथा पक्ष आहे.

**ए) नेशनल पीपल्स पार्टी:**

National Peoples Party ची स्थापना २०१३ पी.ए. संगमा यांच्या नेतृत्वाखाली झाली.पी.ए. संगमा यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा सोबत राष्ट्रपती पदाच्या उमेदवारी वरून मतभेद झाल्या नंतर त्यांना पक्षातून निलंबित केले; पुढे त्यांनी National Peoples Party पक्षाची स्थापना केली. सुरवातीला ते ND (National Democratic Alliance) चा भाग बनले. आपण आदिवासी च्या प्रश्ना बाबत आवाज उठविण्याचे त्यांनी स्पष्ट केल. पी.ए. संगमा यांच्या नंतर पक्षाची धुरा कोनराड संगमा सांभाळत आहेत.

**ऐ) प्रादेशिक पक्ष**

भारत सरकारच्या निवडणुक आयोगा नुसारप्रादेशिक पक्ष म्हणून मान्यताप्राप्त करण्यासाठी खालील निकषा पैकी कोणताही एक  पूर्ण करावा लागतो.

१) विधानसभा निवडणुकीत किमान ६% मतदान आणि किमान ०२ जागा निवडून आल्या पाहिजेत.

२) लोकसभा निवडणुकीत किमान ६% मतदान आणि किमान ०१ जागा निवडून आली  पाहिजेत.

३) विधानसभा निवडणुकीत किमान ३% जागा किंवा किमान ०३ जागा (या पैकी जे जास्त असेल ते) निवडून आल्या पाहिजेत.

४) लोकसभा निवडणुकीत किमान २५ जागे पाठीमागे एक जागा निवडून आली पाहिजेत.

५) विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत राज्यात किमान ८% मते पडली पाहिजेत

महाराष्ट्रात प्रामुख्याने काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी या राष्ट्रीय पक्षाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. तरी परंतु खालील काही प्रादेशिक पक्ष हि आपला प्रभाव निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.

**ओ) शिवसेना :**

१९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात शिवसेनेची स्थापना झाली. मराठी माणसाच्या न्याय हक्काच्या लढ्यासाठी हा पक्ष निर्माण झाला. सुरवातीस मुंबई पुरताच मर्यादित असणारा पक्ष १९९० च्या दशकातमहाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष बनला. मराठी माणसाच्या न्याय हक्का बरोबरच हिंदुत्व विचाराचा आग्रह धरणारा पक्ष बनला. सामान्य माणसाचे प्रश्न घेऊन लढा उभारण्यात या पक्षाला यश आले. विशेषतः मुंबई मधील कामगार वर्गा ला आपली भूमिका पटवून देण्यास हा पक्ष यशस्वी झाला. १९९९ च्या निवडणुकीत या पक्षाने आपले महत्व सिद्ध केले. १३ व्या लोकसभेत या पक्षाला १३ तर विधान सभेत ६९ जागा मिळाल्या.

भाजपाला आपला वैचारिक सोबती मानणारा आणि त्यांच्या सोबत महाराष्ट्रात दोन वेळा सत्ता स्थापना करणारा हा पक्ष २०१९ मात्र विरोधी विचाराच्या पक्षा सोबत महा विकास आघाडी बनविली आणि सत्ता स्थापन केली. सद्य स्थितीत शिवसेनाप्रमुख प्रमुख म्हणून काम पाहणारे उद्धव ठाकरे हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत.

**औ) महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष :**

शिवसेना पक्षातून बाहेर पडल्या नंतर राज ठाकरे यांच्या नेतृत्वात २००६ साली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली.मराठी माणसाची अस्मिता आणि महाराष्ट्र धर्म हि भूमिका घेऊन त्यांनी आपल्या पक्षाचे कार्ये सुरु केले. महाराष्ट्रातील परप्रांतीय विरोधी केलेली आंदोलने विशेषतः मुंबई मध्ये प्रभावी ठरली. पहिल्या विधानसभेत त्यांनी १३ जागा प्राप्त करून आपला महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभाव निर्माण केला.

नाशिक, पुणे, मुंबई इ. शहरात विशेषतः शहरी भागातील त्यांची कामगिरी वगळली तर या पक्षाला फारसे यश मिळाले नाही.

वरील पक्षा प्रमाणेच प्रकाश आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी, राजू शेट्टी यांचा स्वाभिमानी पक्ष, महादेव जाणकार यांचा राष्ट्रीय समाज पक्ष इ. पक्ष हि महाराष्ट्राच्या राजकारणात आपली भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण रीतीने पार पाडत आहेत; मात्र संसदीय प्रक्रियेत म्हणजेच निवडणुकीत या पक्षांना पर्याप्त यश मिलेलेल दिसत नाही.

★ **स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) राजकीय तत्त्वज्ञानाच्या आणि भुमिकेच्या बाबतीत एकमत असलेला आणि संघटीतरित्या राष्ट्रीय हितासंबंधी जपणूक करणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय ही व्याख्या कोणाची?

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील राजकीय पक्ष कोणता होता.

३) बहुजन समाज पक्षाची स्थापना कोणी व केंव्हा केली.

४) कोणता पक्ष फुले, शाहू, आंबेडकर यांचा पक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

५) स्वतंत्र मजूर पक्ष आणि सेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षा संदर्भातील संबंधी व्यक्तीमत्त्व कोणते.

६) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना केव्हा झाली.

७) कोणत्याही दोन राजकीय पक्षाची नावे सांगा.

८) बहुजन समाजाला संविधानिक अधिकार प्राप्त करून देणे हे कोणत्या पक्षाचे धोरण आहे.

९) समान नागरी कायदा लागू करणे हे कोणत्या पक्षाचे धोरण आहे.

## ४.३ सारांश

राजकीय सहभागावर सर्वाधिक प्रभाव टाकणारा घटक म्हणजे राजकीय पक्ष होय. आधुनिक काळात सर्वच राजकीय पक्षाना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. याची सविस्तर चर्चा केलेली आहे. त्याचबरोबर राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये, रचना, दबावगट व हितसंबंधगटाची वैशिष्ट्ये आणि राजकीय महत्त्व विशद केले आहे. या सर्व घटकाचा अभ्यास केला आहे. सदर अभ्यासाबरोबर भारतातील प्रमुख राजकीय पक्ष त्यांची धोरणे आणि तत्त्वाचाही आढावा येथे सविस्तर घेण्यात आला आहेह.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) एंडमड बर्क

२) भारतीय रिपब्लिकन पक्ष

३) काशीराम १४ एप्रिल १९८४

४) बहुजन समाजपक्ष

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ६) १८८५

७) बहुजन समाजपक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय समाजवादी पक्ष, भारतीय जनता पाटी, शिवसेना, नॅशनल पीपल्स पार्टी इत्यादी.

८) बहुजन समाज पक्ष ९) भारतीय जनता पक्षाचे

## ४.५ सरावासाठीचे प्रश्न (सविस्तर उत्तरे लिहा)

१) राजकीय पक्ष आणि सामाजिक रचना विश्लेषन करा.

२) दबावगट आणि हितसंबंधगट यावर चर्चा करा.

३) भारतातील प्रमुख राजकीय पक्ष आणि त्याची तत्त्वे याचे स्पष्टीकरण द्या.

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

1) Laclau, E Politics and Ideology in Marxist theory, London Verso, 2012.

2) Dahl, R. Who Governs? New Haven : Yale University P, 1961.

3) Kothari, R. Caste in Indian Politics. Delhi : Orient Blackswan, 2008.

4) Bottomore, T. Elites and Society Harmonds Worth Penguin, 1966.

❑❑❑

# घटक – १
# सामाजिक मानवशास्त्राचा परिचय
## (Tribal Society in India)

**घटक संरचना**

१.१ उद्दिष्टे:

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ सामाजिक मानवशास्त्रचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

१.३.२ समाजशास्त्र आणि मानवशास्त्र यामधील संबंध

१.३.३ क्षेत्र कार्य पद्धती आणि त्याचे वैशिष्ट्य

१.३.४ सामाजिक मानवशास्त्रचे महत्त्व

१.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### **१.१ उद्दिष्टे:** (Objective)

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

- सामाजिक मानसशास्त्राचा अर्थ आणि वैशिष्ट्ये सांगता येतील.
- समाजशास्त्र आणि मानवशास्त्र यामधील संबंध स्पष्ट करता येतील.
- क्षेत्र कार्य पद्धती आणि त्याचे वैशिष्ट्य सांगता येतील
- सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

## १.२ प्रास्ताविक:

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण मानव शास्त्राचा विषयी माहिती जाणून घेणार आहोत. समाजशास्त्र हे नेहमी तार्किक घटनांचा अभ्यास करत असते त्याचबरोबर सामाजिक संबंध, सामाजिक आंतरक्रिया, यांचा अभ्यास करणार असते. ज्याप्रमाणे समाजशास्त्रात ग्रामीण समाजशास्त्र नागरी समाजशास्त्र आदिवासी समाजशास्त्र अशा विविध शाखा आहेत त्याचप्रमाणे मानवशास्त्रात देखील शारीरिक मानसशास्त्र संस्कृती मानसशास्त्र सामाजिक मानसशास्त्र अशा शाखा आहेत. सदर प्रकरणांमध्ये आपण समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांच्यातील परस्पर संबंध क्षेत्र कार्य पद्धती त्यांचे वैशिष्ट्य याविषयी दिर्घ माहिती तसेच समाजशास्त्रामध्ये मानसशास्त्राचे महत्त्व व त्याची प्रासंगिकता याविषयी विस्तृत रित्या जाणून घेणार आहोत.

## १.३ विषय विवेचन:

मानवशास्त्र हे मानव आणि त्याची कार्य निर्मिती याचा अभ्यास करते. मानवाच्या उत्पत्तीपासून शारीरिक सामाजिक सांस्कृतिक विकासाचा आणि मानवी वर्तनाचा अभ्यास मानवशास्त्र करत असते. मानवशास्त्र हेमा नावाचा समग्र अभ्यास करते मानव आपली नैसर्गिक जीवन जगण्याची पद्धत सोडून सामाजिक जीवन पद्धती शोधून काढली, तिला संस्कृती म्हणतात त्या संस्कृतीचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. प्रस्तुत प्रकरणांमध्ये मानसशास्त्राचा अर्थ, वैशिष्ट समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांमधील परस्पर संबंध क्षेत्र कार्यपद्धती त्याचबरोबर सामाजिक मानवशास्त्रात चे महत्व हे सूक्ष्म रित्या आणि विस्तृत समजावून घेतला आहे.

### १.३.१. सामाजिक मानवशास्त्रचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

**मानवशास्त्राचा अर्थ** (Meaning of Anthropology).

मानवशास्त्र या शब्दाला इंग्रजी मध्ये अंथरपोलॉजी (anthropology) म्हणतात हा शब्द अंथरोपोस आणि लोगस (logos) यापासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ मानवाची शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत आरिस्टाटल यांनी मानसशास्त्र हा शब्द प्रथम उपयोगात आणला. त्यांच्या मते मानव म्हणजे मानवाची स्वतःबद्दलची बडबड. (talk about himself) होय.

ॲरिस्टोटल यांना मानव शास्त्राचे जनक असे म्हटले जाते. जिज्ञासा ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे या जिज्ञासेपोटी मानवाने सभोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास केला. विविध स्वरूपाचे ज्ञान संपादन केले यातून अनेक नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा उदय झाला मानवाच्या शोधा स्वतःबद्दलच्या जिज्ञासू मानसशास्त्राचा उदय झाला आहे.

**मानवशास्त्राच्या व्याख्या** (Definition of Anthropology)

अनेक मानवशास्त्रज्ञांनी मानसशास्त्राच्या विविध व्याख्या सांगितलेले आहेत. त्यापैकी काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) **हस्कोविट्स:** मानव आणि त्याची कार्य निर्मिती याचा अभ्यास म्हणजे मानव शास्त्र होय. (Anthropology is the study of the man and his works Heskovits).

२) **जेकब आणि स्टरन:** पृथ्वीतलावरील मानवाच्या उत्पत्तीपासून शारीरिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा आणि मानवी वर्तनाचा वैज्ञानिकरित्या अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय. (Anthropology is the scientific study of the physical, social and cultural development and behaviour of human being since their appearance on earth)

३) **डॉक्टर मुजुमदार आणि मदन:** मानवाच्या शारीरिक सांस्कृतिक व सामाजिक उत्पत्ती व विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय (Anthropology studies the emergence and development of man from the physical cultural and social point of view Dr Majumdar and madan.).

४) **ए. एल. क्रोबर:** मानवी समूहाचे आणि संवर्धनाचे तसेच त्यांनी केलेल्या उत्पादनाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय (Anthropology is the science of group of men and their behaviour and production.)

५) **फ्रान्झ बोअस:** मानवशास्त्र मानवाचा एक सामाजिक प्राणी म्हणून अभ्यास करते. (Anthropology deals with man as a social being Frenz Boas.)

६) **मानसशास्त्र परिभाषा कोश:** मानसशास्त्र म्हणजे मानवाचा अभ्यास होय. (Anthropology is the study of man-T.K.penniman).

७) **टी. के. पेंनिमन:** मानसशास्त्र हे मानवी विषयक विज्ञान आहे (Anthropology is the social science of man.)

८) मानवाचा शारीरिक व सांस्कृतिक विकास ठरवणाऱ्या तत्त्वप्रणाली शोधून काढणे हे मानव शास्त्राचे प्रमुख कार्य आहे. (Anthropology is the search for a set of principle which governance men's physical and cultural development- Beals and Hoijer).

९) **इ. ए. होबेल:** मानव व त्याच्या कृती यांचा अभ्यास करणारे मानवशास्त्र होय. मानसशास्त्र हे सांस्कृतिक विज्ञान देखील आहे. म्हणून मानसशास्त्र हे एक प्रमुख सामाजिक विज्ञान आहे. (Anthropology is the study of man and of all his works anthropology is also the science of culture as such it is a major social science-E..Hobel.)

मानवशास्त्र हे मानवाचा अभ्यास करत असते परंतु समाजशास्त्र राज्यशास्त्र अर्थशास्त्र हीसुद्धा मानवाचा अभ्यास करतात पण ही शास्त्रे मानवाच्या विशिष्ट पैलूंचा अभ्यास करत असतात. मानव शास्त्र हे मानवाच्या सर्व पैलूंचा अभ्यास करते. मानवशास्त्र मानवाचा समग्र अभ्यास करते प्राणी जगतात. मानवाचे स्थान

अद्वितीय आहे. मानव व मानवेतर प्राण्यांमध्ये बरंच साम्य असले तरीही काही असे भेद सुद्धा आहेत. मानव आणि आपली नैसर्गिक जीवन जगण्याची पद्धत सोडून सामाजिक जीवन पद्धती शोधून काढली, तिलाच संस्कृती म्हणतात त्या संस्कृतीचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

**१.३.१. सामाजिक मानवशास्त्रची वैशिष्ट्ये:**

मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र असून ते इतर सामाजिक शास्त्र होऊन वेगळे व स्वतंत्र शास्त्र आहे. मानव शास्त्रात एकाच वेळी मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. मानवाची ज्यावेळी उत्पत्ती झाली त्यावेळी पासून आजपर्यंत मानवाच्या कार्याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. मानवाच्या शारीरिक सांस्कृतिक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणारे मानसशास्त्र हे एकमेव शास्त्र आहे त्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे.

**१) मानवाचा हा जैविक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास:** मानव का जैवीक प्राणी व सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे त्याच्या सामाजिक जीवनाची पाळेमुळे जैव मानसिक प्रकृतीत आढळतात. पण मानव नेहमीच जय व मानसिक प्रकृतीत जखडून राहिलेला नाही. मानवाने संघटित जीवन जगावे किंवा आपल्या जैविक घरचा सुलभ मार्गाने पूर्ण कराव्यात या गोष्टी प्रकृतीने मानवावर लादल्या आहेत. परंतु समाज हा प्रगत असावा की अप्रगत असावा, समाजात लोकशाही असावी की हुकूमशाही असावी या गोष्टी प्रकृतीने मानवावर लादलेल्या नाहीत. भूक लागल्यानंतर अन्न खावे खावे ही गोष्ट प्रकृतीने मानवावर लागलेली आहे. पण कोणते अन्न कोणत्या वेळी कशाप्रकारे खावे या गोष्टी प्रकृतीने मानवावर लागलेले नाहीत पण या गोष्टी संस्कृतीने मांडले माणसावर लादलेल्या आहेत.

**२) मानव व त्याच्या कार्याचा अभ्यास:** मानवशास्त्रात मानवाचा आणि त्याच्या कार्याचा अभ्यास केला जातो. अशी मानसशास्त्राची व्याख्या हर्सकोविट्स Herskovits यांनी केली आहे. मानवाचा त्याच्या उत्पत्तीपासून आज पर्यंतच्या प्रगत मानवाचा आणि त्याच्या कार्याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवाच्या शारीरिक व सामाजिक जीवनात कसे बदल होत गेले. मानवाने संस्कृती कशी निर्माण केली. संस्कृतीमध्ये आचार-विचार कला विज्ञान कौशल्य रितीरिवाज साधने प्यारे यांचा समावेश कसा झाला, यांचा अभ्यास मानव शास्त्रात केला जातो त्याचप्रमाणे मानवाच्या शरीरात जन्मदरात मन शांत कसे बदल घडून आले आहेत त्याचाही अभ्यास मानवशास्त्र शास्त्रात केला जातो. उदा. पृथ्वीतलावर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वंशाचे लोक राहत होते. पण सध्या शुद्ध स्वरूपात पूर्वीची वश आढळून येत नाहीत. विशिष्ट शारीरिक लक्ष्मणाचा समुच्चय म्हणजे वंश होय.

**३) मानवाचा तोलनिक दृष्टिकोनातून अभ्यास :** मानव शास्त्रात मानवाच्या सामने व घेता चा तुलनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. मानवाच्या शारीरिक रचनेचा, वंशाचा समूहातील वर्तन प्रकाराचा साम्य व भेद पाहताना तुलनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. विशेषता मानवी जीवनाच्या कोणकोणत्या घटकात आर्थिक परस्पर संबंध आहे हे पाहण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा वापर केला जातो. उदा. एडवर्ड टायटलर यांनी कुटुंब संघटनेतील कार्य परस्पर संबंध स्पष्ट करताना प्रतिपादन केले की,

विवाहानंतर पतीने आपल्या पत्नीच्या घरी राहावयास जाण्याची प्रथा ज्या कुटुंबात आहे, अशी अचार पद्धती रूढ झालेली आहे म्हणजेच या रूढी चा संबंध मातृसत्ताक कुटुंब पद्धतीशी आहे.

**४) प्राथमिक अवस्थेतील मानवाचा अभ्यास:** मानवशास्त्र मानवाचा व त्याच्या कार्याचा अभ्यास करत असले तरी प्रत्यक्ष केवळ प्राथमिक अवस्थेत राहणाऱ्या मानवाचा अभ्यास केला जातो. आदिवासी रानटी किंवा वनवासी जमातीचा अभ्यास करणाऱ्या वर मानवशास्त्रात भर दिला जातो. मानसशास्त्राचा मुख्य उद्देश मानवाची उत्पत्ती कशी झाली व त्याच्या सामाजिक जीवनाला कशी सुरुवात झाली हे जाणून घेण्याचा आहे. प्राथमिक समाजाचे जीवन कसे असेल या प्रश्नाचे उत्तर प्राथमिक अवस्थेत राहणाऱ्या लोकांच्या अभ्यासातून मिळू शकते. प्राथमिक अवस्थेत आज केवळ आदिवासी जीवन जगतात म्हणून मानवशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास केला जातो.

**५) समग्र स्वरूपाचा अभ्यासक्रम :** मानवशास्त्रात मानवाचा म्हणजेच आदिवासी समाजाचा समग्र जीवनाचा अभ्यास केला जातो. इतर सामाजिक शास्त्रे आणि मानवी जीवनाच्या विशिष्ट पहिलुचा अभ्यास करतात. उदाहरणार्थ राज्यशास्त्र हे मानवाच्या राजकीय संबंधाचा, अर्थशास्त्र मानवाच्या आर्थिक संबंधाचा, मानवशास्त्र मानवाच्या आर्थिक राजकीय सामाजिक शैक्षणिक या सर्व संबंधाचा अभ्यास करते. म्हणजेच मानवशास्त्रात मानवाचा समग्र अभ्यास केला जातो. मानवशास्त्रात मानवाच्या अभ्यासाला सीमारेषा नाहीत. मानवा संबंधित याचे ज्ञान मिळते संपादन मानवशास्त्रात केले जाते. क्षेत्र कार्य अभ्यास पद्धती द्वारे संशोधक एखादा आदिवासी जमातीत अभ्यास करण्यासाठी गेल्या की, त्या जमातीतील सर्व रूढी, प्रथा, परंपरा, धर्म, शिष्टाचार इत्यादी विषयी सर्व माहिती जमा करतो म्हणजे समग्र स्वरूपाचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

**६) प्रत्यक्ष अभ्यास:** मानवशास्त्र इतर शास्त्र प्रमाणे घटनेशी संबंधित व्यक्ती किंवा प्रयोगाच्या आधारे माहितीचे संकलन करत नाही. संशोधक प्रत्यक्ष ज्या आदिवासी जमातीचा अभ्यास करायचा आहे त्या जमातीत प्रत्यक्ष स्वतः अनेक दिवस येतील माहिती संकलित करतो. माहिती संकलन नातू इतर पुराव्याच्या आधारे कोणतेही अनुमान काढता नाही. जोपर्यंत या घटनेची संशोधकाला प्रत्यक्ष अनुभूती येत नाही तोपर्यंत संशोधक कोणतीही हनुमान काढत नाही. संशोधक स्वतःचा पुरावा गोळा करतो व त्यावरून निष्कर्ष काढतो. मुलाखत किंवा प्रश्नावली पेक्षा स्वतः निरीक्षणावर भर देतो. मानवशास्त्रात वापरली जाणारी क्षेत्र कार्यपद्धत प्रत्यक्ष अभ्यास पद्धत म्हणून ओळखले जाते. क्षेत्र कार्यपद्धतीत संशोधक स्वतः या घटकाचा अभ्यास करायचा आहे तेथे दोन तीन वर्षे राहतो वयाची देही याची डोळा या उक्तीप्रमाणे स्वतःला जेवढे अनुभव येथील त्यास बाबत अनुमान काढत असतो.

**७) सूक्ष्म रचनात्मक व विगनात्मक अभ्यास:** सूक्ष्म रचनात्मक अभ्यास म्हणजे एकाद्या विशाल घटकाचा अभ्यास करण्याऐवजी त्यातील लहान सूक्ष्म घटकाचा अभ्यास करून विशाल घटकाचे रचना समजून घेणे होय. आपण दैनंदिन व्यवहारात यालाच शितावरून भाताची परीक्षा म्हणतो. निगमनात्मक अभ्यासाचा देखील वापर मानवशास्त्रात केला जातो विद्यमान म्हणजे विशिष्ट गोष्टीचा अनुभव वरण सामान्य सिद्धांत प्रस्थापित करण्याची क्रिया होय. ज्ञान संपादनाच्या पद्धतीला विगमन पद्धत म्हणतात.

**८) मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे:** मानवशास्त्र बाबत मानवशास्त्रात एकमत नसले तरी मानसशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. म्यॉलीनोवस्की, रेडक्लिफ ब्राऊन, फोर्टिस नाडेल, या मानवशास्त्राच्या मते मानसशास्त्र हे नैसर्गिक शास्त्र आहे. कारण मानव हा जैविक प्राणी असून तो निसर्गाचाच एक भाग आहे. त्यामुळे मानवाला निसर्गाचे नियम लागू पडतात. संस्कृती हे मानवाच्या गरजा पूर्तीचे साधन आहे त्यामुळे संस्कृती व निसर्ग यामध्ये एकृप्ता दिसून येते, असे वरील मानवशास्त्रज्ञांचे मत आहे. पण क्रोबर, बिडने, इव्हान प्रीचर्डने इत्यादी मानव शास्त्रज्ञांच्या मते, संस्कृती व निसर्ग यामध्ये एकृरुपता माननीय अप्रस्तुत आहे. कारण निसर्गाचे नियम सर्वत्र एकसारखे असले तरी संस्कृती मात्र सर्वत्र एकसारखी नाही. अनु आणि रेणू यांची रचना एकसारखी असते पण संस्कृती मात्र सर्वत्र एकसारखे नसते.मानवी समाज हा ही नैतिक व सामाजिक व्यवस्था आहे. या सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास मानव शास्त्रात केला जातो म्हणून मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. थोडक्यात मानसशास्त्राचे स्वरूप इतर शास्त्र होऊन वेगळे आहे. समाजशास्त्र राज्यशास्त्र अर्थशास्त्र ही शास्त्र देखील मानवाचा अभ्यास करतात पण ती सामाजिक जीवनाचा अभ्यास करतात मानवशास्त्रात मात्र मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. अभ्यास विषय यात फरक असल्यामुळे मानसशास्त्राला वेगळे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

## १.३.२ समाजशास्त्र आणि मानवशास्त्र यामधील संबंध

मानवशास्त्र हे एक व्यापक सामाजिक शास्त्र असून ते मानवाच्या सर्वांगीण अभ्यासाशी निगडित आहे. मनुष्य प्राणी पृथ्वीतलावर अस्तित्वात आल्यापासून ते आधुनिक मानवा पर्यंत सर्व ठिकाणच्या आणि सर्व कालखंडातील मानवाचा अभ्यास मानवशास्त्र करते. म्हणून मनुष्यप्राणी आणि त्याच्या कृतीचा सर्वांगीण अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. मानवशास्त्राचा अभ्यासविषय अतिशय व्यापक असल्याने त्यांच्या अनेक शाखा निर्माण होऊन विकसित झाल्या आहेत. शारीरिक मानवशास्त्र, सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र, आर्थिक मानवशास्त्र, भाषिक मानवशास्त्र, उपयोजित मानसशास्त्र इत्यादी विशेष शाखा प्रसिद्ध आहेत. सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र या शाखेशी संबंधित विशेष जवळचा संबंध आहे. सामाजिक सांस्कृतिक मानवशास्त्र या दोन भिन्न शाखा असल्याचे काही विद्वान मानतात असले तरी या दोहोंमधील भेद इतका स्पष्ट आहे की, इंग्लंडमध्ये सांस्कृतिक मानवशास्त्राला सामाजिक मानवशास्त्र म्हणजेच अधिक पसंत केले जाते. सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यावर विशेष भर दिला जातो. अर्थात आजकाल लहान-लहान आदिवासी समाजाबरोबर ग्रामीण समुदाय, शहरे इत्यादी विषयीचा सामाजिक मानवशास्त्रज्ञ अभ्यास करतात. त्यांच्या अभ्यासाचा भर मानवी संस्कृतीचे अध्ययन करण्यावर असतो. लहान-लहान समुदायाचे सामाजिक आर्थिक राजकीय संघटन त्यातील लोकांची भाषा कलाकौशल्य, तंत्रज्ञान, धर्म इत्यादी. माणूस संस्कृतीच्या विविध पैलूंचा सखोल आणि विशिष्ट अभ्यास मानवशास्त्र करते. समाज समग्र रीत्या अभ्यास करण्यावर सामाजिक मानवशास्त्रात भर दिला जातो. विविध सांस्कृतिक घटकातील आंतरसंबंधाची उकल करून विशिष्ट समाज गुणांचा अभ्यास मानसशास्त्रात होतो. समाजशास्त्राची आदिवासी ग्रामीण नागरी अशा सर्व प्रकारच्या समाजाचा त्यातील विविध संस्थांचा त्यातील अंतरसंबंधाचा त्यांच्या संरचनांचा आणि त्यातील परिवर्तनाचा अभ्यास होतो. यावरून सामाजिक मानसशास्त्र

आणि समाजशास्त्र या दोहोंत अनेक समान असा विषयाचा संबंध स्पष्ट होतो. विशिष्ट समाजाची संस्कृती त्या समाजाचा परस्पर संबंधांची यथार्थ आकलन समाज शास्त्रज्ञांना होणार नाही. त्यामुळे सामाजिक मानसशास्त्रीय अभ्यास समाज शास्त्रज्ञांना उपयुक्त ठरतात. समाजशास्त्रातील काही संकल्पना या शास्त्राने सामाजिक मानवशास्त्र कडून स्वीकारल्या आहेत. समाजशास्त्रीय विज्ञानाचा ही सामाजिक मानवशास्त्राना उपयोग होतो तात्पर्य या दोहोत आदान-प्रदान होते. समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र या काही मूलभूत बाबतीत भेद आहेत. एकंदरीने विचार करता सामाजिक मानसशास्त्राचा मुख्य भर आकाराने लहान एकसंध व साध्या अशा आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यावर अधिक प्रमानावर राहिलेला आहे. तर समाजशास्त्रात आकाराने मोठ्या गुंतागुंतीच्या आधुनिक औद्योगिक त्यातील विविध प्रकारचे समूह संस्था त्यातील अंतरसंबंध, घटना अशा विविध समाजातील परस्परसंबंधांचा अभ्यासच प्रधान्याणे यांनी झाला आहे. समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र या दोहोंचा अभ्यास पद्धतीत भेद आहे. एखाद्या विशिष्ट विषयाबाबतची अनेक लोकांकडून कमीत कमी वेळात माहिती गोळा करून त्यावर आधारित अशा सामान्यकरण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न समाजशास्त्रात होतो. यासाठी समाजशास्त्राचा मुख्य भर सामाजिक सर्वेक्षण पद्धति वर असतो या प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची यात तथ्य संकलन तंत्राचा हे वापर मोठ्या प्रमाणात समाजशास्त्रात होतो. पण सामाजिक मानवशास्त्रात सहभागी निरीक्षण तंत्राचा अधिक वापर होताना दिसतो. ज्या समाजाचा वा समूहाचा अभ्यास करायचा आहे. त्या समाजाचा एक घटक म्हणून दीर्घ काळ तेथे राहून निरीक्षण करायचे असे तंत्र आहे. या तंत्राच्या वापरामुळे अभ्यास विषयाची गुणात्मक स्वरूपाची तपशिलासह माहिती मिळते आणि सखोल सर्वांगीण अध्ययन शक्य होते. क्षेत्र कार्यपद्धतीवर सामाजिक मानवशास्त्रात विशेष भर दिला जातो समाजशास्त्रात ही सहभागी निरीक्षण तंत्रांचा अवलंब करून काही अभ्यास झाले असले तरी अपवादात्मक कसे म्हणावे लागतील.

### १.३.३ क्षेत्र कार्य पद्धती आणि त्याचे वैशिष्ट्य

**क्षेत्र कार्य पद्धतीचा अर्थ** (Meaning of Fieldwork Method)

क्षेत्र कार्य पद्धती सामाजिक मानवशास्त्रात वापरले जाणारे महत्त्वाची पद्धत आहे. क्षेत्र कार्य पद्धत म्हणजे संशोधकाला ज्या समाजाचा अभ्यास करायचा आहे त्या समाजात त्याने प्रत्यक्ष जाऊन किमान तीन ते चार वर्षे तेथे राहून त्या समाजाचा समग्र अभ्यास करणे हे होय. या अभ्यास पद्धतीत संशोधक स्वतः त्या समाजात तीन-चार वर्षे वास्तव्य करतो. हा भाग अत्यंत महत्त्वाचा असतो संशोधकाचा प्रत्यक्ष संवाद त्या समाजातील लोकांशी असतो संशोधक स्वतःच्या डोळ्यांनी हेतुपुरस्कर त्यांच्या जीवनाची निरीक्षण करतो व त्यांच्या नोंद ठेवतो. आदिवासी जमातीचा अभ्यास करण्यासाठी ही पद्धत प्रामुख्याने वापरली जाते. क्षेत्र कार्य पद्धतीचा उदय अगदी अलीकडच्या काळातील आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अगोदर आदिवासींचा केवळ वर्णनात्मक स्वरूपाचा अभ्यास केला होता. प्रवासी धर्मप्रसारक प्रशासकीय व्यक्ती इत्यादींनी आदिवासींचे केलेले वर्णन हे एकांगी व अतिरंजित स्वरूपाचे होते. काही व्यक्तींनी आदिवासींची वस्तुस्थिती निदर्शक वर्णन केले होते. उदाहरणात आंद्रे बेटले (Andre Battle) यांनी कांगोजेरेमी लोबो यांनी आबिसीनोयातील, विल्यम बोसमन William Bosman यांनी गोल्ड कोस्ट इत्यादींनी केलेले लिखाण वस्तुस्थिती निदर्शक

होते. परंतु शास्त्रीय पद्धतीचा वापर केला नसल्यामुळे त्यात अनेक उणिवा होत्या. पण वरील विचारवंतांच्या पेरणीमुळे आदिवासींच्या शास्त्रीय अभ्यासाला चालना मिळाली. क्षेत्र कार्यपद्धतीचा प्रथम वापर विसाव्या शतकात प्रो. Radcliffe ब्राऊन यांनी केला. त्यांनी अंदमान बेटावरील आदिवासींचा अभ्यास प्रत्यक्ष त्यांच्या सानिध्यात दोन वर्षे राहून केला. क्षेत्र कार्य पद्धतीच्या इतिहासातील हा अभ्यास पथदर्शक म्हणून ओळखला जातो. याच दरम्यान १९१४-१८ या काळात मैलिनोवस्की Malinowski यांनी ट्रोब्रिएंड बेटावरील आदिवासींचा अभ्यास त्यांची भाषा आत्मसात करून त्यांच्या सानिध्यात सलग चार वर्षे राहून केला. नंतर अनेक सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करून विविध आदिवासी जमातीचा अभ्यास केला.

**अ) क्षेत्र कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये:** (Characteristics of Fieldwork Method)

क्षेत्र कार्य पद्धत म्हणजे संशोधकांनी ज्या आदिवासी जमातीचा अभ्यास करायचा आहे त्या जमातीत प्रत्यक्ष जाऊन तीन-चार वर्षे राहून, त्यांच्याशी मैत्री व घनिष्ठ संबंध निर्माण करून त्यांच्या दैनंदिन जीवनाचे निरीक्षण करणे होय. हे काम तितकेसे सोपे नाही आदिवासींना आपलेसे करण्यासाठी एक वर्षाहून अधिक काळ लागतो आदिवासींचाची भाषा आत्मसात करणे त्यांच्याशी मैत्री करणे, त्यांना बोलते करणे या गोष्टी सहज शक्य नसतात पण ते सामाजिक मानवशास्त्रज्ञ साध्य करतात या क्षेत्र कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

**१) अध्ययनाचा कालावधी:** (Time for Study)

आदिवासी जमातीचा अभ्यास करताना संशोधकाला आदिवासी सामाजिक जीवनाची पूर्ण माहिती करुन घ्यावी लागते. यासाठी बराचसा कालावधी लागतो. सहज भेटून अगर अल्पकाळात ही माहिती संपादित करणे अशक्य असते. काही वेळा दिसते तसे नसते, तर काही वेळा किरकोळ वाटणारी घटना महत्त्वाचे असू शकते. यासाठी परिपूर्ण माहितीची गरज असते. त्यामुळे बराचसा कालावधी लागतो. आदिवासी जीवनाची पूर्ण माहिती होण्यासाठी किमान तीन-चार वर्षांचा कालावधी लागतो, असे अनेक मानव शास्त्रज्ञांचे मत आहे. आदिवासी लोकांमध्ये राहून त्यांना आपलेसे करावी लागते. त्याची भाषा शिकावी लागते त्यांच्याशी भावनिक नाते निर्माण व्हावे लागते. पण भौतिक सानिध्य याशिवाय भावनिक नाती निर्माण करता येत नाहीत. यासाठी बराच कालावधी लागतो. दीर्घ कालावधी महत्त्वाचा नाही. या कालावधीचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा लागतो आदिवासी समाजात घडून येणार्या सामाजिक घटना उदा. धार्मिक समारंभ, वैवाहिकसमारंभ, न्यायनिवाडा, वधू-वर निवड, जादू इत्यादी तपशीलवार माहिती संपादित करावी लागते. या घटना नेहमी घडणाऱ्या नसतात किंवा त्यांची ठराविक वेळ नसते ज्या वेळी या घटना घडतात तेथे संशोधक हजर असेलच असे नाही. काहीवेळा या घटना २ वर्षातून किंवा वर्षातून एकदा घडत असतात. त्यामुळे अज्ञानाचा कालावधी अधिक लागतो. आदिवासी जीवनाचे यथार्थ आकलन संशोधकाला होण्यासाठी त्यांनी आदिवासींमध्ये भौतिकसानिध्या त्याबरोबर मानसिक एकरूप झाले पाहिजे. त्याशिवाय आदिवासींच्या भावनांचे वर्णन संशोधकाला करता येणार नाही. संशोधकाने आदिवासींमध्ये वावरताना आपला धर्म, आपली

संस्कृती, आपल्या आवडीनिवडी, छंद, नाद, सवयी बाजूला ठेवाव्या लागतात. आपण एक संशोधक आहोत यापलीकडे संशोधकाच्या मनात कोणताही हेतू नसतो. नसावा तर आदिवासींच्या वास्तव जीवनाचा जो संशोधकाला जवळून अभ्यास करता येईल. आदिवासी जीवनातील चुका संशोधकांनी काढू नयेत आदिवासी जीवनात ढवळाढवळ संशोधकाने करू नये. आदिवासी लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या समग्र जीवन पद्धतीचा अभ्यास संशोधकांनी केला पाहिजे. यासाठी अधिक कालावधीची गरज असते.

**२) अध्ययनाची भाषा** (Language of Study)

आदिवासींचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी आदिवासींमध्ये किमान ३ ते ४ वर्षे वास्तव्य केले पाहिजे. आदिवासींच्या बरोबर खेळीमेळीने वागले पाहिजे. त्यांच्याशी सुसंवाद साधता आला पाहिजे. त्यांच्यासाठी संशोधकाला आदिवासींच्या भाषेचे ज्ञान असले पाहिजे. संशोधकाला आदिवासींची भाषा चांगल्या रीतीने बोलता आली पाहिजे. अर्थपूर्ण संवादासाठी संशोधक व आदिवासी यांची एकच भाषा असली पाहिजे. आदिवासींची भाषा आधुनिक समाजातील भाषेहून वेगळी असते. त्यांच्या भाषेला लिपी नसते. सुरुवातीला संशोधकाला दुभाषी यांची मदत घ्यावी लागते. पण कायमस्वरूपी दुभाषाची मदत घेणे शक्य नसते. आदिवासींच्या बरोबर मानसिक रित्या एकरूप होण्यासाठी प्रत्यक्ष संशोधक व आदिवासी यांच्या संवादाची गरज असते. आदिवासी संशोधकाची भाषा शिकणार नाहीत म्हणून संशोधकाला आदिवासींची भाषा कितीही अवघड वाटत असली तरी शिकावीच लागते. भाषा ही आचार विचारांच्या देवाण-घेवाण याचे उत्तम साधन आहे त्यामुळे भाषा शिकल्यावर आदिवासींचे आचार-विचार संशोधकाला समजून घेता येतात. भाषेच्या साह्याने आदिवासींच्या अंतर्मनाचा वेध घेता येतो. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होता येते. त्यांच्या संस्कृतीत, धार्मिक, सामाजिक जीवनातील देखील सहभागी होता येते.भाषा एक संस्कृतीचा घटक आहे. आदिवासी बरोबर भावनिक नाते निर्माण करता येते त्यामुळे आदिवासी जीवनाची वास्तवता समजते. मैलिनोवस्की यांनी आदिवासींचा अभ्यास त्यांच्या भाषा शिकून केला सध्या अनेक संशोधक प्रथम आदिवासी भाषेचा अभ्यास करतात त्यामुळे आदिवासींची भाषा शिकणे हे क्षेत्र कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य मानले जाते.

**३) अध्ययनाचे क्षेत्र** (Field of Study)

क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करून अध्ययन करताना क्षेत्र निवडणे हा भाग अत्यंत महत्त्वाचा असतो. आदिवासींचा समग्र अभ्यास करायचा की विशिष्ट अंगाचा करायचा, हे प्रथम निश्चित केले पाहिजे. कारण अध्ययनाची क्षेत्र निवड यावर अवलंबून असते. अनेक मानसशास्त्रज्ञांच्या मते आदिवासींचा समग्र अभ्यास करावा. कारण आदिवासींच्या चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा, वर्तन एकमेकांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ बैगा जमातीतील सर्व स्त्रिया आपल्या शरीरावर गोंदण काढून घेतात त्या वेळी स्त्रियांना खूप वेदना होतात. तरीही त्या आपले संपूर्ण शरीर गोंदून घेतात, कारण मृत्यूनंतर प्रत्येक स्त्री स्वर्गात जाते तिच्या शरीरावर जेवढे दागिने गोंदवलेले असतात तेवढे सर्व दागिने तिला देवाकडून मिळणार असतात.अशी त्यांची धार्मिक श्रद्धा असते. त्यामुळे आदिवासींचा समग्र अभ्यास करावा, कारण कोणतीही नोंद कुठे पण उपयोगी

पडेल हे प्रथम दर्शनी सांगता येत नाही. समग्र अध्यंनात आदिवासींच्या सर्व दैनंदिन वर्तनाची नोंद घेतली जाते. इव्हान्स प्रीचर्ड यांनी आदिवासींचा समग्र जीवनाचा अभ्यास करताना दैनंदिन जीवनातील बारीकसारीक गोष्टींची नोंद ठेवली पाहिजे असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. या नोंदीचा अहवाल लेखनात समावेश होईल किंवा नाही हे सांगता येत नाही. कारण एखादी किरकोळ वाटणारे वर्तन कधीकधी महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकू शकतील.उदाहरणार्थ तोडा जमातीत म्हशीचा धार काढण्याचे काम केवळ पुरुषच करतात. स्त्रियांना म्हशीच्या गोठ्यात जाण्यास बंदी आहे. याचे कारण तोडा जमातीत म्हशींना धार्मिक महत्त्व आहे. आदिवासींची जीवनपद्धती प्रथा मुले सवय याबाबतची संपूर्ण माहिती मिळवण्यासाठी अशा बाबींची नोंद घेणे आवश्यक असते म्हणून संशोधकाचा अभ्यासाचा दृष्टीकोण समग्र असावा.

### ४) **संशोधकाचे गुण किंवा पात्रता:** (Eligibility of Researchers)

क्षेत्र कार्यपद्धतीने आदिवासी समाजाचे अध्ययन करणे काम अवघड आहे. रानटी अज्ञानी आणि रागंड्या रांगड्या आदिवासी समाजाचे अध्ययन करणे हे संशोधका समोर फार मोठे आव्हान असते. आदिवासी मध्ये प्रत्यक्ष  जाऊन राहणे, त्यांची भाषा शिकणे त्यांना आपलेसे करणे या गोष्टी सहज शक्य नाहीत. त्यासाठी संशोधक सुद्धा तेवढाच हुशार, धाडसी, जीद्दी व संयमी असावा लागतो. त्यासाठी त्याच्याकडे विशिष्ट गुण किंवा पात्रता असणे अपरिहार्य आहे. अज्ञानाच्या खाईत लोटलेल्या परंपरेत बरबटलेल्या आणि पशुतुल्य जीवन जगणाऱ्या आदिवासी मध्ये ३ ते ४ वर्षे राहून अभ्यास करण्यासाठी संशोधकाच्या अंगी विशिष्ट गुण किंवा पात्रता असावी लागते.

**संशोधकाचे गुण किंवा पात्रता:**

**अ) प्रशिक्षण** (Academic Training)

आदिवासी मध्ये जाऊन राहणे आणि त्यांची जीवनपद्धती याचे अवलोकन करणे ही बाब सहज शक्य नाही. त्यासाठी संशोधक प्रशिक्षित असावा लागतो. ज्या भौगोलिक प्रदेशात आदिवासी राहतात त्यांची व त्यांच्या जीवनपद्धती विषयी वर्णनात्मक माहिती संशोधकाला असणे आवश्यक आहे. संशोधकाचा अभ्यास करण्यापूर्वी सामाजिक मानवशास्त्रात चे प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. सामाजिक मानसशास्त्राचे अध्ययन केल्यामुळे संशोधकाला संशोधन करत असताना कोणत्या बाबी महत्त्वाच्या आहेत व कोणत्या महत्त्वाच्या नाहीत यातील फरक कळून येईल व नियोजित वेळेत संशोधनाचे काम पूर्ण होईल. सामाजिक मानवशास्त्रात सैद्धांतिक ज्ञानाची मांडणी असल्यामुळे संशोधकाला निरीक्षण करणे व त्याच्या नोंदी ठेवणे सोपे जाईल. आदिवासींच्या दैनंदिन जीवनातील बारीकसारीक गोष्टींची नोंद घेणे सहज शक्य होते. आदिवासींची वर्तनाचा उचित अर्थ समजून घेता येईल. म्हणूनच मार्गारेट मीड म्हणतात, सैद्धांतिक ज्ञानाविना अभ्यासकाचे अवलोकन पुरेसे न होण्याचा अवलोकन केलेल्या बाबीचा योग्य तो अन्वयार्थ लावता येण्याचा धोका असतो. (there is also the danger that without theoretical tools the field anthropologist may not see enough and me not change the significance of what he does see). सैद्धांतिक ज्ञान

असणाऱ्या पण असामान्य प्रतिभा असणाऱ्या काही बुद्धिमान व्यक्तींनी संशोधन करून त्याचे लिखाण पुस्तक रुपात प्रकट केले आहे. उदा. डूबाईस यांचे हिंदू मॅनर्स कस्टम्स अंड सेरेनिज

हे पुस्तक १८१६ साली प्रकाशित झाले होते त्याच प्रमाणे या पुस्तकाचे महत्त्व आपल्याला नाकारता येत नाही. पण सामाजिक मानवशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञान असलेली व्यक्ती यापेक्षा अधिक सखोल व परिपूर्ण माहितीचे चांगल्या प्रकारे वर्तन करू शकेल.

**ब) विशिष्ट प्रकारचा स्वभाव:**

संशोधक प्रशिक्षित असला पाहिजे. यात काही शंका नाही पण त्याचा विशिष्ट स्वरूपाचा स्वभाव घेतला असला पाहिजे. संशोधकाच्या स्वभावाचा परिणाम अभ्यासावर होणार असतो. संशोधक संशोधनात यशस्वी होण्यासाठी त्याच्याकडे असामान्य जिद्द समरस होण्याची वृत्ती सहानभूती याची गरज असते.

**१) असामान्य जिद्द:**

बहुतेक आदिवासी जमाती दूर डोंगर दऱ्या-कड्या कपाऱ्यात किंवा जंगलात राहतात. त्या ठिकाणी कोणत्या सोयी सुविधा नसतात. तेथील वातावरणाची व जीवनपद्धतीची संशोधकाला सवय नसते. त्यामुळे अशा परिस्थितीत संशोधकाला असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. तेथील वातावरण निवास भोजन पाणी इत्यादी सर्वच बाबी आरोग्यास घातक असतात. या प्रतिकूल परिस्थितीत संशोधन करत राहावे लागते.त्यासाठी त्याच्याजवळ असामान्य जिद्द असावी लागते. सवई मानवाला त्याची वर्तन अथवा व्यक्तिमत्व बनवण्यात कारणीभूत ठरत असतात. त्याचप्रमाणे संशोधक हा सुद्धा एक माणूस असल्यामुळे त्याचाही काही सवयी असतात. त्या सवयी आधुनिक समाज जीवनाशी निगडित असतात. प्रांतविधी पासुन रात्री झोपेपर्यंत अनेक सवयी या संशोधकाला असतात. गुरुवर्य डॉ. गुरुनाथ नाडगोंडे यांनी भारतीय आदिवासी या पुस्तकात उदाहरण दिले आहे. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीच्या समस्या जाणून घेण्यासाठी तेथे राहण्याचा निश्चय केला. पण अंघोळीसाठी आणि घर व पाणी नसल्यामुळे त्यांना वस्तीपासून मैलभर चालावे तर लागले. शिवाय एका छोट्याशा घाणेरड्या पाण्याच्या डबक्यात आंघोळ करावी लागली. पण त्यांनी आपली जिद्द सोडली नाही. या प्रकारच्या अनेक अडचणींना तोंड देण्यासाठी संशोधनाकडे असामान्य जिद्द असावी लागते.

**२) एकरूप होण्याची प्रवृत्ती:**

संशोधकाचा स्वभाव केवळ जिद्दी असून चालत नाही. आदिवासी जीवनाचे धागे-दोरे समजून घेण्यासाठी त्यांना त्यांच्याशी एकरूप व्हावे लागते. आदिवासींना आपलेसे करून घ्यावे लागते. तेव्हा ते संशोधका बरोबर दिलखुलास बोलू लागतात. रूढी, प्रथा, परंपरा, विशेष जादू, धर्म, मंत्रतंत्र याची माहिती मिळवणे सहज शक्य नसते. त्यासाठी आदिवासींच्या हृदयात संशोधकांनी स्थान निर्माण केले पाहिजे.

संशोधक हा आपल्या पैकीच एक व्यक्ती असतो. असा भास संशोधकाला निर्माण करावा लागतो. बऱ्याच वेळा आदिवासींच्या सण समारंभाच्या वेळेस सहभागी व्हायचे असल्यास त्याच्या सारखे

संशोधकाला अर्धनग्न राहावे लागते. कारण आदिवासी त्यावेळी त्यांचे कपडे वापरावे लागतात काही वेळा प्रसाद म्हणून कच्चे मांस खावे लागते. या गोष्टी केल्या शिवाय संशोधकाला आदिवासींच्या बरोबर भावनिक एकृप्ता साधता येत नाही.

**३. आवड व सहानुभूती:**

आवड असेल तर सवड होते असे म्हटले जाते.संशोधकाला आदिवासींच्या अभ्यासाची आवड निर्माण झाली पाहिजे. आदिवासींच्या बद्दल त्यांच्या मनात आस्था व सहानुभूती असली पाहिजे. आदिवासी जीवनाबद्दल संशोधकाच्या मनात घृणा, तिरस्कार,मत्सर किंवा उदासीनता असून चालणार नाही. त्यांचा अभ्यासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. आधुनिकतेचा व विज्ञानाचा जराही गंध नसणारे आदिवासी निष्पाप व भोळेभाबडे असतात. त्यांचे गलिच्छ राहणीमान निरर्थक वाटणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा त्यांचे दारिद्र्यामुळे संशोधकाच्या मनात त्यांच्याविषयी अनादर निर्माण होण्याची शक्यता असते. अशावेळी संशोधकाचा स्वभाव बदलून चालणार नाही बहुतेक आदिवासी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी निकराचे प्रयत्न करत असतात. खायला पोटभर अन्न नाही अंगावर कपडे नाही. तर राहायला चांगले घर नाही उत्पन्नाचे साधने नाहीत शिक्षण नाही. अशा आदिवासी समाजाबद्दल संशोधकाला सहानुभूती असेल तर तो त्यांच्याशी एकरूप होऊन संवाद साधू शकेल व संशोधनात यशस्वी होईल यासाठी संशोधकाच्या स्वभावात आदिवासीं विषयी आवड व सहानुभूती असली पाहिजे.

**४) कल्पनात्मक अंतर्दृष्टी** (Imaginative Insights)

संशोधक आकडे कल्पनात्मक अंतर्दृष्टी असली पाहिजे. संशोधक हा चित्रकार किंवा फोटोग्राफर नसतो पाहिलेल्या दृश्याचा योग्य तो अन्वयार्थ लावण्याची क्षमता म्हणजेच कल्पनात्मक अंतर्दृष्टी होय. अंबादास माडगूळकर व प्रशांत फडणीस यांच्या मते संशोधकाकडे मानवशास्त्राच्या सखोल ज्ञानाबरोबर थोडीशी प्रतिभा सुद्धा असली पाहिजे. म्हणजे नेमक्या शब्दात योग्य वर्तनकरता येते. मिळालेल्या माहितीमध्ये महत्त्वाची बाब कोणती हे संशोधकाला समजले की त्याचे वर्णन सविस्तर करता येते.

**५) लेखन कौशल्य:**

कल्पनात्मक अंतर्दृष्टी बरोबर संशोधकाकडे लेखन कौशल्य असले पाहिजे. संशोधकाला आदिवासींची जीवनपद्धती समजून चालणार नाही. तर इतरांनीही समजावी यासाठी संपादित केलेल्या माहितीचे लेखन केले पाहिजे. लेखन योग्य प्रकारे झाली नाही तर त्या माहितीला ही काही अर्थ राहत नाही.आदिवासी जीवनाचे योग्य शब्दात लेखन करण्यासाठी संशोधक आकडे लेखन कौशल्य असावे लागते. संशोधकाच्या बुद्धी पटलावर उमटलेले विचार योग्य शब्दात उतरवण्याची कला म्हणजे लेखन कौशल्य होय.आदिवासी जीवनातील सुभाषिते, गाणी, दंतकथा, म्हणी, कोडी, उखाणे इत्यादींना संशोधकांनी समजून घेऊन त्याचे भावभावना सहीत अचूक लेखन केले पाहिजे.आदिवासी जीवनातील विचार व तत्वज्ञान आधुनिक समाजापर्यंत जसेच्या तसे पोहोचवले जात पाहिजेत. त्यामुळे आधुनिक समाजातील लोकांची आदिवासी विषयी गैरसमज दूर होतील. संशोधकाला सुद्धा असामान्य जिद्दीवर कठोर परिश्रम घेऊन केलेल्या

आदिवासीच्या अभ्यासाचे समाधान मिळेल. उपरोक्त नुसार क्षेत्र कार्य अभ्यास पद्धती ची वैशिष्ट्ये सांगता येतील. क्षेत्र कार्य अभ्यास पद्धती इतर अभ्यास पद्धती पेक्षा पूर्णपणे वेगळी असून तिचा वापर करून एखाद्या आदिवासी जमातीचा अभ्यास करणे ही बाब कठीण आहे. तरीसुद्धा अनेक मानसशास्त्रज्ञांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर या अभ्यास पद्धतीचा वापर करून अनेक आदिवासी जमातींचा अभ्यास केला आहे.

१) प्रा. Redcliffe प्राध्यापक रेडीक्लीफ ब्राऊन -अंदमान बेटावरील आदिवासींचा अभ्यास.

२) मैलिनोवस्की-ट्रोब्रिएंड

३) प्रा. शापेरा-आफ्रिकेतील बेचून आदिवासी चा अभ्यास.

४) प्रा. नाडेल नायजेरियातील सुप आदिवासी.

आदिवासी समाज हा मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. मानवी सामाजिक जीवनाला येथून सुरुवात झाली मानवी जीवनाच्या विकासाची पहिली अवस्था म्हणजे आदिवासी होय. अशा आदिवासींचा यथार्थ व वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी केवळ क्षेत्र कार्य अभ्यास पद्धती उपयोगात पडते. मानवशास्त्राच्या दृष्टिकोनातून आदिवासीच्या समग्र जीवनाचा अभ्यास करण्यासाठी केवळ क्षेत्र कार्य पद्धत उपयोगी आहे, असे अनेक मानसशास्त्राचे मत आहे. आदिवासींच्या धर्म, रूढी, प्रथा, परंपरा, विवाहसंस्था, कल्पना, भावभावना, समजुती इत्यादी सर्वांगीन जीवनाचा वास्तव अभ्यास होण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो.

### १.३.४ सामाजिक मानवशास्त्रचे महत्त्व:

सामाजिक मानसशास्त्र हे अगदी अलीकडच्या काळात उदयास आलेले असून त्याचा विकास जलद गतीने झाला आहे. म्हणजेच त्याचे महत्व समाजाला कळले आहे. त्यामुळेच या शाखेचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सामाजिक मानवशास्त्रात चे महत्त्व पुढीलप्रमाणे.

१) आदिवासी समाजाची यथार्थ आकलन होते. या शाखेत शक्यतो आदिवासींच्या अभ्यासावर जास्त भर दिला जातो. याशिवाय आदिवासींचा प्रत्यक्ष अभ्यास केला जातो. या त्यामुळे सामाजिक मानवशास्त्र यामुळे आदिवासी समाजाचे यथार्थ आकलन होते.

२) आदिवासी समस्यांचे निराकरण करता येते सामाजिक मानवशास्त्रात आदिवासींचा प्रत्यक्ष अभ्यास करताना त्यांच्या समस्यांचे अध्ययन केले जाते. अभियानाच्या जोरावर समस्यांच्या निराकरणासाठी उपाय सुचवता येतात.

३) आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासाच्या दृष्टीने सामाजिक मानवशास्त्रात चे महत्त्व आहे. सामाजिक मानवशास्त्रात आदिवासींच्या सर्वांगीण अभ्यास केला जातो त्यामुळे आदिवासी कल्याण कार्यक्रम किंवा विकासाचे आराखडे तयार करता येतात.

४) आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे. एक दिवस आदिवासी संस्कृतीचा पूर्ण ऱ्हास होईल आणि आपल्याला संस्कृतीचा अभ्यास करता येणार नाही. या शाखेत केवळ संस्कृतीचे अध्ययन केले जात नाही तर संवर्धन (जपणूक) केली जाते.

५) वंशवाद दूर करण्याच्या दृष्टीने सामाजिक मानवशास्त्रात चे महत्त्व आहे. समाजात वंश श्रेष्ठत्वाचा वाद आहे. एका वर्षाचे लोक दुसऱ्या वंशाला विनाकारण तुच्छ मानतात. त्यामुळे त्यांच्यात वाद निर्माण होतो. सामाजिक मानवशास्त्रात विविध वंशाचा तुलनात्मक अभ्यास करून हा वाद मिटवला आहे.

६) औद्योगिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्व सामाजिक मानवशास्त्रात औद्योगिक समूहाचा अभ्यास केला जातो. यामध्ये मालक व कामगार वर्गाचा अभ्यास करून अधिक संबंध सुधारण्यावर भर दिला जातो.

७) धर्मप्रसाराच्या दृष्टीने महत्त्व: सामाजिक मानवशास्त्रात सर्वांगिन जीवनाचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाच्या आधारावर अनेक मिशनरी आपल्या धर्माचा प्रसार करतात. उदाहरणार्थ ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासी समाजात केलेला ख्रिश्चन धर्माचा प्रसार होय.

८) देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्व: प्रत्येक देशात विकासासाठी मोठमोठ्या योजना किंवा प्रकल्प राबवले जातात. यावेळी सरकारला काही अडचणी येतात त्यातील पुनर्वसनाचे अडचण मोठी असते किंवा इतर सामाजिक अडथळे निर्माण होतात त्या वेळी सामाजिक मानवशास्त्र सहाय्य करते.

**स्वयंअध्ययन प्रश्न**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

१) क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर कोणी केला?

२) क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करणारे संशोधक आदिवासी समाजात किती वर्षे राहतात?

३) आदिवासींचा समग्र दृष्टीकोनातून अभ्यास करावा असे कोणी स्पष्टपणे नमूद केले आहे?

४) संशोधकाचा प्रथम आवश्यक गुण कोणता?

## १.४ सारांश:

मानवशास्त्र हे एक शास्त्र आहे. मानसशास्त्र हे मानवांचा अभ्यास करते मानवशास्त्र मानवांच्या सर्व पैलूचा अभ्यास करत असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणांमध्ये सामाजिक मानसशास्त्राच्या अर्थाने वैशिष्ट्ये. समाजशास्त्र आणि मानव शास्त्र यांचा परस्परांमधील असणारा संबंध याविषयी विस्तृत माहिती जाणून घेतली आहे. त्याचबरोबर मानवशास्त्रात उपयुक्त असणारी अत्यंत महत्वाची एक वैज्ञानिक पद्धत म्हणजे क्षेत्र कार्यपद्धत आणि त्याची वैशिष्ट्ये यांचा सूक्ष्मरित्या आढावा घेतला आहे. त्याचबरोबर सामाजिक मानसशास्त्राचे सद्यकालीन परिस्थिती मध्ये असणारे महत्त्व समजून घेतले आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये विविध मानववंशशास्त्रज्ञ यांच्या व्याख्या समजावून घेतलेल्या आहेत. त्याचबरोबर मानवशास्त्राची समाजशास्त्र मध्ये

असणारी प्रासंगिकता आणि महत्त्व याचे सूक्ष्मरित्या अभ्यास केला आहे. आदिम समाजाला समजून घेण्यासाठी मानवशास्त्र कोणत्या प्रकारची भूमिका पार पाडते याचे अध्यन प्रस्तुत प्रकरणात केलें आहे.

## १.५ स्वयं– अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) रेडक्लीफ ब्राऊन यांनी क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचा वापर प्रथम केला.

२) क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करणारे संशोधक आदिवासींमध्ये किमान तीन ते चार वर्षे वास्तव्य करतात.

३) ईव्हनस प्रीचर्ड चानी आदिवासींचा समग्र दृष्टिकोनातून अभ्यास करावा, असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

४) प्रशिक्षण हा संशोधकाचा प्रथम गुण असावा.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

(खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा)

१) क्षेत्रकार्य पद्धतीची वैशिष्ट्य विशद करा.

२) सामाजिक मानववशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

३) समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यामधील संबंध स्पष्ट करा.

४) सामाजिक मानसशास्त्राचा अर्थ सांगून त्याच्या वैशिष्ट्ये यांची चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. Vidyarthi LP tribal culture of India, concept publishers, New Delhi, 1976.

२. E.E.evans pricherd social anthropology and other essays, the free press, New York, 4962

३. Mazumdar DN and madan TN and introduction to social nthropology, sia publishing house Bombay, 1973.

४. KS tribal situation in India, Indian institute of advanced study, Shimla, 1972.

५. S.L.Doshi.and P.C.Jain. Social Anthropology Rawat publication, 2001

६. संगवे विलास, सामाजिक मानवशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६९.

७. नाडगोंडे गुरुनाथ भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८.

८) डॉ. सर्जेराव साळुंखे, समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, प्रोफीशिएंट पब्लिशिंग हाऊस,५३५, शनिवार पेठ, राधाकृष्ण बिल्डिंग, शॉप नं.९, प्रभात सिनेमा समोर, पुणे.


❑❑❑

# घटक – २
# भारतातील आदिवासी समाज
## (Tribal Society in India)

**घटक संरचना**

२.१ उद्दिष्टे
२.२ प्रस्तावना
२.३ विषय विवेचन
२.३.१ आदिवासी समाज: अर्थ आणि वैशिष्ट्ये (Tribal Society: Meaning and Characteristics)
२.३.२ सामाजिक जीवन: कुटुंब संस्था आणि विवाह संस्था- वैशिष्ट्ये (Social Life: Family and Marriage- Characteristics)
२.३.३ आदिवासी आर्थिक जीवन:वैशिष्ट्ये (Economic Life: Characteristics)
२.३.४ आदिवासी धार्मिक जीवन: श्रद्धा आणि कर्मकांड/ धर्माचरण (Religious Life: Beliefs and Practices)
२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
२.५ सारांश
२.६ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे
२.७ सरावासाठी प्रश्न
२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ उद्दिष्टे:

या प्रकरणाचा अभ्यास करत असताना पुढील प्रमाणे उद्दिष्टे सांगता येतील.

१. आदिवासी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे
२. भारतातील आदिवासींचे सामाजिक जीवन कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेच्या वैशिष्ट्यांच्या माध्यमातून अभ्यासणे.
३. भारतातील आदिवासी समुदायाचे आर्थिक जीवन अभ्यासणे
४. भारतातील आदिवासी समुदायाच्या धार्मिक जीवनामधील श्रद्धा आणि कर्मकांड यांचा अभ्यास करणे.

## २.२ प्रस्तावना (Introduction)

कोणत्याही समाजाचे वर्गीकरण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रामुख्याने तीन भागांमध्ये केले जाते. यामध्ये आदिवासी समुदाय, ग्रामीण समुदाय आणि शहरी समुदाय अशा तीन प्रकारांमध्ये हे वर्गीकरण आपणास आढळते. यामधील शहरी समाज हा तुलनेने अत्यंत प्रगत असा तर आदिवासी समाज हा अप्रगत असलेला दिसून येतो. म्हणून संपूर्ण भारतीय समाजाच्या विकासाचा विचार करत असताना या तीनही समाजाच्या विकासाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने आदिवासी समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे आणि भारतातील आदिवासी समाज याविषयी योग्य ज्ञान मिळवणे, अत्यंत आवश्यक बनले आहे. या आधारावरच आदिवासी समाजाच्या विकासाची धोरणे करता येतील. म्हणून प्रामुख्याने सामाजिक मानवशास्त्र ही समाजशास्त्राची एक अत्यंत महत्वपूर्ण शाखा आहे, जी संपूर्ण मानव समाजाचा अभ्यास करत असताना आदिवासी समाजाचाही शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करण्यावर भर देते.

## २.३ विषय विवेचन:

या पुस्तकाच्या दुसऱ्या घटकामध्ये आपण भारतातील आदिवासी समाज याबाबतची महत्वपूर्ण मुद्दे अभ्यासणार आहोत यामध्ये प्रामुख्याने आदिवासी समाज म्हणजे काय? आदिवासी समाजाचा अर्थ,व्याख्या आणि वैशिष्ट्यांचा अभ्यास आपण करणार आहोत. यासोबतच भारतातील आदिवासींचे सामाजिक जीवन,कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्था यांची वैशिष्ट्ये, भारतातील आदिवासींचे आर्थिक जीवनाची वैशिष्ट्ये, भारतातील आदिवासींच्या धार्मिक जीवनामधील श्रद्धा आणि कर्मकांड, धर्माचरण इत्यादींचा अभ्यास आपण या घटकांमध्ये करणार आहोत. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणास आदिवासी समाजाची संकल्पना शास्त्रशुद्धपणे समजण्यास मदत होईल. यासोबतच भारतातील आदिवासींच्या जीवन बाबतची महत्वपूर्ण आणि शास्त्रशुद्ध माहिती आपल्याला मिळेल.

### २.३.१ आदिवासी समाज: अर्थ आणि वैशिष्ट्ये (Tribal Society: Meaning and Characteristics)

**आदिवासी समाज– व्याख्या:**

विविध मानवशास्त्रज्ञांनी व समाजशास्त्रज्ञांनी आदिवासी समाज हि संकल्पना समजण्यासाठी व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**१. डॉ. डी. एन. मुजुमदार :**

आदिवासी म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या, फक्त विशिष्ट भूप्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह, व्यवसाय या बाबतीत समान निषेधनियमांचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा काही मूल्यांची, विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय.

(Tribe is a collection of families or groups of families bearing a common name, members of which occupy the same territory, speak the same language and observe

certain taboos regarding marriage, profession or occupation and have developed a well assessed system of reciprocity of mutuality of obligations.)

२. **डॉ. रिव्हर्स :**

आदिवासी समूह हा साधा, सरळ, सामाजिक समूह असून त्यातील सदस्य हे एकाच समान बोलीभाषेचा वापर करतात आणि युद्ध वगैरे समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन कार्य करतात.'

(Tribe is a social group of simple kind, the members of which speak common dialect and act together in such common purposes as warfare)

३. **इंपिरिअल गॅझेटियर ऑफ इंडिया :**

समान नाव धारण करणारा, समान बोलीभाषा बोलणारा, एकाच भूभागावर राहणारा आणि पूर्वी जरी आंतर्विवाही असण्याची शक्यता असली तरी आता आंतर्विवाही नसलेल्या कुटुंबांचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय.

(Tribe is collection of families bearing a common name, speaking a common dialect, occupying or professing to occupy a common territory and is not usually endogamous through originally if might have been so.)

४. **गिलीन आणि गिलीन :**

एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा, परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.'

(Any collection of preliterate local groups which occupies a common general, territory, speaks a common language practices a common culture is a tribe)- Gillin and Gillin.

अशाप्रकारे, विविध मानवशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आदिवासी समाजाचा अर्थ समजून घेण्यासाठी काही महत्त्वपूर्ण मुद्दे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

- आदिवासी समाज हा ग्रामीण समाज आणि शहरी समाज यांच्यापेक्षा वेगळा असलेला दिसून येतो
- आदिवासी समाज विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करीत असतो
- आदिवासी समाज हा समान रक्तसंबंधितांचा समूह आहे
- आदिवासी समाजातील सदस्यांची संख्या मर्यादित असते
- आदिवासी समुदायांमध्ये लेखनकलेचा अभाव आढळतो
- प्रत्येक आदिवासी समाजाला स्वतःची अशी वेगळी बोलीभाषा असते

* आदिवासी समाजाची जीवनपद्धती अत्यंत साधी आहे परंतु त्यांच्यामध्ये सामाजिक एकजिनसीपणा दिसून येतो
* आदिवासी समाजामध्ये समान धर्माबाबत श्रद्धा आढळते
* आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था साधी आढळते तसेच यामध्ये मर्यादित तंत्रविद्या दिसून येते
* आदिवासी समाजामध्ये जादूचे अस्तित्व असलेले दिसून येते

आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये:

**१. विशिष्ट भूप्रदेश:**

सर्वसाधारणपणे एकाच आदिवासी जमातीचे वास्तव्य समान भूप्रदेशावर असलेले दिसून येते. कारण त्याच भूप्रदेशावर आपला मालकी हक्क आहे असे ते मानत असतात सर्वसाधारणतः डोंगराळ प्रदेश जंगल अशा विशिष्ट भूप्रदेशावर त्यांचे कायमचे निवासस्थान असते थोडक्यात प्रादेशिक अलगता हे आदिवासी समाजाचे मुख्य वैशिष्ट्य आहे असे मानले जाते

**२. कमी लोकसंख्या:**

ग्रामीण समाज किंवा शहरी समाजाच्या तुलनेमध्ये आदिवासी समाजाची लोकसंख्या कमी असलेली दिसून येते आदिवासी समाजामध्ये लोकसंख्येचे प्रमाण अत्यंत मर्यादित असते.ज्या भूप्रदेशावर आदिम राहतो तो भूप्रदेश मर्यादित असतो. त्यामुळेसामाजीक संपर्कावरही मर्यादा पडतात.

**३. समान नाव:**

प्रत्येक आदिवासी जमातीला तिचे स्वतंत्र असे नाव असते, इतर जमातींत पासून आपला वेगळेपणा आणि स्वातंत्र्य या नावामुळे सूचित होते उदा. भिल्ल, गोंड, वारली इत्यादी

**४. समान संबंधितांचा समूह:**

प्रत्येक आदिवासी जमातींमधील लोक परस्परांना एकमेकांचे रक्तसंबंधित मानतात. याचे मुख्य कारण म्हणजे एकाच समान पूर्वजांपासून त्यांची उत्पत्ती झालेली आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. आणि यामुळेच त्यांच्यामध्ये असणारी आत्मीयता आपुलकी दृढ असलेली दिसून येते.

**५. समान बोलीभाषा:**

प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र अशी बोलीभाषा असलेली दिसून येते. आपले विचार, कल्पना, भावना, मते इत्यादींची देवाण-घेवाण याच बोलीभाषेतून ते करतात. या बोलीभाषेमुळे आदिवासींच्या मधील समूहभावना दृढ अशी टिकून राहते. तसेच इतर आदिवासी जमातींपासून त्यांचा सांस्कृतिक वेगळेपणा टिकून राहतो, असे दिसून येते.

### ६. लेखन कलेचा अभाव:

आदिवासी समाजामध्ये बोलीभाषेचा वापर असला तरीसुद्धा प्रगत समाजाच्या संपर्कात नसल्यामुळे त्यांच्यामध्ये लेखनकलेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये असणारे ज्ञान, कला, धर्म, साहित्य इत्यादींच्या प्रगतीवर मर्यादा असलेल्या दिसून येतात. आदिवासी समाजामध्ये संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असताना प्रामुख्याने लोककथा, लोकगीते, म्हणी, कोडी, उखाणे, वाक्प्रचार, चालीरीती इत्यादींद्वारे संस्कृतीच्या हस्तांतरण होते.

### ७. साधी अर्थव्यवस्था:

साधी अर्थव्यवस्था हेसुद्धा आदिवासी समाजाचे एक महत्त्वपूर्ण असे वैशिष्ट्य मानले जाते.निसर्गाच्या सानिध्यात नेहमी असलेला आदिवासी समाज आर्थिक दृष्ट्या मात्र ग्रामीण आणि शहरी समाजाप्रमाणे सक्षम असलेला दिसून येत नाही. इव्हान प्रिचर्ड यांनी साधी अर्थव्यवस्था हे आदिवासी समाजाचे महत्वाचे लक्षण सांगितले आहे. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे निर्वाह प्रधानता हे मुख्य वैशिष्ट्य असलेले दिसून येते. प्रामुख्याने खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी इत्यादी प्राथमिक क्रिया आदिवासी समाजामध्ये केल्या जातात आणि आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता केली जाते. यासोबतच काही आदिवासी जमातींमध्ये शेती आर्थिक क्रिया केली जात असली तरी सुद्धा हीशेती पारंपारिक आणि प्राथमिक स्वरूपाची असलेली दिसून येते. तसेच वस्तुविनिमयचे सहाय्याने परस्परांच्या आर्थिक गरजांचे निराकरण आदिवासी समाजामध्ये केले जाते. यासोबतच आदिवासींच्या मधील श्रमविभाजन हे लिंगभेदवरती आधारित असलेले दिसून येते. यानुसार कोणती कार्ये पुरुषांनी करायची आणि कोणती कार्ये स्त्रियांनी करायची हे निश्चित झालेले असते.

### ८. मर्यादित तंत्रविद्या:

आर्थिक क्रिया करत असताना खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी व शेती यामध्ये अविकसित साधी जुनी तंत्रे, हत्यारे अवजारांचा वापर या समाजाकडून होत असलेला दिसून येतो. यासोबतच प्रगत समाजाशी संपर्क नसल्याने सांस्कृतिक देवाण-घेवाण पासून हा समाज दूर राहिलेला दिसून येतो. म्हणूनच आदिवासींची अर्थव्यवस्था साधी आहे .तसेच यामध्ये मर्यादित तंत्रविद्या असलेली दिसून येते

### ९. समान धर्मश्रद्धा:

प्रत्येक आदिवासी समाजामध्ये धर्माबद्दलची श्रद्धा दिसून येते. तसेच धार्मिक बाबींविषयी आदिवासींच्या प्रतिक्रिया सामूहिक असतात. निसर्गाच्या सानिध्यात असल्यामुळे निसर्गातील घडामोडी व कार्यकारण संबंध यासाठी फक्त निसर्गच जबाबदार आहे, असा त्यांचा समज असतो. म्हणून निसर्गाबद्दल त्यांना भीतीयुक्त आदर वाटतो. यासोबतच त्यांच्यामध्ये अलौकिक शक्ती विषयी श्रद्धा आढळते. या दृढ श्रद्धेने मधूनच निसर्गपूजा, पूर्वजपूजा, भूतपूजा इत्यादी दिसून येतात.

### १०. जादूचा प्रभाव:

अलौकिक शक्तीवर वर्चस्व प्रस्थापित करून आपल्या इच्छा पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये जादूचे अस्तित्व प्रमुख्याने असलेले दिसून येते. यामध्ये काळी जादू, पांढरी जादू, संपर्कात्मक जादू, अनुकरणात्मक जादू असे विविध प्रकार दिसून येतात.

थोडक्यात, आदिवासी समाजाची संकल्पना समजून घेत असताना विविध मानवशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांनी आपल्या क्षेत्रकार्यपद्धती, निरीक्षण अशा विविध शास्त्रशुद्ध तंत्रांचा वापर करून उपलब्ध केलेल्या माहितीचा आधार घेणे अत्यंत आवश्यक ठरते. थोडक्यात, वरीलप्रमाणे आदिवासी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील. यावरून आदिवासी समाज याबाबतची संकल्पना समजण्यास मदत होईल.

## २.३.२ सामाजिक जीवन: कुटुंब संस्था आणि विवाह संस्था– वैशिष्ट्ये

(Social Life: Family and Marriage- Characteristics)

कोणत्याही समाजाच्या रचनेमध्ये त्या समाजातील सामाजिक संस्थांचे स्थान आणि योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. यामध्ये प्रामुख्याने कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, विवाहसंस्था, शिक्षणसंस्था, राज्यसंस्था इत्यादींचा समावेश करता येईल. मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवत, मानवी सामाजिक  गरज पूर्तीचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून या सामाजिक संस्थांकडे पाहिले जाते. सामाजिक मानवशास्त्रमध्ये आदिवासींच्या शास्त्रशुद्ध अभ्यास आवरती भर दिला जातो आणि आदिवासींच्या संपूर्ण सामाजिक जीवनाचा अभ्यास करत असताना त्यांच्यामधील सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे हे क्रमप्राप्त आणि महत्त्वपूर्ण ठरते .कोणत्याही समाजाचा शास्त्रशुद्धपणे अभ्यास केल्यानंतर त्या समाजातील विविध समस्या ज्ञात होऊन त्या पाठीमागील कारणांचा शोध घेऊन त्यावर ती योग्य उपाययोजना सुचविणे किंवा त्या समाजाच्या बाबतीत सुयोग्य धोरणांचा अवलंब करणे शक्य होते. यासाठीच भारतातील आदिवासी समुदायाचे सामाजिक जीवन, कुटुंबसंस्था, अर्थसंस्था इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर त्यांचा विकास करणे शक्य होईल. भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या नऊ टक्के प्रमाणात आदिवासी राहतात. या आदिवासींना देशाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहामध्ये सामावून घेण्याचे प्रयत्न भारतसरकार आणि विविध सेवाभावी संस्था करत आहेत. आदिवासी संस्कृतीची वैशिष्ट्ये तशीच ठेवून त्यांना आधुनिक काळातील विविध सेवा-सुविधा पुरविणे व त्यांचा विकास घडवून आणणे. हा या पाठीमागील मुख्य हेतू असलेला दिसून येतो.

यामध्ये आपण आदिवासींचे सामाजिक जीवनाचा अभ्यास करणार आहोत, तसेच आदिवासींच्या मधील कुटुंबसंस्था आणि तिची वैशिष्ट्ये, विवाहसंस्था आणि तिची वैशिष्ट्ये इत्यादींचा अभ्यास करणार आहोत.

**भारतातील आदिवासी कुटुंब संस्था आणि वैशिष्ट्ये:**

प्रत्येक मानवी समाजामध्ये कुटुंबसंस्थेचे अस्तित्व असलेले आढळून येते. किंबहुना कुटुंबसंस्थेचे शिवाय मानवी समाजाची जडणघडण होऊ शकत नाही. म्हणून कुटुंबसंस्थेला मानवी समाजामध्ये प्राथमिक आणि मूलभूत सामाजिक संघटन म्हणून ओळखले जाते .चार्लस कूले यांनी कुटुंबाला प्राथमिक समूहाचे स्थान दिलेले आहे. तसेच प्रजोत्पादन आणि बालसंगोपन ही दोन महत्त्वपूर्ण कार्ये कुटुंब संस्थेच्या द्वारे पार पाडली जातात. विवाह संस्थेच्या पायावर कुटुंबसंस्था आधारित असलेलीदिसून येते.

**कुटुंबाची व्याख्या** (Definition of Family)

१. मॅक आयव्हर आणि पेज,

प्रजोत्पादन आणि संततीचे संगोपन यासाठी निश्चित आणि दिर्घकालीन लैंगीक संबंधावर आधारलेला एक समूह म्हणजे कुटुंब होय.

(The family is group defined by sex relationship sufficiently precise and enduring to provide for the procreation and upbringing of children.)

२. प्रा. बिल्स व हॉयजर,

आप्तसंबंधाच्या बंधनांनी एकत्रित आलेल्या सदस्यांचा सामाजिक समुह म्हणजे कुटुंब होय.

(The family may be briefly defined as a social grouping the members of which are united by bonds of kinship.)

३. रॉबर्ट लोई,

विवाहावर आधारलेला सामाजिक घटक म्हणजे कुटुंब होय. ज्यात माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो.

(The family is the social unit based on marriage it includes the Parents andtheir children.)

५. रॉल्फ पिडींग्टन

कुटुंब हा आप्तसंबंधावर आधारलेला मुलभूत व सार्वत्रिक स्वरूपाचा समुह आहे. कुटुंबात एखादा पुरुष, त्याची पत्नी आणि त्याच्यामुळे निर्माण झालेली किंवा दत्तक घेतलेली मुले यांचा समावेश होतो.

(The Basic and universal kinship grouping is the family. It consists of a man his wife and the children resulting from the union or adopted into the family.)

**आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये :**

कोणत्याही समाजातील कुटुंबाची काही मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. सार्वत्रिकता, भावनात्मक बंध, कुटुंबप्रमुख, कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांप्रती उत्तरदायित्वाची भावना, कुटुंबाकडून होणारे सामाजिक नियंत्रण इत्यादी. आदिवासी समाजातील कुटुंब संस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

रॉबर्ट लोई यांनी आपल्या अभ्यासातून स्पष्ट केलेली आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१. कुटुंबाची अस्थिरता** (Instability of Family)

आदिवासी कुटुंबातील घटस्फोटाची सार्वत्रिकता या वैशिष्ट्यामुळेच आदिवासी कुटुंबाची अस्थिरता हे वैशिष्ट्य दिसून येते. कोणत्याही कारणास्तव आणि सहज, सोप्या पद्धतीने घटस्फोट झाल्याने कुटुंबातील पती-पत्नी यांचे नाते संपुष्टात येते. त्यामुळे कौटुंबिक जीवनावर विशेष परिणाम होतो. कुटुंबाच्या स्थिरतेला बाधा येते. कुटुंबातील सदस्यांची रचना बदलते. मुलांचे पितृत्व, मातृत्व बदलते. घटस्फोटीत स्त्री-पुरुष या दोघांनाही पुनर्विवाहाची परवानगी असते व पुनर्विवाहाचे प्रमाणही जलद व वेगाने घडते. त्यामुळे वाढते पुनर्विवाह, बहुविवाहाचे प्रकार यातूनच कुटुंबांच्या स्थिरतेला बाधा येते. कुटुंबाची रचना, मातृ-पितृ भूमिका व मुलांचे नाते या सर्वच गोष्टी दुय्यम बनतात. परिणामी कुटुंबाची अस्थिरता हे आदिवासी कुटुंबाचे वैशिष्ट्य बनते.

**२. श्रमविभाजन :**

आदिवासींच्या आर्थिक जीवनात कुटुंब हा एक घटक म्हणून सहभागी होत असतो. अर्थातच कोणत्याही समाजात कुटुंबातील सदस्यांचा दर्जा हा त्यांनी आर्थिक उत्पादनात कितपत सहभाग घेतला आहे. यावरच आधारित असतो. अर्थोत्पादनासाठी कुटुंब एक घटक म्हणून सहभागी होत असताना पुरुषांनी कोणती कामे करावयाची व स्त्रियांनी कोणती कामे करावयाची? याबाबत आदिवासी समाजात श्रमविभाजन आढळते. आदिवासी जीवनात तर कुटुंबाचा फार मोठा वेळ अर्थोत्पादनात खर्च होत असतो.त्यांच्यात सर्व स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने अर्थोत्पादनात सहभागी होत असतात. त्यात स्त्रियांनी कोणती कामे करावयाची व पुरुषांनी कोणती कामे करावयाची याबाबत परंपरागत प्रथा, सामाजिक रूढी पाळल्या जातात. उदा.भारतामध्ये तोडा जमातीत म्हैशीला पवित्र मानले जात असल्याने स्त्रियांचा म्हैशीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संपर्क येऊ नये म्हणून दूध काढणे, दुधात पदार्थ शिजवणे वगैरे कामे त्यांना करू दिली जात नाहीत. सर्वसाधारणपणे स्त्रियांची नाजूकता, प्रजनन व बालसंगोपनातील स्त्रियांचा निसर्गदत्त अधिकार या गोष्टींचा विचार करून स्त्रियांना कमी कष्टाची, घरात व घराच्या आसपास करता येण्याजोगी कामे दिली जातात. घराची झाडलोट, स्वयंपाक, पाणी भरणे, बागकाम, भरतकाम, शिवणकाम वगैरे. याउलट, शारीरिकदृष्ट्या अधिक मजबूत व धाडसी असलेल्या पुरुषांकडे अधिक कष्टाची, साहसाची कामे सोपविली जातात. उदा. परक्या जमातीपासून संरक्षण अगर लुटालुटीच्या निमित्ताने लढाई करणे, शिकार करणे, मासेमारी करणे, जनावरे पाळणे वगैरे कामे

पुरुषांनाच दिली जातात. जरी एखाद्या आर्थिक क्रियेत स्त्री व पुरुष या दोहोंना सहभागी व्हावयाचे असेल तरीही त्यातदेखील श्रमविभागणी आढळते. त्यातदेखील निश्चितता आढळूनयेते. उदा. ओरिसातील खासिया जमातीत घरे बांधण्याचे काम पुरुषाकडे असते तर स्त्रियांना या घराची देखरेख ठेवावी लागते.

**३. युवागृहे :**

युवागृहांचे अस्तित्व हे आदिवासी समाजाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाते. आदिवासींचे जीवन किती स्वाभाविक व नैसर्गिक आहे याचा आविष्कार आदिवासींच्या युवागृह पद्धतीतून दिसून येतो. आदिवासींत सर्वसाधारणपणे कुटुंबातील विवाहित व्यक्तीपासून अविवाहित व्यक्तींना वेगळे ठेवले जाते. वयात आलेल्या मुलामुलींना संध्याकाळी जेवण झाल्यानंतर घरी न राहता युवागृहात राहावे लागते.

**४. दत्तक प्रथा :**

कुटुंबात ज्याप्रमाणे रक्तसंबंधित आप्तांचा समावेश होतो, त्याचप्रमाणे दत्तक घेतल्या गेलेल्या मुला-मुलींनादेखील कुटुंबात सामावून घेतले जाते. आदिवासींत दत्तकाची प्रथा आढळते. काही आदिवासी जमाती अपत्य असूनदेखील दत्तक घेतात. पॅसिफिक महासागरावरील मरे बेटावरील आदिवासींना दत्तक घेण्यासाठी कोणतेही खास कारण लागत नाही. ज्या आदिवासींत दत्तक घेण्याची प्रथा सर्रास आढळते, तेथील कुटुंबरचनेवर याचा परिणाम होतो. कुटुंबातील सदस्यांत अशा प्रकारे वाढ झाली की कौटुंबिक जीवनाचे स्वरूप देखील बदलते. आदिवासींच्या सामाजिक जीवनावर त्यांच्या या वैशिष्ट्यांचा दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो.

**५. स्त्री-पुरुषांचे विलगीकरण** (Sexual Separation):

अनेक आदिवासी कुटुंबातील विवाहीत स्त्री-पुरुष म्हणजे पती-पत्नी एकमेकांपासून वेगळे राहण्याची प्रथा आहे. या जमातीतून पुरुषांची मंडळे (Clubs) असतात. त्यात स्त्रियांना प्रवेश नसतो. पुरुष आपल्या पत्नीसोबत न राहता त्यांच्यासाठी असलेल्या स्वतंत्र मंडळात राहतात. अशा मंडळातच पुरुष भोजन व शयन करतात. जेवणे व झोपणे या क्रिया मंडळातच पार पडतात उदा. हुपा जमातीत पुरुष केवळ जेवणासाठीच घरी येतात. आदिवासी पुरुषांना अशा पुरुष मंडळांचे सदस्यत्त्व मिळणे त्यात राहणे भुषणावह वाटत असते. अर्थात सर्वच आदिवासीत असे विवाहितांचे विलगीकरण असतेच असे नाही. पण बहुतांशी जमातीत मात्र हे पुरुषांचे विलगीकरण आढळते. यामुळे आदिवासींच्या कौटुंबिक जीवनावर फार दुरगामी परिणाम होतात.

**६. आदिवासी कुटुंबात विविध रचनात्मक प्रकार** (Various structural Types in Tribal Family):

आदिवासी कुटुंबात पुढीलप्रमाणे विविध रचनात्मक प्रकार आढळून येतात. उदा. केंद्र किंवा प्राथमिक अथवा विभक्त कुटुंब (Nuclear or Primary Family), एकत्र किंवा संयुक्त (Joint Family), पितृसत्ताक कुटुंब आणि मातृसत्ताक कुटुंब (Mother right Family), एकविवाही कुटुंब (Monogamous Family), बहुविवाही कुटुंब (Polygamous Family) यातही बहुपत्नी प्रथात्मक

कुटुंबे (Polygynous Family) व बहुपती प्रथात्मक कुटुंबे (Polyandrous Family), अगदीच क्वचित ठिकाणी समुह विवाही कुटुंब (Group Marriage Family) देखील आढळून येतात.

**७. घटस्फोटाची सर्वत्रिकता** (Universality of Divorce)

जवळजवळ सर्वच समाजातून सर्व जमातीतून लोकांना विशिष्ट परिस्थितीत विवाहविच्छेद म्हणजेच घटस्फोट करण्याची परवानगी दिली जाते. घटस्फोट घेण्याच्या या सवलतींचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. त्यामुळे आदिम कुटुंबात विवाह हा एक करार म्हणून पाहतात. अशा प्रकारे आदिवासी कुटुंबाच्या रचनेतील वैशिष्ट्यपूर्णता असून आदिवासी समाज, आदिवासी जमात, प्रदेश कूल या सर्वांची या कुटुंबरचना पद्धतींना मान्यता असते.

थोडक्यात, आदिवासी सामाजीक जीवनाचा अभ्यास करत असताना कुटुंबसंस्थेची व्याख्या आणि वैशिष्टे वरीलप्रमाणे समजावून घेता येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध विकासात्मक धोरणांच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी समाजाचा संपर्क प्रगत समाजाशी येत आहे आणि आदिवासी सामाजिक जीवन, कुटुंबसंस्था यामध्ये परिवर्तन होत असल्याचे दिसुन येत आहे.

**आदिवासी विवाह संस्था: व्याख्या व वैशिष्ट्ये:**

प्रत्येक समाजामध्ये सामाजिक संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावतात. व्यक्तीच्या समाजाच्या विविध गरजा पूर्ती करण्याचे कार्य सामाजिक संस्थांकडून पूर्ण होते. यामध्ये प्रामुख्याने समाजाची रचना आणि विकासाचे महत्त्वाचं कार्य या सामाजिक संस्थांचकडून केले जाते. यामध्ये कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था, अर्थसंस्था, राज्यसंस्था, शिक्षणसंस्था इत्यादींचा समावेश होतो. आदिवासी सामाजिक जीवनाचा अभ्यास करीत असताना आदिवासींच्या सामाजिक संस्था देखील महत्त्वपूर्ण ठरतात. यामध्ये आपण आदिवासींच्या विवाह संस्थेबद्दलची माहिती घेणार आहोत. विवाह ही मानवी जीवनातील एक प्राचीन सामाजिक संस्था आहे. सर्व सामाजिक संस्थांचा पाया आहे कारण विवाहवरच कुटुंब संस्था व समाजाची निर्मिती व अस्तित्व अवलंबून आहे

**विवाह :व्याख्या–**

१. गिलिन यांच्या मते,

स्त्री–पुरुष यांच्यात वैयक्तीक संबंध प्रस्थापित करण्याचा समाजमान्य मार्ग म्हणजे विवाह होय.

२. डॉ. एडवर्ड वेस्टरमार्क यांच्या मते,

एक किंवा अधिक पुरुष आणि एक किंवा अधिक स्त्रिया यांच्या ज्या संबंधाला रीतीरिवाज किंवा कायदा यांची मान्यता असते असे संबंध म्हणजे विवाह होय. हे संबंध संबंधित व्यक्तीच्या व त्यांच्या मुलांच्या बाबतीत काही हक्क व कर्तव्ये निर्माण करणारे असतात.

३. इ. एस. बोगार्डस

विवाह ही स्त्री आणि पुरुषांना कौटुंबिक जीवनात प्रवेश देणारी संस्था आहे.

(Marriage is an Institution for admitting men and women for family life.)

४. व्यक्तीचे वैयक्तीक वर्तन योग्य असावे यासाठी समाजाचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असतात. थोडक्यात, समाजमान्य व योग्य वैयक्तीक संबंधाचा प्रकार म्हणजे विवाहसंस्था होय.

व्यक्तिगत व सामाजिक दृष्टिकोनातून विवाहसंस्थेची आवश्यकता अनन्यसाधारण आहे. म्हणूनच सर्व समाजात विवाहसंस्थेचे अस्तित्व दिसून येते. आदिवासी समाजातही विवाहसंस्थेला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. कोणी, कोणाशी विवाह करावा, केव्हा करावा इत्यादी विवाहाशी संबंधित अनेक नियम आदिवासी समाजात असल्याचे आढळून येते. विवाहविषयक नियमांचे पालन अत्यंत काटेकोरपणे करण्याचा आदिवासींचा कटाक्ष असतो. म्हणूनच आदिवासीच्या विवाहाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक ठरते.थोडक्यात वरील प्रमाणे आणि विवाहसंस्थेची व्याख्या अभ्यासल्यानंतर आदिम विवाह संस्थेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**आदिवासी विवाहाची वैशिष्ट्ये :**

**१. विवाहाची अपरिहार्यता :**

प्रत्येक समाजामध्ये कुटुंबाप्रमाणेच विवाह संस्थेचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजामध्ये ही एक अपरिहार्य बाब मानली जाते. कारण पुरुषांमधील संबंध विवाह या समाजमान्य माध्यमातूनच निर्माण व्हावेत. अशी समाजाची अपेक्षा असते. विवाह हा केवळ वैयक्तिक विषय असून यामुळे दोन कुटुंबे एकत्र येत असतात. तसेच या दोन कुटुंबातील सामाजिक संबंध दीर्घकाळ टिकावेत.अशा वधू आणि वराच्या कुटुंबाची अपेक्षा असते. तसेच भारतातील संथाल आदिवासी जमाती मध्ये असे दिसून येते की, अविवाहित व्यक्तीचा उपहास केला जातो. आदिवासींमध्ये प्रामुख्याने स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंध हे विवाह या समाजमान्य माध्यमातूनच प्रस्थापित व्हावेत अशी आदिवासींची इच्छा असते. अन्य लोकांप्रमाणेच विवाह ही व्यक्तीसाठी आवश्यक बाब आहे असे आदिवासी मानतात.

**२. विवाह एक करार दृष्टिकोन :**

विवाह हा दोन कुटुंबे एकत्र आणणारा करार आहे असा आदिवासींचा विवाहाबाबतचा दृष्टिकोन आहे. परंतु काही ठराविक कारणांसाठी विवाहसंबंध विच्छेदास म्हणजेच घटस्फोटास अनेक आदिवासी जमातींमध्ये मान्यता दिली जाते. आदिवासी जमातीमध्ये घटस्फोट घेणे समाजमान्य समजले जाते. अनेक आदिवासी जमातींमध्ये पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही घटस्फोट घेण्याची सवलत उपलब्ध असते. अदिवासी जमातींमध्ये घटस्फोटित व्यक्ती पुन्हा विवाह करू शकते. आदिवासींचा विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, बऱ्याच प्रमाणात 'विवाह हा दोन कुटुंबामधील एक करार आहे.' असा आहे.

**३. बालविवाहाचे कमी प्रमाण :**

भारतातील बहुसंख्य आदिवासी जमातीमध्ये बालविवाहाची प्रथा नाही. आदिवासी जमातींमध्ये प्रौढ विवाहाची प्रथा असल्याचे दिसून येते. परंतु काही आदिवासी जमातींमध्ये बालविवाहाची प्रथा दिसून येते.उदा. संथाल, मुंडा या आदिवासी जपातींमध्ये बालविवाहाची प्रथा आहे. तथापि बालविवाहाची प्रथा असणाऱ्या आदिवासी जमातींची संख्या कमी आहे.

**४. विवाहविषयक नियम :**

आदिवासी जमातीमध्ये विवाह विषयक विविध नियमांचे पालन करणे आवश्यक मानले जाते. आदिवासी समाजात व्यक्तीने केव्हा विवाह करावा? त्याचप्रमाणे जोडीदार निवडतांना कोणते नियम पाळावे? याबाबत विविध निकष आदिवासींमध्ये केलेले आहेत. उदा. आंतर्विवाह व बहिर्विवाह विवाहविषयक नियम अशाप्रकारे आदिवासींमध्ये आहेत. तसेच आपल्या नात्यातील कोणत्या विशिष्ट व्यक्तीशी लग्न करावे यासंबंधीचे नियम आदिवासी समाजात आहे..

व्यक्तीने कोणत्या वयात विवाह करावा, आपला जोडीदार कसा निवडावा इत्यादी बाबीशी संबंधित नियमांचे अस्तित्व आदिवासी समाजात आहे. आदिवासींमध्ये विवाह नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तीला शासन केले जाते. घटस्फोट देखील काही ठराविक पद्धतीने घेण्याची प्रथा आदिवासींमध्ये आहे .

**५. विवाहपूर्व संबंध :**

काही आदिवासी जमातींमध्ये युवागृहात अथवा शयनगृहात युवक व युवतींना लैगिंक संबंध ठेवण्यास अनुमती दिली जाते. कोण्याक नागा जमातीमध्ये लग्नापूर्वी झालेल्या मुलाला घेऊन स्त्री आपल्या पतिगृही येऊ शकते. अशा प्रकारे विवाहपूर्व संबंधांबाबत आदिवासी उदारवादी असले तरीही सामान्यपणे विवाहबाह्य संबंध मान्य केले जात नाहीत. विवाहानंतर स्त्रीने आपल्या पतीशी एकनिष्ठ रहावे अशीच अपेक्षा सर्वसाधारण आदिवासी जमातींमध्ये आढळून येते. आदिवासी विवाहाच्या वैशिष्ट्यांवरून आदिवासी समाजातील विवाह संस्थेचे स्वरूप स्पष्ट होते.

६. **अंतर्विवाह** (Endogamy) **व बहिर्विवाह** (Exogamy)

अंतर्विवाह म्हणजे एखाद्या विशिष्ट समूहातील व्यक्तींनी त्या समाजातील व्यक्तींची विवाह करण्याची प्रथा म्हणजे अंतर्विवाह होय.

एखाद्या विशिष्ट समूहातील व्यक्तींनी त्या समूह बाहेरील व्यक्तीशी विवाह करणे म्हणजे समूह बाहेरील व्यक्ती बरोबर विवाह करणे असा नियम असतो या पद्धतीला बहिर्विवाही असे म्हणतात.

**७. वधूमूल्य:**

आदिवासी समुदायामधे वधूमूल्य ही महत्वपूर्ण संकल्पना दिसून येते. आदिवासी समुदायांमध्ये विवाहावेळी वधुपक्षाला, वर पक्षाकडून काही विशिष्ट रक्कम किंवा वस्तू दिली जाते त्यास वधूमूल्य असे

म्हणतात. याउलट प्रगत समाजामध्ये वधु पित्याकडून वर पक्षाला विशिष्ट रक्कम किंवा वस्तू दिली जाते याला हूंडा असे म्हणतात.

भारतातील आदिवासी समुदायातील प्रामुख्याने संथाल हो गोंड नागा खासी या भिल्ल कोळी वारली कातकरी ठाकूर इत्यादी विविध आदिवासी जमातींमध्ये वधूमूल्य प्रथा दिसून येते

वधूमूल्य देण्याचे प्रमुख कारण म्हणजे आदिवासी समुदायांमध्ये वधूपित्याला प्रचलित प्रथम असा काहीतरी मोबदला देऊन वर पित्याने आपल्या मुलासाठी वधू आणावी असा नियम प्रचलित आहे कारण आदिवासी समाजामध्ये कुटुंबातील स्त्री ही उपयुक्त अशी व्यक्ती मानली जाते प्रमुख्याने घर काम अर्थोत्पादन जननक्षमता इत्यादी कारणांमुळे स्त्री ही कुटुंबाची संपत्ती मानली जाते व ही स्त्री स्वरूपातील संपत्ती वर पक्षाच्या घरी देताना वधूपित्याला होणारे नुकसान भरून काढण्यासाठी वर पक्षाने वधूपित्याला कोणत्यातरी स्वरूपामध्ये हे मूल्य द्यावे यासाठी ही प्रथा सुरू झालेली दिसून येते विशेष म्हणजे या वधूमूल्याला आदिवासी समाजामध्ये मान्यता असते वधूमूल्य देऊन म्हणजेच रूढ संप्रदायानुसार होणारे विवाह मध्ये काही प्रकार दिसून येतात तसेच वधूमूल्य देऊ न शकणाऱ्या म्हणजेच रूढ संप्रदायानुसार नसलेल्या पद्धती वरून वधू मिळविण्याके प्रकार दिसून येतात.

**विवाहाचे प्रकार**

आदिवासी सामाजिक जीवन अधिकचे समजून घेण्यासाठी आदिवासी विवाहाचे प्रकार पुढीलप्रमाणे थोडक्यात पाहूयात.

अ) रूढ संप्रदायानुसार पद्धती

ब) रूढ संप्रदायानुसार नसलेल्या पद्धती

या दोन विवाहप्रकारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे पाहूयात.

अ) रूढ संप्रदायानुसार पद्धती

आदिवासी समुदायांमध्ये वर पक्षाकडून वधू पक्षाला विशिष्ट स्वरूपामध्ये योग्य मोबदला म्हणजेच वधूमूल्य द्यावे लागते वधूमूल्य देण्याची प्रथा कोणत्या प्रकाराने पूर्ण केले जाते, यानुसार त्या विवाहाचे पुढील तीन प्रकार दिसून येतात

१. क्रय विवाह (Marriage by Purchase)

२. सेवा विवाह (Marriage by Service)

३. विनिमय विवाह (Marriage by Exchange)

**१. क्रय विवाह** (Marriage by Purchase)

प्रामुख्याने आदिवासी समाजामध्ये सन्मानाने वधूमूल्य देऊन विवाह करण्यासाठीची जी पद्धती आहे तिला क्रय विवाह असे म्हटले जाते भारतातील संथाल, हो, नागा, कुकी, भिल्ल, कोळी, गोंड, कातकरी, वारली, ठाकूर इत्यादी आदिवासी जमातींमध्ये विवाहाची पद्धती दिसून येते. वारली जमाती मध्ये वधूमूल्य आहे. प्रामुख्याने धान्य, रक्कम, कपडे, भांडी, दागिने इत्यादी स्वरुपात देण्यात येते. थोडक्यात, आपली मुलगी इतर घरांमध्ये देणे वधूपित्याला नुकसानीचे ठरते. ही नुकसान भरपाई म्हणुन वधूपित्याला वधूमूल्य दिले जाते. कारण स्त्रीला होणाऱ्या संततीचा फायदा वर पक्षाला होणार असतो. बांटू जमातीमध्ये वधूमूल्य आहे. पशु जनावरांच्या स्वरूपामध्ये दिले जाते त्याला लोबोला असे म्हणतात.

**२. सेवाविवाह**

आदिवासी समाजामध्ये सर्वांनाच वधूमूल्य हे रोख रक्कम भांडी दागिने इत्यादी स्वरूपात देऊन वधू मिळविणे शक्य होत नाही, तेव्हा इतर स्वरूपामध्ये वधूमूल्य दिली जाते. उदाहरणार्थ सेवा विवाहामध्ये वराला वधूच्या घरी सेवा करून तिच्या वडिलांच्या संमतीने विवाह करता येतो याला सेवा असे म्हणतात. यावेळी वराला जी कामे सांगितली जातात ती सर्व कामे वराला उत्तम रीतीने पूर्ण करावी लागतात. थोडक्यात, हा कालावधी म्हणजे वराचा परीक्षेचा कालावधी समजला जातो. वराचे एकूण काम आणि स्वभाव त्याला पसंत पडल्यानंतरच त्याचा विवाह करून दिला जातो. उत्तर भारतातील बिरहोर जमातीमध्ये वधूपिता होणार, यावर आला वधूमूल्य ची रक्कम कर्ज स्वरूपात देतो आणि ही रक्कम वराकडून सेवा काळामध्ये हप्त्याने फेडून घेतो.

**३. विनिमय विवाह**

आदिवासी समाजामध्ये विनिमय विवाह हा एक मुख्य प्रकार आढळतो. यालाच साटेलोटे विवाह असेही म्हणतात या विवाह मध्ये प्रामुख्याने दोन्ही घरच्या वरांना वधूमूल्य द्यावे लागत नाही कारण या विवाह प्रकारात मध्ये आपल्या घरची मुलगी दुसऱ्या घरी दिली जाते त्याच वेळी त्या घरची मुलगी आपल्या घरी सुन म्हणून केली जाते. भारतामध्ये केरळ मधील काही आदिवासी जमातींमध्ये ही पद्धती लोकप्रिय आहे उदाहरणार्थ इरुलार, विश्वान, उरली, कुरियन, उल्लतन, मलपंदरम इत्यादि.

**ब) रूढ संप्रदायानुसार नसलेल्या पद्धती**

रूढ़ संप्रदायानुसार असलेल्या पद्धतीमध्ये वधू पित्याला वधूमूल्य मिळते. परंतु बऱ्याच वेळा रूढ़ संप्रदायानुसार वधूमूल्य न देता इतर पद्धतीने विवाह केला जातो, तेव्हा अशा पद्धतीला रूढ संप्रदायानुसार नसलेल्या पद्धती असे म्हणतात या पद्धतीला आदिवासी समाजामध्ये मान्यता असतेच असे नाही. परंतु या पद्धतीने विरोधही केला जातो असे नाही. यामध्ये पुढील विवाह प्रकार दिसून येतात.

१) अपहरण विवाह (Marriage by Capture)

२) परीक्षण विवाह (Marriage by Trial)

३) सहपलायन विवाह (Marriage by Elopement)

४) हठागमन विवाह/अनादर विवाह (Marriage by Mitual Intrusion)

५) पारस्पारिक संमती विवाह (Marriage by Mitual Consent)

**१) अपहरण विवाह** (Marriage by Capture)

या प्रकारच्या विभागांमध्ये वधूचे अपहरण करून विवाह केला जातो. त्यामुळे वधूपित्याला कोणत्याही प्रकारचा मोबदला किंवा वधूमूल्य मिळत नाही. मॅकलेनन या मानवशास्त्रज्ञाच्या मते, अपहरण विवाह ही सर्वात प्राचीन विवाह पद्धती आहे. विवाह संस्थेच्या विकासातील वधू मिळवण्याची ही सर्वात पहिली अवस्था आहे असे त्यांचे मत आहे.

**२) परीक्षण विवाह**

काही आदिवासी जमातीमधे वराला ठराविक कसोटी किंवा परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतात त्यानुसार होणाऱ्या विवाहास परीक्षण विवाह असे म्हणतात. उदाहरणार्थ महाराष्ट्र मध्ये कोळी जमातीमध्ये वराला खवळलेल्या समुद्रामध्ये आपली नाव घेऊन जाऊन मोठ्यातला मोठा मासा पकडून आणायचा असतो.

**३) सहपलायन विवाह** (Marriage by Elopement)

वधू-वरांनी एकमेकांच्या संगनमताने परंतु आपल्या कुटुंबियांच्या मनाविरुद्ध केलेल्या विवाहाला सहपलायन विवाह असे म्हणतात. उदाहरणार्थ भारतातील छोटा नागपूर मध्ये हो जमात मध्ये हा प्रकार दिसून येतो

**४) हठागमन विवाह/अनादर विवाह** (Marriage by Mitual Intrusion)

या विवाहामधे होणारी वधु स्वतः पुढाकार घेते आणि ती वराच्या घरच्यांकडे विवाहाचा हट्ट धरते. कितीही अपमानास्पद वागणूक केली किंवा छळ केला तरीही ती तरुणी आपल्या निर्णयावर ती ठाम राहते त्यानंतर त्यांच्या विवाहासाठी संमती मिळते भारतामधील कमार, हो, मुंडा या आदिवासी जमाती मध्ये या प्रकारच्या विवाहाची पद्धती दिसून येते. तसेच महाराष्ट्रामध्ये ठाणे जिल्ह्यातील वारली आणि विदर्भामधील कोरकू जमातीमध्ये अशा प्रकारची पद्धती दिसून येते. महाराष्ट्र मध्ये मराठी भाषेत अशा विवाह घरघुशी विवाह असे म्हणतात. हो आणि बिरहोर जमातीमध्ये या प्रकारच्या विवाहाला अनादर विवाह असे मानतात

**४. पारस्पारिक संमती विवाह** (Marriage by Mutual Consent)

आदिवासी समाजामध्ये प्रमुख्याने युवाग्रहासारख्या संस्थांच्या मुळे तरुण-तरुणींना एकत्रित येण्यासाठीचे तसेच आपले विचार कल्पना मांडण्याची ठिकाण मिळते यावेळी त्यांना स्वतःचा जोडीदार शोधण्याची मोकळीक युवा ग्रहांमध्ये मिळते वधू आणि वराच्या परस्पर संमतीने झालेल्या विवाहास पारस्परिक संमती विवाह असे म्हणतात. उदाहरणार्थ गोंड जमातीमध्ये अशा प्रकारची विवाह पद्धति आढळून येते.

### ५. अधिमान्य विवाह

आदिवासी समाजामध्ये विशिष्ट नात्यातील किंवा समूहातील व्यक्तींमध्ये होणाऱ्या विवाहांना समाजाची मान्यता असते तसेच आपल्या नात्यातील विशिष्ट व्यक्तींसोबत विवाह करण्यासाठी विशेष अधिकारही मिळालेले असतात. अशा पद्धतीला प्राधान्य देणाऱ्या नियमानुसार किंवा प्रथम नुसार होणारे विवाहाला अधिमान्य विवाह असे म्हणतात. या प्रकारच्या विवाहाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केलेले दिसून येते.

१) आते-मामे भावंडांचा विवाह (Cross Cousin Marriage)

२) चुलत अगर मावस भावंडांचा विवाह (Parallel Cousin Marriage)

३) दीर-भावजय विवाह (Levirate)

४) मेहुणा-मेहुणी विवाह (Sororate)

आदिवासी सामाजील जीवन समजून घेण्यासाठी विवाह संस्थेची संकल्पना आणि आदिवासी विवाहाची वैशिष्टे अभ्यासाने महत्वपूर्ण ठरते.अशाप्रकारे आदिवासी सामाजिक जीवनामधील विवाह संस्था ही अत्यंत महत्त्वाची संस्था असून त्या संस्थेची व्याख्या व वैशिष्ट्ये आणि आदिवासी विवाहाचे प्रकार थोडक्यात वरील प्रमाणे आपणास स्पष्ट करता येतील. आदिवासी समाजामध्ये विवाहविषयक नियमांचे पालन अत्यंत काटेकोरपणे करण्याबाबतचा कटाक्ष दिसतो.

## २.३.३ भारतातील आदिवासी समाज – आर्थिक जीवन वैशिष्ट्ये

(Economic Life: Characteristics)

आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला आवश्यक त्या वस्तूंचे संकलन उत्पादन वितरण व उपभोग आदी विविध स्वरूपाच्या क्रिया सतत करावे लागतात. या सर्व क्रियांचा समावेश आर्थिक क्रियांमध्ये होतो या ठिकाणी आपण आदिवासींच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करत असताना आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**मदन आणि मुजुमदार** यांच्या मते, ''मानवाच्या रोजच्या जीवनातील अत्यावश्यक गरजांचे कमीत-कमी श्रमात निराकरण करण्यासाठी क्रमबद्ध रित्या संघटित केलेली व्यवस्था म्हणजे आर्थिक व्यवस्था किंवा आर्थिक संघटन होय.'' थोडक्यात, आदिवासींच्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत पुढील वैशिष्ट्ये आपणास मांडता येतील

### १. निर्वाह प्रधानता:

आदिवासी समाजाचा जास्तीत जास्त संपर्क निसर्गाशी येत असल्याने तसेच निसर्गातच वास्तव्य करीत असल्यामुळे सहाजिकच निसर्गात उपलब्ध असणाऱ्या साधनांचा शोध घेऊन ती साधने मिळवून त्यावरती उदरनिर्वाह केला जातो. प्रमुख्याने आदिवासींच्या आर्थिक क्रियेचे मुख्य उद्दिष्ट हे उदरनिर्वाहासाठी आवश्यक

असणाऱ्या गरजा पूर्ण करणे असे असते, म्हणून निर्वाह प्रधानता हे आदिवासी अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

**२. साधी तंत्रविद्या:**

**ईव्हान प्रीचर्ड** यांच्या मते, साधी तंत्रविद्या हे आदिवासी यांच्या आर्थिक जीवनाचे प्रमुख लक्षण आहे. प्रामुख्याने आदिवासी समाजातील सदस्य आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळाचा वापर करतात. आपल्या दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी उदा. खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी, काही प्रमाणात शेती करण्यासाठीची तंत्रविद्या अत्यंत साधी असलेली दिसून येते.

**३. मर्यादित उत्पादन:**

प्रामुख्याने निर्वाहप्रधानता आणि तंत्रविद्यात्मक साधनांचा अभाव असल्याने आदिवासींचे उत्पादन हे मर्यादित स्वरूपाचे असलेले दिसून येते. प्रामुख्याने आदिवासींची शेती करण्याची पद्धत ही स्थलांतरित शेती पद्धती असल्याने त्यातून मिळणारे उत्पादन अत्यंत अपुरे असते. याच शेतीला झुम प्रकारची शेती असेही म्हटले जाते. खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी, शेती या सर्व क्रिया मागासलेल्या पद्धतीने किंवा पारंपरिक पद्धतीने केल्यामुळे त्यातून मिळणारे उत्पन्न कमी असते, तसेच यातून नफा हे उद्दिष्ट नसते, असे दिसून येते.

**४. बाजारपेठेचा अभाव:**

बाजारपेठेचा अभाव हेसुद्धा आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य असलेले दिसून येते. कारण आदिवासींचे उत्पादन हे मर्यादित स्वरूपात असल्याने या सोबतच निर्वाह प्रधानता हे त्यांच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये असल्याने कोणत्याही वस्तूंचे उत्पादन साठविणे किंवा विकणे किंवा त्यामधून नफा मिळविणे हे मुख्य उद्दिष्ट नसते. प्रामुख्याने जत्रा,उत्सव, सण-समारंभ अशावेळी वस्तूंची देवाण-घेवाण होते. परंतु नियमित बाजारपेठा आदिवासी समाजामध्ये आढळून येत नाहीत.

**५. वस्तू विनिमाय पद्धती:**

आदिवासी समुदायांमध्ये प्रामुख्याने वस्तुविनिमय पद्धती आढळून येते. तसेच विनिमयाच्या माध्यमांमध्ये पैशाचा अभाव त्यांच्यामध्ये दिसून येतो. दैनंदिन जीवन जगत असताना आपला उदरनिर्वाह चालावा यासाठी आपल्याकडे उपलब्ध असणारी धान्य, फळे खाणे योग्य इतर वनस्पती, प्राणी, मासे इत्यादी नाशवंत वस्तूंची देवाण-घेवाण ते एकमेकांमध्ये करीत असतात. तसेच नाणी किंवा कागदी चलनाच्या स्वरूपातील पैशाची त्यांना फारशी गरज भासत नाही.

**६. जादू आणि धर्माचा प्रभाव:**

निसर्गातील प्रत्येक घडामोडी च्या पाठीमागे अलौकिक शक्ती हे कारण आहे असे आदिवासींचे मानने असते. त्यामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये धर्म आणि जादू यांचे अनन्यसाधारण महत्त्व असलेले दिसून येते. धर्मावरती आदिवासींची नितांत श्रद्धा असते तसेच आर्थिक क्रिया यशस्वीरित्या पूर्ण होणे किंवा न होणे

यासाठी सुद्धा अलौकिक दैवी शक्तीची कृपा आपल्यावर असणे आवश्यक आहे,असे त्यांचे मानने असते म्हणून प्रसंगी अशा अलौकिक दैवी शक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी धर्म आणि जादूटोण्याचा वापर आदिवासींच्या कडून केला जातो. यासाठी विविध धार्मिक पूजा-अर्चा,कर्मकांड इत्यादी केले जाते

### ७. श्रमविभाजनाचे निकष:

प्रामुख्याने आदिवासी समाजातील श्रमविभाजन हे लिंगभेदावर आधारित असते. म्हणजेच पुरुषांनी करावयाची कामे वेगळी आणि स्त्रियांनी करावयाची कामे वेगळी असे वर्गीकरण झाले असते आणि या नियमांचे पालन परंपरेने प्रत्येक पिढीमध्ये केले जाते. तसेच वयावरती आधारित सुद्धा श्रमविभाजन आदिवासींच्या मध्ये असलेले दिसून येते. यामध्ये विशिष्ट प्रकारच्या आर्थिक क्रिया मध्ये मोठ्या लोकांनी वयाने मोठे असणाऱ्या लोकांनी कोणती कामे करायची? तर वयाने लहान असणाऱ्या लोकांनी कशा पद्धतीने कामे करायची? हे परंपरेने ठरवून दिलेले असते.

### ८. विशेषीकरणचा अभाव:

**मदन आणि मुजुमदार** यांच्या मते, आदिवासींच्या मध्ये नवीन शोध अत्यंत मंद आणि क्वचित आढळणारी गोष्ट आहे म्हणून आदिवासी समाजामध्ये विशेषीकरण दिसून येत नाही. प्रगत समाजाप्रमाणे प्रत्येक गोष्टीत असणारे विशेषीकरण आदिवासींच्या मध्ये आढळत नाही.

### ९. आर्थिक जीवनातील सामुदायिकता:

आदिवासी समाजामध्ये प्रामुख्याने मर्यादित लोकसंख्या असते तसेच त्यांच्या त्यांच्यामधील विविध आर्थिक प्रश्नांची सोडवणूक सामूहिक प्रयत्नांमधून केली जाते. तसेच निर्वाहप्रधानता हे मुख्य उद्दिष्ट असल्याने त्यात या जमाती मधील सर्व सदस्यांची गरज पूर्तीकडे संपूर्ण समाजाचे लक्ष असते. थोडक्यात, आदिवासींच्या मध्ये असलेली सामूहिकता आणि एकता यामुळे आर्थिक जीवन सामुदायिक स्वरूपाचे असते. सर्व प्रकारच्या आर्थिक क्रिया उदा. खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी, शेती या सर्व क्रिया मध्ये परस्परांचे सहकार्य केले जाते आणि मिळणारे उत्पादनाचे विभाजन सुद्धा केले जाते.

### १०. अर्थव्यवस्थेमधील समानता आणि स्थिरता

थोडक्यात, आदिवासींची अर्थव्यवस्था ही ग्रामीण किंवा शहरी समाजापेक्षा वेगळी असलेली दिसून येते आणि आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे एक मूलभूत वैशिष्ट्य म्हणून त्यांचा अर्थव्यवस्थेमधील समानता आणि स्थिरता असेच सांगता येईल.

### ११. जंगल संपत्तीचा ऱ्हास:

प्रामुख्याने आदिवासींच्या संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असताना तसेच बदलत्या काळानुसार परिवर्तन होत असताना आपल्या गरज पूर्तीसाठी प्रमुख्याने कारण स्थानांतरित शेती करीत असताना जंगल संपत्तीचा नाश होऊन पर्यावरणावरती त्याचा परिणाम होत आहे.

थोडक्यात, आदिवासी समाजाची आर्थिक जीवन समजून घेताना वरील मुद्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. आदिवासी अर्थव्यवस्था साधी आणि अप्रगत दिसून येते. प्रामुख्याने प्रगत समाजापेक्षा आदिवासी समाजामध्ये संपत्तीची संकल्पना वेगळी असलेली दिसूनयेते.

## २.३.४ आदिवासी धार्मिक जीवन: श्रद्धा आणि कर्मकांड/ धर्माचरण

(Religious Life: Beliefs and Practices)

धर्मसंस्था ही सार्वत्रिक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे सर्व समाजामध्ये धर्मसंस्था आढळून येत असल्याचे दिसून येते आदिवासी धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी तसेच आदिवासींची धार्मिक जीवन समजून घेण्यासाठी त्यांच्यामधील धर्मश्रद्धा आणि धर्माचरण म्हणजेच धार्मिक विश्वास श्रद्धा व कर्मकांड विधी धर्माचरण इत्यादींबाबतचे विवेचन करणे क्रमप्राप्त ठरते. धर्म ही श्रद्धा आणि विधी यांची एक व्यवस्था आहे.

**धर्माची व्याख्या:**

वेगवेगळ्या मानवशास्त्रज्ञांनी धर्माच्या व्याख्या पुढीलप्रमाणे मांडल्या आहेत.

१. एडवर्ड टायलर,

धर्म म्हणजे दिव्यप्राण्यांवरील श्रद्धा होय.

२. पी. गिस्बर्ट,

धर्म म्हणजे मानवाचे अलौकिक प्राण्याशी असलेले संबंध व त्यांवरील त्याचे अवलंबन होय.

३. आर. एन. मुखर्जी,

धर्म म्हणजे कोणत्याना कोणत्या तरी प्रकारच्या अतिमानवी किंवा अलौकिक अथवा परासामाजिक शक्तीवर श्रद्धा होय. या श्रद्धेचा आधार भय, पूज्यभाव, शक्ती आणि पावित्र्याची कल्पना नसून ती प्रार्थना, पूजा अगर समर्पण यांतून व्यक्त होत असते.

४. सर जेम्स फ्रेझर,

मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तीची आराधना म्हणजे धर्म होय. या शक्ती मानवी जीवन व निसर्गक्रम निर्देशित व नियंत्रित करतात, अशी मानवाची श्रद्धा असते.'

५. मलीनोस्की,

धर्म ही जशी क्रियापद्धती आहे तशी श्रद्धा पद्धतीदेखील आहे. समाजशास्त्रीय घटनेप्रमाणेच तो एक वैयक्तिक अनुभवही आहे.

**आदिवासींच्या धर्मश्रद्धा** (Beliefs)

आदिवासींच्या जीवनामध्ये निसर्गाला सर्वात महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. निसर्गातील घडणाऱ्या सर्वच घडामोडींच्या पाठीमागील कार्यकारण संबंधांचे आकलन न झाल्याने या सर्व घडामोडींच्या पाठीमागे अलौकिक शक्ती किंवा दिव्य शक्ती आहे, असे त्यांचे मानणे आढळते. म्हणून धर्माचा संबंध अलौकिक किंवा दिव्य शक्तीची आहे. या दिव्य शक्तीच्या स्वरूपाबाबत वेगवेगळ्या धर्मांमध्ये वेगवेगळ्या श्रद्धा, विश्वास, कर्मकांड आढळतात. या विश्वासालाच धर्मश्रद्धा म्हणतात. आदिवासींच्या मध्ये प्रामुख्याने पुढील धर्मश्रद्धा आढळतात.

१. सर्वात्मवाद

२. शक्तीवाद

३. निसर्गवाद (Naturalism)

४. कुलप्रतिकवाद (Totemism)

१. सर्वात्मवाद (nimism)

प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ एडवर्ड टायलर यांनी सर्वात्मवाद हा विचार मांडला यालाच आत्मावाद किंवा सजीवत्ववाद म्हटले जाते.

थोडक्यात, या धर्म श्रद्धेची मध्यवर्ती कल्पना म्हणजे अविनाशी स्वरूपाचा आत्मा निसर्गामध्ये अस्तित्वात आहे हा आत्मा मानवी शरीर, पशुपक्षी, वनस्पती इत्यादींमध्ये असतो अशी आदिवासींची श्रद्धा असते.

आदिवासींच्या मनामध्ये आत्म्या बद्दलची संकल्पना कशा पद्धतीने निर्माण झाली असावी याबाबतचे स्पष्टीकरण एडवर्ड टायलर यांनी केलेले दिसून येते मानवाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये निसर्गातील काही घटना मानवाच्या आकलना बाहेरील होत्या. या आणि अशा घटनांचा अर्थ लावत असताना मानवाच्या मनामध्ये आत्म्याची कल्पना रूढ झाली. उदाहरणार्थ आपल्या आवाजाचे प्रतिध्वनी ऐकू येणे, स्वतःची सावली दिसणे, स्वतःचे प्रतिबिंब पाण्यामध्ये दिसणे, अचानक मृत्यू येणे इत्यादी.

म्हणजेच प्रत्येक जिवंत व्यक्तीच्या शरीरामध्ये आत्मा असतो आणि हा आत्मा जोपर्यंत त्या व्यक्तीच्या शरीरामध्ये असतो तोपर्यंत ती व्यक्ती सचेतन असते हा आत्मा व्यक्तीच्या शहरांमधून निघून गेल्यानंतर व्यक्तीचा मृत्यू होतो असे मानले जातेपा मूलतत्वासच आत्मा असे म्हटले गेले. एखाद्या व्यक्तीचा आत्मा तिला कायमचा सोडून गेला की, तात्पुरता सोडून गेला हे ठरविण्यासाठी काही जमातीत एखादी व्यक्ती मरण पावली तरी तिच्या देहावर लगेच अत्यविधीकरीत नाहीत, तिचा आत्मा शरीरात परत येण्याची काही काळ वाट पाहतात. मात्र तो परत येत नाही हे काही काळाने लक्षात आल्यावर त्या देहावर अंत्यविधी करतात. स्वप्न व मृत्यूप्रमाणेच प्रतिध्वनी, प्रतिबिंब इत्यादी घटनांच्या अनुभवाने आदिमानवाची आत्म्याच्या

अस्तित्वावरील श्रध्दा अधिक बळकट झाली. एकंदरीत मानवाच्या सुखदुःखात दिव्य प्राणी किंवा अलौकिक शक्ती जबाबदार असल्याने मानव त्यांची कृपा संपादन करण्यासाठी व त्यांची अवकृपा टाळण्यासाठी त्यांची पूजाअर्चा करू लागला. यातूनच वेगवेगळे धार्मिक विधी किंवा कर्मकांड उदयास आले. अशाप्रकारे आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रध्देतून मानवी जीवनात धर्मांचा उदय झाला. असे मत एडवर्ड टायलर यांनी मांडलेले आहे. त्यांच्या या मतासच 'सर्वात्मवाद' म्हणतात, आणि 'धर्म म्हणजे दिव्यप्राण्यांवरील श्रध्दा' (belifs in spiritual beings) होय. अशी धर्माची व्याख्या करतात.

**१. सर्वात्मवादाचे परीक्षण :–**

एडवर्ड टायलर यांच्या सर्वात्मवादाचे पुढीलप्रमाणे परीक्षण करता येईल

१. आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रध्दा ही जगातील सर्वच आदिवासी जमातींमध्ये आढळून येत नाही म्हणून सर्वात्मवाद ही श्रध्दा सार्वत्रिक नाही.

२. मॅरेट यांच्या मते, अनेक जमातीत आत्म्याऐवजी इतर शक्ती वरील विश्वास आढळतो उदा. मॅलेनेशिया बेटावरील आदिवासी, भारतातील हे आणि मुंडा या जमाती आत्म्याऐवजी माना किंवा बोंगा नावाच्या शक्तीवरील आढळते.

३. टायलरच्या मते, सर्वात्मवाद धर्माचे प्रारंभिक रूप आहे. पण रॉबर्ट लोवी यांच्या मते, धर्म व सर्वात्मवाद या दोन्ही बाबी एकसारख्या नाहीत.

४. टिकाकारांच्या मते, टायलर यांनी आदिम जमातीचे अनुभवजन्य निरीक्षण न करता सर्वात्मवादाची मांडणी केलेली आहे. त्यामुळे त्यांचा सिद्धांत हा वास्तविक ठरत नाही. तसेच त्यांनी सर्वात्मवादाचे केलेले विवेचन हे खूपच तर्कशुध्द आहे. आदिमानव एवढा तर्कशुध्द विचार करीत नसावा.

५. दुर्खाइमच्या मते, धर्म ही सामाजिक घटना असल्याने तिचा उदय समाजात शोधला पाहिजे. सर्वात्मवाद धर्माच्या उदयामागील सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे तो स्वीकारता येत नाही.

एडवर्ड टायलर हा विकासवादी विचारवंत होता. बहुदेवापासून एकदेववादाकडे धार्मिक श्रद्धा टप्प्याटप्प्याने विकसित होत गेल्या. हा त्याचा सिद्धांत अधिकतर काल्पनिक आहे. त्याला त्याच्या सिद्धांताच्या पुष्ठ्यर्थ पुरेसे पुरावे देता आलेले नाहीत.

**२. शक्तिवाद**

शक्तिवादालाच मानावाद, बोंगोवाद असे म्हटले जाते. मॅक्स मुल्लर, प्रिअर्स, मॅरेट यांसारख्या विचारवंतांनी शक्तिवादाची संकल्पना मांडली.

प्रत्येक सचेतन, अचेतन वस्तूंमध्ये अलौकिक, असाधारण शक्तीचे अस्तित्व असते. या शक्तीच्या अलौकिक व दिव्य सामर्थ्याबद्दल आदिवासींच्या मनात नितांत श्रद्धा असते. ही शक्ती निराकार आहे. ती सर्वत्र संचार करू शकते. मानवी ज्ञानाच्या पलीकडे ही शक्ती असल्याने मानवाला तिच्याबद्दल संपूर्ण ज्ञान केव्हाच होणार नाही. अशी अनाकलनीय शक्ती अभौतिक आहे, अत्यंत सामर्थ्यशाली आहे. मानवी जीवनात अनेक चमत्कारपूर्ण गोष्टी या शक्तीमुळे घडून येतात. ही शक्ती शाश्वत आहे. या अलौकिक शक्तीला योग्य रीतीने आवाहन करून प्रसन्न करून घेतल्यास ती मानवाला अनेक कार्यात यश मिळवून देते. या शक्तीमुळे अनेक अवघड कार्ये मानवाला सहज पार पाडता येतात कोणत्याही घटनेपाठीमागचे कारण या शक्तीच्या साहाय्याने स्पष्ट होऊ शकते.

डॉ. मॅरेट यांच्या मते, या विश्वातील सर्व जड-अजड पदार्थांमध्ये एक विलक्षण अशी शक्ती आहे ही शक्ती अनाकलनीय, अवैयक्तिक, अभौतिक, अमानवी अशा स्वरूपाची आहे. या शक्तीचे प्रमाण वस्तूमध्ये कमी-जास्त प्रमाणात आहे, अशी आदिवासी लोकांची श्रध्दा आहे. या श्रध्देलाच'शक्तीवाद', भारतातील हो, मुंडा जमाती तिला बोंगा असे म्हणतात. म्हणून शक्तीवादास मानावाद किंवा बोंगावाद असेही म्हणतात.

शक्तीवादानुसार अलौकिक शक्तीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१. ही शक्ती अभौतिक स्वरुपामध्ये असल्यामुळे तिचे मानवी इंद्रियांना आकलन होत नाही

२. ही शक्ती विशिष्ट व्यक्ती किंवा वस्तू शी संबंधित नसते म्हणून ही शक्ती व्यक्तिनिरपेक्ष आहे

३. ही शक्ती कधीही नाश होऊ शकत नाही म्हणून ती शाश्वत आहे

४. सर्व सर्वच वस्तूंमध्ये ही शक्ती कमी किंवा जास्त प्रमाणामध्ये आढळते

५. ही शक्ती ज्या व्यक्तीं मध्ये किंवा वस्तू मध्ये प्रवेश करते त्यावेळी त्या वस्तू किंवा शरीराला प्रचंड सामर्थ्य प्राप्त होते म्हणून ही शक्ती अत्यंत सामर्थ्यशाली असते असे मानले जाते.

अशा या अभौतिक, अनाकलनीय, व्यक्तिनिरपेक्ष, सामर्थ्यवान शक्तीच्या अस्तित्वावरील श्रध्दा आदिम लोकांत आढळते. या श्रध्देस शक्तीवाद म्हणतात.

**शक्तीवादाचे मूल्यमापन :-**

१. विविध तज्ञांनी मांडलेल्या विचारानुसार मांडलेल्या विचारांनुसार शक्तीवादामध्ये माना किंवा बोगो ही शक्ती कशा पद्धतीने अस्तित्वात आली याबाबतचे विवेचन आढळत नाही

२. ईमील दुरखाईम यांच्या मते, शक्तीवादामध्ये पवित्र किंवा अपवित्र वस्तूंमधील फरक स्पष्टपणे दिलेला नाही तसेच शक्ती वादाच्या सिद्धांतामध्ये सामाजिक घटकांचा विचार केला गेला नाही.

### ३. निसर्गवाद

मॅक्समुल्लर यांनी निसर्गवाद हा सिद्धांत मांडलेला दिसून येतो. विविध नैसर्गिक शक्तींमध्ये अलौकिक किंवा दिव्य शक्ती असते या शक्तींचा मानवी जीवनावर चांगला किंवा वाईट परिणाम होत असतो. म्हणून अशा सर्व निसर्ग शक्तींना नेहमी खुश ठेवण्यासाठी आनंदी ठेवण्यासाठी मानव त्यांची प्रार्थना पूजा अर्चा करू

लागला आणि यामधूनच धर्माचा उदय झाला. असे मॅक्समुल्लर यांनी यांनी मांडले त्यांच्या या मताला निसर्गवाद असे म्हणतात.

थोडक्यात निसर्गातील अनाकलनीय रहस्यमय घटना या निसर्गातील विशिष्ट शक्ती मुळेच होत असतात. उदाहरणार्थ ऊन, वारा, पाऊस, विज, अग्नी तसेच सूर्योदय, सूर्यास्त, भूकंप, वादळे, अतिवृष्टी, दुष्काळ इत्यादी सर्वांचा ईष्ट-अनिष्ट परिणाम मानवी जीवनावर होतो आणि या सर्व गोष्टींना नैसर्गिक शक्ती जबाबदार असते व या नैसर्गिक शक्तीला प्रसन्न ठेवण्यासाठी मानवत यांची पूजा करू लागला. उदाहरणार्थ पर्जन्यदेवता, वायूदेवता, सूर्यदेवता, अग्नीदेवता, इत्यादी विविध देवदेवता आहेत अशी कल्पना मानवाने केली आणि या निसर्ग पूजे मधूनच धर्माचा उदय झाला असे निसर्ग वादा मध्ये मानले जाते.

**निसर्गवादाचे परीक्षण**

सर्वच आदिवासींच्या मध्ये निसर्ग पूजा आढळून येत नाही म्हणून मॅक्समुल्लर यांच्या या विचाराला शास्त्रीय आधार मिळत नाही.

१. तसेच धर्म ही सामाजिक घटना आहे म्हणून निसर्ग वादा चे विवेचन अशास्त्रीय वाटते

४. **कूलप्रतिकवाद:**

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ इमिल दुरखाइम यांनी धर्माच्या उदय संदर्भात कुलप्रतीकवादाचा सिद्धांत मांडलेला दिसून येतो. इमिल दुरखाइम यांनी ऑस्ट्रेलियामधील अरुंटा जमातींमधील धर्माचा अभ्यास केला आणि त्यावरून कूलप्रतीकवादाची संकल्पना मांडलेली दिसून येते. त्यांच्या मते, आदिवासी जमातींमध्ये 'कुल' हा सामाजिक समूह आढळून येतो. यामध्ये माता किंवा पिता यांच्यापैकी कोणाही एका व्यक्तीच्या मार्फत ओळखल्या जाणाऱ्या सर्व नातेवाईकांचा समावेश होतो. इमिल दुरखाइम यांच्या मते, एकाच जमातींमध्ये अनेक कुले असतात. तसेच या प्रत्येक कुलाची एक कुलचिन्ह किंवा कुलप्रतीक दिसून येते. यालाच कुलप्रतिक असे किंवा देवक असे म्हणतात. हे कुलप्रतीक एखादी सजीव किंवा निर्जीव वस्तू असू शकते. उदाहरणार्थ पशुपक्षी, वृक्ष, नदी, पर्वत, चंद्र-सूर्य इत्यादी म्हणून एकाच कुलातील सर्व सभासद हे एकमेकांच्या रक्ताचे नातेवाईक आहेत आणि कूल प्रतीकही आपले पूर्वज आहे. या भावनेतून कुलप्रतीकास अत्यंत पवित्र आणि पूजनीय मानले जाते व आपल्या कुलाचे रक्षण आणि कल्याण करण्यासाठी सर्व सदस्यांनी कुल प्रतिकाची पूजा करणे आवश्यक आहे, असे मानले जाते. विविध सणसमारंभ यात्रा साजरी करत असताना कुलचिन्हाचे गोंदन अंगावर केले जाते. तसेच एखादा वृक्ष, कुलचिन्ह असेल तर तो वृक्ष तोडला जात नाही. उदाहरणार्थ पिंपळ, लिंब इत्यादी. तसेच एखादा पशु किंवा पक्षी कुलप्रतीक असेल तर त्याची शिकार केली जात नाही. थोडक्यात, कुलप्रतिकावरील ही श्रद्धा व त्यासंदर्भात पाळावयाचे निषेध नियम परंपरा यांनाच सर्वसाधारण अर्थाने कुलप्रतीकवाद किंवा कुलचिन्हवाद असे म्हटले जाते.

**आदिवासी समाजातील धर्माचरणाचे प्रकार** (Practices)

आदिवासी समाजातील धर्मश्रद्धा समजून घेतल्यानंतर आता आपण आदिवासी समाजातील धर्माचरणाचे विविध प्रकार समजून घेणार आहोत. अलौकिक शक्तीच्या कृपेवर आपले जीवन अवलंबून आहे. या भावनेमधून, श्रद्धेमधून आदिवासी लोक या अलौकिक शक्तीला आनंदित ठेवण्यासाठी विविध विधी करतात आणि या विधीलाच धार्मिक विधी किंवा धर्माचरण असे म्हटले जाते. प्रामुख्याने आदिवासी समाजामध्ये प्रार्थना, यज्ञ, निषेध-नियम इत्यादी धर्माचरणाचे प्रकार आढळतात ते आपण पुढील प्रमाणे पाहूयात.

**१. प्रार्थना**

अलोकिक शक्तीला तोंडी आवाहन करणे, म्हणजे प्रार्थना होय अलौकिक शक्ती ने मानवाला मदत करावी, या हेतूने प्रार्थना केली जाते. यासाठी प्रार्थनेची जागा, वेळ, प्रार्थना करण्याची पद्धत, भाषा तसेच प्रार्थना सोबत करावयाचे इतर विधी याबाबतचे नियम निश्चित केलेले असतात. प्रामुख्याने विशिष्ट व्यक्तीकडून प्रार्थना करून घेतली जाते. तसेच प्रार्थना ही वैयक्तिक आणि सामूहिक अशा स्वरूपामध्ये केली जाते. सर्वच आदिवासी समूहामध्ये प्रार्थनेला महत्त्व आहे. आपल्या जीवनातील विविध संकटे दूर व्हावीत आणि किर्ती व यश प्राप्ती व्हावी यासाठी प्रार्थनेमध्ये नतमस्तक होऊन विनवणी केली जाते. यासोबतच प्रार्थना यशस्वी होते, यावर आदिवासींची दृढ श्रद्धा असते.

**२. यज्ञ**

अलौकिक शक्ती किंवा दिव्य प्राण्याची कृपा होण्यासाठी यज्ञ हा विधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. प्रामुख्याने यज्ञामध्ये प्रतिकात्मक स्वरूपामध्ये भक्ताने केलेल्या गोष्टींचा त्यागाचा समावेश होतो. तसेच काहीवेळा काही वस्तू भेट दिल्या जातात किंवा काही प्राण्यांचा बळी देखील दिला जातो. थोडक्यात यज्ञासाठी पेटविलेल्या अग्नीमध्ये विविध वस्तूंची आहुती दिली जाते. यज्ञाच्या वेळी दिव्यशक्ती ला भेट वस्तू दिल्यानंतर त्याच प्रकारच्या वस्तू आपल्याला ही मोठ्या प्रमाणात मिळतात, अशी यामागील श्रद्धा असते.

**३. निषेध-नियम** (Taboo)

यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा समावेश होतो. पवित्र आणि पवित्र म्हणजेच ज्या गोष्टी चांगल्या योग्य पवित्र अशा मानल्या जातात, त्या गोष्टी आपल्या वर्तनामध्ये खाण्यामध्ये समावेशित करणे, तर ज्या गोष्टी अपवित्र वाईट मानल्या जातात, त्या गोष्टींपासून दूर राहणे. उदाहरणार्थ यज्ञाच्या वेळी आपले वर्तन कसे असावे, मंदिर मध्ये गेल्यानंतर आपले वर्तन कसे असावे, यासंदर्भातील नियम ठरलेले आहेत. तसेच कुल प्रतीकाची श्रद्धा असणाऱ्या आदिवासींच्या मध्ये असे नियम मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येतात आणि त्यानुसार एकाच जमाती मधील सर्व व्यक्तींच्या वर्तनामध्ये समानता असलेली दिसून येते. तसेच आदिवासी आमच्या धार्मिक धर्माचरणामध्ये मिरवणूका, नृत्य, वाद्य इत्यादींचा वापर दिसून येतो. तसेच जादूचे ही अस्तित्व दिसून येते.

आदिवासींच्या धर्म व्यवस्थेमध्ये प्रमुख्याने भगत आणि पुरोहित महत्वपूर्ण भूमिका बजावतात

प्रामुख्याने भगत म्हणजे जादूचा क्रिया करण्यामध्ये निष्णात असणारी पुरुष किंवा स्त्री या व्यक्तीला अलौकिक शक्ती किंवा दिव्य प्राण्याचे संपूर्ण ज्ञान असते तसेच कोणत्या शक्ती साठी कोणत्या प्रकारची जादू करणे आवश्यक आहे कोणते मंत्रोच्चार करणे आवश्यक आहे या गोष्टींमध्ये भगत पारंगत असतो भारतीय आदिवासींत भगत या शब्दासाठी गोंड जमातीत 'बैगा', कोरवा, संथाल जमातीत 'ओझा', थारू जमातीत भरारा', भिल्लांमध्ये 'पुंजारो', कमार जमातीत'झांकर' या नावांनी ओळखले जाते. सोनकोळी जमातीत तर त्याला'बाबा' नावाने ओळखले जाते.

पुरोहित म्हणजे प्रामुख्याने अलौकीक शक्ती किंवा दिव्य प्राण्यावर नियंत्रण मिळवणारी व्यक्ती होय.

आदिवासींचा जीवनामध्ये धर्म आणि जादू या दोन्ही गोष्टींना अनन्यसाधारण असे महत्त्व असलेली दिसून येते. दिव्य प्राण्याशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी धर्म आणि जादू या दोन्ही गोष्टी आदिवासींना अत्यंत महत्त्वपूर्ण वाटतात. आपल्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी धर्म च्या माध्यमातून प्रार्थना, यज्ञ, निषेध-नियमांचे पालन करणे, इत्यादी विविध मार्गांचा अवलंब करतात. तसेच जादू मध्ये यश येण्यासाठी विविध क्रिया केले जातात आणि या धर्म आणि जादू मधील सर्व क्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी तसेच अलौकिक शक्ती आणि व्यक्ती यांच्यामध्ये मध्यस्थ म्हणून कार्य करण्यासाठी धर्म व्यावसायिकांची आवश्यकता भासते आणि ही आवश्यकता भगत आणि पुरोहित हे दोन धर्म व्यवसायिक प्रामुख्याने पूर्ण करतात.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न:

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. आदिवासी समाजाची व्याख्या लिहा?

२. आदिवासी समाजातील वधूमूल्य म्हणजे काय?

३. अंतर्विवाह म्हणजे काय ?

४. बहिर्विवाह म्हणजे काय ?

५. सर्वात्मवाद हा विचार कोणी मांडला ?

ब) रिकाम्या जागा भरा.

१. कुटुंबहा घटक ............................आधारित सामाजीक समूह आहे.

२. ................. यांनी निसर्गवाद हा सिद्धांत मांडला.

३. एडवर्ड टायलर यांनी ..........मांडला.

४. आदिवासींच्या धर्म व्यवस्थेमध्ये प्रमुख्याने ............. आणि..................महत्वपूर्ण भूमिका बजावतात

५. अलोकिक शक्तीला तोंडी आवाहन करणे, म्हणजे .............. होय.

## २.५ सारांश :

थोडक्यात,आपणास वरीलप्रमाणे आदिवासी समाज म्हणजे काय? आदिवासी समाजाची संकल्पना, व्याख्या, अर्थ, वैशिष्टे, भारतातील आदिवासी समाजाचे सामाजिक जीवन, कुटुंब संस्था, विवाहसंस्था, विवाहाची वैशिष्टे, विवाहाचे प्रकार, धार्मिक जीवन, धर्मश्रद्धा, धर्माचरण, आर्थिक जीवन इत्यादींचा सविस्तर अभ्यास करता येईल. सामाजिक संस्था सर्वच समाजात आढळून येतात परंतु त्या सामाजिक संस्थांच्या स्वरूपामध्येसमाजानुसार बदल दिसून येतो.

## २.६ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे:

अ) खालीलप्रश्नांची उत्तरे लिहा.

१. एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा, परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.'

२. आदिवासी समुदायामधे वधूमूल्य ही महत्वपूर्ण संकल्पना दिसून येते. आदिवासी समुदायांमध्ये विवाहावेळी वधुपक्षाला, वर पक्षाकडून काही विशिष्ट रक्कम किंवा वस्तू दिली जाते त्यास वधूमूल्य असे म्हणतात.

३. अंतर्विवाह म्हणजे एखाद्या विशिष्ट समूहातील व्यक्तींनी त्या समाजातील व्यक्तींची विवाह करण्याची प्रथा म्हणजे अंतर्विवाह होय.

४. एखाद्या विशिष्ट समूहातील व्यक्तींनी त्या समूह बाहेरील व्यक्तीशी विवाह करणे म्हणजे समूह बाहेरील व्यक्ती बरोबर विवाह करणे असा नियम असतो या पद्धतीला बहिर्विवाह असे म्हणतात

५. प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ एडवर्ड टायलर यांनी सर्वात्मवाद हा विचार मांडला.

ब) रिकाम्या जागा भरा.

१. कुटुंबहा घटक विवाहावर आधारित सामाजीक समूह आहे.

२. मॅक्समुल्लर यांनी निसर्गवाद हा सिद्धांत मांडला.

३. एडवर्ड टायलर यांनी सर्वात्मवाद मांडला.

४. आदिवासींच्या धर्म व्यवस्थेमध्ये प्रमुख्याने भगत आणि पुरोहित महत्वपूर्ण भूमिका बजावतात

५. अलोकिक शक्तीला तोंडी आवाहन करणे, म्हणजे प्रार्थना होय.

## २.७ सरावासाठी प्रश्न

खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. आदिवासी समाजाची व्याख्या व वैशिष्टे स्पष्ट करा.

२. भारतातील आदिवासी समाजाचे सामाजिक जीवन स्पष्टकरा.

३. आदिवासी विवाहाची वैशिष्टे स्पष्ट करा.

४. आदिवासी कुटुंबाची वैशिष्टे स्पष्ट करा.

५. भारतातील आदिवासी समाजाचे धार्मिक जीवन धार्मिक श्रद्धा आणि कर्मकांड याआधारे स्पष्ट करा.

६. भारतातील आदिवासी समाजाच्याआर्थिक जीवनाची वैशिष्टे स्पष्ट करा.

टिपा लिहा.

१. आदिवासी धर्मश्रद्धा

२. आदिवासी विवाहाची वैशिष्टे

३. आदिवासी धर्माचरण

४. आदिवासी कुटुंबसंस्था

५. आदिवासी आर्थिक जीवन

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. Vidyarthi L.P. (1976) Tribal Culture of India, Concept Publishers, New Delhi.

२. E.E. Evans Pritchard Social Anthropology and Other Essays, The free Press, New York.

३. Mujumdar D.N. and Madam T.N n Introduction to Social Anthropology, Sia Publishing House, Bombay, 1973.

४. संगवे विलास (१९६९) सामाजिक मानवशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. नाडगोंडे गुरुनाथ (१९९८) भारतातील आदिवासी, कॉन्तीनेन्तल प्रकाशन, पुणे.

६. संगवे विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

७. कोंडेकर आणि पाटील (२०१२) सामाजिक मानवशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

८. ठाकूर सुंदरसिंह (२००६) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नांदेड : निर्मल प्रकाशन.


❑❑❑

# घटक – ३
# आदिवासी समस्या
# (Tribal Problems)

**घटक संरचना**

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ आदिवासींचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा

३.३.२ जमीन हस्तांतरण

३.३.३ आदिवासी लोकांची निरक्षरता व पिळवणूक

३.३.४ धार्मिक गुंतागुंत (संकट)

३.४ सारांश

३.५ परिभाषिक शब्द (शब्दार्थ)

३.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.८ सरावासाठी स्वाध्याय

३.९ क्षेत्रीय कार्य

३.१०अधिक वाचनासाठी पुस्तके / संदर्भ ग्रंथ.

## ३.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

- आदिवासी समाजाच्या अभ्यासबरोबर त्यांच्या समस्या जाणून घेणे.
- आदिवासींच्यात कर्जबाजारीपणा जमीन हस्तांतरण व जमीनविषयक प्रश्नांचा शोध घेणे.
- आदिम लोकांच्यातील निरक्षरता, पिळवणूक व धर्मविषयक समस्यांचा अभ्यास करणे.
- आदिवासींच्या समस्या व त्यावरील शासकीय विविध योजना, कल्याणकारी कार्यक्रम, सुधारणा कार्यक्रम कोणकोणते आहेत ते जाणून घेणे.

वरील उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवूनच आदिवासी समस्यांचा यथासांग परिपूर्ण अभ्यास करणे हाच आपला मुळ हेतू आहे.

## ३.२ प्रास्ताविक (Introduction)

मानव समाजात विविध समस्या आहेत. जगात असा कोणताही समाज नाही की ज्याच्या कोणत्याच समस्या नाहीत. मानवी समाजात समाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय इ. विविध प्रकारच्या समस्या असतात. प्रत्येक समाजात या समस्या आढळत असल्या तरी प्रत्येक समाजातील समस्यांचे स्वरूप आणि त्या समस्यांची तीव्रता यामध्ये फरक असतो. भारतात ग्रामीण आणि नागरी समुदायाच्या वेगवेगळ्या समस्या आहेत. परंतु त्यापेक्षा आदिवासी समाजाच्या समस्या या वेगळ्या आहेत. कारण आदिवासी समाज हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. प्रत्येक देशातील आदिवासींच्या समस्या विविध प्रकारच्या आहेत. म्हणजे आर्थिक दारिद्र्याच्या समस्येपासून ते स्वतःचे अस्तित्व नष्ट होणे यासारख्या गंभीर समस्या अशा अनेक समस्या आदिवसींच्या वाट्याला आल्या आहेत.

आदिवासी समाजाचा अभ्यास करण्याबरोबर आदिवासींच्या समस्या समजावून घेणे हे महत्त्वाचे आहे. दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, धार्मिक कर्मकांडाचे अवडंबर, अनारोग्य, व्यसनाधीनता व आर्थिक पिळवणूक अशा अनेक समस्यांनी हा जंगलचा राजा त्रस्त आहे. 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' या प्रतिज्ञेत या ९ टक्के आदिवासींचाही समावेश आहे. हे भारतीय शासन व इतरांनाही विसरून चालणार नाही. खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यावयाचे असेल तर त्यांच्या विविध समस्यांचे आकलन करून घेवून त्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. या आदिवासींच्या विविध समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी विविध उपाययोजनेतील महत्त्व लक्षात घेवून त्यांना भारतीय घटनेने कलम ३६६ (२५) अन्वये अनुसुचित जमाती (Scheduled Tribes) ही संज्ञा वापरली आहे.

भारतातील आदिवासींच्या समस्या या साध्या आणि सरळ नाहीत. खऱ्या अर्थाने या समस्या विस्तृत आणि जटिल आहेत. या समस्या आदिवासींच्या आचार-विचार, राहणीमान, प्रथा-परंपरा, सभ्यता, धर्म, ललितकला इत्यादींशी संबंधित आहेत. बाह्य लोकांच्या सांस्कृतिक प्रभावामुळे ते आपल्या मुळ संस्कृतीपासून दूर जात आहेत. आर्थिक बाबतीत त्यांचे सर्व प्रकारचे शोषण होत आहे. त्यामुळे आर्थिक शोषण आणि दारिद्र्याची समस्या निर्माण झाली. कर्जबाजारीपणामुळे ते सावकाराच्या जाळ्यात सापडले आहेत. पुरेसे आणि पौष्टिक अन्न न मिळाल्यामुळे त्यांच्या अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या. सर्वच आदिवासी जमातीच्या समस्या या सारख्या नाहीत. एकाच भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या समस्यामध्ये भिन्नता दिसून येते. आदिवासी समाजातील समस्यांचे स्वरूप हे भिन्न असले तरी काही समस्या या सर्वच आदिवासी समाजात सारख्याच आहेत.

भारतातील सर्वच आदिवासी समाजाच्या दारिद्र्य, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, दुरावा, शेतजमीनविषयक प्रश्न, शोषण इत्यादी समस्या आहेत. या समस्यामुळे त्यांचा विकास होण्यास अडथळे निर्माण झाले आहेत.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

भारतीय संविधानातील ३४१ आणि ३४२ कलमानुसार राष्ट्रपतीच्या आदेशाने अनुसूचित जातीची यादी तयार करण्यात येते. २०११ च्या जनगणनानुसार एकूण भारतीय लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण ८.६ टक्के पर्यंत आहे. १९५६ च्या यादीनुसार एकूण आदिवासींची संख्या ४१४ इतकी आहे. सर ग्रियसन यांनी इ.स. १८९० मध्ये केलेल्या भाषिक पाहणीनुसार ५४४ बोलीभाषा व १७९ भाषा भारतातील आदिवासीत व बिगर आदिवासीत आढळतात. यावरून असे लक्षात येते की, अनेक जाती, उपजाती, भाषा, वंश, लिपी, प्रथा, परंपरा, स्वरूप, खाण-पान, आचार-विचार, पोषाख पध्दती, रितीरिवाज, धर्म, जादूटोणा अंधश्रध्दा इ. विविधता ही आदिवासींच्यात पाहण्यास मिळते. प्रत्येक आदिवासींना विविध भौतिक व सांस्कृतिक वातावरण लाभल्याने प्रत्येक जमातीचा प्रश्न वेगवेगळा आहे. म्हणून शास्त्रशुध्द अभ्यास केल्याशिवाय त्या त्या जमातीच्या समस्याच समजू शकत नाहीत. म्हणून भारतातील आदिवासींचे प्रश्न दोन प्रकारचे आहेत. एक म्हणजे त्यांच्या पारंपारिक जीवन पध्दतीतून निर्माण झालेला प्रश्न तर दुसरा म्हणजे आदिमांचा प्रगत समाजाशी संपर्क आल्याने निर्माण झालेला दुसरा प्रश्न (समस्या) या घटकात आपण आदिम जमातीचे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, जमीन हस्तांतरण, निरक्षरता, आदिवासी लोकांची पिळवणूक, धार्मिक गुंतागुंत इ. समस्यांचा अभ्यास करणार आहोत.

### ३.३.१ आदिवासींचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा : (Poverty & Indebtedness)

#### अ) आदिवासीचे दारिद्र्याची समस्या (Problem of Poverty)

आदिवासी समाजाची दारिद्र्य ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. आजही बहुतांशी आदिवासी लोक हे दारिद्र्यातच खितपत पडले आहेत. त्यामुळे ही देशातील संपूर्ण आदिवासी समाजाची महत्त्वपूर्ण अशी समस्या आहे. दारिद्र्य ही आर्थिक समस्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक समस्या देखील आहे. ही समस्या व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे निर्माण होते. उत्पन्न कमी असल्यामुळे व्यक्ती आपल्या जीवनावश्यक गरजांची पुर्तता करू शकत नाही. कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीचा जीवनस्तर हा निम्न असतो. दारिद्र्याची समस्या निर्माण होण्यास आर्थिक कारणाबरोबरच सामाजिक कारणे देखील जबाबदार आहेत. दारिद्र्याच्या समस्येतून गुन्हेगारी, स्वहत्या (Suicide), घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती, बाल अपचारिता इत्यादी सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्याच नाही तर ती एक सामाजिक समस्या देखील आहे. दारिद्र्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विघटन घडून येते.

**दारिद्र्याचा अर्थ :-**

प्रत्येक व्यक्तीला जिवंत राहण्यासाठी किंवा जीवन जगण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्ती होणे महत्त्वाचे आहे. मोटार, स्कुटर, फ्रीज, टी.व्ही. या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु या वस्तू जीवनावश्यक नाहीत. आपल्या जीवनाचा एक न्यूनतम स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि घर या गोष्टी आवश्यक असतात. जेंव्हा स्वत: व्यक्ती आणि त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या

आवश्यक गरजांची पुर्तता होत नाही. व्यक्तीचा जीवनस्तर न्यूनतम जीवन स्तरापेक्षा खाली जातो. या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात.

दारिद्र्याच्या संदर्भात आर्थिक दृष्टीकोनातून अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणे गिलीन व गोडार्ड ह्यांनी समाजशास्त्रीय दृष्टीने व्याख्या दिल्या आहेत. सामाजिक समस्या या दृष्टीने दारिद्र्याचा अभ्यास करीत असताना या व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

**व्याख्या –**

१) **गिलीन आणि गिलीन :** ''दारिद्र्य ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवनस्तर हा उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची मानसिक तंदुरूस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत त्या समाजाच्या जीवनमुल्याप्रमाणे योग्य प्रकारे ते कार्य करू शकत नाही.''

२) **गोडार्ड :** ''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वस्थ आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा अभाव किंवा अपर्याप्त पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.''

वरील व्याख्यांवरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो. दारिद्र्य ही एक अशी परिस्थती किंवा अवस्था असते की ज्यावेळी व्यक्तीच्या उत्पन्नामध्ये व्यक्ती स्वत:च्या आणि आपल्या कुटूंबातील सदस्यांच्या आवश्यक गरजांची पुर्ती करू शकत नाही. त्यामुळे व्यक्ती आणि त्यांच्या कुटूंबातील लोक समाजातील अपेक्षित स्तरामध्ये जीवन व्यतीत करू शकत नाही. त्यांच्यासमोर मुलभूत गरजांची पुर्ती करण्याचा प्रश्न निर्माण होतो. दारिद्र्यामुळे लोक आपला आणि आपल्या कुटूंबातील सदस्यांच्या जीवनाचा एक न्युनतम स्तर टिकवून ठेवू शकत नाही. अत्यल्प उत्पन्नात आवश्यक गरजांची पुर्ती करणे शक्य नसते. म्हणून त्यांचा जीवनस्तर न्यूनतम जीवनस्तरापेक्षाही खालचा असतो.

**आदिवासी समाजातील दारिद्र्याची कारणे** (Causes of Proverty in Tribal Society)

आदिवासी समाजाच्या दारिद्र्याची अनेक कारणे आहेत. या विविध कारणामुळे आदिवासी समाजामध्ये दारिद्र्याची समस्या निर्माण झाली आहेत.

**अ) आर्थिक कारणे :** (Economic Causes)

**१. शेती व्यवसायाची वाईट अवस्था :** भारतातील बहुतांश आदिवासींचा मुख्य व्यवसाय हा शेती आणि शेतमजुरी आहे. विशेष म्हणजे आदिवासी समाज हा दऱ्या खोऱ्यात आणि डोंगराळ प्रदेशात राहतात. त्यांची शेती ही सपाट अशा मैदानी प्रदेशात नाही. त्यांच्या शेतीत ओलिताच्या सोयी नाहीत. त्यांची शेती ही पावसावर अवलंबून आहे. अजूनही बरेच आदिवासी स्थानांतरीत शेती करतात. त्यांच्याकडे उत्कृष्ट बी-बियाणे आणि खते नाहीत. त्यामुळे त्यांच्या शेती व्यवसायाची अवस्था वाईट आहे. शेतीपासून मिळणारे

उत्पन्न अत्यल्प आहे. म्हणून त्यांचे आर्थिक उत्पन्न कमी आहे. त्यामुळे आदिवासी समाजामध्ये दारिद्र्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

२. **बेरोजगारी :** आदिवासी समाजात रोजगाराच्या नवीन संधीचा अभाव आहे. त्यांचे सर्व आर्थिक व्यवहार शेती आणि वनोत्पादनाशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यांना वर्षभर काम मिळत नाही. त्यांच्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहे. म्हणून त्यांचे उत्पन्न कमी आहे.

**३. कर्जबारीपणा :** आदिवासी लोक मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी आहेत. ते सावकार आणि जमीनदाराकडून कर्ज घेतात. त्यांना दिलेल्या कर्जावर सावकार जास्त व्याजदर आकारतो. त्यामुळे आदिवासी लोक हे सतत कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले असतात.

**४. सरकारचे वनधोरण** : आदिवासी लोकांचे संपूर्ण जीवन जंगलाशी निगडीत आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन हे जंगल आहे. पूर्वी आदिवासी जंगलाच्या भरवशावर आपले जीवन जगत होते. परंतु सरकारचे वनधोरण जाहिर झाल्यानंतर आदिवासींचा जंगलातील अधिकार संपला. ते जंगल संपत्तीचा आपल्या उदर्निर्वाहासाठी उपयोग करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे.

**५. आर्थिक शोषण :** आदिवासी हे साधेभोळे आहेत. त्यांना सभ्य समाजातील लोकांचे डावपेच माहित नाही. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून इतर लोक त्यांची फसवणूक करतात. ठेकेदार त्यांच्याकडून पूर्ण दिवसाचे काम करवून घेतो. परंतु त्यांना कमी मजुरी देतो. सावकार जामीनदार कर्जाचा जास्त व्याजदर घेतात. आदिवासीकडून वस्तू अत्यंत स्वस्त दरात व्यापारी लोक खरेदी करतात. अशाप्रकारे त्यांचे सतत आर्थिक शोषण केले जाते. परिणामत: आदिवासी लोक दारिद्र्यातच खितपत राहतात.

**ब) सामाजिक कारणे :** (Social Causes)

**१. साधी राहणी :** आदिवासी लोक जंगलात निसर्गाच्या सानिध्यात रहातात. ते शहरातील झगमगाटापासून खूप अलिप्त आहेत. शेती आणि जंगल संपत्तीवर ते स्वत:चा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या जीवनाविषयीच्या फार मोठ्या अशा आकांक्षा नाहीत म्हणून ते अधिक पैसा मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीत ते अल्पसंतुष्टी आहेत.

२. **निरक्षरता :** आजही आदिवासी लोक मोठ्या प्रमाणात निरक्षर आहेत. आदिवासी लोक शिक्षणाला महत्त्व देत नाहीत. आदिवासी अशिक्षित असल्यामुळे ते आपली प्रगती करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे इतर सुशिक्षित लोक त्यांच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन त्यांना फसवितात.

**३. अंधश्रध्दा व अंधविश्वास :** आदिवासी समाजात विविध प्रकारच्या अंधश्रध्दा आणि अंधविश्वास आहेत. त्यामुळे ते आपल्या अंधश्रध्दा आणि अंधविश्वासानुसार वर्तन करतात. याकरीता त्यांचा वेळ आणि पैसा देखील खर्च होतो. म्हणून त्याची आर्थिक प्रगती होवू शकली नाही.

४. **सामाजिक रूढी परंपरांचा प्रभाव :** आदिवासी समाजावर पारंपारिक रूढी परंपरांचा आजही मोठ्या प्रमाणावर प्रभाव आहे. त्यामुळे ते या रूढी परंपरानुसार वागतात. त्यांच्यामध्ये नवीन काही निर्माण करण्याची

इच्छा नाही. आपली प्रगती व्हावी असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे ते आहे त्याच परिस्थितीमध्ये समाधान मानतात म्हणून त्यांची आर्थिक प्रगती होवू शकली नाही.

**५. कुटूंब नियोजनाचा अभाव :** आदिवासी समाजावर पारंपारिक रूढी, परंपराचा प्रभाव आहे. तसेच त्यांच्यात कुटूंब नियोजनाचा अभाव आहे. कुटूंब नियोजनास ते महत्त्व देत नाही. परिणामत: त्यांची लोकसंख्या वाढत आहे. परंतु त्यांची उत्पादनाची साधने मात्र मर्यादित असतात. त्यामुळे देखील दारिद्र्याची समस्या निर्माण झाली आहे.

**६. सामाजिक प्रबोधनाचा अभाव :** आदिवासी समाजाला सामाजिक प्राबेधनाची गरज आहे. परंतु त्यांच्यामध्ये सामाजिक प्रबोधनाचा अभाव आहे. त्यामुळे त्यांच्यात नव्या आशा-आकांक्षा निर्माण झाल्या नाहीत. आदिवासी समाजात जनजागृती झाली तर ते नव्या विचारांनी प्रेरित होवून विकासाच्या मार्गाचा अवलंब करतील.

**क) राजकीय कारण :** (Political Causes)

आदिवासी समाजाच्या विकासासाठी भारतीय संविधानात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत आदिवसींच्या विकासाकरीता त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रक्कम ठेवली जाते. परंतु आदिवासींच्या विकासाकरीता ठेवलेली रक्कम पुर्णपणे खर्च केली जात नाही. नंतर शासन तो पैसा दुसऱ्या योजनेवर खर्च करतात. आदिवासी लोकांचा विकास व्हावा असे राज्यकर्त्यांना वाटत नाही ते आदिवासींचा वापर केवळ आपली 'व्होट बँक' म्हणून करतात. आदिवासी लोक सुधारले तर ते आपले ऐकणार नाही. आपणास मतदान करणार नाही. म्हणून राजकर्त्यांना आदिवासींचा आर्थिक विकास व्हावा असे वाटत नाही. आदिवासींच्या विकासाकरीता असलेल्या अनेक योजनांची योग्य अंमलबजावणी केली जात नाही.

आदिवासी समाजात दारिद्र्याची समस्या किती भीषण आहे याची कल्पना येते. आदिवासी समाजातील दारिद्र्य नष्ट व्हावे म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने विविध उपाययोजना केलेल्या आहेत. परंतु आदिवासींना या उपाययोजनांची माहिती नसते. आदिवासींच्या कल्याणाकरीता येणारा पैसा हा लाभार्थी आदिवासीपर्यंत कधी पोहचत नाही. इतर लोक त्या योजनेचा फायदा घेतात. त्या संदर्भात कुणी तक्रार देखील करीत नाही. म्हणून आदिवासी लोक वर्षानुवर्षे दारिद्र्यातच खितपत पडलेले आढळतात.

**ब) कर्जबाजारीपणाची समस्या :** (Problem of Indebtendeness)

जंगलात आणि पहाडी भागात राहणारे आदिवासी हे निसर्गाने समृध्द बनविलेले स्वयंपूर्ण, समृध्द आणि कमीत कमी गरजांवर आधारित असे संतुष्ट जीवन जगत होते. त्यांच्या गरजा तिथल्या नैसर्गिक संपत्तीवरच पूर्ण होत होत्या. समाधानी, प्रामाणिक आणि शोषणमुक्त असे त्यांचे जीवन होते. परंतु त्यांचा बाह्य लोकांशी संपर्क आल्यानंतर मात्र त्यांच्या सामाजिक जीवनात बराच बदल झाला. व्यापारी, जमीनदार आणि सावकारांचा आदिवासी क्षेत्रात प्रवेश झाला. त्यांचा संबंध आदिवासींशी येऊ लागला. व्यापारी, जमीनदार आणि सावकारांनी त्यांना व्याजाने पैसे देवून स्वस्त किंमतीत त्यांच्या जमीनी हडपल्या. अनेक आदिवासी

कर्जबाजारीपणामुळे बरबाद झाले. आज आदिवासी समाजाची कर्जबाजारीपणाची एक अतिशय महत्त्वाची समस्या बनली आहे.

आदिवासीची कर्जबाजारीपणाची समस्या ही दीडशे-दोनशे वर्षापुर्वीपासून अस्तित्वात आहे. आदिवासी लोकांनी सावकारांविरूध्द आंदोलने देखील केलेत. महाराष्ट्रातील महादेव कोळी आणि भिल्ल या जमातीच्या लोकांनी सर्वात प्रथम सावकारांविरूध्द आवाज उठविला, पुण्याजवळील आंबेगावापासून तर नाशिक, डाहाणू, जव्हार, मोरवाड, खानदेश, सातपुडा, इगतपुरी, घोटी, त्र्यंबकेश्वर, राजूर, ओतूर, खेड या सर्व भागातील आदिवासींच्या बहुतांश जमीनी या सावकारांच्या ताब्यात होत्या. त्यात भिल्ल, महादेव कोळी, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर या विविध आदिवासी जमातीचे लोक सावकारांचे जणू काही गुलाम बनले होते. १८७४ मध्ये सावकारी विरूध्द पहिली चळवळ पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातल्या सांभोरी गावच्या होनाजी भागूजी केंगले नावाच्या क्रांतिकारक आदिवासीच्या नेतृत्वात झाली होती. या चळवळीमुळे आदिवासी जागृत झाले आणि आपल्याला कर्जबाजारी करणाऱ्या सावकारशाही विरूध्द आंदोलन करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

सावकार कर्ज देवून भरमसाठ व्याज वसुल करतो, तो आपल्या आदिवासींचे शोषण करतो, हे माहित असून देखील आजही आदिवासी लोकांना कर्ज काढण्यासाठी सावकारांकडेच जावे लागते. आदिवासी क्षेत्रात बँका नाहीत आणि तालुक्याच्या गावात बँका असल्या तरी आदिवासी बँकामध्ये जात नाहीत. कारण बँकाचा व्यवहार अशिक्षित आदिवासीच्या दृष्टीने कठिण असतो. बँका पुर्ण लेखी व्यवहार झाल्याशिवाय कर्ज देत नाही. त्या तुलनेत सावकाराकडून कर्ज घेण्याची पध्दत आदिवासींना अतिशय सुलभ वाटते. आदिवासीच नव्हे तर शेतकरी वर्ग सुध्दा बँकापेक्षा सावकारांकडूनच कर्ज घेतात. अखिल भारतीय ग्रामिण सर्वेक्षणाच्या अहवालानुसार देशातील ७० टक्के शेतकरी सावकारांकडून तर १० टक्के शेतकरी बँकांकडून कर्ज घेतात. विदर्भातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या (Suicide) करतात. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आदिवासी शेतकरी देखील आहेत. सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली शेतकरी वर्ग इतका दबला आहे की, कर्जाच्या या चक्रव्युहातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तरी त्यात तो अधिकच गुरफटत जावून शेवटी तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

**कर्जबाजारीपणाची कारणे** (Causes of Indebtedness)

**१) अत्यल्प उत्पन्न :** आदिवासी लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. आजही काही आदिवासी स्थानांतरीत शेती करतात. त्याची शेती करण्याची पध्दत ही परंपरागत आहे. तसेच त्यांची शेती पावसावर अवलंबून आहे. म्हणून त्यांचे उत्पन्न हे अत्यल्प आहे. ह्या उत्पन्नात त्यांच्या गरजा भागू शकत नाही. म्हणून शेतीची लागवड करणे, मुलामुलींचे लग्न, सण इत्यादी प्रसंगी त्यांना सावकारकडून कर्ज काढावे लागते.

**२) नैसर्गिक संकट :** आदिवासी शेतकरी मेहनत करून शेतीची मशागत करतो. परंतु नैसर्गिक आपत्तीपुढे तो हतबल होतो. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ पडतो. त्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. त्याचे पुर्ण जीवन शेतीवर अवलंबून असते. अशावेळी त्याला कर्ज काढण्याशिवाय पर्याय नसतो.

**३) जोड व्यवसायाचा अभाव :** भारतातील बहुतांश आदिवासी शेतकरी हे पूर्णत: शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे शेतीचे नुकसान झाल्यानंतर त्यांच्याकडे दुसरा पर्यायच राहात नाही. शेवटी नाईलाजास्तव त्याला सावकाराकडून कर्ज काढावे लागते.

**४) कौटूंबिक खर्चात वाढ :** पुर्वी आदिवासी लोकांच्या गरजा, अपेक्षा या अगदी कमी होत्या. त्यामुळे उत्पन्न कमी असले तर तेवढ्या उत्पन्नात तो सुखी असायचा. परंतु आता इतर लोकांशी संपर्क वाढल्यामुळे त्यांच्या गरजा आणि अपेक्षा वाढल्या आहेत. आदिवासी क्षेत्रात देखील भौतिक वस्तू आढळतात. त्यामुळे आदिवासी लोकांच्या कौटूंबिक खर्चात वाढ झाली आहे. परिणामत: आपल्या वाढलेल्या कौटूंबिक खर्चासाठी त्यांना कर्ज काढावे लागते.

**५) माहागाई :** दिवसेंदिवस वस्तूच्या किंमतीत प्रचंड वाढ होत आहे. महागाई कमी होण्याऐवजी वाढत आहे. महागाई वाढली परंतु त्या प्रमाणात आदिवासी लोकांचे उत्पन्न मात्र वाढत नाही. महागाईमुळे कुटूंबाचा खर्च वाढला आहे. त्यामुळे आदिवासींना सावकारांकडून कर्ज काढावे लागते.

**६) बँक सुविधा नसणे :** लहान मोठ्या गावात बँका पोहोचल्या आहेत. आता सर्वत्र बँक सुविधा उपलब्ध आहेत असे असले तरी आजूनही आदिवासी क्षेत्रात मात्र बँक सुविधा फारशा उपलब्ध नाहीत. त्यामुळे आदिवासींना कर्जासाठी सावकारांवरच अवलंबून रहावे लागते.

**७) आदिवासींचा अज्ञानपणा :** आदिवासी हे अज्ञानी आहेत. त्यांना लिहिता वाचता येत नाही. त्यांना फारसे व्यावहारिक ज्ञान नसते. त्यांच्या अज्ञानीपणाचा फायदा घेवून सावकार लोक कमी पैसे देवून जास्त पैशांवर त्यांचा अंगठा घेतात. आदिवासी लोक आपले कर्ज प्रामाणिकपणे फेडतात. परंतु सावकार त्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड कागदोपत्री नमुद करीत नाहीत. परिणामत: त्यांचे कर्ज वाढत जाते आणि जुने कर्ज देण्यासाठी नवीन कर्ज काढतात.

आदिवासी समाजाची कर्जबाजारीपणाची समस्या अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. आदिवासींप्रमाणेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये देखील कर्जबाजारीपणाची समस्या आहे. कर्जबाजारीपणाची समस्या सोडविण्यासाठी शासनाद्वारे विविध प्रयत्न करण्यात आलेत. केंद्र शासन आणि राज्य शासनाने सावकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी विविध कायदे केलेत. त्यामध्ये व्याजदरावर नियंत्रण, योग्य लिखित आकडेवारी तसेच सावकारांचे पंजीकरण सामील आहे. आदिवासींची कर्जबाजारीपणापासून सुटका व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्र आदिवासी उधारदाता अवस्था (सुधारित) अधिनियम १९७६ पास केला.

आदिवासी आणि ग्रामीण शेतकऱ्यांना बचत करता यावी आणि आवश्यक तेंव्हा कर्ज घेता यावे या दृष्टीने शासन अधिकाधिक व्यावसायिक बँकांच्या शाखा दुरवरच्या खेड्यात आणि आदिवासी भागात सुरू

करीत आहेत. ३० जून २००६ पर्यंत बँकांची संख्या ६९,६१६ होती. आदिवासी आणि ग्रामीण भागातील अल्पभुधारक, भूमीहिन श्रमिक यांना योग्य दराने कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून २७ सप्टेंबर १९७५ ला एक अध्यादेश जारी करून पाच क्षेत्रीय बँकाची स्थापना करण्यात आली. ३० जून २००६ पर्यंत १९६ क्षेत्रीय बँका स्थापन करण्यात आल्या ज्यांच्या १४५०७ शाखा ग्रामीण आणि अर्धग्रामीण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी आणि गरीब लोकांना सहजपणे कर्ज मिळावे म्हणून सहकारी संस्थांचा विस्तार करण्यात आला आहे. इतके सर्व प्रयत्न शासनाने केले असले तरी आदिवासींची कर्जबाजारीपणाची समस्या कमी झाली नाही.

### ३.३.२ जमीन हस्तांतरण : (Land Alienation)

आदिवासींचा जमीन हस्तांतरणाचा विचार करता आपल्याला जमीन हस्तांतरणाविषयीचे प्रश्न व त्यामुळे आदिवासींची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी सुरूवातीला स्वातंत्र्योतर काळातील 'बॉम्बे टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्ड्स ॲक्ट १९४८' (मुंबई प्रांत कुळ आणि शेतीविषयक कायदा) या कायद्याचा विचार करणे आवश्यक आहे. व त्यातूनच काही नवीन प्रश्न निर्माण झाल्यामुळे व आदिवासींना सावकारांच्या ताब्यात गेलेल्या जमीनी परत मिळवून देण्यासाठी प्रस्तुतच्या कायद्यात अनेक बदल करून १९७५ साली 'महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लॅण्ड टू शेड्यूल्ड ट्राईब्स ॲक्ट' (महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातीचा जमीन पुनर्स्थापना कायदा) संमत झाला. त्यामुळे या जमीन पुनर्स्थापना कायद्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

बॉम्बे टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्ड्स ॲक्ट, १९४८ यात क्रांतीकारक बदल करण्यात आला आणि या बदलानुसार १ एप्रिल, १९५७ रोजी कुळ म्हणून जमीन कसणाऱ्यांना विशिष्ट अटीनुसार मालक म्हणून जाहिर करण्यात आले. या कायद्याखालील बिगर आदिवासींनी आदिवासींची जमीन बळकावल्याची २८ प्रकरणे एकट्या नंदुरबार तालुक्यात समितीला आढळून आली. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेवून कुळ कायद्याखाली बिगर आदिवासींनी बळकावलेल्या जमीनी त्यांना परत करण्यासाठी कायदेशीर तरतुदी कराव्यात असे समितीने सुचविले.

गेल्या ४० वर्षात आर्थिकृष्ट्या पुढारलेले आणि राजकीयदृष्ट्या प्रबळ असलेले बिगर आदिवासी गट आदिवासी विभागात शिरत असून त्यांच्या जमीनी बळकावत आहेत. त्यामुळे आदिवासींच्या पुरातन मलाकीच्या जमीनी जावून ते गरीब भूमिहिन शेतमजूर होत आहेत. अशा अनेक व्यवहारात वरकरणी प्रचलित कायदेशीर तरतुदी पाळल्या गेल्या आहेत. पण मोठ्या प्रमाणावर अन्याय व अयोग्य पध्दतीने घडलेल्या विषम व्यवहारामुळे आदिवासींची जमीन बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाली आहे आणि आदिवासी भूमिहिन बनले आहेत. आदिवासीवरील अन्याय दूर करणे हा या कायद्यामागील उद्‌देश आहे. १९७६ साली महाराष्ट्र सरकारने कर्जमुक्तीचा कायदा केला. सावकारांनी कर्ज देणे अवैध ठरविले. त्यामुळे सावकारांना गहाण वस्तू कर्जदारांना परत देण्याचा आदेश देण्यात आला.

'मुंबई प्रांत कुळ आणि शेतीविषयक कायदा' याच्या अंमलबजावणीमुळे ज्याच्या जमीनीचे हस्तांतरण झाले आहे अशा आदिवासीला अशी जमीन परत करावी असा अर्ज करता येईल. मात्र त्यासाठी तो ती

जमीन स्वत: कसणार आहे. अशी हमी अर्जदारांनी द्यावयास हवी. हा अर्ज कायदा अमलात आल्यापासून तीन वर्षाच्या आत करावयास पाहिजे असे बंधन आहे. कायदा अमलात आल्यापासून ३ वर्षापेक्षा अधिक काळ लोटला आहे. कायद्याविरूध्द वेळोवेळी स्थागिती दिली आहे. त्यामुळे आदिवासीपर्यंत हा कायदा पोहोचला नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी सुध्दा आपण होवून अशी प्रकरणे निकालात काढल्याचे दिसत नाही.

त्यामुळे आदिवसींवरील अन्याय दूर करण्यासाठी नवीन कायदा संमत करण्याची गरज भासली. महाराष्ट्र सरकारच्या विधानसभेने ३० ऑगस्ट, १९७४ रोजी व विधान परिषदेने ३ सप्टेंबर, १९७४ रोजी विधेयक मंजूर केले. या विधेयकातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी खास अधिकारी नेमतील असे त्यावेळचे महसुल मंत्री श्री. ह. गो. वर्तक यांनी कायदेमंडळात सांगितले १ नोव्हेंबर, १९७५ पासून 'महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातींच्या जमीनीचा पुनर्स्थापना कायदा' या नावाने अंमलात आला. कायद्यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

**१. जमीनीची अदलाबदल रद्द करण्यात यावी –**

जमीनीचे हस्तांतरण करणाऱ्या आदिवासी मालकाची आणि या हस्तांतरात बिगर आदिवासीला मिळालेल्या जमीनीची आदलाबदल रद्द करण्यात यावी. मात्र ही आदलाबदल करताना जमीन सुधारणेवर झालेला खर्च या कायद्यात दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित करण्यात यावा आणि अशी सुधारीत जमीन मिळालेल्या मालकाने सुधारण्यासाठी खर्च केलेल्या मालकास ती रक्कम परत द्यावी.

**२. जमीन सुधारणेसाठी केलेला खर्च देणे –**

आदलाबदलीशिवाय इतर कारणाने हस्तांतरीत झालेली जमीन आदिवासी मालकाला परत मिळावी. मात्र ही जमीन परत करताना जमीन मिळणाऱ्या आदिवासीने जमीन महसुलाच्या ४८ पट किंवा बिगर आदिवासी मालकाने जमीन विकत घेतेवेळी दिलेली किंमत यापैकी कमी असेल ती रक्कम अधिक बिगर आदिवासी मालकाने जमीनीवर केलेल्या सुधारणांची जिल्हाधिकाऱ्याने ठरविलेली किंमत, बिगर आदिवासी मालकाला दिली पाहिजे. अशा हस्तांतरात आदिवासीने १ एप्रिल १९५६ (जमीन कसेल त्याची मालकीची करणारा दिवस) पासून ६ जुलै १९७४ पर्यंत (आदिवासींच्या जमीनीच्या हस्तांतरणाला प्रतिबंध करणाऱ्या तरतुदी अमलात आल्याचा दिवस) बिगर आदिवासीला दिलेली हस्तांतरे पुढील प्रकारे येतात.

अ) विक्री देणगी, आदलाबदल, गहाण किंवा खंडाने व इतर तोंडी व्यवहाराने केलेली हस्तांतरे.

ब) कोर्टाच्या हुकुमानुसार किंवा विक्री खाली झालेली हस्तांतरे.

क) आदिवासींकडून शेतसाऱ्याची किंवा शेतसाऱ्याप्रमाणे गणली जाणारी इतर बाकी वसुल करण्यासाठी तसेच महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह सोसायटीज् ॲक्ट, १९६० यानुसार किंवा इतर कायद्यानुसार झालेली हस्तांतरे मात्र यातून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमाच्या कलम ३६ बी यानुसार झालेल्या हस्तांतरीत जमीनी वगळण्यात आल्या आहेत.

ड) आदिवासींची जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत झालेली जमीन कब्जा दिल्यापासूनच्या दोन वर्षाच्या काळात त्याने अर्ज केल्यास त्याला परत मिळू शकेल अशी तरतुद

जमीन महसुल कायद्यात होती म्हणजेच कब्जा दिल्यानंतर दोन वर्षानंतर अशी हस्तांतरीत जमीन परत मिळण्याचा आदिवासींचा अधिकार गमावला जाई. आदिवासी जमीनीच्या हस्तांतरविषयक पहिल्या कायद्यातील तरतुदीनुसार अशा अधिकार गमावलेल्या जमीनीदेखील जिल्हाधिकाऱ्यांना आपण होवून कधीही तसेच कायदा जारी झाल्यापासून तीन वर्षाच्या आत अशा आदिवासीने अर्ज केल्यास परत मिळवता येतील.

इ) महाराष्ट्र सरकारने एक खास दुरूस्ती कायदा केला (३०/१९७७) या कायद्यातील तरतुदीनुसार आदिवासीने किंवा त्याच्या वारसाने अशा प्रकारे जिल्हाधिकाऱ्याची पुर्वपरवानगी न घेता हस्तांतरीत झालेल्या जमीनीचा परत कब्जा घेण्यास नकार दिला तर तिचा कब्जा राज्य सरकारकडे जाईल आणि अशा जमीनीची किंमत व त्यावरील सुधारणांची किंमत सरकार बिगर आदिवासीला देईल. अशी योजना करण्यात आली. अशी सरकारने ताब्यात घेतलेली जमीन नंतर जमीन असलेल्या गावात राहणाऱ्या किंवा जमीनीपासून ५ किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या व जमीनीची किंमत व त्यावरील सुधारणांची किंमत भरण्यास तयार असलेल्या दुसऱ्या आदिवासीला देण्यात यावी अशी तरतुद केली.

फ) जमीनीचे हस्तांतरण ६ जुलै, १९७४ पूर्वी झाले असल्यास आणि ज्या बिगर आदिवासीकडे जमीन हस्तांतरित झाली आहे. त्याची जमीन सार्वजनिक कार्यासाठी सरकारने ताब्यात घेतली असल्यास हस्तांतरीत जमीनीपैकी फक्त अर्धी जमीन बिगर आदिवासीला परत केली जाईल. हस्तांतरीत जमीन परत मिळण्यास पात्र असलेल्या आदिवासीने ती जमीन तो स्वत: कसणार आहे आणि जिल्हाधिकाऱ्याने जमीन सुधारणेवर केलेला खर्च म्हणून ठरविलेली रक्कम बिगर आदिवासी मालकाला द्यावयास तयार आहे. अशी हमी दिल्यानेच त्याला मिळू शकेल. मात्र कायदेशीर अज्ञानाच्या बाबतीत अशी हमी त्याच्या पालकाला देता येईल. इतर कायदेशीर अपात्रता असलेल्या माणसाच्या बाबतीत ज्याची हमी त्याची अधिकृत एजंटला देता येईल. मूळ कायद्यात ३१ ऑगस्ट १९८४ पर्यंत निरनिराळ्या दुरूस्त्या केल्या आहेत.

आदिमांना जमीन देणे व आदिमांकडून जमीन हस्तांतरणावर प्रतिबंध आणणे यावर भारतातील सर्व राज्यांनी कायदे संमत केले आहेत. तरीसुध्दा बऱ्याच आदिवासींकडे अत्यंत अल्प प्रमाणात जमीनीची मालकी आहे व आदिमांचे भूक्षेत्रही आकाराने लहान आहे या जमीनीचे संदर्भातील प्रगती अगदी नगण्य आहे. केरळ, महाराष्ट्र, तमिळनाडू या राज्यात कोणत्याही जमीनीचे मालकीहक्क नसणारे आदिवासी बहुसंख्य आहेत. तथापि, केरळ, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तरप्रदेश, तमिळनाडू या राज्यात जमीनीसह घरे (कुटूंबे) असण्याचे आदिम जमातीचे प्रमाण इतर वर्गाच्या कुटूंबापेक्षा अधिक आहे. मध्य प्रदेश, ओरिसा, झारखंड आणि प. बंगाल या राज्यात आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले असुनसुध्दा आदिमांच्या जमीनी मालकीहक्काच्या बाबतीत त्यांची परिस्थिती सुधारण्याच्या मार्गावर आहे असे म्हणता येणार नाही. राज्यात फार मोठा जमीनीचा पट्टा दाट जंगल व पर्वतराजीत वसलेल्या आदिवासींकडून वेढलेला आहे. या जमीनीवर जंगल साफ करून तेथील जमीन शेतीला लागवडीसाठी योग्य केली आहे. तसेच या जमीनीवर शेती करण्यासाठी त्यांना पुरेसा तो प्रवेश, मुक्त जमीन सापडली आहे. याला विरोध म्हणून त्यांच्या जमीन

मालकीच्या हक्कांच्या बाबतीत परिस्थितीने प्रतिकुल स्वरूपाचे वळण घेतले आहे. तसेच जवळजवळ आदिम जमातीपैकी ७५ टक्के आदिम लोक या देशात जमीन धारक असून ते लहान व सीमांत शेतकरी आहेत असे नमुद केले आहे. देशात आता ९० टक्के आदिम लोक भूमिहिन आहेत. शिवाय त्यांना कोणत्याच प्रकारचे जीवन जगण्यासाठी उत्पादक कार्ये नाहीत व कायम स्वरूपाच्या नोकरीविषयक संधी नाहीत.

जरी देशातील अनेक राज्यात आदिम जमातीकडून बिगर आदिवासींकडे जमीन हस्तांतरणाला प्रतिबंध करणारे कायदे संमत झाले असले तरीसुध्दा बिगर आदिवसींनी आदिमांची जमीन गिळंकृत केली जाते. आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यात आदिमांच्यातील जमीन हस्तांतरणाची प्रकरणे मोठ्या संख्येने आहेत. पण याच राज्यात अशी अनेक आदिवासी खेडी आहेत की, ज्यात सर्व खेडूत (ग्रामवासीय) भूमिहिन आहेत. सूक्ष्म अध्ययनात प्रगतशील सवलती प्राप्त झालेल्या बिगर आदिवासी व राज्य सरकारने आदिम लोकांना जमीन मालकीपासून परात्म ठेवण्यासाठी एकतंत्र (यंत्रणा) वापरले आहे असे नमुद केले आहे. महाराष्ट्रातील अलीकडेच झालेल्या अध्ययनात हे सुचित केले आहे की जरी आदिवासींच्या जमीन हस्तांतरण, विक्री, गहाण ठेवणे किंवा बक्षीस देणे यावर जरी प्रतिबंध ठेवला असला, तरी खेड्यातील काही वृध्द, खेड्यातील प्रतिष्ठा सांभाळणारे जाणते लोक, काही अनौपचारीक कराराद्वारे जमीन हस्तांतरणाची उदाहरणे घडली आहेत. काही ठिकाणी सावकार आपली जमीन आपल्याच गावातील काही शेतकऱ्यांना तोंडी कराराने (बोलीने) कसावयास देतात किंवा आदिमांचे कष्ट स्वस्तात मिळवून शेती पिकविली जाते. जे लहान व सीमांत आदिम शेतकरी असतात त्यांनी कर्जफेडीसाठी आपली जमीन सावकाराकडे गहाण ठेवल्याने व त्यानंतर कर्जफेड काही वर्षात न झाल्याने त्या आदिवासींच्या जमीनी बिगर आदिवासी सावकारांनी गिळंकृत केल्या आहेत.

आंध्र प्रदेश या राज्यातील नऊ जिल्ह्यांतील पश्चिम घाटातील हिरव्या जंगलांनी या राज्यातील ११,५९,५५९ मैलाचा प्रदेश व्यापलेला आहे. परंतु हा प्रदेश जवळ जवळ ३३ आदिम जमातींना सुरक्षित राहिला नाही. येथील आदिम लोकांनी हळूहळू या प्रदेशावरील आपले नियंत्रण गमावले आहे. तसेच काहींनी आपले जीवननिर्वाहाचे साधनही गमावले व इतरांनी दाट जंगलात आपले वास्तव्यस्थान ठरविले. बिगर आदिवासींनी जवळजवळ बेनामी स्वरूपाचे हस्तांतरणाचे व्यवहार केले आहेत व आदिवासींची ५० टक्के जमीन स्वत:च्या मालकीची बनविली. आदिम प्रदेशातील सरकारचे छोटे व मध्यम स्वरूपाच्या पाटबंधारे प्रकल्पामुळे तेथील स्थानीय आदिवासींना आपली जमीन गमवावी लागली. सरकारने आदिम क्षेत्रातील अनेक तलाव, छोटे पाटबंधारे व मध्यम स्वरूपाचे कालवे यांना मंजूर दिली. कारण मैदानी प्रदेशातील लोकांच्या जमीनीवर शेती करणे सुलभ होईल. तेंव्हा बिगर आदिवासीला सुपीक जमीनीवर शेती करणे आवश्यक वाटते तेंव्हा आदिवासी माणसाला (पोडु) शेतीवर समाधान मानावे लागते.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या काळात सरकार गरीब आदिवासी वनजमिनीचा प्रश्न सोडवू शकलेला नाही. ही मोठी शोकांतिका ठरली आहे.

### **३.३.३ आदिवासी लोकांची निरक्षरता व पिळवणूक** (Illitracy and Exploitation of Tribal People)

**अ) निरक्षरतेची समस्या** (Illitracy)

आदिवासींच्या दयनीय अवस्थेत भर टाकणारे म्हणजे त्यांचे अज्ञान/निरक्षरता आहे. त्यांच्या अज्ञानाचा फायदा अनेक हितसंबंधी घेत आहेत. त्यांना मिळणाऱ्या सुखसोई, सवलती, सुविधा, फायदा यापासून ते वंचित रहात आहेत. म्हणून सरकारने त्यांच्या कल्याण कार्यक्रमांत शिक्षणाला महत्व व आग्रक्रम दिलेला आहे. तसे पाहिले तर देशातील साक्षरतेचे प्रमाण २९.९७: (१९८०) आज महाराट्र राज्यात ७० लक्ष निरक्षर आहेत. वर्गीकृत जमातीत हे प्रमाण ८.५४: आहे. महाराष्ट्रात आदिवासी समाजात १९५१ साली २: देखील साक्षरता नव्हती. आज ती ३६: झालेली आहे. स्त्रीयांमधील साक्षरतेचे प्रमाण २४: एवढे आहे. सर्वसामान्य जनतेत आदिवसींचे साक्षरतेचे प्रमाण ५० : हून कमी आहे. गेल्या ५० वर्षात साक्षरतेची पातळी उंचावत आहे. आदिमांना शिक्षण, घर, उत्पन्न, जमीन नसल्याने ते प्रेगती करू शकत नाहीत. दारिद्रयामुळे शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणून दारिद्रय घालविता येत नाही. अशी अवस्था त्यांची झालेली आहे. गेल्या ५० वर्षातील आदिम जमातीविषयीची शासनाची शैक्षणिक आणि आर्थिक धोरणे पंचवार्षिक नियोजनावर आधारित आहेत. सध्याच्या आदिवासी नियोजनाचा मुख्य भर शेतीवर, त्यांच्या विकासावर आहे. पण मोलमजूरी, भूमिहिनांसाठी नियोजन अपरिहार्य आहे.

कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. शिक्षणामुळेच दृष्टी, व्यापकता, विशालता प्राप्त होते. सभोवतालच्या जगाचे, समाजाचे ज्ञान होते. समाजात स्पर्धा आणि महत्वकांक्षा निर्माण होवून समाजाच्या प्रगतीला गती मिळते. एखाद्या समाजात साक्षरतेचे प्रमाण किती आहे. यावरून त्या भागातील, समाजातील, शैक्षणिक प्रगती व सामान्यज्ञान कोणत्या पातळीवर आहे याची कल्पना येते.

महाराष्ट्र राज्यात १९६० नंतर आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला अधिक गती मिळाली. १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी जमातीतील साक्षरतेचे प्रमाण ५९ : होते.

आदिवासी समाज जंगलात, दऱ्याखोऱ्यात, डोंगरकपारीत, राहणारा, शिकार आणि कंदमुळे खावून जीवन जगणारा, नैसर्गिक आपत्तींना घाबरून त्यांची पुजा करणारा, प्रश्नांची उकल झाली नाही. अंध विश्वासाला माहेरघर करणारा, जादूटोना, मंत्रतंत्र, कर्मकांड, जपतप इ. ने उपचार करणारा, दारिद्रय, अज्ञान यांनी ग्रासलेला, आधुनिक प्रगतीचा संपर्क नसलेला, दोनवेळा जेथे भाताची पेज, कंदमुळे, रानातील फळे, नदीतील खेकडे, मासे यावर गुजराण करणारा, शिक्षणापेक्षा 'जंगलचे राजे' म्हणून घेण्यात धन्यता वाटणारा आमचा आदिवासी आहे. याचे कारण त्यांच्यामध्ये असणारी निरक्षरता.

**आदिवासी जमाती व त्यांच्यासाठी सोईसुविधा –**

शासनाच्या शिक्षणविषयक विविध योजना आदिवासीत राबविल्या जात आहेत. उदा. खडूफळा, अंगणवाडी, अनौपचारिक शिक्षण, शालेय पोषण आहार, आश्रमशाळा, वसतिगृहे, शालेय मोफत पाठ्यपुस्तके, शैक्षणिक इतर सवलती, शिष्यवृत्ती, सोईसुविधांचा लाभ आदिवासींना मिळत आहे. पण विज्ञान व तंत्रज्ञान शाखेकडे बोटांवर मोजण्याएवढीच मुले जातात. पण मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये राखीव जागा भरल्या जात नाहीत. परिणामी खऱ्या आदिवासींच्या जागी खोटे आदिवासी प्रवेश मिळवू लागले आहेत. डी.एड., बी.एड. सारखे व तांत्रिक शिक्षणाकडे आदिवासींचा कल दिसत नाही. याचे कारण आदिवासी मुलांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत नाही. तसेच मुलांना आत्मविश्वास नसतो. फक्त शिकावयाचे म्हणून शिकतात. यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याकडे न होता निरक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. यासाठी विविध संस्थांनी व शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करून शिक्षणाकडे कल वाढविला पाहिजे.

आदिम कल्याण कार्यक्रमाद्वारे आदिवासीत रेडिओ, दुरदर्शन, पुस्तके, छोटी चित्रे, पुस्तिका इ. माध्यमांचा वापर करून सामाजिक व नैसर्गिक पर्यावरणाविषयी माहिती दिली जाते. प्राथमिक शाळा स्थापन करून शिक्षण सक्तीचे केले आहे. आत्मविश्वास येण्यासाठी स्पर्धात्मक परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केली आहेत. आश्रमशाळेतून शेती, वीणकाम, शेतीपुरक उद्योग, फळबागा, फुलबागा, वनीकरण, कुटीरोद्योग, हस्तव्यवसाय, भाजीपाला, औषधी वनस्पती, पशुविकास, तंत्रविकास इ. शिक्षण दिले जात आहे. काही राज्यात औद्योगिक शाळा स्थापन केल्या आहेत. त्यातून विणकाम, शिवणकाम, विद्युतअभियांत्रीकी, शिंपीकाम, लोहारकाम इ. शाखांचे शिक्षण दिले जात आहे. या सुविधांचा लाभ अजूनही घेत नसल्याने साक्षरता दर वाढत नाही. आदिवासीत पुरूषांच्या पेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. शिक्षण, अर्थव्यवस्था व समाज हे तिन्हीही घटक परस्परांशी संबंधित आहेत. आदिवासींची प्रगती, विकास, सामाजिक सुधारणा, आर्थिक विकास यासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाचा आहे. आदिम विकास कार्यक्रमात प्रौढांकडून सहकार्य व सहभाग होण्यासाठी प्रौढशिक्षणही आवश्यक आहे व असा प्रयोग आदिवासीत चालू आहे.

शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निश्चित शैक्षणिक धोरण, शिक्षकांची नियुक्ती, प्रशिक्षक शिक्षक, शिक्षणाचे माध्यम (मातृभाषा) क्रमिक पुस्तके, आर्थिक सहाय्य, शालेय इमारती, सर्वसोईनी युक्त शाळा यासाठी सर्वसामान्य धोरण आखणे जरूरीचे आहे. यासाठी सरकार आदिम कल्याण विभाग शिक्षण विभागाचे एक केंद्र म्हणून आदिम शिक्षण हे धोरण निश्चित ठरू शकते.

**आदिवासींच्या निरक्षरतेची कारणे :–** (आदिवासी समाजात साक्षरतेच्या मंदगतीची कारणे)

**१) विसंगती अभ्यासक्रम –** भारतीय समाजातील सर्वसाधारण विद्यार्थ्यांकरीता असलेला अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. ही शैक्षणिक अभ्यासक्रमातील विसंगती असून या आदिवासींकरीता गरजा आणि सांस्कृतिक मुल्यांचा विचार केलेला दिसत नाही. हा अभ्यासक्रम योग्य नाही. प्राथमिक स्तरावर तो गैरलागू स्वरूपाचा आहे.

**२) पालकांचे दारिद्र्य** – भारतातील आदिवासी गरीबीत व दारिद्र्यात जीवन जगत असून उपजिविकेकरीता कुटूंबातील आर्थिक क्रियेत मुलांचा वापर करून घेतात लहान भावंडांना सांभाळण्यासाठी मोठ्या मुलांनी घरातच थांबावे लागते. अतिदुर्गम भागात जंगलात, पाळणाघरे व बालवाडी नसल्याने आदिवासी मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते.

**३) शैक्षणिक सुविधांचा अभाव** – आदिवासी दुर्गम भागात शैक्षणिक संस्था पुरेशा सुविधांच्या अभावाने कार्यरत आहेत. इमारती सुयोग्य नाहीत. असतील तर प्रशिक्षित शिक्षक नाही. त्या शिक्षकास आदिवासीविषयी आस्था नाही. पुस्तकपेढी नाही, शैक्षणिक साहित्य नाही. शिष्यवृत्या पासून काही आदिवासी वंचित आहेत.

**४) विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरहजेरी** – आदिवासी क्षेत्रात प्रशिक्षित आस्थापूर्ण शिक्षकांची गैरहजेरी हा आदिवासी शिक्षणावर विपरीत परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. नैसर्गिक आपत्ती संकटे यामुळे कधी मुले गैरहजर तर कधी शिक्षक गैरहजर राहतात. आदिवासी शाळेत नोकरी करावी किंवा असावी, अशी इच्छा शिक्षकांची नसते. त्यामुळे शैक्षणिक विकासकामात गती मिळत नाही. त्यामुळे मुलेही शाळेत उपस्थित राहात नाहीत.

**५) शिक्षणाचे माध्यम** – आदिवासींच्या त्यांच्या बोलीभाषेत, प्रादेशिक भाषेत शिक्षणाचे माध्यम नसल्याने मुलांना अभ्यासक्रम, धडे कळत नाहीत. भिन्न भाषा, धडे, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यामुळे मुले गोंधळतात. त्यामुळे शाळेकडे पाठ फिरवण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे शाळा बंदही पडतात. तेंव्हा त्यांच्या मातृभाषेतून, संस्कृतीतून शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

**६) शैक्षणिक धोरणातील त्रुटी** – आदिवासीसाठी स्पष्टरित्या व स्वतंत्र धोरण सर्वत्र सारखे नाही. आदिवासी शाळा काही ठिकाणी शिक्षण विभागाच्या तर काही समाजकल्याण विभागाच्यामार्फत चालविल्या जातात. यामुळे शैक्षणिक प्रगतीवर त्याचा विपरित परिणाम झालेला आहे. शाळेतील प्रवेश, नोंदणी याचा दर प्राथमिक, माध्यमिक स्तरावर चांगला असली तरी उच्चशिक्षणात दर घसरलेला दिसून येतो. आकडेवारीची तपासणी अतिरंजित असते. सुख सुविधा, अभ्यासक्रम, शालेय साहित्य, इमारती, शिक्षक यांची कमतरता असल्याने शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक आहे.

**७) आदिवासींची शिक्षणाविषयी उदासिनता** – आदिवासी लोकांना अजुनही शिक्षणाचे महत्त्व कळले नाही. अनेक लोकांना तर शिक्षणाचा गंध देखील नाही. त्यामुळे आदिवासी लोक शिक्षणाविषयी उदासीन आहेत. मुलांना शिकविले पाहिजे असे त्यांना वाटत नाही. जिथे पालकच शिक्षणाविषयी उदासीन असतात तेथे मुले शाळेत जाण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

**८) शैक्षणिक वातावरणाचा अभाव** – आदिवासी क्षेत्रात शिक्षणासाठी पोषक असे शैक्षणिक वातावरण नसते. शाळा कुठेतरी जिल्हा पिरषदेच्या मोडक्या इमारतीत नाही तर खाजगी घरात भरवली जाते. शाळेच्या बाजूला उकिरडे, गुरांचे गोठे, गटारे असतात. विद्यार्थ्यांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असते. त्यांच्यात

स्वच्छतेचा अभाव असतो. चांगल्या शैक्षणिक वातावरणाचा अभाव असल्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण होत नाही.

**९) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गैरसमज** – कोवळ्या वयाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीचे अनेक गैरसमज असतात. खुप अभ्यास करावा लागतो. शिक्षक खुप मारतात. असे काही गैरसमज असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड वाटत नाही. उलट शिक्षण आणि शिक्षकांविषयी भिती त्यांच्या मनात निर्माण होते. तसेच शिक्षणाची भाषा देखील वेगळी असते. ती त्यांना समजत नाही. मध्येच शाळा सोडून देण्याचे प्रमाण आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये अधिक आहे.

**१०) उच्चशिक्षण व गळीतचे प्रमाण** – उच्चशिक्षणात बिगर आदिवासींचे प्रमाण अधिक आहे. आदिवासींने प्रवेश घेतला तरी त्यांचे गळतीचे प्रमाण अधिक आहे. शहरी विद्यार्थ्यांसमोर आदिवासी मुले मागे पडतात. त्यांना उच्चशिक्षण सोडून द्यावे लागते किंवा तसे सांगितले जाते. अभ्यासक्रम, शैक्षणिक सुविधा अनेक अडचणींमुळे त्यांना दुर्मिळ संधीपासून वंचित रहावे लागते. तसेच आदिवासी मुलांना भेदभावाची वागणूक दिली जाते.

**११) शासकीय धोरण आणि मार्गदर्शनाचा अभाव** – राखीव (आरक्षण) जागेच्या शासकीय धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील, उद्योगधंदे, बँकांच्या सेवा यामध्ये ठरवून दिलेल्या कोट्याप्रमाणे आदिम तरूणांना स्पर्धेत कमी ठरल्यामुळे उच्चपदांवर नोकऱ्या मिळू शकत नाहीत. सार्वजनिक क्षेत्रातील बरेचसे उद्योगधंदे आदिम क्षेत्रात स्थापन केलेले आहेत. जमीन सरकारने काढून घेतल्यामुळे जीवननिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अकुशल कामात व कनिष्ठ पदावर काम करतात. आदिवासी मुलांसाठी पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे स्पर्धेच्या युगात मागे पडतात. त्यामुळे शिक्षणाकडे त्यांची वाटचाल राहात नाही.

अशाप्रकारे आदिमामधील निरक्षरतेची विविध कारणे आहेत.

**आदिम समाजात साक्षरता दर वाढावा यासाठी खालील सुचना व शिफारशी केलेल्या आहेत :–**

१) **शिक्षण – अभ्यासक्रमाची आखणी :** आदिवासींसाठी अभ्यासक्रम तयार करताना आदिवासींच्या गरजा लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी पुरेशा निधीची तरतुद व व्यवस्था व्हावयास हवी. अभ्यासक्रमामध्ये परंपरागत स्थानिक कौशल्य, कारागिरी यांचा समावेश करायला हवा.

२) **शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास आग्रक्रम :** आदिवासी क्षेत्रात शैक्षणिक संस्था उघडण्यासाठी विशेष अग्रक्रम देण्यात आला पाहिजे.

३) **शिक्षणाचे माध्यम :** प्राथमिक स्तरावर शिक्षणाचे माध्यम हे आदिवासी मातृभाषा असावयास पाहिजे. माध्यमिक स्तरावर प्रादेशिक भाषा किंवा राज्य भाषा हे शिक्षणाचे माध्यम ठेवण्यात यावे.

४) **शिक्षकांची निवड :** योग्य प्रमाणात प्रशिक्षित व पात्र शिक्षकांची कमतरता भासली तर आदिवासी भाषा अवगत असलेल्या बिगर आदिवासी शिक्षकांची देखील निवड करण्यात यावी.

**५) बालवाड्या, बालसंगोपनगृहे :** आदिवासी क्षेत्रात अधिकाधिक बालवाड्या सुरू करण्यात याव्यात. त्याचबरोबर बालसंगोपनगृहे व्यवस्था, पोषण आहार, पाळणाघर इत्यादी सुविधा पुरविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे शिक्षक प्रक्रियेतील विविध घटकांवर म्हणजे शाळा, बालवाड्या, बालसंगोपनगृहे यावर प्रभावी देखरेख हवी.

**ब) आदिवासी लोकांची पिळवणूक (शोषण)** (Exploitation of Tribal People)

आदिवासी लोक स्वभावाने साधेभोळे असतात. ते निष्कलंक असतात. समाजातील कपटनितीचा त्यांच्यामध्ये लवलेश देखील नाही. ते इतरांशी अत्यंत आपुलकीने वागतात. आदिवासी लोकांचा साधेपणा आणि त्यांचे इतर गोष्टीविषयी असलेले अज्ञान याचा फायदा सभ्य लोकांनी घेतला. आदिवासी क्षेत्रात सावकार, जमीनदार, अधिकारी, ठेकेदार, ख्रिश्चन मिशनरी इत्यादी लोक गेलेत. त्यांनी आदिवाशींसी संपर्क केला. आदिवासीच्या दृष्टीने हे लोक सभ्य होते. या लोकांची वेशभूषा, राहणीमान, भाषा ही आदिवासींपेक्षा वेगळी होती. त्यांना बाहेरील लोक श्रेष्ठ वाटू लागले. म्हणून या लोकांशी आदिवासींनी अतिशय चांगले वर्तन केले. परंतु सभ्य समाजातील समजले जाणारे आणि स्वत:ला आदिवासींपेक्षा श्रेष्ठ मानणाऱ्या जमीनदार, सावकार, ठेकेदार, अधिकारी इत्यादी लोकांनी आदिवासींच्या चांगुलपणाचा फायदा घेवून त्यांचे शोषण केले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासी क्षेत्रात शाळा, दवाखाने उघडलेत, हे खरे असले तरी आदिवासींच्या या सेवेमागे त्यांना ख्रिश्चन बनविणे हा खरा ख्रिश्चन मिशनऱ्यांचा उद्देश होता. म्हणून ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्यांच्या गरीबी आणि साधेभोळे पणाचा फायदा घेवून त्यांचे एक प्रकारे धार्मिक आणि सांस्कृतिक शोषण केले आहे.

आदिवासींचे दारिद्र्य, बेकारी, गरीबी, अज्ञान, निरक्षरता, मितभाषी, जागेचे अज्ञान, तांत्रिक सुविधांचा अभाव, अलिप्तता, अंधश्रध्दा भोळ्या समजूती, कर्मकांड या सर्व बाबींमुळे त्यांच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेवून सर्व क्षेत्रात त्यांची पिळवणूक होत आहे. आदिवासींची पिळवणूक खालीलप्रमाणे होत आहे.

**१) जंगलविषयक कायदे** - भारत सरकारने १९५२ मध्ये जंगलविषयक कायदे अंमलात आणून जंगलातील उत्पादने गोळा करणे, शिकार, कुऱ्हाडशेती यावर बंधने आणली. त्यामुळे जीवननिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. पैसा विनिमय अर्थव्यवस्थेमुळे आदिम अज्ञानाचा फायदा व्यापारी, सावकार, दलाल, जमीनदार, कंत्राटदार यांनी उठविला. केवळ भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासींना आपल्या संपूर्ण जीवनाची किंमत मोजावी लागत आहे. व्यापारी लोकांना आदिवसी म्हणजे आपली राखीव कुरणे वाटतात. आदिवासींना पाहिजे तसे राबवून घेतात व बोटाच्या इशाऱ्यावर नाचवितात. जिवंतपणी त्यांना मरणयातना भोगाव्या लागत आहेत. ही पिळवणूक नसून आदिवासी जीवनावर आक्रमण आहे. कंत्राटदार जंगलकाम, कोळसाखाणी, खाणकाम, झाडे तोडणे, गवत कापणे ही कामे आदिवासींकडून अत्यंत कमी वेतनावर करून घेतात. त्यांचा खरा फायदा कंत्राटदारांचा होतो. ते श्रीमंत बनतात. आदिवासी गरीबीतच जीवन जगतो.

**२) कर्जबाजारीपणा व वेठबिगारी पध्दती** - पैशासाठी फायद्यांसाठी आदिवासींच्या स्वतंत्र जीवनावर आक्रमण केले आहे. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा सावकार, जमीनदार, कंत्राटदार, व्यापारी, दलाल

यांनी घेतला आहे. त्यांच्या भोळ्या स्वभावाचा, असहाय्यतेचा फायदा बिगर आदिवासींनी उठविला. आदिवासींना गुलाम म्हणून जगावे लागते. पिढ्यानपिढ्या विनामोबदला जमीनदारांच्या घरची, शेतीची कामे करीत त्यांना सर्वस्व गमवावे लागते. बायका, मुले, बहिणी, घरदार, जमीन, गुरेढोरे यांवर त्यांचे नियंत्रण राहात नाही. कर्जफेडीसाठी सावकार या सर्व बाबींचा लिलाव करतो. आदिम स्त्रिया व मुलींना वेश्या व्यवसायास प्रवृत्त केले जाते. गुप्तरोगांची लागण होते. जमीनदार सावकार निर्लज्जपणे याचा फायदा घेतात. त्यांना कर्जबाजारीपणात ठेवणे व्यापाऱ्यांना धन्यता वाटते. वेठबिगारीचा कायदा करूनही प्रश्न सुटलेला नाही. आदिवासी समाज नेहमीच उपेक्षीत राहिला आहे. वेठबिगारीची प्रथा काही ठिकाणी चालू आहे. आंध्रप्रदेशात आदिवासींना गेती, वेट्टी, बिहारमध्ये कमला, गुजातमध्ये डुंबला, हलपती, हाळी तर महाराष्ट्रात आदिवासी या पध्दतीला वेठबिगार म्हणतात.

आदिवासींच्यात जागृती निर्माण झाल्यानंतर बंडखोरीला प्रगत समाजातील विशिष्ट हितसंबंधी समुहाकडून विरोध होत आहे. १९८४ मध्ये धुळे जिल्ह्यातील शहारे तालुक्यातील ससरे व शेल्टी या गावात आदिवासींचे अग्निकांड घडून आले. शेल्टी प्रकरणातून असे दिसून येते की, आदिवासी हे गुलाम व वेठबिगार म्हणूनच उपलब्ध व्हावेत. ही प्रगत समाजाची इच्छा आहे. आदिवासींनी संघटीत होवू नये. मुजरी मागू नये म्हणून वरिष्ठ वर्गीय आदिवासींना वेठीस धरतात. हत्याकांड घडवून आणतात. ही भिती आदिवासींना वाटते. श्रमिकांनी कष्ट करावेत व वरिष्ठांनी त्याची फळे विनासायास खावीत अशा समाजव्यवस्थेमुळेच मानवतेला काळीमा फासणारे शेल्टीमधील हत्याकांड प्रकरण दिसून येते. म्हणून सामाजिक व आर्थिक समता जर प्रस्थापित करावयाची असेल तर समाजमन हे परिवर्तनास अनुकुल असले पाहिजे.

**३) प्रगतांच्या संपर्कामुळे निर्माण झालेले प्रश्न** - ख्रिश्चन धर्माच्या विळख्यात आदिम समाज अडकल्याने त्यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक एकजिनसीपणा नष्ट झालेला आहे. हिंदूंच्या संपर्काने तर त्यांच्या सांस्कृतिक जीवनात बदल होत आहे. दळणवळणाच्या माध्यमाने शहरी व नागरी समाजातील लोक आदिमांच्या जवळ जाऊन पोहोचल्याने काही जमातीत परिवर्तने घडून आली. काहींच्यात आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे धाडस निर्माण झाले तर काहींचे पारंपारिक जीवन बदलले. शहरी सांस्कृतीचे आक्रमण त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रावर झाले आहे. कंत्राटदारांनी त्यांची वसतीस्थाने, घरे उध्वस्त केली तर जमीनदारांनी त्यांच्या जमीनी हडप केल्या. जंगलचे राजे आता कर्जबाजारी बनले आहेत. वारली, माडिया, गोंड, संथाळ, थोरिया, अहो, चकमा, भिल्ल या जमातीचे हाल होत आहेत. त्यांच्या सांस्कृतिक व पारंपारिक ज्ञानाचा विनाश होत आहे. कला, संस्कृती, ज्ञान, वैद्यकशास्त्र (आयुर्वेद), वनस्पतीचे गुणविशेष, वापर, माहिती, प्राणीजीवनाविषयी आदिमांना असणारी माहिती हा सर्व कित्येक वर्षाचा ज्ञानभांडार लोप (नष्ट) होण्याची भिती निर्माण झाली आहे. प्रगत समाजाच्या राक्षसी व स्वार्थी प्रवृत्तीने आदिम हतबल होत आहेत. भारतातील आदिम जमातीभोवती प्रगत सांस्कृतीचा वेढा वाढल्याने त्याची सर्व क्षेत्रात पिछेहाट होवून ते पारतंत्र्यात दिवस कंठीत आहेत.

**४) आदिवासींच्यातील मानसिक ताणतणाव** - शासन दरबारातील लालफितीचा कारभार, अकार्यक्षम प्रशासन व्यवस्था, हितसंबंधाचा भ्रष्टाचार, अपुरे अर्थबळ, विस्थापितांना दिलेली जमीन पडिक असणे, मुळ जागेचा वापर औद्योगिक कारणासाठी न होता इतर कारणासाठी होणे, शिक्षकांचा व शैक्षणिक साधनांचा अपुरेपणा, पिण्यायोग्य पाणीपुरवठा नसणे, आरोग्यविषयक गैरसोय, शासकीय कर्मचारी, जमीनदार, कंत्राटदार इ. कडून अपमानास्पद वागणूक, आदिवासींच्या आशा, आकांक्षा, भावनांचा विचार न होणे, दादागिरी, गुंडगिरी, आरेरावी, उपेक्षा, पिळवणूक, विस्थापितांना जागा देताना आदिवासींच्या पसंतीचा विचार न करणे यावरील सर्व कारणामुळे आदिवासींचे मानसिक संतुलन ढासळत असून त्यांच्यात ताणतणाव निर्माण होत आहे. जागेची मिळेल ती रक्कम घेवून घरदार सोडत आहेत. आदिवासींचे कल्याण व विकास कार्य खऱ्या अर्थाने पुरे न झाल्याने आदिवासीमध्ये नैराश्य निर्माण होवून त्यांच्यात मानसिक ताणतणाव वाढत आहे.

**५) आदिवासींचे पुनर्वसन-असंतोष** - आदिवासींचा भूप्रदेश उद्योगधंदे उभारणी, धरण बांधणी, औद्योगिक उभारणी यासाठी हवा असतो. या सर्व उभारणीमध्ये जमीनी किती जाणार, जागा किती जाणार याचा हिशोब करून त्यांना राहणेसाठी जागा व घरे, शेतीसाठी, उत्पादनासाठी, जमीनी देणे हे काम सरकारचे आहे. प्रथम पुनर्वसन नंतर धरण असे होत नाही. त्यामुळे बळजबरीने जमीनीवर कब्जा केला जातो. त्याचे दुर्बल्य, अज्ञान, असंघटितपणाचा फायदा इतर बिगर आदिवासी घेतात. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य-असंतोष वाढत आहे. आदिवासींना पुनर्वसतिकरण वाटण्याऐवजी उध्वस्तीकरण वाटत आहे. परंपरा कला, संस्कृती, पिढ्यानपिढ्या निवासस्थान, परिसर, पर्यावरण, जमीनी हे सर्व सोडून नवीन जागेत विस्थापित व्हावे लागते. पण तेथे कोणत्याच सुविधा नसणे, गैरसोयी, उत्पादनासाठी काहीही नसणे, यामुळे पिळवणूक होवून एकप्रकारचा असंतोष, ताणतणाव निर्माण होवून त्यांचे भावनिक विश्वच हरवले आहे. उदा. धुळे जिल्ह्यातील सरदार सरोवरात बुडणाऱ्या मनीवेली गावात आदिवासी. आदिवासींना मुळच्या वसतीस्थानावर, पर्यावरण, संस्कृती, जंगल, देवदेवता, मंदिरे, प्राणी यात आदिम एकजीव झालेले असतात. पण जेंव्हा विस्थापन होते तेंव्हा प्रगत समाज, संस्कृती, भाषा, रितीरिवाज, खानपान, पोशाखपध्दती, धर्म, करमणूक इ. संपर्क आल्याने त्यांना बऱ्यावाईट गोष्टींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे ताणतणाव असंतोष वाढत आहे. जागतिक कमिशनच्या अहवालानुसार विकास प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांत ४० ते ५० टक्के लोक आदिवासी आहेत.

डहाणू-उंबरगावचा वारली, खानदेशातील भिल्ल, चंद्रपूर बस्तरचा माडिया, दंडकारण्यातील गोंड, सिंहभू-संथाळ मधील संथाळी, भोरीया, नागा, अहो इ. आदिवासी देशोधडीला लागले आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश येथील प्रकल्पाने १,७०,००० हेक्टर वरील जंगल उध्वस्त होणार आहे. त्यामुळे ७५ हजार आदिमांचे भवितव्य अंधारलेले आहे. जंगली प्राणी, वनस्पती, जंगले, दुर्मिळ झाडे यावर फार मोठे संकट येणार आहे. मुण्डा, उराँव, संथाळ हे आदिवासी आसाम, दार्जिलिंग येथे चहाच्या मळ्यात अपुरे वेतन यामुळे त्यांची पिळवणूक वाढली. कर्जबाजारीपणातूनच काही आदिवासी आपल्याच जमीनीत मजूर, वेठबिगार म्हणून काम करू लागले. उदरनिर्वाहासाठी काहीजण उद्योगधंद्यात आलेत आणि इथेही त्यांची पिळवणूक सुरू झाली.

सेवाभावी संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, सामाजिक मानवशास्त्रज्ञ यांनी स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या विविध समस्यांकडे लक्ष देवून त्यांचे हक्क, संरक्षण, कल्याण, जमीन जंगलेविषयक हक्क इ. चा आदर पैसा किती खर्च केला यावर अवलंबून न ठेवता आदिवासीतील गुणवत्तात्मक वाढ यावरच फलश्रुती ठरवावी. यासाठी विस्थापितांचे पुनर्वसन करताना त्यांची परिस्थिती व त्यांची संस्कृती यांचे संपूर्ण आकलन करून विकास कार्याचे नियोजन करावे.

## **३.३.४ आदिवासी धार्मिक गुंतागुंत/संकट/प्रश्न** (Religious Crisis)

समाज मग तो कोणताही असो संख्येने लहान असो वा मोठा असो, प्रगत असो वा अप्रगत असो, विकसित असो वा विकसनशील असो त्या सर्व समाजात कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात धर्म ही व्यवस्था असतेच. पूर्वी काही विचारवंतांना असे वाटे की, मानवी समाजाचा जसा विकास होत गेला तशी धर्मविषयक संकल्पना निर्माण झाली. पण मानवी सामाजाच्या सुरुवातीपासून धर्मव्यवस्था आढळून येते असे मानवशास्त्रज्ञांनी सत्य प्रतिपादन केले आहे.

- **धर्माचा आधार :– अलौकिक शक्ती वा प्राण्यावरील श्रध्दा**

सहाजिकच या जीवनातील अनिश्चीत, अनाकलनीय घटनांपाठीमागे काही ना काही कारण असले पाहिजे अशा विचारातून मानवाने जे उत्तर शोधले ते म्हणजे अलौकिक शक्ती आणि दिव्यप्राणी. या अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या अस्तित्वामुळे, त्याच्या प्रभावामुळे या बऱ्यावाईट, अनिश्चित व अनाकलनीय घटना घडतात. सहाजिकच, जीवनात स्वास्थ्य सुख, सुरक्षा लाभून दु:ख, नैराश्य, अपघात, आजार वगैरे टाळण्यासाठी या अलौकिक शक्तीला अगर दिव्यप्राण्याला प्रसन्न करून घेतले पाहिजे. या सृष्टीतील घटना व मानवी जीवन हे सारे या अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यांकडूनच नियंत्रित केले जाते. म्हणून त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी मानवाने विशिष्ट प्रकारच्या वर्तनावर भर दिला. पुजा, होम, हवन, यज्ञयोग, प्रार्थना वगैरे वर्तनप्रकार रूढ झाले. तेंव्हा धर्माची सुरुवात वा धर्माचा आधार ही अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यांवरची श्रध्दा होय. ही अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यावरील श्रध्देतूनच ईश्वर, देव वगैरे कल्पना विकसित झाल्या. या देवाच्या स्वरूपाविषयी विविध विचार रूढ झाले. त्यानुसार वेगवेगळे आचार आचरणात आणले जावू लागले. पुढे त्याची परिणती वेगवेगळ्या धर्मात झाली.

- **धर्माची व्याख्या :–**

जीवनातील अनपेक्षित, अनाकलनीय व दु:खदायी घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मानवाने अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यांच्या अस्तित्वावर जी श्रध्दा ठेवून विशिष्ट प्रकारच्या आचारास जीवनात स्थान दिले त्यास धर्म म्हणता येईल. वेगवेगळ्या मानवशास्त्रज्ञांनी धर्माच्या व्याख्या देताना हाच विचार मांडला आहे.

१. एडवर्ड टायलर यांच्या मते, ''धर्म म्हणजे दिव्यप्राण्यांवरील श्रध्दा होय''

२. पी. गिस्बर्ट यांच्या मते, ''धर्म म्हणजे मानवाचे अलौकिक प्राण्याशी असलेले संबंध व त्यावरील त्याचे अवलंबन होय''

३. आर. एन. मुखर्जी यांच्या मते, ''धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या अतिमानवी किंवा अलौकिक शक्तीवर श्रध्दा होय. या श्रध्देचा आधार भय, पुज्यभाव, शक्ती आणि पावित्र्याची कल्पना नसून ती प्रार्थना, पुजा अगर समर्पण यातून व्यक्त होत असते''

- **आदिवासींच्या धर्मश्रध्दा** (Tribal Religious Beliefs)

आदिवासींच्या धर्माकडे आपण जेंव्हा पाहतो, तेंव्हा फारसे तात्विक विचारमंथन त्यांच्या धर्मात अढळत नाही. सतत निसर्गाधीन असणारा आदिवासी हा अधिक अनिश्चित पर्यावरणात जगत असतो. त्याच्यासाठी त्याच्याभोवती घडणाऱ्या अनावश्यक घटनांची मालिका फार मोठी आहे. या सर्वांचा प्रभाव त्यांच्या सर्वच सामाजिक संस्थांवर पडला आहे. परिणामी, त्यांच्या जीवनात धर्माचा प्रभाव फार मोठा आहे. धार्मिक, श्रध्दांबद्दल त्यांची मते व प्रतिक्रिया सामूहिक असतात. त्याबद्दल त्यांच्यात वैयक्तिक मतभेद आढळत नाहीत.

आदिवासीत अलौकिक शक्ती अगर दिव्यप्राणी यांच्या स्वरूपांबाबत ज्या भिन्न संकल्पना आढळतात, त्यावरून त्यांच्यातील धर्मश्रध्दांचे स्वरूप कळून येते. याच धर्मश्रध्दांवरून एडवर्ड टायलर, मॅरेट, प्रियस, मॅक्समुल्लर वगैरेंनी धर्माची उत्पत्ती कशी झाली याबाबत आपले विचार मांडले आहेत या आदिवासींच्या विविध श्रध्दा पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सर्वात्मवाद :** मानवशास्त्रज्ञ एडवर्ड टायलर यांनी हा सर्वात्मवादाचा विचार मांडला आहे. सर्वात्मवादालाच आत्मवाद अगर सजीवात्मवाद असेही म्हटले जाते. 'अविनाशी स्वरूपाचा आत्मा अस्तित्वात आहे' ही या धर्मश्रध्देची मध्यवर्ती कल्पना आहे. आदिवासींच्या मनात आत्म्याची कल्पना कशी निर्माण झाली असावी याचे विवेचन एडवर्ड टायलरने केले आहे.

**२) शक्तीवाद :** मॅक्समुल्लर, प्रिअस, मॅरेट यासारख्या विचारवंतांनी शक्तिवादाची संकल्पना मांडली. शक्तिवादालाच मानावाद, बोंगोवाद असे म्हटले जाते.

**३) निसर्गवाद :** प्रसिध्द जर्मन पंडित मॅक्समुल्लर याने निसर्गपूजा ही धर्माची प्राथमिक अवस्था मानली आहे.

- **आदिवासींतील कर्मकांडे किंवा धर्माचरण** (Tribal Religious Practices)

अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यावरील श्रध्दा हा धर्माचा एक भाग झाला पण या श्रध्देय शक्ती वा प्राण्याला प्रसन्न करून घेण्यासाठी काही कर्मकांडे करावी लागतात. कर्मकांडे करण्याच्या या आचरणालाच धर्माचरण असे म्हटले जाते. धर्माचरणात होकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही वर्तनांचा समावेश होतो. ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी कोणते विधी करावेत हे जसे सांगितले जाते, तसे काय करू नये, कोणत्या गोष्टी निषिध्द मानाव्यात हे देखील अग्रहाने सांगितले जाते. आदिवासींत आढळणाऱ्या धर्माचरणाच्या प्रमुख प्रकारांचे पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

**१) प्रार्थना :** ईश्वराची म्हणजे अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्याची केलेली तोंडी आळवणी म्हणजे प्रार्थना होय.

**२) यज्ञ :** ईश्वराची म्हणजे अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यांची कृपा संपादन करण्यासाठी यज्ञ हा प्रभावी मार्ग मानला जातो. दिव्यशक्तीच्या नावे काही वस्तू अगर प्राणी दिव्यशक्तीला भेट दिले जातात. यज्ञ म्हणजे प्रतिकात्मक स्वरूपात भक्ताने केलेला काही गोष्टींचा त्याग होय.

**३) निषेध नियम :** ईश्वराला प्रार्थना, यज्ञातून भेट दिलेल्या वस्तू आवडतात. तशा त्याला काही गोष्टी आवडत देखील नाहीत. काही गोष्टींचे भक्षण, काही प्रकारचे वर्तन, दिव्यशक्तीला वर्ज्य असते. या गोष्टी केल्या तर दिव्यशक्तीचा कोप होतो अशी आदिवासींची श्रध्दा असते. धार्मिक स्थळे, वस्तू इत्यादींचे पावित्र्य सांभाळणे महत्त्वाचे नसल्याने या वर्जनतेचे नियम काटेकोरपणे पाळले जातात.

(आदिवासी धर्मश्रध्दा व धर्माचरणाचा सविस्तर आढावा घटक दोन मध्ये घेतलेला आहे)

आदिवासींच्या जीवनात जसे धर्माचे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे जादूचेही अस्तित्व आढळते. अर्थात, या संकल्पना वेगळ्या असल्या तरी ईश्वर वा अलौकिक शक्तीशी त्या संबंधित आहेत. त्या संदर्भात आपणास भगत व पुरोहित यांच्या बाबतीत माहिती घेणे आवश्यक आहे.

**धर्मव्यावसायिक भगत व पुरोहित**

आदिवासींच्या धर्म व जादू या दोहोत मानव अलौकिक शक्ती वा दिव्यप्राण्यांशी संबंध प्रस्थापित करतो. त्यांना प्रसन्न करून वा त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करून आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात यासाठी प्रयत्न करतो. यासाठी प्रार्थना, यज्ञ व निषेध नियमांचे पालन वगैरेंचा तो अवलंब करतो. त्याचप्रमाणे जादू यशस्वी होण्यासाठी अनुकरणात्मक, संपर्कात्मक वा मंत्रोच्चारित पध्दतीने त्याला विविध क्रिया कराव्या लागतात. परंतु या गोष्टी सर्वसामान्यांना अचुकपणे करता येतील असे नाही. त्यामुळेच अलौकिक शक्ती व व्यक्ती यांच्यात मध्यस्थांचे काम करण्यासाठी धर्मव्यावसायिकांची गरज असते. आदिवासींच्या धर्मव्यवस्थेत भगत व पुरोहित हे दोन धर्मव्यावसायिक मध्यस्थांचे काम करतात.

**आदिवासींचे धार्मिक गुंतागुंत / प्रश्न / संकट** (Religious Crisis)

पुर्वी आदिवासी हे भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलगपणे व स्वतंत्रपणे सुखी समाधानाने जीवन जगत होते. आदिवासींचे धार्मिक प्रथा, परंपरा, धर्मश्रध्दा, धार्मिक आचरण, विधी या इतर धर्मापेक्षा वेगळ्या होत्या. परंतु ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी आदिवासींचे घडवून आणलेले धर्मांतर, आदिवासींनी हिंदू जीवनपध्दतीचे केलेले अनुकरण त्यांच्यात हिंदूकरण आणि संस्कृतीकरणाची सुरू झालेली प्रक्रिया, ख्रिश्चनीकरण यामुळे आदिवासींमध्ये धार्मिक गुंतागुंत (समस्या) निर्माण झाल्या आहेत. धार्मिक गुंतागुंतीचा आढावा घेताना सर्वप्रथम हिंदूकरण, संस्कृतीकरण व ख्रिश्चनीकरण या संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

**हिंदूकरण** – (Hinduization)

भारतातील आदिवासी समाजात हिंदूकरण, संस्कृतीकरण आणि ख्रिश्चनीकरण या संकल्पना आढळतात. या तिन्ही संकल्पना आदिवासी समाजातील परिवर्तनाच्या प्रक्रिया आहेत. आदिवासी समाजात

कोणत्या दिशेने परिवर्तन होत आहे याचे निदर्शक म्हणजे या संकल्पना होत. हिंदूकरण, संस्कृतीकरण आणि ख्रिश्चनीकरणामुळे आदिवासी समाजात सामाजिक गतिशीलता निर्माण झाली आहे.

**हिंदूकरणाची संकल्पना :–**

'हिंदूकरण' या शब्दातच या संकल्पनेचा अर्थ आहे. आदिवासी समाजाचे हिंदुकरण होणे म्हणजे या समाजाने हिंदुंच्या धार्मिक, सामाजिक रूढी परंपरांचे अनुकरण करणे होय. आदिवासींचे परंपरागत जीवन हे अत्यंत मागासलेले होते आणि आजही बहुतांश आदिवासी मागासलेले आहेत. आदिवासींच्या मागासलेपणाचे महत्त्वाचे कारण म्हणजे ते ज्या प्रदेशात तेथील भौगोलिक परिस्थिती आणि त्यांचे इतर समाजापासून अलिप्त राहणे होय. त्यामुळे आदिवासी मागासलेले राहिलेत. परंतु त्यांचा हिंदू लोकांशी वेगवेगळ्या कारणामुळे संबंध येवू लागला. त्यामुळे ते हिंदू लोकांचे वेगवेगळ्या बाबतीत अनुकरण करू लागले. हिंदुकरणाच्या प्रक्रियेमुळे त्यांच्यात परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. मात्र यामुळे आदीवासींच्या मूळ संस्कृतिला तडे गेले.

आदिवासी हे भारताचे मुळचे रहिवाशी आहेत. परंतु ते हिंदू नाहीत. आदिवासींना हिंदू समजणे चुक आहे. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक रूढीपरंपरा या हिंदूपेक्षा वेगळ्या आहेत. हिंदूधर्माच्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेत त्याचा समावेश नव्हता. आदिवासींचे सांस्कृतिक आणि धार्मिक जीवन वेगळे असल्यामुळे ब्रिटिश जनगणना अधिकाऱ्यांनी त्यांची गणना प्राणीपूजक म्हणून केली होती. पुढे आदिवासी समाज आणि हिंदू समाज यांची सामाजिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढली. आदिवासींचे हिंदूकरण होवू लागले. हिंदू समाज आणि आदिवासी यांच्यातील अंतर कमी होवू लागले. त्यामुळे त्यांना हिंदूधर्माचे आचरण करणाऱ्या वन्य जमाती असे म्हटले जावू लागले. कधी त्यांचा 'वन्य जमाती', 'पहाडी टोळ्या' तर कधी 'मागासलेले हिंदू' असा उल्लेख होवू लागला. ख्रिश्चन मशिनरी लोकांनी आदिवासी क्षेत्रात जावून तेथे धर्मप्रसार करण्याच्या निमित्ताने आदिवासींना माणसात आणायचे, त्यांना सुधारण्याचे आणि त्यांची सेवा करण्याचे कार्य सुरू केले. त्यामुळे मेघालय, मणीपूर इत्यादी अनेक राज्यातील आदिवासी मोठ्या प्रमाणात ख्रिश्चन बनलेत. ख्रिश्चन धर्माच्या प्रचारामुळे आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. देशात ख्रिश्चन लोकांची संख्या वाढत आहे ही बाब लक्षात घेवून हिंदू लोकांनी आदिवासींचे हिंदूकरण करण्याचे कार्य हाती घेतले. त्यामुळे हिंदूकरण या प्रक्रियेस चालना मिळाली. परंतु त्यातून आदीवासी समाजात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात.

आदिवासी लोकांचा हिंदू जातीशी सांस्कृतिक संबंध प्रास्थापित झाल्यामुळे ते हिंदूंचे विश्वास, कर्मकांड, परंपरा स्वीकारतात. ते हिंदूच्या उत्सवामध्ये सहभागी होतात आणि हिंदूंच्या मंदिरात जातात. दारिद्र्यामुळे पुरोहितांनी आदिवासींचे पौरोहित्य आणि धार्मिक कर्मकांड करण्याचे कार्य स्विकारले. आदिवासी जामातीचे ते अध्यात्मिक गुरू बनलेत. अशा आदिवासी लोकांनी हिंदूंच्या सामाजिक आणि धार्मिक परंपरा स्वीकारून त्यांनी शेजारच्या हिंदूसोबतच धार्मिक आणि सामाजिक फरक कमी केला. ब्राम्हण पुरोहितांनी असा सिध्दांत आदिवासी लोकांमध्ये मांडला की पूर्वी त्यांचा सामाजिक दर्जा उच्च होता. म्हणून त्यांनी आपला उच्च दर्जा मिळविण्यासाठी धार्मिक परंपराचे काटेकोरपणे पालन करावे. बिहार राज्यातील

'पलामऊ' आणि उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथील 'खारवार' हे स्वत:ला मुळचे उच्च असल्याचे मानतात. ते गळ्यात जानवे घालतात. दिनाजपूर, रूंगपूर, जलपाईगुडी आणि कूच बिहार येथील पोलिया जमातीचे लोक आपण मुळचे क्षत्रिय असल्याचा दावा करतात आणि ते स्वत:ला राजवंशी किंवा राजबंशी (हिंदीमध्ये) म्हणतात. 'राजवंशी' चा अर्थ राज्याच्या वंशातील असा आहे.

ज्या आदिवासी लोकांचे हिंदूकरण झाले आहे. त्यांच्यावर हिंदू धर्मातील धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींचा बराच परिणाम झाला आहे. उत्तरप्रदेशातील थारू जमातीवर हिंदू संस्कृतीचा बराच प्रभाव आहे. ते हिंदूंचे सण साजरे करतात. शंकर, पार्वती, हनुमान इत्यादी हिंदूच्या देवदेवतांची पुजा करतात. कोल जमातीचा हिंदूशी निकट संबंध असल्यामुळे त्यांच्यावर हिंदू संस्कार मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. राम, हनुमान, शंकर, भगवान इत्यादी देवांची ते पूजा करतात. पनिका या जमातीवर देखील हिंदूंचे संस्कार झालेले आहेत. होळी, दसरा, दिवाळी, नागपंचमी इत्यादी सण ते साजरे करतात. केरळच्या आदिवासींमध्ये हिंदूंची संख्या ख्रिश्चन धर्मापेक्षा जास्त आहे. तर कर्नाटकमधील आदिवासींवर हिंदू धर्माची छाप आहे. असे असले तरी येथील आदिवासी आपल्या धार्मिक प्रथा तशाच ठेवून आसपासच्या धार्मिक वातावरणात मिसळून जाण्याची तयारी ठेवल्यामुळे त्यांच्यावर हिंदू धर्माचा प्रभाव निर्माण झाला. एकोणिसाव्या शतकात राजस्थानमधील भिल्लांमध्ये सुरमालदास आणि गोविंदगिरी यांनी हिंदू धर्माच्या धर्तीवर सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. ह्या दोन्ही साधुनी त्यांना भक्तीमार्ग शिकविला. त्यानंतर काही भिल्ल जानवे घालू लागले. रोज आंघोळ करू लागले. त्यांनी मांसाहार आणि मद्यप्राशन बंद केले. अशा प्रकारे भक्त बनलेल्या भिल्लांना लोक 'भगत' म्हणतात.

अनेक आदिवासी राजांचे आणि त्यांच्या जमातीचे हिंदुकरण झाले होते. शहीदाबाद आणि पलामऊ येथील चेरो जामतीचे स्वतंत्र राज्य होते. चेरो जमातीच्या लोकांचा रजपूत लोकांशी संबंध आला. त्यामुळे त्यांनी राजपुतांमार्फत हिंदू धर्मातील काही गोष्टींचे अनुकरण केले. बुचमन या अभ्यासकाने १८१२ मध्ये चेरो लोकांची भेट घेतली होती. तेंव्हा त्यांना चेरो लोक राजपूतांसोबत जेवण करतात आणि ते गळ्यात जानवे घालत असल्याचे आढळून आले. गोंड राजाचे हिंदुकरण झाले होते. महाराष्ट्रातील गोंड, कोलाम, कोरकू, महादेव कोळी, भिल्ल इत्यादी जमातीचे हिंदूकरण झाल्याचे आढळून येते.

आदिवासी समाजात हिंदूकरणाची प्रक्रिया निर्माण झाल्यामुळे त्यांच्यात सामाजिक गतिशीलता आणि परिवर्तन घडून आले हे खरे असले तरी त्याचबरोबर त्यांच्यात अनेक गुंतागुंत (समस्या) निर्माण झाल्यात. एका जमातीच्या काही लोकांचे हिंदुकरण किंवा ख्रिश्चनीकरण झाले. त्यामुळे त्या जमातीचे दोन गटात विभाजन झाले. आदिवासी लोक आपल्या पारंपारिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा पूर्णपणे सोडू शकले नाहीत. त्याचप्रमाणे ते हिंदूंच्या धार्मिक, सांस्कृतिक, प्रथा, परंपरा पूर्णपणे आत्मसात करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक नव्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हिंदू लोकांशी संपर्क आल्यामुळे संथाल, मुंडा, ओरॉंव इत्यादी जमातीमध्ये बालविवाहाची प्रथा निर्माण झाली.

**संस्कृतीकरण :–**

भारतातील अनेक आदिवासी जमातीत संस्कृतीकरणाची प्रक्रिया आढळून येते. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी जातीव्यवस्थेतील उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलतेच्या संदर्भात सांस्कृतीकरण ही संकल्पना त्यांच्या 'रिव्हीजन ॲण्ड सोसायटी अमंग दि कुर्गज' या ग्रंथात मांडली आहे.

**संस्कृतीकरणाची व्याख्या –**

श्रीनिवासच्या मते ''सांस्कृतीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे एखादी कनिष्ठ जात किंवा आदिम जमात किंवा एखादा इतर समूह अपल्या प्रथा, कर्मकांड, विचारसरणी व जीवनपध्दती यामध्ये द्विज जातींच्या दिशेने बदल घडवून आणतो''.

हिंदूमधील कनिष्ठ जातीप्रमाणेच काही आदिवासी जमातीतही संस्कृतीकरणाची प्रक्रिया आढळते. बहुतेक आदिवासी जमातींचे शेजारी हिंदू आहेत. त्यामुळे फार पूर्वीपासून अनेक आदिवासी जमातींनी संस्कृतीकरणाद्वारे हिंदुंच्या श्रध्दा, कर्मकांड व जीवनपध्दती स्वीकारून हिंदूंच्या जातीव्यवस्थेतील एखादी जात प्राप्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या प्रयत्नांसच संस्कृतीकरणाची प्रक्रिया (चळवळ) म्हटले जाते. या प्रक्रियेची असंख्य उदाहरणे भारतभर आढळतात. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

**१) थारू आणि खासा :** मध्य हिमालयातील या दोन जमातींचे मोठ्या प्रमाणावर संस्कृतीकरण घडून आलेले आहे. थारू जामतीने जान्हवे परिधान करून, ठाकूर लोकांशी विवाहसंबंध जोडून व हिंदूंचे कर्मकांड स्वीकारून स्वत:ला ठाकूर म्हणून संबोधण्यापर्यंत मजल मारली आहे. खासा जमातीनेही तिच्या शेजारच्या मैदानी प्रदेशातील राजपूत व ब्राह्मण जातींच्या जीवनपध्दतीचा स्वीकार करून व हिंदू आडनावे धारण करून स्वत:ला राजपूत म्हणून घोषित केलेले आहे आणि तेथील सामाजिक व्यवस्थेत ब्राह्मणाप्रमाणेच आपले सामाजिक स्थान सर्वोच्च बनविलेले आहे. हिमाचल प्रदेशातील गड्डी, किन्नर, लहौली या जमातीही हिंदुंच्या घनिष्ठ संपर्कात आलेली आहेत.

**२) चेरो, खारवार, परहीया व भूमीज :** बिहारमधील चेरो, खारवार व परहीया आणि मध्य प्रदेशातील भूमीज या जमातींवर क्षत्रिय जातीचा मोठा प्रभाव पडला आहे. स्वत:ला क्षत्रिय म्हणून प्रस्थापित करण्यासाठी या जमातीनी क्षत्रियाच्या जीवनपध्दतीचे अनुकरण केलेले आहे.

**३) बावरी, महाली व ऊराँव :** पश्चिम बंगालमधील या जमातींचेही संस्कृतीकरण मोठ्या प्रमाणावर घडून आलेले आहे. बावरी जमातीने ब्राह्मणासारखे ११ दिवसांचे सुतक पाळणे, जान्हवे घालणे, तीर्थयात्रा करणे, वैष्णवधर्म स्विकारणे, शीतला व मानसा या देवतांची पुजा करणे इत्यादी गोष्टींचा स्विकार करून स्वत:ला ब्राह्मण म्हणवून घेण्यापर्यंत मजल मारली आहे. 'शीतला व मानसा' या देवतांची पुजा करण्यात बावरी पुरोहिताएवढा अन्य समुदायातील कोणताही पुरोहित सक्षम नाही असे मानले जात आहे. बावरी लोकांची उत्पत्तीही हिंदुमधील उच्च जातीपासून झाल्याची पुराणकथाही बावरी जमातीने लोकप्रिय केली आहे. या पुराणकथेनुसार महादेवाने आपला नोकर म्हणून सर्वप्रथम एक बावरी माणसाची निर्मिती केली. पण पुढे त्या माणसाने कनिष्ठ जातीत प्रवेश केला. म्हणून महादेवाने त्यास ठार मारले.

इतरही अशा अनेक जमाती (किंवा त्यांचे विभाग) आहेत की, त्यांनी हिंदुधर्माची अनेक लक्षणे आत्मसात केलेली आहेत. मात्र या प्रक्रियेत अनेक जमातींना जातिव्यवस्थेच्या श्रेणीरचनेत एखादी श्रेणी (जात) प्राप्त होवू शकलेली नाही. मात्र काही जमातींना मात्र हिंदू समाजव्यवस्थेत निम्न स्तरावर स्थान मिळालेले आढळते.

पश्चिम बंगालमधील महाली जमातीवरही सभोवतालच्या बहुसंख्यात्मक असलेल्या हिंदूंचा मोठा प्रभाव पडलेला आहे. आपल्या भागातील हिंदू जाती आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत असे मानून महालीने हिंदूंच्या जीवनपध्दतीचा, कर्म सिध्दांताचा, पवित्र-अपवित्रच्या कल्पनेचा, कर्मकांडाचा, देवदेवतांचा, सणसमारंभाचा, हिंदू आडनावाचा स्विकार केलेला आहे. यापैकी अनेक गोष्टींचे पालन बावरी केवळ यांत्रिकपणे करतात. या गोटींशी निगडीत असलेल्या श्रध्दांचे महत्व त्यांना समजलेले दिसत नाही. हिंदुंच्या जीवनपध्दतीचे अनुकरण करण्याच्या ह्या चळवळीस महाली जमातीतील अलीकडील समाजसुधारकांनी व नेत्यांनी मोठी चालना दिलेली आहे.

पश्चिम बंगालमधील ऊराँव जमातीनेही शिवपार्वती या देवदेवतांची पुजा करणे, गोमांस न खाणे, रामायण व हनुमान चाळीस या ग्रंथाचे पठन करणे इत्यादी हिंदुंच्या वैशिष्ट्यांचा स्वीकार केलेला आहे.

**४) मुंडा आणि कोल :** छोट्या नागपुरच्या पठारावरील मुंडा व कोल जमातीचेही बऱ्याच प्रमाणात संस्कृतीकरण घडून आलेले आहे हिंदू धर्मातील भक्ती संप्रदायाचा मुंडावर मोठा प्रभाव पडलेला आहे. काही ठिकाणच्या मुंडाचा आपल्या बोंगावरील (अलौकिक शक्तीवरील) विश्वास उडाला आहे. मुंडांनी हिंदू ऋषींचा व पंचागांचा स्वीकार केला आहे. विवाह व अंत्यविधी पार पाडण्यासाठी मुंडा हे ब्राह्मण पुरोहितास बोलवितात. मुंडाच्या प्रदेशातील काही खेड्यांच्या अभ्यासावरून हे स्पष्ट झालेले आहे की, या प्रदेशात मंझी नावाची एक जात उदयास आली असून तिने काळाच्या ओघात हिंदुची जीवनपध्दती स्विकारली आहे. मंझी जातीने स्वत:ला मुंडासदृश्य इतर समुहांपासून वेगळे ठेवलेले आहे.

कोला जमातीनेही संस्कृतीकरणाद्वारे हिंदूंच्या जीवन पध्दतीतील अनेक बाबींचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे कोल जमातीस हिंदू लोक आता एक 'बाह्य जात' (Outcaste) किंवा अनुसूचित जात मानू लागले आहेत.

**५) पश्चिम भारतातील जमाती :** पश्चिम भारतातील भिल्ल जमातीची सर्वश्रेष्ठ देवता ही महादेव असून राम, कालिका, हनुमान, गणे, इंद्र इ. इतर आहेत. राजस्थान व लगतच्या गुजरातच्या प्रदेशात 'राम' हा अत्यंत जवळचा देव असून त्याला आदराने बाप्पा राम म्हटले जाते. गुजरातमधील दुबळा, नाईक, गामीत, धनका यांचे मोठ्या प्रमाणावर हिंदुकरण झालेले असून या जमाती ब्राह्मण पुरोहितांची सेवा घेतात. आपले स्थान उंचावण्यासाठी या जमातींनी आपल्या समुदायात अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणलेल्या आहेत.

**६) दक्षिण भारतातील जमाती :** चेंचू, कादर, मधुवन या जमातींनी आपल्या शेजारच्या हिंदू जातींच्या श्रध्दा, विधी व देवदेवता यांचा स्वीकार केलेला आहे. चेंचू जमातीने शेजारच्या हिंदूंची लिंगमाया ही देवता

स्वीकारली असून तिला अत्यंत कृपाळू मानली जाते. कादर जमातीने हिंदूंच्या काली व मारूती या देवतांचा तर मुथुवन जमातीने मदुरा मंदिरातील पनाळी, देवर व कडवल्लू या देवतांचा आपल्या प्रमुख देवता म्हणून स्वीकार केलेला आहे.

अशा प्रकारे भारताच्या वेगवेगळ्या भागातील आदिवासी जमातींनी संस्कृतीकरणाद्वारे उच्च सामाजिक दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे आगमन (ख्रिश्चनीकरण)**

१८३० नंतरच्या काळात भारतात मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चन मिशनरी मंडळी धर्मप्रसारार्थ आली. भारतातील लोकांना विशेषत: येथील आदिवासी लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देवून त्यांचे तारण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी आहे ही त्यांची प्रामाणिक भावना होती. अक्षरश: प्राण धोक्यात घालून, अपरिचीत अशा दुर्गम भागातील जमातीमध्ये ते गेले. त्यांची भाषा शिकून, त्यांची हरप्रकारे सेवा करीत राहून, अनेक मिशनऱ्यांनी मोठ्या निष्ठेने, चिकाटीने व जिद्दीने कार्य चालविणे या कामी त्यांना अनेक ब्रिटीश प्रशासकांचे सहाय्य होते. भारतातील आदिवासी अज्ञानी, साधेभोळे, गरीब आणि मागासलेले असल्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराच्या दृष्टीने या लोकांकडे आपले लक्ष केंद्रीत केले. आदिवासी भागात दवाखाने उघडणे. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याकरीता शाळा सुरू केल्यात. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासी लोकांची सेवा करून त्यांच्या मनात आपल्याविषयी व येशूबद्दल आदर मिळविला आणि हळूहळू त्यांनी आदिवासी लोकांचे धर्मांतर घडवून आणणे सुरू केले. त्यामुळे अनेक आदिवासी हे ख्रिश्चन झाले. त्यांनी आपल्या परंपरागत संस्कृतीचा त्याग केला. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नामुळे आदिवासी लोक शिकले आणि नंतर त्यांनी धर्मांतर केल्यामुळे त्यांचा आपल्या आदिवासी बांधवांशी संबंध तुटला. एकीकडे नवीन धर्माचा स्विकार त्यांनी केला असला तरी परंपरागत आदिवासी संस्कृतीचा ते पुर्णत: त्याग करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या संस्कृतिकरणाच्या संदर्भात अनेक समस्या निर्माण झाल्यात.

अशा प्रकारे फार पुर्वीपासून अनेक आदिम जमाती हिंदू धर्मातील श्रध्दा, विधी, मुल्ये, जीवनशैली इ. चा स्विकार करत आलेल्या आहेत. यालाच हिंदुकरण म्हणतात. तर ब्रिटीश राजवटीत ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी आदिम जमातींची सेवा करून व त्यांना काही अमिषे दाखवून त्यांना ख्रिस्ती धर्म स्विकारण्यास लावले. हिंदू करण व ख्रिस्ती धर्माचा स्वीकार यामुळे आदिम संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात आले. धर्मांतरीत आदिवासींचे अनेक गुंतागुंत (समस्या/प्रश्न) निर्माण झालेत त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

- **आदिवासींची धार्मिक गुंतागुंत प्रश्न/समस्या :-**

प्रत्येक आदिम जमातीचा स्वत:चा असा एक धर्म आहे. जमातीचे सर्व सदस्य या धर्मातील समान श्रध्दा बाळगतात व समान विधी/कर्मकांड आचरणात आणतात. त्यामुळे धर्म हा जमातीत सामाजिक ऐक्य निर्माण करण्यास उपयुक्त ठरलेला आहे. तथापि, आज अनेक आदिवासींनी धर्मांतर करून इतर धर्म (ख्रिस्ती, इस्लाम, बौध्द) स्वीकारलेले आहेत. उदा. ईशान्य भारतातील अनेक जमातींनी ख्रिस्ती, मलबार किनारा, पंजाब व फाळणीपुर्व सिंध प्रांत येथील काही आदिवासींनी इस्लाम तर लडाखमधील आदिवासींनी

बौध्द धर्म स्विकारला आहे. तर काही आदिवासींनी हिंदूधर्मातील श्रध्दा व कर्मकांड स्विकारलेले आहे. यालाच हिंदुकरण म्हणतात. उदा. हिमालयातील थारू व खासा या जमातींनी जानवे व हिंदू कर्मकांड स्वीकारून व ठाकूर जातीशी विवाहसंबंध जोडून स्वत:ला क्षत्रिय म्हणून घोषित केले आहे. बंगालमधील बावरी व महाली या जमातींनी हिंदूंचा कर्मसिध्दांत पापपुण्याची कल्पना, हिंदूंचे संस्कार, सणसमारंभ, आडनावे, धार्मिक विधी इत्यादींचा स्वीकार केला आहे. त्यामुळे एकाच जमातीत जमातीचा परंपरागत धर्म पाळणारे व नवीन धर्म पाळणारे असे दोन गट निर्माण झाले आहेत. परिणामी, समान वा एकाच धर्मामुळे निर्माण होणारे सामाजिक ऐक्य आता धोक्यात आलेले आहे. काही आदिवासींनी नवीन धर्मश्रध्दा व कर्मकांड स्विकारले खरे पण आपल्या आदिम धर्मश्रध्दा व कर्मकांडाचे पालन चालूच ठेवलेले दिसते. त्यामुळे अशा आदिवासींच्या धार्मिक जीवनात एक प्रकारची चमत्कारिक गुंतागुंत निर्माण झाली आहे. थोडक्यात धर्मांतर व हिंदूकरण यामुळे आदिम जीवनात धार्मिक गुंतागुंतीचा प्रश्न उद्‌भवला आहे.

अनेक समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या आदिवासींचे जीवन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आधुनिक समाजाच्या प्रभावशाली माऱ्याने आदिवासींचे अस्तित्व टिकणे शक्य नाही. ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम धर्माच्या अनुकरणाने आणि प्रगतांच्या संपर्काने त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या अनेक समस्यामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या आदिवासींच्या जीवनकक्षाच नष्ट होत आहेत. अशा परिस्थितीत उध्वस्त होत असलेले आदिवासींचे जीवन परत उभे करण्यासाठी त्यांच्या समस्यावर ठोस उपाय करणे आवश्यक आहे. भारतातील आदिवासी समाजाचे प्रश्न सोडविणाच्या संदर्भात मानवशास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. तथापि, आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अभ्यासकांनी खालील तीन मार्ग स्पष्ट केले आहेत.

**१) अलगीकरण किंवा पृथकता** (Isolation)

आदिवासी समाजाला इतर समाजापासून अलिप्त ठेवण्याचा विचार 'हटन' (Hutton) यांनी मांडला. आदिवासी समाजाला इतर समाजापासून दूर ठेवून त्यांच्या जीवनपध्दतीचे वेगळेपण टिकवून ठेवता येईल असे त्यांचे मत होते. इतर समाजाच्या संपर्काने आदिवासी त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक चालीरिती, परंपरा आणि एकूणच त्यांच्या जीवनपध्दतीचे अनुकरण करतील. परिणामी आदिवासी समाजामध्ये अनेक अनिष्ठ रूढी परंपरांचा शिरकाव होवून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल, असे अलिप्ततावाद्यांना वाटते. सुरवातीस १९३१ मध्ये जनगणना आयुक्त असलेल्या डॉ. व्हेरियर एल्विन यांनी या अलिप्ततावादी विचारांचा पुरस्कार केला. अलिप्ततावादी दृष्टिकोनामुळे आदिवासी लोकांना आपल्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात परस्परांच्या सानिध्यात राहाता येईल व त्यांच्या पारंपारिक गुणवैशिष्ट्यांचे जतन व संवर्धन करता येईल. अशाप्रकारे आदिवासी समाजाच्या जीवनपध्दतीचे वेगळे स्वतंत्र अस्तित्व अलिप्ततावादी धोरणाद्वारे शक्य आहे. ज्यामुळे आदिवासी लोकांना बाह्य समाजाच्या प्रभावाखाली न राहता नैसर्गिक जिवन पध्दतीचा आनंद घेता येणे शक्य होणार आहे.

२) **सामिलीकरण** (Assismilation)

अलिप्तवादी विचाराच्या अगदी विरूध्द असा हा सामिलीकरणाचा दृष्टिकोन आहे. आदिवासी समाजातील प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी सामिलीकरण दृष्टिकोनाचा पुरस्कार डॉ. जी. एस. धुर्ये आणि ठक्कर बाप्पा यांनी केला. त्यांच्या मते, आदिवासी समाजातील समस्यांचे निराकरण या सामिलीकरणातून होणार आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचे प्रगत समाजाशी नियोजनपुर्वक एकरूपीकरण करण्याचा मार्ग त्यांना योग्य वाटतो. आदिवासी समाजाचे वेगळे अस्तित्व न ठेवता त्या समाजाच्या अवतीभोवती असणाऱ्या प्रगत समाजाशी त्यांचे विलीनीकरण जाणीवपुर्वक घडवून आणण्याचा हा सामिलीकरणाचा विचार आहे.

३) **एकीकरण** (Integration)

डॉ. हटन यांनी एकीकरणात्मक दृष्टिकोनाचा पुरस्कार करून एक सुवर्णमध्य काढला आहे. एकीकरणात्मक दृष्टिकोनानुसार भारतीय समाजाशी आदिवासीचे अभिनत्त्व साधताना आदिवासी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनपध्दतीला धक्का न लावता त्यांच्या जीवनपध्दतीचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न अभिप्रेत आहे. आदिवासी समाजाच्या रूढी, परंपरा, श्रध्दा, आचार-विचार, नितीमुल्ये, कला-कौशल्य आणि एकूणच जीवनपध्दतीचे वेगळेपण कायम ठेवून त्यांना राष्ट्रीय जीवन प्रवाहामध्ये अंतर्भूत करणारा हा विचार आहे. कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांना हा एकीकरणाचा विचार अधिक व्यवहार्य आणि राष्ट्रीय वाटला. म्हणून त्यांनी या विचाराचा पुरस्कार केला.

थोडक्यात आदिवासी समाजातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी, अलिप्तवाद, सामिलीकरणवाद आणि एकीकरणवाद या तीन दृष्टिकोनांचा काही समाजशास्त्रज्ञांनी उपाय सुचविला आहे.

## ३.४ सारांश –

भारतातील आदिवासींच्या समस्या या साध्या आणि सरळ नाहीत. खऱ्या अर्थाने या समस्या विस्तृत आणि जटिल आहेत. या समस्यामुळे त्यांचा विकास होण्याला अडथळे निर्माण झाले आहेत. आदिवासी समाजाची दारिद्र्य ही एक अत्यंत महत्वाची समस्या आहे. आजही बहुसंख्य आदिवासी लोक हे दारिद्र्यातच खितपत पडले आहेत. दारिद्र्य ही आर्थिक समस्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक समस्या देखील आहे. आदिवासी समाजाच्या दारिद्र्याची आर्थिक, सामाजिक, राजकीय अशी विविध कारणे आहेत. दारिद्र्याच्या समस्येतूनच कर्जबाजारीपणाची समस्या निर्माण होते. आदिवासी समाजाची कर्जबाजारीपणाची समस्या अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. आजही आदिवासी लोकांना कर्ज काढण्यासाठी सावकारांकडेच जावे लागते. आदिवासींच्या कर्जबाजारीपणाला विविध कारणे जबाबदार आहेत.

स्वातंत्र्यानंतर बिगर आदिवासी गट आर्थिक दृष्ट्या व राजकीय दृष्ट्या प्रबळ होत आहेत. मुळच्या आदिवासींच्या हक्काच्या जमीनी जावून ते गरीब व भूमिहिन शेतमजूर होत आहेत. मोठ्या प्रमाणावर अन्याय व अयोग्य पध्दतीने घडलेल्या व्यवहारामुळे आदिवासी जमीन बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाली आहे. आदिवासी भूमिहिन बनले आहेत. यामुळेच आदिवासींवरील अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने

दि. १/११/१९७५ पासून 'महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातींच्या जमीनीचा पुनर्स्थापना हस्तांतरण करणे' हा कायदा मंजूर केला आहे. पण तरीसुध्दा अल्पप्रमाणात जमीनी आदिमांकडे आहेत.

आदिवासींच्या दयनीय अवस्थेत भर टाकणारे म्हणजे त्यांचे अज्ञान/निरक्षरता आहे. त्यांच्या अज्ञानाचा फायदा अनेक हितसंबंधी घेत आहेत. कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. शासनाच्या शिक्षणाविषयक विविध योजना आदिवासींत राबविल्या जात आहेत. परंतु आदिवासींच्यात साक्षरतेचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. आदिम समाजात साक्षरतेच्या मंदगतीची कारणे (निरक्षरतेची कारणे) यामध्ये विसंगत अभ्यासक्रम, पालकांचे दारिद्र्य, शैक्षणिक सुविधांचा अभाव, विद्यार्थ्यांचा व शिक्षकांची गैरहजेरी, शैक्षणिक धोरणातील त्रुटी अशाप्रकारे आदिवासीमधील निरक्षरतेची विविध कारणे आहेत. आदिवासींची पिळवणूक ही देखील गंभीर समस्या आहे. आदिवासी लोक स्वभावाने साधेभोळे असतात. ते निष्कलंक असतात. आदिवासी लोकांचा साधेपणा आणि त्यांचे इतर गोष्टीविषयी असलेले अज्ञान यांचा फायदा सभ्य लोकांनी घेतला. सभ्य समाजातील समजले जाणारे आणि स्वत:ला आदिवासीपेक्षा श्रेष्ठ म्हणणाऱ्या जमीनदार, सावकार, ठेकेदार, अधिकारी इ. लोकांनी आदिवासींच्या चांगुलपणाचा फायदा घेवून त्यांचे शोषण (पिळवणूक) केली. आदिवासींचे दारिद्र्य, बेकारी, अज्ञान, निरक्षरता, मितभाषी, तांत्रिक सुविधांचा अभाव, अलीप्तता, भोळ्या समजुती, कर्मकांड या सर्व बाबींमुळे त्यांच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेवून सर्व क्षेत्रात त्यांची पिळवणूक होत आहे.

प्रत्येक आदिम जमातीचा स्वत:चा असा एक धर्म आहे. जमातीचे सर्व सदस्य या धर्मातील समान श्रध्दा बाळगतात व समान विधी/कर्मकांड आचरणात आणतात. आदिवासींच्या धार्मिक प्रथा, परंपरा, धर्मश्रध्दा इतर धर्मापेक्षा वेगळ्या आहेत. परंतु आदिवासींनी हिंदू जीवनपध्दतीचे केलेले अनुकरण म्हणजेच हिंदूकरण आणि सांस्कृतीकरण आणि ख्रिश्चनीकरण यामुळे आदिवासी जीवनामध्ये धार्मिक गुंतागुंत/प्रश्न निर्माण झाले आहेत. काही आदिवासींनी नवीन धर्मश्रध्दा व कर्मकांड स्वीकारले खरे पण आपल्या अदिम धर्मश्रध्दा व कर्मकांडाचे पालन चालूच ठेवलेले दिसते. त्यामुळे अशा आदिवासींच्या धार्मिक जीवनात एक प्रकारची चमत्कारिक गुंतागुंत निर्माण झाली आहे. थोडक्यात धर्मांतर व हिंदूकरण यामुळे आदिम जीवनात धार्मिक गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला.

विविध विचारवंतांनी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी समिलीकरण, अलगता व एकीकरण हे तीन सिध्दांत मांडलेत. पण डॉ. हटन यांनी सुवर्णमध्य सुचविला. तसेच आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी विविध स्वरूपाचे कायदे, सुधारणा योजना, कल्याण कार्यक्रम राज्य व केंद्र सरकारमार्फत राबविले जात आहेत.

## ३.५ परिभाषिक शब्द (शब्दार्थ)

- **अनुसूचित जमाती** : आदिवासी
- **निरक्षर** : लिहिता वाचता न येणारा, अज्ञानी.
- **कर्मकांड** : रितीरिवाज, पध्दती, जपतप.

- **अवडंबर** : एखाद्या गोष्टीचे प्रमाणापेक्षाही नको तेवढे स्तोम माजविणे.
- **जमीन हस्तांतरण** : कायद्याच्या आधारे एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तीकडे रितसर (नियमानुसार) जमीन सुपुर्द करणे.
- **वेठबिगारी** : कर्जबाजारी आदिवासीला गुलाम म्हणून जमीनदारांच्या घरची व शेतीची कामे विनामोबदला करणे (सर्वस्व गमावणे)
- **कुपोषण** : लहान मुलासाठी सकस, प्रोटीन्सयुक्त, पोषक आहारविना राहणे.
- **अनारोग्य** : आरोग्य चांगले नसणे.
- **उपासमार** : पुरेशा अन्न, पाण्यावाचून उपाशी राहणे.
- **वंचितता** : वीज, शुध्दपाणी, सुखसोई, आरोग्य, पुरेसे अन्नधान्य इ. पासून दूर राहणे, बाजूला पडणे
- **विस्थापन** : आदिवासींना कामधंदा देवून रोजगार उपलब्ध करून त्यांच्यासाठी त्यांना इतरत्र हलवून म्हणजे स्थलांतरीत करून नव्या वसाहती उभ्या करणे (पुनर्वसतिकरण)
- **भूमिहिन** : जमीन नसणारा.
- **उदरनिर्वाह करणे** : पोट भरण्यासाठी, जगण्यासाठी कोणत्याही स्वरूपाची मजूरी, कामधंदा करणे.
- **बिगर आदिवासी** : मूळचा आदिवासी नसलेला.
- **जमीनधारक** : जमीन असलेला, जमीनदार, जमीनीचा मालक.
- **कुऱ्हाडशेती** : जंगले तोडून ती जाळून त्या राखेत बी, बियाणे टाकून शेती करणे.
- **धर्म** : श्रध्दा आणि विधी यांची व्याख्या.
- **सर्वात्मवाद** : सर्व वस्तूमध्ये आत्मा हे तत्व असते अशी श्रध्दा.
- **शक्तीवाद** : सर्व जड-अवजड वस्तूंमध्ये दिव्य शक्ती असते अशी श्रध्दा.
- **निसर्गवाद** : निसर्गशक्तीच्या ठिकाणी दिव्य शक्ती असते अशी श्रध्दा.
- **धर्म व्यावसायिक** : धार्मिक कार्ये पार पाडून त्यावर उपजिविका चालवणारी व्यक्ती.
- **भगत** : दिव्यशक्तीला वश करून घेण्यासाठी जादूची क्रिया करणारा आदिम समाजातील धर्मव्यावसायिक.
- **पुरोहित** : दिव्यशक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी पुर्जा-अर्चा करणारा आदिम समाजातील धर्मव्यावसायिक.
- **संस्कृतीकरण** : संस्कृतीकरण ही अशी एक सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यात विविध सांस्कृतिक पर्श्वभूमी असलेले गट परस्परांच्या संपर्कात आल्यानंतर एकमेकांच्या सांस्कृतिक अनुबंधातील काही भाग स्विकारतात त्यास सांस्कृतीकरण असे म्हणतात.

- **हिंदूकरण** : आदिवासींनी हिंदूंच्या धार्मिक-सामाजिक रूढी परंपरांचे अनुकरण करणे होय.

## ३.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

- प्रश्न : योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१. आदिवासी समस्यांचे मुळ ..................... मध्ये आहे.

अ) दारिद्र्य ब) कर्जबाजारीपणा क) निरक्षरता ड) वरील सर्व

२. २०११ च्या जनगणेनुसार एकूण भारतीय लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण ... आहे.

अ) ८.६% ब) १०% क) ९% ड) १२%

३. आदिवासी समाजातील दारिद्र्यात ................... कारण जबाबदार आहे.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) वरील सर्व

४. आदिवासी समाजातील दारिद्र्याचे ................... हे आर्थिक कारण आहे.

अ) बेरोजगारी ब) साधी राहणी क) निरक्षरता ड) अंधश्रध्दा

५. आदिवासी समाजातील दारिद्र्यास .................... हे सामाजिक कारण आहे.

अ) कर्जबाजारीपणा ब) बेरोजगारी क) अंधश्रध्दा व अंधविश्वास ड) आर्थिक शोषण

६. अखिल भारतीय ग्रामिण सर्वेक्षणाच्या अहवालानुसार देशातील ............... टक्के शेतकरी सावकाराकडून कर्ज घेतात.

अ) ७०% ब) ४० % क) ५०% ड) ३०%

७. पुढीलपैकी ..................... हे कर्जबाजारीपणाचे कारण आहे.

अ) अत्यल्प उत्पन्न ब) नैसर्गिक संकट क) जोड व्यवसायाचा ड) वरील सर्व

८. १८७४ मध्ये सावकारी विरूध्द पहिली चळवळ ............. या जिल्हयामध्ये झाली.

अ) पुणे ब) औरंगाबाद क) नांदेड ड) यवतमाळ

९. महाराष्ट्र राज्याने १९७५ मध्ये आदिवासीसाठी .................. कायदा पास केला.

अ) जमीन पुनर्स्थापना कायदा ब) मुंबई प्रांत कुळ व शेतीविषयक कायदा

क) कुळ कायदा ड) वरीलपैकी नाही.

१०. मुंबई प्रांत कुळ आणि शेतीविषयक कायदा ......... साली करण्यात आला.

अ) १९७५ ब) १९८० क) १९४८ ड) १९६०

११. .................. मध्ये महाराष्ट्र राज्यसरकारने कर्जमुक्तीचा कायदा पास केला.

अ) १९७० ब) १९८० क) १९८५ ड) १९९०

१२. २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण ................ टक्के आहे.

अ) ४०%　　ब) ३०%　　क) ५९%　　ड) ३५%

१३. आदिवासी समाजात साक्षरतेच्या मंदगतीस ..................... कारण जबाबदार आहे.

अ) विसंगत अभ्यासक्रम　　ब) पालकांचे दारिद्र्य

क) शैक्षणिक धोरणातील त्रुटी　　ड) वरील सर्व

१४. भारत सरकारने ........................ साली जंगलविषयक कायदा अंमलात आणला.

अ) १९५२　　ब) १९६०　　क) १९७०　　ड) १९८०

१५. विकास प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकात ............ टक्के आदिवासी आहेत.

अ) २०%　　ब) ४०%　　क) ३०%　　ड) ७०%

१६. आदिवासींच्या .................. चा प्रश्न सोडविण्यासाठी तत्कालीन महसुलमंत्री श्री. ह. गो. वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली.

अ) जमीन हस्तांतरण　　ब) दारिद्र्य

क) कर्जबाजारीपणा　　ड) पिळवणूक

१७. भगत आणि .......................... हे आदिम समाजातील धर्मव्यावसायिक आहेत.

अ) मांत्रिक　　ब) देवर्षी　　क) धर्मगुरू　　ड) पुरोहित

१८. धर्म ही श्रध्दा आणि ........................ यांची व्यवस्था आहे.

अ) जादू　　ब) प्रार्थना　　क) विधी　　ड) यज्ञ

१९. सर्वात्मवाद हा सिध्दांत ............................ यांनी मांडला.

अ) टायलर　　ब) मॅरेट　　क) मॅक्समुल्लर　　ड) डुरखाईम

२०. शक्तीवादास भारतातील जमातीत ..................... म्हणतात.

अ) मानवाद　　ब) आत्मवाद　　क) बोंगावाद　　ड) देवकवाद

२१. मॅक्समूल्लरचे नाव ...................... सिध्दांताशी संबंधित आहे.

अ) सर्वात्मवाद　　ब) निसर्गवाद　　क) शक्तीवाद　　ड) देवकवाद

२२. डॉ. व्हेरियर एल्विन यांनी आदिवासी विकासाच्या ............... दृष्टीकोनाचा पुरस्कार केला.

अ) सामिलीकरण ब) एकीकरण　　क) अलीप्ततावादी　　ड) वरीलपैकी नाही

२३. आदिवासी विकासाचा सामिलीकरणाचा दृष्टिकोन ............... यांनी मांडला.

अ) डॉ. जी. एस. घुर्ये　　ब) जी. एच. हटन

क) व्हेरीयर एल्वीन ड) मॅक्स मुल्लर

२४. आदिवासींच्या धार्मिक जीवनात गुंतागुंत .................. मुळे निर्माण झाली.

अ) हिंदुकरण ब) सांस्कृतीकरण क) ख्रिश्चनीकरण ड) वरील सर्व

२५. ................... यांनी सांस्कृतीकरणाची संकल्पना मांडली.

अ) डॉ. एम. एन. श्रीनिवास ब) डॉ. जी. एस. घुर्ये

क) डॉ. ए. आर. देसाई ड) डी. पी. मुखर्जी

## ३.७. स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ड | वरील सर्व | २. | अ | ८.६% |
| ३. | ड | वरील सर्व | ४. | अ | बेरोजगारी |
| ५. | क | अंधश्रध्दा व अंधविश्वास | ६. | अ | ७०% |
| ७. | ड | वरील सर्व | ८. | अ | पुणे |
| ९. | अ | जमीन पुर्नस्थापना कायदा | १०. | क | १९४८ |
| ११. | अ | १९७० | १२. | क | ५९% |
| १३. | ड | वरील सर्व | १४. | अ | १९५२ |
| १५. | ब | ४०% | १६. | अ | जमीन हस्तांतरण |
| १७. | ड | पुरोहित | १८. | क | विधी |
| १९. | अ | टायलर | २०. | क | बोंगावाद |
| २१. | ब | निसर्गवाद | २२. | क | अलीप्ततावादी |
| २३. | अ | डॉ. जी. एस. घुर्ये | २४. | ड | वरील सर्व |
| २५. | अ | डॉ. एम. एन. श्रीनिवास | | | |

## ३.८ सरावासाठी स्वाध्याय

प्र. १. टीपा लिहा.

१. आदिवासींचे दारिद्र्याची समस्या.

२. अदिवासी कर्जबाजारीपणाची समस्या

३. जमीन हस्तांतरण

४. आदिवासी लोकांची निरक्षरता

५. आदिवासी लोकांची पिळवणूक

६. आदिवासी धार्मिक गुंतागुंत (संकट)

प्र. २. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. आदिवासींचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा स्पष्ट करा.

२. आदिवासींच्या कर्जबाजारीपणाची कारणे विशद करा.

३. आदिवासी समाजातील जमीन हस्तांतरणाविषयी सविस्तर चर्चा करा.

४. आदिवासी समाजातील निरक्षरतेची कारणे (साक्षरतेच्या मंदगतीची) विशद करा.

५. आदिवासींची पिळवणूक या विषयी सविस्तर चर्चा करा.

६. आदिवासी धर्मविषयक गुंतागुंत (संकट) या विषयी सविस्तर चर्चा करा.

## ३.९ क्षेत्रीय कार्य

१. आदिवासींच्या समस्येचा अभ्यास करून त्याबाबत दैनिक पेपरमधून त्याविषयी लेखन करा.

२. आपल्या नजिकच्या आदिवासी समाजास भेट देवून त्यांच्या समस्या जाणून घ्या आणि त्यावर लेखन प्रसिध्द करा.

३. सहभागी निरक्षणाच्या सहाय्याने आदिवासी समाजात वास्तव करून त्यांच्या संपूर्ण कलासंस्कृती, धर्म, राहणीमानाचा अभ्यास करा.

४. हाकारा व आदिवासी संशोधन पत्रिकेच्या विविध अंकांचे वाचन करून परिवर्तनाचा महाराष्ट्रातील आदिवासीवर होणारा परिणाम यावर टिप लिहा.

## ३.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

१. Vidyarthi L. P. & Rai B. K. : The Tribal Culture of India, Concept Publication Company, New Delhi, 1976.

२. Majumdar D. N. : Races & Culture in India, Kalyani Publications, New Delhi.

३. Dr. D. N. Mujumdar and T. N. Madan : Social Anthropology-National Publication House, New Delhi.

४. डॉ. गोविंद गारे : महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे.

५. डॉ. विलास संगवे : आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

६. डॉ. गोविंद गारे : आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, कॉन्टिनेंटल प्रकाश पुणे.

७. ए. वाय. कोंडेकर : भारतीय आदिवासी समाज, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. गुरूनाथ नाडगोंडे : भारतीय आदिवासी, कॉन्टिनेंटल प्रकाश पुणे.

९. प्रा. ए. वाय. कोंडेकर, डॉ. सौ. मंगला पाटील : सामाजिक मानवशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
१०. प्रा. एन. आर. रजपूत : सामाजिक मानवशास्त्र, अंकुश पब्लिकेशन, नागपूर.
११. प्रा. ए. वाय. कोंडेकर व प्रा डॉ. मंगला पाटील : आदिवासींचे समाजशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर.
१२. डॉ. प्रदिप आगलावे : आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
१३. डॉ. संजय भा. साळुंखे : आदिवासी समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
१४. डॉ. बोबडे / लोटे : सामाजिक मानवशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपूर.
१५. प्रा. चंद्रकांत खंडागळे : भारतातील सामाजिक चळवळी, मोमीन प्रिंटर्स, कोल्हापूर.

❑❑❑

# घटक – ४
# पारधी : महाराष्ट्रातील आदिवासी समूदाय
## (Tribal Community in Maharashtra : Pardhi)

**घटक संरचना**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ पारधी समुदायाचे सांस्कृतीक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

    ४.२.२ पारधी समुदायाचे आर्थिक जीवन : परंपरा आणि परावर्तन (Economic Life : Tradition & Change)

    ४.२.३ पारधी समुदायाचे धार्मीक जीवन : परंपरा आणि परिवर्तन (Religious Life of Pardhi Community : Traditions and Change)

    ४.२.४ पारधी समुदायाच्या विकासासाठी सामाजिक चळवळी (Social Development for Development of Pardhi Community)

    स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.३ सारांश

४.४ सरावासाठीचे प्रश्न

४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे :

१) आदिवासी जमात म्हणून पारधी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक परंपरा यांचा अभ्यास करता येईल.

२) पारधी जमाती मधील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक परंपरामधील परिवर्तन जाणून घेता येईल.

३) पारधी जमातीच्या विकासासाठी झालेल्या सामाजिक चळवळीचा अभ्यास करता येईल.

## ४.१ प्रस्तावना :–

भारतीय समाज व्यवस्था हि अनेक स्तर आणि वर्गात विभागलेली आहे. जागतिक समाज व्यवस्थेशी तुलना करता भारतातील हि व्यवस्था जन्म आधारित स्तरीकरणाकडे अधिक झुकलेली आहे. वर्ण, जात, लिंगइ. आधारावरील स्तरीकरण हे प्रामुख्याने जन्मावर आधारलेले आहे. भारतातील वर्ण आणि जातीची व्यवस्था हे जगातील एकमाद्वितीय उदाहरण मानता येईल. सर्वसाधारणपणे समाज जीवनात जात आणि जमात या संकल्पना समान अर्थाने वापरल्या जात असतात ; परंतु त्या दोन्ही संकल्पना या स्वतंत्र आहेत. 'जात'हि संकल्पना अनुवंशावर आधारित आंतरविवाही समूह आहे. तर 'जमात' हि संकल्पना 'आदिवासी' या संकल्पनेसाठी समांतर किंवा संविधानिक पातळीवर वापरली जाते. मराठी विश्वकोश म्हणतो कि, 'नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय.'

'पारधी' ही भारतातील सर्वसाधारण ४१४ आदिवासी जमाती पैकी एक जमात आहे. ब्रिटिशांनी गुन्हेगार म्हणून ठरविलेल्या जमातीपैकी ही एक जमात आहे. रेणके अहवालानुसार भटक्या जमातीची एकूण संख्या ३१३ तर विमुक्त जमातीची संख्या ११७ एवढी आहे. त्यांची लोकसंख्या हि १०० दशलक्ष एवढी असून महाराष्ट्रात त्या पैकी ४२ जमातीचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रातील जमाती पैकी महत्त्वपूर्ण जमात म्हणून 'पारधी' या जमातीचा उल्लेख करता येईल. १९३७ च्या के एम मुन्शी कमिशन ने पारधी जमातीला भटक्या जमाती म्हणून घोषित केले. भौगोलिक वर्गीकरणानुसार महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ इ. जिल्ह्यात पारधी जमातीचा अधिवास आढळतो. शिवाय नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, बीड, पुणे तसेच विदर्भातील बहुतेक जिल्ह्यात पारधी समुदाय बहुसंख्याने आढळतो.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ पारधी समुदायाचे सामाजिक सांस्कृतिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

Socio-Cultural life: Tradition and Change

'पारधी' समुदायाचा उल्लेख हा प्राचीन विशेषतः पुराण काळापासून अनेक साहित्यामधील वर्णनात आढळतो. पारध्यांना 'निशाद' या नावानेही ओळखले जाते. जंगलातील प्राणी, पक्षी यांची शिकार करून उपजीविका करणारी पारधी हि जमात आहे. मराठी भाषेतील 'पारध' या शब्दावरून 'पारधी' हा शब्द तयार झाला आहे. 'पारध' म्हणजेच शिकार तर पारधी म्हणजेच शिकार करणारा होय. थोडक्यात शिकार करणारा समुदाय म्हणजेच 'पारधी' होय. भारत शासनाच्या अनुसूचीमधील अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) या अनुसूची मध्ये 'पारधी' या समुदायाचा समावेश करण्यात आला आहे.

**पारधी समुदायाचे सामाजिक सांस्कृतिक जीवन**

ज्या समुदायाचा इतिहास हा प्राचीन काळापासून आढळतो त्या समुदायाचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास महत्त्वाचा आहे. त्याच प्रमाणे त्यांचे वर्तमान हि जाणून घेणे, त्यांचे सामाजिक आणि

सांस्कृतिक जीवनजाणून घेणे आणि त्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे अतिशय गरजेचे आहे. त्यास अनुसरून पुढील प्रमाणे मांडणी करता येईल.

**१) पारधी जमात आणि त्यांच्या उपजमाती:-**

पारध्यांमध्ये अनेक पोटभेद आहेत; ज्यामध्ये फासेपारधी, राज पारधी, गाय पारधी, हरणपारधी, मीर पारधी, टकारी, भिल्ल पारधी, गाव पारधी, टाकणकार इ. चा विशेष उल्लेख करता येईल. हे भेद त्यांचा रहिवास, व्यवसाय, परंपरा, संस्कृती, सण उत्सव इ. च्या पातळीवर विभागलेला दिसतो. राज पारधी चित्त्याच्या पिल्लाची शिकार करत म्हणून त्यांना चित्ता पारधी ही म्हणत. शिवाय हि जमात राजाच्या दरबारी आश्रित असत. गाई पाळणारे, शिकार कामात शिकारीचा उपयोग करणारे गाय पारधी तर हरणांची शिकार करणारे हरीण पारधी होत. इ. बाबी आपणास त्यांच्यातील भेद स्पष्ट करतांना सांगता येतील. या प्रमाणेच पारध्या मधील अनेक जमाती या आपला सबंध हा रजपूत, कोळी, धनगर, इ. जाती समुदायाचा जोडतात. या जमाती मध्ये बेटी व्यवहार म्हणजेच वैवाहिक सबंध होत नाहीत. पारध्या मधील या विविध जमातीचा सांस्कृतिक वारसा ही काहीसा भिन्न असताना दिसतो.

**२) शारीरिक रचना:-**

मानववंशशास्त्रीय विश्लेषण हे समाजशास्त्रीय विश्लेषण करत असतांना अतिशय महत्त्वाचे ठरते. शारीरिक वर्गीकरण हा मानवंश शास्त्रीय विश्लेषणाचा भाग आहे. पारधी जमातीच्या शारीरिक रचणे मध्ये रंग गोरा, गारोळे डोळे, सरळ नाक, लहान परिघाचे डोके, उंच कपाळ, रेखीव बांधा, पिंगट व काळे केश इ. शारीरिक वैशिष्टे सांगता येतील. या शारीरिक वैशिष्ट्याच्या आधारावरच महाराष्ट्र आणि देशातील इतर भागात पारध्यांचीआपली वेगळी ओळख निर्माण झालेली आहे.

**३) विविध आडनावे आणि कुळे:-**

पारधी जमातीच्या विविध पोट भेद आहेत त्याच प्रमाणे त्यांची आडनावे आणि कुळे सुद्धा वेगवेगळी आहेत. आडनावा मध्ये प्रामुख्याने चव्हाण, पवार, साळुंके, सोनवणे, दाभोडे, झाकर्डे, धनगऱ्या इ. नावाचा उल्लेख करता येईल. या मध्ये चव्हाण या आडनावात चामळ्या, खलक्या, पिजाऱ्या, कावळ्या, दखन्या इ. कुळांचा समावेश होतो. तर पवार आडनावात कुमऱ्या, शेल्या, नवापूऱ्या, नेभळ्या, इ. कुळांचा समावेश होतो. याच प्रमाणे प्रत्येक आडनावात असे विविध कुळे आढळतात त्या नुसार त्यांची जीवनप्रणालीही भिन्न राहते.

**४) वेशभूषा :-**

पारधी समुदायाच्या व त्यांच्या पोट जमातीचे रीतीरिवाज, सण-समारंभ, रूढी परंपरा इ. भिन्न असल्याने त्यांच्या वेशभूषा व पोशाख, राहणीमान मध्ये ही भिन्नता आढळते. तरी परंतु पारधी समुदायातील सर्वसाधारण पोशाख पाहिला तर पुरुष अंगात बंडी, व कमरेला लंगोटी किंवा धोतर, अगांत सदरा व डोक्याला पागोटे तर हातात कडे घालतात. पारधी महिला काष्टा पदराची नऊवारी साडी व चोळी घालतात.

हातावर व कपाळावर गोंदण, गळ्यात काळ्या मण्याची पोत व रंगीबेरंगी माळा घालतात. विशेष म्हणजे पारंपारिक पारधी महिला कुंकू चा वापर करतांना दिसत नाही.

**५) बोलीभाषा :–**

पारधी जमातीची भाषा गुजराती, मारवाडी, हिंदी भाषेच्या मिश्रणातून निर्माण झालेली भाषा आहे. पारध्याची भाषा उत्तर भारतातील जाटांच्या भाषेशी साधर्म्य दर्शविते. या भाषेलाच पारधी बोली भाषा किंवा वाघारी भाषा किंवा पारुशी भाषा म्हणतात. पारध्यांची हि भाषा त्यांचे महत्वपूर्ण वैशिष्टे तर आहेच शिवाय त्यांच्या संकटाच्या काळात आपल्या सोबत्यांना ओळखण्याचे आणि इतरांपासून आपल्या संदेशाची गुप्तता ठेवण्याचे महत्वाचे साधन आहे. मध्ययुगीन अनेक राजकीय सत्तांनी याचा आपल्या राजकारभारात कौशल्याने वापर केल्याचे दिसते.

**६) भूप्रदेशः–.**

भारतातील राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र इ. प्रदेशात यांच्या वसाहती आहेत. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच प्रादेशिक विभागात पारधी जमातीचे वास्तव्य आढळते. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, नाशिक पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर, मराठवाड्यातील बीड, नांदेड, उस्मानाबाद तर विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ इ. जिल्ह्यात पारधी जमातीचा अधिवास आढळतो.

**७) कुटुंब पद्धती :–**

सर्व साधारणपणे आदिवासी समुदायाचा कौटुंबिक इतिहास हा प्रामुख्याने मातृप्रधान आढळतो. परंतु गाव आणि शहरांच्या संपर्कामुळे आज हि कुटुंबे पुरुष प्रधान आढळतात. पारधी जमातीतील पुरुष हा कुटुंबाचा प्रमुख असतो. संयुक्त व विभक्त अशा दोन्ही स्वरूपाचे कुटुंब पारधी जमाती मध्ये आढळतात.

**८) विशिष्ट विवाह पद्धती :–**

पारधी समाजात विवाह संबंध जोडताना कुळ (गोत्र) पाहून सोयरी जोडली जाते तसेच ताफेतीलद्याई (देवी) किती आहेत तेही बघून, ही सोयरी जोडताना वधू वर यांचे मामाचं कुळ आडवं येत नसेल किंवा समान येत नसेल तर सोयरी जोडली जाते. सोयरी जुडली कि वधु वराची हळद व पहिली लग्न पत्रिकाकूळ देवीस दिली जाते. पुढील लग्नाची तयारी दरपीढी प्रमाणे केली जाते. हळदीच्या दिवशी पारंपरिक लोकगीते म्हटली जातात, उत्तेजित होईल वधू – वर यासाठीही गीते म्हणून खेसर, (टिंगल) करतात. रिती प्रमाणे मग पहिले मुळ फिरवली जातात, चुल्ह्यास पाय लावतात अर्थात याईनबाई यांच्या घरी येणं जाणं करून गोड धोड स्वयंपाक करतात. सव्वा महिने पर्यंत हळदीचं अंग असल्यामुळे वधू वरांना एकटं बाहेर फिरू देत नाहीत, मग नंतर हळूहळू दैनंदिन कामांची सुरूवात काही नियम मनात ठेवून केली जातात.

प्रामुख्याने पारधी जमाती मध्ये बालविवाह प्रथा दिसते. मुलीला हुंडा देण्याची प्रथा आहे. विवाह हा वधूच्या घरी लावण्याची पद्धत होती. या मध्ये आंबा व जांभळाच्या डहाळ्याचा मंडप आणि देवाकाची पूजा, धान्याच्या राशीची पूजा होते. पारधी स्त्रीला घटस्फोटाचा म्हणजेच 'सोडमोकळीक' चा अधिकार

आहे. पहिल्या नवऱ्याला हुंडा देऊन जमातीतील इतर पुरुषाशी ती दुसरा विवाह करू शकते. विशेष म्हणजे नवरा बायकोला दुसऱ्याकडे गहाण ठेऊ शकतो. त्या काळात त्या स्त्रीला मुले झाली तर ठेऊन घेतलेल्या व्यक्तीला ती मुले व्याज म्हणून सांभाळावी लागतात.

**९) आहार :–**

पारधी जमात हि मिश्रहारी आहे. मांसाहारा मध्ये ते कबुतरे, कोंबड्या, मासे, बोकड, मेंढ्या, ससे इ. मांस खातात तर ज्वारी, बाजरी, भात, डाळ, कंदमुळे इ. वापर ते शाकाहारात करतात. प्रदेश बदलला कि त्यांचा आहार ही बदलताना दिसतो, त्यामुळे त्यांचा प्रमुख असा आहार सांगणे कठीण आहे.

**१०) घरांची रचना किंवा वसाहत:–**

पारधी जमातीच्या पालांची किंवा घरांची रचना वैशिष्टे पूर्ण असते. पारधी नेहमी भटकंती करत असल्याने पक्क्या घराच्या ऐवजी ते गोधडी, ताडपत्री किंवा कापडाचा वापर आपले घर म्हणजेच 'पालं' बनवताना वापरतात. त्यांची घरे हि गावापासून दूर, शेतात किंवा डोंगर माथ्याला असतात. त्यांच्या घराचे तोंड प्रामुख्याने पूर्वेला असते; तर घरांची रांग ही दक्षिणोत्तर असते. खानदेशात पारधी वसाहतीला 'पारधीवाडा' असे संबोधतात.

**११) जात पंचायत किंवा जमात पंचायत:–**

इतर भटक्या विमुक्त जमाती किंवा आदिवासी समुदाया प्रमाणेच पारधी जमाती मध्ये जात पंचायत हे प्रमुख वैशिष्टे आहे. जात किंवा जमात पंचायत हे न्यायनिवाडा करण्याचे महत्त्वाचे स्थान आहे. जात पंचायतीचा एक पाटील व इतर अकरा पंच मिळून न्यायनिवाडा करत असतात. जात पंचायतीची जागा महत्त्वाची मानली जाते कारण ज्या ठिकाणी ही पंचायत भरते त्या ठिकाणी अगोदर देवतेची स्थापना केली जाते. जात पंचायती द्वारे दिलेला निकाल हा आरोपी व फिर्यादी यांना मान्यच करावा लागतो. एका अर्थाने पंचांचा निकाल म्हणजेच देवाने दिलेला निकाल मानाला जातो. न्यायनिवाडा करणारे पाटील आणि पंच यांना मात्र काही संकेत पाळून न्याय निवाडा करावा लागतो.

वरील प्रमाणे पारधी जमाती मध्ये अनेक रूढी– परंपरा या त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा घटक भाग बनलेल्या आहेत. कालानुरूप त्या मधील अनेक परंपरा या आजही चालू आहेत तर काही मध्ये परिवर्तन झालेले दिसते. त्या परिवर्तनाचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

## पारधी समुदायाचे सामाजिक सांस्कृतिक जीवनातील परिवर्तन

सर्वसाधारणपणे भारतीय समाजव्यवस्थे मध्ये परिवर्तनाची गती मंद आहे. जर तो समुदाय वंचित किंवा समाज वर्तुळा बाहेरचा असेल तर परिवर्तनाची गती अधिकच मंद दिसते. पारधी जमात हि समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याने त्याच्या परिवर्तांची गती इतर मुख्य समुदायाच्या तुलनेत मंद आहे याचा अर्थ असा नव्हे कि पारधी समुदायात परिवर्तन झाले नाही. पारधी जमाती मध्ये जे परिवर्तन झाले ते

प्रामुख्याने ब्रिटीश म्हणजेच वसाहत कालानंतर त्यास गती मात्र स्वातंत्र्योत्तर काळा नंतर मिळाली. त्याचा आढावा पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१) शैक्षणिक परिवर्तन:–**

जोतीबा फुले म्हटले त्या प्रमाणे शिक्षणाच्या अभावानेच समाजाची प्रगती थांबते. पारधी जमात त्यास अपवाद नाही. पारधी समुदाय हा मुख्यतः भटके जीवन जगत असल्याने स्थिर जीवनात येणाऱ्या कोणत्याही सुविधा त्यास मिळणे शक्य नव्हते. परिणामी तो इतर घटका प्रमाणेच शिक्षणा पासून तो वंचित राहिला होता, मात्र स्वातंत्र्यानंतर समाजाच्या सर्व घटकाला शिक्षण प्रक्रियेत सामाऊन घेण्याचे जे प्रयत्न झाले त्यामुळे काही प्रमाणात पारधी समुदायात शैक्षणिक परिवर्तन झाले. सर्व शिक्षा अभियान, वस्ती तिथे शाळा या धोरणामुळे शिक्षण प्रक्रियेत पारधी जमात सामाऊन घेण्यास मदत झाली. यामध्ये अनेक सेवा भावी संस्था यांचे योगदान फार महत्त्वाचे ठरले. जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील एका अभ्यासानुसार या जिल्ह्यातील पारधी समाजात साक्षरतेचे प्रमाण ४९% एवढे आहे.

**२) कौटुंबिक व वैवाहिक परिवर्तन :–**

विशिष्ट कौटुंबिक आणि विवाह विषयक रचनेसाठी पारधी समुदायाची पारंपारिक ओळख आहे. परंतु खेडे आणि नागरी समुदायाचा संपर्क आल्या नंतर त्याच्या कुटुंब आणि विवाह विषयक रचना आणि कार्यात बदल झालेला आहे. हिंदू धर्म पध्दतीने सध्याची लग्ने होतात पण लग्नानंतर पुन्हा ताफाच्याद्याईचे दर्शन घेवून सत्यनारायण इ. विधी होतात. संयुक्त कुटुंब आता विभक्त कुटुंबाच्या दिशेने वाटचाल करतांना दिसत आहे. स्त्री प्रधानता जाऊन पुरुष प्रधानता अधिक प्रभावी ठरत आहे. जात पंचायत द्वारे दिला जाणारा घटस्फोटाचा म्हणजेच 'सोडमोकळीक' न्याय आता कायदेशीर रित्या बेकायदेशीर मानण्यात आला असून त्या ऐवजी कायदा आणि न्यायालयाद्वारे घटस्पोट कायदेशीर मानण्यात येतो. पूर्वी स्त्रीला गहाण ठेवणे आता कायदेशीर रित्या गुन्हा मानण्यात आला आहे.

**३) वेशभूषा व आहारात परिवर्तन:–**

पारधी जमातीची पारंपारिक वेशभूषा आणि आहार ही त्यांच्या पारंपारिक व्यवसाय शी निगडीत होती. पारधी समाज आता मुख्य प्रवाहातील समाजाच्या संपर्कात येऊ लागला. त्याच्या व्यवसायात बदल होत आहे. शिक्षण प्रक्रियेतील सहभाग वाढत आहे; परिणामी त्याचा खानपान आणि राहणीमान, वेशभूषाही मुख्य प्रवाहातील गाव आणि शहरांच्या प्रमाणे होऊ लागली आहे. पाश्चिमात्य राहणीमान आणि खानपान याचा परिणाम पारधी जमातीवर सुद्धा झालेला दिसतो आहे. तो जसा पुरुषा मध्ये दिसतो तसा तो महिलांच्याही राहणीमानातही दिसत आहे.

**४) बोलीभाषा मध्ये परिवर्तन :–**

पारधी जमातीची भाषा गुजराती, मारवाडी, हिंदी भाषेच्या मिश्रणातून निर्माण झालेली पारधी बोली किंवा वाघारी भाषा किंवा पारुशी भाषा आज जरी वापरत असली तरी सार्वजनिक जीवनात मराठीचा वापर

होत आहे. शिवाय औपचारिक शिक्षणासाठी वापरता येणारी हिंदी व इंग्रजी भाषा हि तो गरजे नुसार वापरताना दिसतो. पारधी समाज जीवनावर आधारित अनेक पद्धतीचे साहित्य निर्माण होत आहे. त्यामध्ये लिखित भाषा मराठी, हिंदी किंवा इंग्रजी असली तरी पारधी भाषेतील काही शब्द आणि संकल्पना या साहित्यात येताना दिसतात.

**५) जात किंवा जमात पंचायत मध्ये शिथिलता :-**

जात किंवा जमात पंचायत हे इतर भटक्या-विमुक्त आदिवासी जमाती प्रमाणेच पारध्यांचे वैशिष्टे होते. आजही ते काही प्रमाणात कार्यरत असताना दिसते मात्र संविधानिक मार्ग आणि आधुनिक संविधानिक न्याय प्रक्रियेत जात पंचायत चे न्याय व्यवस्था शिथिल होत आहे. जात पंचायती मधील अनेक बाबी कायद्याने गुन्हा ठरविल्या आहेत. अनेक शिक्षित, नोकरदार, गाव आणि शहरात राहणारे कुटुंब आता जात पंचातीच्या चौकटी बाहेर राहणायचा प्रयत्न करीत आहेत. परिणामी जमात पंचायती या पूर्णपणे संपल्या नसल्या तरी त्या शिथिल होतांना दिसत आहेत.

**६) घरांची रचना आणि वसाहती मध्ये बदल:**

'पारध्याची पालं' हि पारध्यांच्या घरांसाठी वापरण्यात येणारी संकल्पना महाराष्ट्रात सर्वपरिचित आहे. भटके जीवन जगणारी पारधी जमात काही प्रमाणात गाव आणि शहरात स्थिरावत आहेत. गावाच्या बाहेर असणारी त्यांची वसाहत मुख्य वसाहतीचा भाग बनली नसली तरी काही पारधी लोकांची घरे आता शहरांच्या मुख्य वसाहती मध्ये दिसत आहेत. त्या प्रमाणे गावाचा भाग बनले नाहीत मात्र काही गावात त्याच्या स्वतंत्र वसाहती बनत आहेत. पारंपारिक कापडी पाला च्या ऐवजी पक्क्या किंवा विटांची घरे बनत आहेत. या मध्ये अनेक घरकुल योजनाचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे.

**७) राजकीय परिवर्तन :-**

भारतीय संविधानाच्या अंमलबजावणी नंतर राजकीय जीवनात अमुलाग्र परिवर्तन झालेले आहे; विशेषतः संसदीय राजकारणात 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' या तत्वा मुळे भारतातील सर्वसामान्य व्यक्ती ही राजकीय प्रक्रियेचा भाग बनला. पारधी समाज जरी गावकुसा बाहेर राहत असला तरी त्याचा जनगणना आणि निवडणूक प्रक्रियेत मताधिकार प्रक्रियेत त्याचा सहभाग वाढला. राजकीय नेतृत्वाची निर्मिती होऊ लागली. पारंपारिक जात पंचायत आणि तेथील पाटील व पंच एवढेच त्याचे राजकीय जीवन होते. नवीन राजकीय सहभागामुळे तो गाव आणि शहराच्या राजकीय प्रक्रियेचा भाग बनला आहे.

**८) मुख्य प्रवाहाच्या दिशेने:-**

पारधी जमात परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करत आहे. मुख्य प्रवाहाच्या बाहेरचे जीवन, गावकुसा बाहेरचे जीवन, अप्रतीष्टीत, गुन्हेगारी जीवन हा जीवन प्रवास आता बदलू लागला आहे. अनेक शासकिय-अशासकीय योजना, शिक्षण-नोकरी मधील सहभाग आणि राजकीय सहभाग या मुळे पारधी मुख्य प्रवाहाच्या

दिशेने वाटचाल करत आहे. वर्तमानात तो मुख्य प्रवाहाचा प्रमुख घटक भाग नसला तरी पूर्वी सारखे त्याचे जीवन गावापासून पूर्णपणे अलिप्त ही नाही.

थोडक्यात, महाराष्ट्रातील पारधी समुदाय भटक्या-विमुक्त-आदिवासी समुदायातील एक महत्त्वपूर्ण समुदाय आहे. पारंपारिक दृष्ट्या अनेक वैशिष्टेपूर्ण जीवन प्रणाली असणारा हा समुदाय हळूहळू मुख्य प्रवाहाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात गाव आणि शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा प्रभाव दिसू लागला आहे.

## ४.२.२ पारधी समुदायाचे आर्थिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

(Economic life of Pardhi Community : Tradition and Change)

कोणत्याही समुदायाची आर्थिक गरज ही त्या समुदायाची प्राथमिक म्हणजेच मुलभूत गरज असते. आधुनिक समाज जीवनात उपजीविका एवढाच आर्थिक जीवनाचा अर्थ घेतला जात नाही तर औद्योगिक क्रांती नंतर आर्थिक जीवन हेच सामाजिक विकासाच्या केंद्र स्थानी येऊ लागले. मार्क्सवादी विचारानुसार समाज मागास राहण्याचे मुख्य कारण त्या समाजाच्या आर्थिक मागासलेपणात आढळते. पारधी ही आदिवासी भटकी जमात मूलतः भारतीय समाज संरचनेच्या वर्ण-जाती चा भाग नसली तरी तिचे गावकुसाबाहेर राहणे आणि गुन्हेगारी ओळख असणे तिच्या आर्थिक मागासलेपणाची स्थिती दर्शविते. पारधी समाज पारंपारिक रित्या नेमक्या कोणत्या पद्धतीने आपली उपजीविका करीत होत त्याचा आढावा पुढील प्रमाणे पाहता येईल.

### पारधी समुदायाची आर्थिक जीवन

**१) शिकार करणे:-**

पारध्यांना 'निशाद' या नावाने ही ओळखले जाते. जंगलातील प्राणी, पक्षी यांची शिकार करून उपजीविका करणारी पारधी ही जमात आहे. मराठी भाषेतील 'पारध' या शब्दावरून 'पारधी' हा शब्द तयार झाला आहे. 'पारध' म्हणजेच शिकार तर पारधी म्हणजेच शिकार करणारा होय. भारताच्या इतिहासात पारधी जमातीचा जो प्रामुख्याने विशेषतः पुराण ग्रंथे असतील किंवा रामायण, महाभारत मधील उल्लेख हा शिकार करणारा जमात असा आहे. या वरून हे स्पष्ट होते कि पारधी समुदायाचा पारंपारिक व्यवसाय हा शिकार करणे आहे. फासेपारधी, राज पारधी, गाय पारधी, हरणपारधी, मीर पारधी, टकारी, भिल्ल पारधी, या पोट जमाती कोणाची शिकार करणारा आहे यावर पडलेल्या आहेत. जसे कि, राज पारधी चित्त्याच्या पिल्लाची शिकार करत म्हणून त्यांना चित्ता पारधी हि म्हणत. गाई पाळणारे, शिकार कामात शिकारीचा उपयोग करणारे गाय पारधी तर हरणांची शिकार करणारे हरीण पारधी होत.

**२) पशुपालन करणे:-**

पारधी हि जमात मुख्यतः भटकी असणारी आहे त्यामुळे स्वाभाविकच त्यांना प्रवासाकरिता, सुरक्षेकरिता, उपजीविकेसाठी प्राण्यांचा उपयोग होतो. म्हणून पारधी हे आपल्या सोबत नेहमी अनेक पाळीव

प्राणी ठेवताना दिसतात. विशेषतः गाय पारधी हे त्यांची मुख्यतः उपजीविका गायी भोवती केंद्रित झालेली दिसते. शिवाय ते सोबतीला बकरी, कोंबडी इ. पशुधनही सोबत ठेवतात. शिकार करण्यासाठी काही वेळेला कुत्रा उपयुक्त ठरतो म्हणून अनेक पारधी आपल्या गटात कुत्रा हि पाळतात.

**३) भिक्षा मागणे :-**

पारधी जमातीची पारंपारिक आर्थिक जीवनाची प्रक्रिया ही निसर्ग आणि जंगल आधारित आहे. या संबंधीचे अनेक संदर्भ प्राचीन ते आधुनिक साहित्यामध्ये आढळते. ब्रिटीश वसाहत काळात भारताच्या अनेक क्षेत्रात बदल झालेले दिसतात त्या मध्ये जंगल क्षेत्रासंबंधी अनेक कायदेशीर तरतूदी झाल्या त्याचा प्रतिकूल परिणाम हा आदिवासी समाज जीवनावर झालेला आहे. जंगलातून पूर्ण होणारी त्यांची उपजीविका आता गाव आणि शहराच्या दिशेने सुरू झाली.या मध्ये भिक्षा मागण्याची पद्धती सुरू झाली.

मराठवाड्यातील फासेपारधी खेडे गावात पिक काढण्याची वेळी शेतकरी आणि गावकऱ्याकडून भिक्षा मागून आपली उपजीविका करतात. त्रि.ना. आत्रे यांनी त्यांच्या 'गावगाडा आणि गुन्हेगारी जाती' या ब्रिटीश कालीन ग्रंथा मध्ये या भिक्षा मागणाऱ्या जाती-जमाती चे वर्णन करण्यात आले आहे. आत्रे यांनी या मध्ये आणि पारधी विशेषतः फांसेपारधी यांच्या विषयी ते गावात आल्या नंतर गावातील पाटील कसा व्यवहार करतो आणि त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था कसा करतो याचे वर्णन केले आहे. त्या मध्ये भिक्षा चे सविस्तर विवेचन आहे.

**४) शेती करणे:-**

आदिवासीचा संबंध जंगलचा असल्याने स्थलांतरित शेती हा त्यांच्या उपजीवीकेचे पारंपारिक साधन आहे त्याचे अनेक संदर्भ आपणास मानवशास्त्रीय अभ्यासात आढळते. इतर जमाती प्रमाणे पारधी त्यास अपवाद नाहीत. जंगलातील ज्या भागात पारधी राहतात त्या ठिकाणी ते अविकसित किंवा पारंपारिक पद्धतीने ते शेती करत असत. निसर्ग आधारीत शेती, पारंपारिक आणि स्थानिक पिक रचना हे त्याच्या शेतीचे वैशिष्टे होते. उपजीविका हा प्रमुख उद्देश असल्याने बाजारपेठ हि संकल्पना पारधी किंवा इतर आदिवासीच्या शेती मध्ये आढळत नाही. पारध्याची शेती हि प्रामुख्याने डोंगरभाग, माळरान, गायरान, किंवा जगली भागात दिसते ज्या ठिकाणी मुख्यतः दळणवळणाचा अभाव आहे.

**५) चोरी-गुन्हेगारी जमाती :-**

१९३१ ला जी जाती आधारित जनगणना झाली त्या जनगणनेत पारधी जमाती बाबत १७०१३ व्यक्तीची 'पारधी गुन्हेगार' म्हणून गणना झाल्याचे आढळते. आपली उपजीविका करण्यासाठी चोरी, दरोडे इ. सारख्या गुन्हेगारी कृतीचा त्यांना उपयोग करावा लागला त्यास ब्रिटीश धोरण आणि भारतीय समाजव्यवस्थेत असणारे त्यांचे स्थान कारणीभूत असल्याचे दिसते. मध्ययुगीन काळात विविध सैनिकी किंवा जंगलात राहून आपली उपजीविका करणारे पारध्यांना जंगल विषयक कायद्याने गुन्हेगारीकडे वळविले. १८६४ पासून शिकार ही चोरी ठरली. शहरी करण आणि दळणवळणाच्या सोई मुळे जंगलाकडे होणारे स्थलांतर

त्याची उपजीविकेचा मार्ग अस्थीर बनला आणि पारधी आपली उपजीविका करण्यासाठी गुन्हेगारी मार्गाकडे नाइलाजाने का होईना वळला.

थोडक्यात आदिवासी जमाती विशेषतः पारधी जमात आजही आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी जंगलातील आर्थिक जीवन प्रक्रियेवर अवलबूंन आहेत. वर्तमान मुख्य प्रवाहातील आर्थिक जीवन हे शेअर बाजारा पासून ते आंतरराष्ट्रीय बाजारावर अवलबूंन आहे. जगणे किंवा उपजीविका  एवढीच आर्थिक जीवन प्रणाली महत्त्वाची नाही तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात आर्थिक प्रक्रिया प्रभाव टाकत आहेत, या दृष्टीने विचार करता पारधी समुदाया मध्ये आर्थिक परिवर्तन किती झाले याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

**पारधी समुदायाचे आर्थिक परिवर्तन**

संविधानाच्या अंमलबजावणी नंतर पारधी जमातीच्या आर्थिक विकासासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या, अनेक सामाजिक चळवळी झाल्या, अनेक सेवाभावी संस्थानी प्रयत्न केले या सर्वांचा परिणाम काय झाला त्याचा आढावा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) शासकीय- अशासकीय नोकरी मध्ये सहभाग:-**

आदिवासी जमाती मध्ये विशेषतः अनेक बाबतीत परिवर्तन झाले आहे त्या मध्ये आर्थिक क्षेत्रातील परिवर्तन अतिशय महत्त्वपूर्ण आहे कारण वर्तमान काळात आर्थिक जीवनावर अनेक घटक अवलंबून आहेत. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणी नंतर अनेक योजना अनुसूचित जमाती साठी अंमलबजावणीत आल्या त्या पैकी आरक्षण म्हणजेच प्रतिनिधींत्वाचा एक आहे. त्याचा परिणाम म्हणून अनेक शासकीय आणि अशासकीय क्षेत्रात पारधी जमतीचे प्रतिनिधित्व दिसत आहे. एका पाहणीत धुळे, जळगाव, नाशिक, परभणी (सेलू) येथील पारधी जातीच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झालायचे आढळले आहे.

**२) खाजगी नोकरी:-**

पारधी जमातीचा शासकीय-अशासकीय  नोकरी मध्ये काही प्रमाणात प्रवेश झाला असला तरी मुख्यतः ज्यांनी शिक्षण घेऊन पारंपारिक व्यवसाय सोडले परंतु शासकीय-अशासकीय  नोकरी मिळाली नाही त्यांना खाजगी नोकरीचा पर्याय शोधला आहे. कारखाना, मोठे-लघु व्यापार, खाजगी बँक, पतसंस्था, फर्म, इ. ठिकाणी नोकरी करू लागला आहे. या मुळे त्याच्या आर्थिक जीवनात काही प्रमाणात सुधारणा दिसत आहे. स्वतःचे गाव, शहर घर किंवा मोटार इ. मिळकती कडे त्याचा कल तयार झाला आहे. मुख्य प्रवाहातील समुदाया प्रमाणे आपल्या आर्थिक गरजा-प्रणाली जगण्याचा त्याचा प्रयत्न दिसत आहे.

**३) लघु उद्योग:-**

स्वर्ण जयंती ग्राम जयंती स्वयंरोजगार योजना, सुशिक्षित बेरोजगारांना बीज भांडवल, इ. शासकीय योजना पारधी जमातीच्या आर्थिक विकासात मोठी भूमिका बजावत आहेत. अनेक सुशीक्षित बेरोजगार हे या योजनेचा लाभ घेताना दिसत आहेत. या मुळे छोटे उद्योग उभा करून आपली उपजीविका ते करतच आहेत शिवाय आपली आर्थिक प्रगती ही करत आहेत. अहमदनगर, धुळे, जळगाव, नाशिक इ. जिल्ह्याच्या

अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे कि किराणा मालाचे दुकान, कुकुटपालन, इतर पशु पालन, जीप-रिक्षा चालविणे, हॉटेल व्यवसाय, भाजीपाला व्यवसाय, बांधकाम विषयक व्यवसाय इ. व्यवसाय पारधी जमातीमधील लोक करत आहेत.

**४) शेती सुधार:-**

स्थलांतरित शेती हे पारंपारिक आदिवासी समुदायाचे प्रमुख वैशिष्टे आहे हे आपण वरील विवेचनात पहिले आहे. ब्रिटीशांच्या नंतर त्यांच्या जीवनमानात अनेक बदल झाले. जंगलातील जमिनी औद्योगीकरणात अनेक उद्योजक यांच्याकडे गेल्या. अनेक जमिनी शासनाने वर्ग करून घेतल्या. पारधी जमातीकडे आजच्या काळात शेतीची काय स्थिती आहे याचा अभ्यास केला असता अहमदनगर जिल्ह्यातील ५०० नमुना कुटुंबा पैकी ११५ कुटुंबाकडे जमिनी होत्या तर गायरानजमिन धारकांची सख्या एकत्रित केली तर १८९ कुटुंबाकडे जमिनी होत्या. या पैकी बहुतेक लोक इतरांकडून किंवा स्वत: शेती करत होते. शेती सुधारणा करण्यासाठी त्यांनी शासन किंवा इतर घटकांची मदत घेतलेली ५०% पेक्षा अधिक कुटुंब होती. हि आकडेवारी स्पष्ट करते कि पारधी जमातीच्या आर्थिक प्रगती मध्ये शेती सुधारणांचा सुद्धा सहभाग आहे.

**५) पशु संवर्धन विकास:-**

पशुपालन हा पारधी जमातीचा पारंपारिक व्यवसाय आहे. जे व्यवसाय आजही मोठ्या प्रमाणात करण्यात येतात त्या पैकी पशुपालन हा एक होय. या व्यवसायाच्या वाढी साठी शासकीय आणि अशासकीय पातळीवर अनेक योजनाची तरतूद करण्यात करण्यात आलेली आहे. या योजनांचा काही कुटुंबांनी फायदा घेतला दिसतो. पारधी कुटुंब पूर्वी आणि आजही पशुपालन करत असले तरी आजच्या पशुपालनात व्यवहारीकता आलेली आहे. जनावर आणि पशु बाजारात विकण्यासाठी किंवा दुग्धविकास म्हणून केले जात आहे. या मध्ये कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, गाय, घोडा इ. जनावरांचे पालन केले जाते.

**६) सहकार मध्ये सहभाग:-**

सहकार हा महाराष्ट्राचा कणा मानला जातो. पारधी जमाती मधील काही लोक पतसंस्था, सहकारी संस्था, शिक्षण संस्था, इ. निर्मिती मध्ये आपले योगदान देतांना दिसतात. काही लोकानी त्या मध्ये आपले शेअर गुंतवले आहेत तर काही नोकरी करत आहेत. पारधी जमाती मधील अनेक वसाहतीमध्ये महिला बचत गट निर्माण झालेले आहेत. त्या मधील अनेक बचत गटाद्वारे छोटे छोटे व्यवसाय केले जात असल्याचे निरीक्षण अनेक अभ्यासकानी आपल्या अभ्यासात नोंदविले आहेत.

**७) विविध विकासाच्या योजना:-**

१९७६ साली झालेल्या आदिवासी आर्थिक सुधारणा कायद्यामुळे आदिवासीची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र शासनाने आदिवासी विकासासाठी एकात्म क्षेत्र विकास पद्धतीचा अवलंब करून आदिवासी उपाययोजना तयार करण्याचे मार्गदर्शन करून विविध उपाययोजना राबवण्यात आल्या.महाराष्ट्र राज्य आदिवासी संसोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, अंत्रोळीकर समिती (१९५०) थाडे समिती (१९६०)इदाते

समिती (१९९७) इत्यादीनी भटक्या-विमुक्त जमाती संबधी जे काही अध्ययन आणि शिफारसी केल्या आहेत पारधी जमातीच्या विकासाच्या अनेक बाबी अंतर्भूत आहेत. या मध्ये महिला व बालविकास, आदिवासीचे सबलीकरण व स्वाभिमान योजना, सहकारी गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडल, किमान कौशल्ये विकास कार्यक्रम इ. योजनांचा समावेश करता येईल. टाटा सामाजिक विज्ञान संस्था ने पारधी पुनर्वसनसंबधी उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी गावाच्या पुनर्वसन संबधी अहवाल सादर केला इ. सारखे अनेक प्रयत्न पारधी विकास योजनेच्या दृष्टीने चालू आहेत.

वरील प्रमाणे पारधी जमातीच्या आर्थिक घटकात परिवर्तन होतांना दिसत असले तरी मुख्य प्रवाहाच्या आर्थिक प्रगतीमध्ये आणि पारधी जमातीच्या आर्थिक प्रगती दरम्यान मोठी दरी आहे. आजही पारधी जमात पारंपारिक व्यवसायात मोठ्या प्रमाणात सहाभागी आहे. शासनाच्या अनेक योजना असल्या तरी जनतेपर्यंत त्यांना पोहचविण्यात आलेले अपयश आणि पारधी जमाती मधील शिक्षण आणि जागृतीचा अभाव या पारधी जमात आर्थिकदृष्ट्या आजही मागासच आहे हे वास्तव नाकारता येणार नाही.

### ४.२.३ पारधी समुदायाचे धार्मिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

(Religious life: Tradition and Change)

### पारधी समुदायाचे धार्मिक जीवन :

मानवी मूल्याच्या निर्मिती आणि संवर्धनात आदिवासी धर्माचे विशेष योगदान आहे. मानवी सभ्यतेची पायाभरणी हिआदिवासी धर्माने रचली असे म्हणण्यास वाव आहे. अनेक विकसित सभ्यता आणि आदिवासी सभ्यता यात अनेक प्रकारचे साम्य आढळते. भारताची सर्वात प्राचीन 'इंडस' सभ्यता, बौद्ध सभ्यता आणि आदिवासी सभ्यता यांच्या मध्ये साम्य आढळते. पारधी एक आदिवासी जमात असल्याने त्यांच्या धार्मिक परंपरा आणि इतर आदिवासी यांच्या धार्मिक परंपरा यांच्या मध्ये मूल्यात्मक साम्यता आढळते त्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

#### १) निसर्ग आधारित प्रकृतीपूजकधर्म परंपरा:-

इतर आदिवासी प्रमाणेच पारधी जमात हि प्रकृतीपूजक म्हणजेच निसर्ग पूजक आहे. पारधी जमाती मध्ये निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे. बहुतेक सर्व पूजा या पौर्णिमेला होतात तर अमावस्याला पूजा नाकारतात. हे लक्षात घेतले पाहिजे कि, पारधी ही श्रमिक जमात आहे त्यामुळे बहुतेक सण-समारंभ साजरे करण्यासाठी रात्रीचा वेळ गरजेचा आहे त्यामुळे पौर्णिमाच्या रात्रीच्या प्रकाशात ते आपला उत्सव साजरा करू शकत असत. पारध्यांच्या बहुतेक पूजे मध्ये नैऋत्य दिशेचे महत्वाचे स्थान आहे. भारतीय ऋतूमानात या दिशेचे महत्व लक्षात घेतले तर पारध्यांच्या निसर्ग पूजेचे हि संदर्भ लक्षात येतील. फांसेपारधी यांचे जीवन हे गाईवर अवलंबून आहे. त्यामुळे गाईला बांधवायची खुंटी हीच त्यांची देवता मानली जाते. या शिवाय वेगवेगळ्या पोट भागात निसर्गातील वनस्पती, प्राणी इ. संदर्भ त्यांच्या पूजा विधी मध्ये आढळतात.

## २) पुरोहितशाही नाही :-

अनेक धर्मात पुरोहितांना किंवा पुरोहितशाहीला अनन्यसाधारण महत्व असते; परंतु आदिवासी विशेषतः पारधी जमाती मध्ये पारंपारिक पुरोहित नाही. कुटुंबात होणारी पूजा हि सर्वसाधारण कुटुंबातील मोठा मुलगा करतो किंवा लहान मुलगा करतो. स्त्रिया किंवा मधल्या मुलांनापूजेचा अधिकार नसतो. इतर अनेक पूजा मध्ये 'भगत' (पूजा-विधी करणारा) असला तरी ता सुद्धा वंशपरंपरागत पुरोहित असत नाही. पारध्या मधील अनेक पोट भागात या विषयी वेगवेगळ्या परंपरा आढळत असल्या तरी पारंपारिक पुरोहित किंवा पुरोहितशाहीचा प्रभाव दिसत नाही.

## ३) तरांगळे-खुणंचे महत्व आणि पूजा:-

पारधी जमाती मध्ये विशेषतः टाकणखार जमाती मध्ये तरांगळेम्हणजेच 'खुणं' आणि त्याची पूजा करण्याचे महत्व आहे. 'तरांगळे' हा वाघारी या बोली भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ 'तारांगण' असा होतो.पारधी जमाती मध्ये देव उघडे न ठेवता त्यांना बांधून ठेवण्याची पद्धत आहे. हे देव विशेषतः नारळाच्या दोरीने बनविलेल्या जाड-भरड्या कापडात बांधून ठेवले जातात. देवदेवतांना अंतराळी बांधून ठेवले जाते म्हणून त्यांना 'तरांगळे' म्हणतात. या बांधणी मध्ये देवदेवतांच्या बरोबर आपल्या पूर्वजांच्या काही आठवणी किंवा खुणा असतात म्हणून त्यास 'खुणं' असे म्हणतात. यांची पूजा वर्षात फक्त चार वेळच केली जाते. ते चार दिवस म्हणजेच चैत्र अष्टमी, आखाडी/आषाढ पौर्णिमा, पित्र/पितरपूजा आणि नवरात्र दसरा होत.

## ४) पारधी सण उत्सव:-

पारधी जमातीच्या सण-उत्सव आणि पारंपारिक गाव, शहर मधील विशेषतः हिंदू समारंभ यामध्ये विशेष बदल दिसत नाहीत. स्थिर ग्रामीण जीवनाचे अनुकरण त्यांच्या जीवनशैलीचा भाग बनले आहे. पारंपारिक जत्रा म्हणजे 'जव्हारणं' हे त्यांच्या जीवनशैलीतील महत्त्वपूर्ण वैशिष्टे आहे.या दिवाळी, होळी, नवरात्र इ. हिंदू सण-समारंभ ते साजरे करत असले तरी त्याच्या साजरा करण्याच्या पद्धती मध्ये फरक आहे, जेवणामध्ये गोडधोड करण्यापेक्षा त्यांचा भर मांसाहार करण्यावर अधिक असतो. प्रामुख्याने ते आपल्या सण-उत्सव प्रसंगी इतर समुदायाच्या व्यक्तीला सहभागी करत नाहीत. काही प्रसंगात जर कोणी सहभागी झाले तर आपल्या सांकेतिक भाषेत इतरांना सूचित करतात.

## ५) पारध्याची महापडन (महापूजा) :

महापडन (महापुजा) हा सात दिवसाचा धार्मिक कार्यक्रम असतो ह्या कार्यक्रमात पिढीपरागत चालत आलेली कृतीशील पुजा द्याईची (देवी) केली जाते. ही पुजा गोत्र बघून केली जाते, कारण प्रत्येक गोत्र /कुळास विविध पुजेचे काही समान तर काही विशेष कुळ समजून घेताना पुजा केली जाते. ही पुजा जागल्या, पारधी जमातीच्या धर्मगुरूंच्या साक्षीने केली जाते. द्याईच्या संकेतावरच मग पुजा करायची कि नाही करायची, हे तेव्हा ठरवले जाते.

पहिल्या दिवशी टांगलेल्या चांदीच्या पत्रात बनवलेली द्याई उतरवल्या जातात. त्यांची पंचधातुच्या पाण्याने अंघोळ करून द्याईंना पाटावर बसवून पुजा केली जाते.

दुसऱ्या दिवशी घोगडी टाकून पुढील कार्यक्रमाचे संकेत काढले जातात, तेव्हा बाहेरील गावशिव बाहेरील देवांना पण पुजले जाते. तिसऱ्या दिवशी सोमवार हा वार बघुनच धनीसाहेबांचा कार्यक्रम होत असतो. पगडी बांधलेले गावोगावचे भगत यावेळी देवीस मान देण्यासाठी तेथे येतात. या दिवशी दाळ, रोटीचे जेवण असते सर्व समाज बांधव ही पंगत खाण्यासाठी येतात.

चौथ्या दिवशी आघाडी पुजा केली जाते, अर्थात यादिवशी पुढील देवीची पुजा केली जाते, बोकड बळी दिले जातात आणि प्रसाद म्हणून तो स्वयपाक रात्री जेऊ घालतात.

पाचव्या दिवशी पिच्छाडी असते, या दिवशी पण चौथ्या दिवसासारखे केले जाते, रात्री पारधी स्रिया देवीचे गाणे म्हणतात. भगत घुमत असतात डांख्या (वाद्य) वाजवत जागर पण होत असतो. सहाव्या दिवशी खवाया काढल्या जातात (गरम तेलात हाताने पापड्या काढतात. चुल्हा पण न फुंकताच पेटवला जातो, देवीचे गाणे म्हटली जातात. आणि ते पापडीचे भाताचे असे पाच विविध प्रकारचे शुध्द भोजन बनवून दही भात, तुपाचं भोजन देवीला नैवद्यदेवून प्रसाद म्हणून गोड धोड खाल्लं जातं. सातव्या दिवशी शांति जम्मन म्हणून देवांना पंचधातुचं पाणी मारून, गुढी काढून देवं शांत केली जातात, आणि पुन्हा देवांना एकत्र करून टांगून विसावतात.

**६) देवीचे महत्व :–**

पारध्याच्या धर्म परंपरेमध्ये स्त्री देवतांचे महत्त्वाचे स्थान आहे. वळेखण देवी, दगाव देवी, खोडीयारदेवी, मऱ्हटी देवी, मेलडी देवी, खोक्कळी देवी मावली देवी अश्या अनेक स्त्री देवींचे संदर्भ देता येतात. पारध्यांची मुळ देवी अमुर्त आहे, त्यांचा निसर्गाशी संबध आहे. म्हणून पारधी निसर्गाला पुजायचे, आजही पुजतात, पिढीपरात काही देवींना काल्पनिक चेहरा आला जे चांदीच्या पत्र्यात मढवले गेले, नंतर जात्कीजोतची प्रचिती होतांना काही लोकांनी इतर देवस्थानातील देवींना'हे तुमचे जात्कीजोत देव आहेत' असे सांगतात.

**७) मर्तिकांचे विधी (मृत्यू नंतर ची पूजा) :–**

मानवाच्या मृत्यू नंतर त्याच्या प्रतीकृत्यज्ञता बाळगण्याची परंपरा पारधी जमातीच्या सर्वच पोट भेदा मध्ये दिसून येते. पारध्यामध्येपरंपरेने मृत्यू नंतर दफन करण्याची पद्धती आहे. व्यक्तिला तिथेल्या गावाच्या मातीत पुरलं जातं ज्या गावात त्याचा जन्म झालेला असतो अथवा हयात (संपूर्ण आयुष्य) गेलेले असतं. ‘सुत्तक’ (दुखं पाळणे) पाळले जाते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर ०७ दिवसांनी त्या संबधी विधी होतो. या पुजेची विशिष्ट पद्धती आहे, ज्या मध्ये मंडपात वळचणीला पूजा मांडतात. या मध्ये मापणं (छोटी मडकी) चा वापर केला जातो. हि मापन पाण्याने भरून ठेवली जातात. स्त्री आणि पुरुष यांच्या साठी मापनाची संख्या वेगवेगळी असते. ती सर्वसाधारण पुरुषासाठी १२५ तर स्त्रियांसाठी ७५ एवढी असते. या मध्ये आलेल्या

पाहुणे-आप्तेष्टा कडून मापने फोडणे, भोग लावण्याचा कार्यक्रम होतो. मापणं मधील पाणी व भोग लावण्यातील भोजन आपल्या पूर्वजाला घालण्याची हि पद्धत एका अर्थाने उत्तरदायी होण्याचीच प्रथा आहे.

**८) पशु प्राण्याचा बळी देण्याची प्रथा :-**

इतर अनेक आदिवासी जमाती प्रमाणेच पारधी जमाती मध्ये विशिष्ट प्रसंगी पशु प्राण्यांचे बळी देण्याची प्रथा असल्याचे आढळते. पारधी यात्रेत अश्या प्रकारच्या बळी देण्याचे प्रमाण जवळपास सर्वत्रच आढळते. या मध्ये कोंबडी, बकरा, हल्या (रेडा)चा बळी देण्याची प्रथा आहे. फासेपारधी जमाती मध्ये 'हल्या' (रेडा)चा बळी देण्याची प्रथा प्रामुख्याने आढळते. या प्रथेस 'पडणं' असे म्हणतात.

वरील प्रमाणे पारधी आदिवासी मध्ये धार्मिक परंपरा आढळतात; परंतु ब्रिटीशांच्या नंतर अनेक पारध्याचा जंगलाचा संपर्क कमी झाला किंवा संपला आणि ते आपली उपजीविका करण्यासाठी गाव आणि शहराच्या संपर्कात आले. त्याचा परिणाम म्हणून आदिवासी यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनात हि अनेक प्रकारचे बदल दिसू लागले. त्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

## ४.२.३ पारधी समुदायाचे धार्मिक परिवर्तन

**१) स्थिर ग्रामीण जीवनाचे अनुकरण :-**

वर्तमान काळात आदिवासी मधील जे प्रमुख बदल दिसतात त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचा ग्रामीण-शहरी भागाचा संपर्क हा होय. त्याचा परिणाम म्हणून त्याच्या धार्मिक जीवनात स्थिर अश्या ग्रामीण जीवनाचे अनुकरण करण्यात आले आहे. स्थानिक जीवनातील राहणीमान, खानपान, सण-उत्सव, देवदेवता, पूजा विधी, जन्म-विवाह-मृत्यू प्रसंगी होणारे कार्यक्रम, विधी यांचा स्वीकार पारधी समाजाने स्वीकारलेले आहेत. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी या प्रक्रियेला 'सांस्कृतिकरण' असे संबोधले आहे. हि प्रक्रिया पारधी समुदायात झालेली आहे. त्यामुळेच ग्रामीण-शहरी जीवनातील धार्मिक जीवन आणि पारधींच्या धार्मिक जीवनात फारसा फरक दिसत नाही.

**२) हिंदू सण-उत्सवांचा प्रभाव:-**

वर्तमान काळातील पारधी जमात प्रामुख्याने हिंदू दसरा, दिवाळी, होळी इ. सारखे सण-उत्सव इतर ग्रामीण-शहरी जीवना सारखेच साजरे करू लागले आहेत. शहर-ग्रामीण भागात स्थिरावलेले अनेक पारधी युवकांना त्यांच्या पारंपारिक सण-उत्सव कोणते आहेत याची माहिती नाही किंवा ते जाणून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. पारध्यांच्या पारंपारिक सण-उत्सवाच्या स्वरुपात सुद्धा हिंदू आणि पारधी परंपरा यांचे मिश्रण पहावयास मिळत आहे.

**३) हिंदू देव-देवतांचा स्वीकार :**

ज्या प्रमाणात आदिवासींनी हिंदू चालीरीती, प्रथा, परंपरा, सण-उत्सव इ. स्वीकार केलेला आहे. पारधी ज्या देवदेवतांची पूजा करतात त्या मध्ये त्यांच्या हिंदू स्थानिक देवतांचा ही सहभाग झालेला आहे.

डॉ. जी.एस.घुर्ये अश्या आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे संबोधतात. स्थानिक ग्रामीण देवतांचा, ग्रामीण भागात प्रभाव असणाऱ्या देवदेवतांचा स्वीकार पारधी जमातीने केलेला आहे.

**४) अनेक पारंपारिक धार्मिक परंपरा कालबाह्य :–**

देवतेच्या पूजा करतांना मांसाहार हा पारंपारिक मानला जात होता. हल्या (रेडा), बकरा, मेंढ्या, कोंबडी बळी देण्याच्या प्रथा एकतर बंद पडत आहेत किंवा कमी होत आहे. भारतीय संविधानिक मर्यादा मुळे बळी परंपरा कालबाह्य होत आहे. अनेक पारधी गाव शहराचा निवासी बनल्याने त्यांना गावातील शहरातील धार्मिक कार्यक्रमाच्या तुलनेत पारधी परंपरा मागास वाटतात किंवा आपण एकटे पडू या भीती पोटी त्याचा अवलंब होत नाही त्या ऐवजी तेथील स्थानिक देवता च्या प्रथा, परंपरा, चालीरीती, पूजा विधी इ. स्वीकार केलेला आहे.

**५) आधुनिकीकरणाचा प्रभाव:–**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय समाजाने स्वीकारलेले वेगवेगळे दिन-दिवस जसे नवीन वर्ष, रोज डे, मैत्री दिन, इ. दिवस पारधी युवक युवती साजरे करतांना दिसत आहेत. वाढ दिवस साजरा करणे असेल, विवाह आणि विवाहा नंतरचे कार्यक्रम ज्या मध्ये आधुनिक संगीत कार्यक्रम असेल, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी इत्यादीचा उपयोग असेल, इ. मध्ये आधुनिकता आणण्याचा व तंत्रज्ञांचा उपयोग करण्याचा प्रयत्न होत आहे.

**६) संविधानिक मूल्याची मर्यादा:–**

भारतीय संविधानाच्या अमलबजावणी नंतर पारधी जमाती मध्ये हि काही प्रमाणात संविधानिक जागृती पहावयास मिळत आहे. संविधांनाच्या चौकटीत राहून नवीन धार्मिक मुल्यांची जोपासना करण्याचे प्रयत्न सामाजिक कार्यकर्ते आणि आणि विविध संघटना द्वारे केले जात आहेत. यामध्ये समाजातील अनेक धार्मिक अनिष्ट रूढी परंपरांच्या विरुद्ध आवाज उठविले जात आहेत. जसे कि जात पंचायतीस विरोध, बळी प्रथेस विरोध, अंधश्रद्धाना विरोध इ. अश्या अनेक बाबी ज्यांना धार्मिक अधिष्ठान आहे त्यांना नाकारूनच संविधानिक मुल्यांची जोपासना करण्याकडे कल दिसतो.

थोडक्यात पूर्वीचा पारधी समुदाय आज राहिला नाही याचा अर्थ असा नव्हे कि पारधी जमातीचे समग्र परिवर्तन झाले आहे. पारधी समाजातील एक घटक जो गाव आणि शहराच्या संपर्कात आला, शिक्षणाच्या संपर्कात आला, पुरोगामी बनायच्या प्रक्रियेत आला त्या मध्ये काही प्रमाणात परिवर्तन होत आहे. बाकीचा पारधी आजही भटके, मागास, गावकुसाबाहेरचे जीवन जगत आहे.

### ४.२.४ पारधी समुदायाच्या विकासासाठी सामाजिक चळवळी

Social Movements for Development of Pardhi Community

कोणत्याही वंचित घटकाच्या सामाजिक परिवर्तनात सामाजिक चळवळीचे योगदान हे अनन्यसाधारण महत्त्वाचे असते. ब्रिटीश वसाहत काळात बिरसा मुंडा किंवा १८५७ उठावातील क्रांतिवीर समशेरसिंग पारधी हे अश्याच आदिवासी या वर्तुळा बाहेरच्या (मुख्य प्रवाहापासून दूर) आदिवासी आंदोलनाचे प्रणेते, आणि प्रतिक आहेत. या आणि इतर ब्रिटीश कालीन आदिवासी आंदोलने पाहीली तर त्यांची व्यापकता आणि विषयाची स्पष्टता अधिक स्पष्ट होते. स्वातंत्र्या नंतरच्या काळात अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमाती इ. नावे आपल्या हक्क अधिकार प्राप्त करण्यासाठी अनेक आंदोलने झाली आहेत. या आंदोलनात 'पारधी' जमातीचा ही सहभाग आहे. महाराष्ट्रातील काही आदिवासी, भटक्या-विमुक्त जमातीच्या सामाजिक आंदोलनाची चर्चा पुढील प्रमाणे मांडता येईल.

इतर आदिवासी प्रमाणेच पारध्यांचे विकासाचे प्रश्न हे मुख्यतः त्यांच्या जगण्याच्या प्रश्न आहेत जे त्यांच्या मुलभूत गरजे भोवतालचे आहेत. मुख्य प्रवाहातील विकासाची संकल्पना पारधी जमातीला लागू पडत नाही कारण बहुतांश पारधी आजही जमिनीच्या ताब्याचा प्रश्न, दारिद्र्य कुपोषण, अनारोग्य, बेरोजगारी, अंधश्रद्धा, महिलांवरील अत्याचार इ. जीवन जगण्यासाठी अतिशय अनिवार्य अश्या प्रश्ना मध्येच गुंतलेले आहेत.

नजुबाईगावित, एकनाथ आव्हाड, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, वाहरू सोनवणे इत्यादींच्या नेतृत्वात महाराष्ट्रात जे दलित, शोषित, आदिवासी, भटक्या-विमुक्ताची आंदोलने झाली. या चळवळीचा विचार हा जोतीबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराबरोबरच तो समाजवादीही होता. या आंदोलनाचा सक्रीय सहभाग पारधी समाज ही होता. मूलभूत जगण्याच्या प्रश्ना बरोबरच सरकारी नोंदीची समस्या, आरक्षण धोरण, केंद्र आणि राज्याची स्वतंत्र सूची मुळे निर्माण झालेले प्रश्न, शिक्षण आणि रोजगार चा प्रश्न पारधी जमातीच्या आंदोलनाचे प्रमुख प्रश्न आहेत. वाहरू सोनवणे म्हणतात त्या प्रमाणे, आदिवासींच्या जमीन प्रश्नावरच नाही तर एकंदर संपूर्ण विकास हा मुद्दा आदिवासी, श्रमिक संघटना यांचा आहे. पारधी समुदाय विकासाच्या सामाजिक चळवळीचा स्वतंत्र आणि समाजशास्त्रीय अभ्यास पर्याप्त प्रमाणात न झाल्याने त्यांच्या अनेक आंदोलनच्या नोंदी किंवा कागदपत्रे, पुरावे मिळविणे कठीण आहे. असे असले तरी पारध्यांच्या महाराष्टातील विशेषतः पश्चिम महराष्ट्रातील काही स्थानिक आंदोलन आणि त्याच्या प्रश्नाची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

**१) सामुहिक हत्याकांडा मॉबलिंचीग विरोधात आंदोलनः-**

संपूर्ण जग आणि भारतीय समाज २१ व्या शकतात जगात असला तरी पारधी आजही गुन्हेगारी समाज या ओळखीतून बाहेर पडलेला नाही. समाज आजही त्यांना गुन्हेगार असल्या सारखे वागविताना दिसत आहे. जेंव्हा कुठे चोरी-दरोडा पडतो तेंव्हा पोलिसांची पहिली चौकशी हि पारधी तांड्यावर होते हे वास्तव फारसे बदललेले नाही. अशाच संशायतून अनेक पारध्यांच्या हत्या होतात. सन २०२१ रोजी बीड येथील केज

तालुक्यात मांग वडगाव येथील ०३ पारध्याची हत्या झाली. सन २००२ अहमदनगर जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात ०५ पारध्यांची हत्या चोरी-दरोड्यच्या संशायतून गावकऱ्याकडून हत्या झाल्या या विरोधात भटक्या विमुक्त संघटना, आदिवासी पारधी विकास संस्था, भटके विमुक्त परिवर्तन परिषद, मानवी हक्क संघटना इत्यादी आंदोलने करून या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रयत्न केले.

**२) पोलीस मारहाणी मृत्यू झाल्याच्या विरोधात आंदोलन:-**

अनेक गुन्ह्याच्या प्रकरणात पोलीस पारध्यांना चौकशीसाठी घेत असतात. अश्यावेळी अनेक निरपराध पारध्याचे मृत्यू होतात या विषयी काहीच ठिकाणी आवाज उठविला जातो. पुणे जिल्ह्यातील बारामती तालुका मधील १९९७-१९९८ ला झालेले असेच एक आंदोलन खूप चर्चेत राहिले होते. हे आंदोलन लक्ष्मण माने, अंकुश काळे, रत्नाकर मखरे यांच्या नेतृत्वात झाले होते.

**३) गायरान जमीन व जमीन हस्तांतरित प्रश्न संबधी आंदोलन :-**

ब्रिटीशांच्या जंगल जमीन आणि शिकारी विषयक कायद्या नंतर पारधी गावाच्या दिशेने वाटचाल करू लागला अश्या आदिवासीच्या हस्तांतरित जमिनी परत मिळविण्यासाठी साठी उत्तर महाराष्ट्र मध्ये श्रमिक दल, आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचयांच्या कडून धुळे, नंदुरबार जिल्ह्यात  अनेक आंदोलने झाली, १९९३ पुणे जिल्ह्यातीलइंदापूरतालुक्यात आदिवासी- फासेपारधी संघर्ष समिती, च्या वतिनेअंकुश काळे यांच्या नेतृत्वात गायरान जमीन भूदान आंदोलन झाले. बीड जिल्ह्यातील मानवी हक्क अभियान कडून अनेक आंदोलने फासेपारधी यांच्या गायरान जमिनी साठी झालेली आहेत.

**४) शिक्षण विषयक लोक चळवळ :-**

जोतीबा फुले यांचा शिक्षणाचा विचार घेऊन पारध्याच्या विकासासाठीलोक सहभाग आणि लोक चळवळ करून प्रयत्न करण्यात आले आहेत. या मध्ये संस्कार संजीवनी फाँडेशनमुळे गावजिल्हा सोलापूर, यशोधरा प्रकल्प कर्जत, अहमदनगर, आदिवासी पारधी विकास संस्था, कळंबजिल्हा पुणे, मानवी हक्क अभियान बीड, जालना आणि मराठवाड्यातील इतर जिल्हे इ. ठिकाणी या शिक्षण विषयक जागृती चे काम केले जात आहे त्या करिता लोक सहभाग आणि लोक चळवळीचा आधार घेण्यात आला आहे.

**५) आंदोलन -चळवळी चा परिणाम:-**

कोणत्याही सामाजिक चळवळीचा परिणाम हा त्या समुदायाच्या परिवर्तनात झालेला दिसतो. लोकशाही शासन प्रणालीत जागृती अभियान, संविधानिकसंघर्ष या बरोबरच शासन आणि प्रशासन यांच्या कडे पाठपुरावा आणि त्या करिता लोक दबाव निर्माण करणे गरजेचा असतो. दलित, शोषित, आदिवासी, भटक्या-विमुक्ताच्या आंदोलनाचा ज्या मध्ये पारधी जमातीचा सहभाग आहे परिणाम म्हणून काही शासकीय योजना निर्माण झाल्या व त्याची अंमलबजावणी होत आहे. जसे कि, १९७२ समाजकल्याणविभागाअंतर्गत 'आदिवासी विकास संचलनालय, १९७६ आदिवासी विकास आयुक्तालय, १९८३ स्वतंत्र आदिवासी विकास विभाग १९८४ आदिवासी विकास विभाग स्वतंत्र कारभार, तर 'आदिवासी विकास संचलनालय' हे

आयुक्तांलयात विलीन करण्यात आले  ११९२ ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर विभाग, २९ एकात्मिक विकास प्रकल्प १९९९ स्वतंत्र मंत्रालय स्थापना करण्यात आले.

इतिहासात ज्यांची शौर्य आणि राजकीय सत्तेची परंपरा आहे तो समुदाय आज गुन्हेगारी जमात, भिक्षाकरी जमात, मागास-वंचित जमात म्हणून जीवन जगत आहे. परिवर्तन हा नियम असला तरी सामाजिक परिवर्तनाची गती अतिशय मंद आहे. परिवर्तना साठी आणि मुख्य प्रवाहात आणण्याचे शासकीय, अशासकीय पातळीवर अनेक प्रयत्न होत असले तरी तो आपल्या उद्दिष्टां पासून अद्याप दूर आहे. अश्या जमातीच्या अभ्यासा बरोबरच त्यांना प्रत्यक्ष अनुभवाने जाणून घेणे आणि त्या साठी संविधानिक, चिरंतर उपाय शोधणे हे समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून आपले कर्त्यव्य आहे.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणती जमात ही ४१४ जमातीपैकी एक आहे.

२) कोणत्या कमिशनने पारधी समाजाला भटके म्हणून घोषित केले.

३) पारधी जमातीची भाषा कोणत्या भाषेच्या मिश्रनातून झाली आहे.

४) कोणत्या कालखंडामध्ये पारधी समाजाची भाषा अनेक राजानी राजकीय कौशल्यासाठी वापरली.

५) पारधी जमातीचा कौटुंबिक इतिहास कोणत्या प्रकारचा आहे.

६) पारध्यांना कोणत्या नावाने ओळखले जाते.

७) मराठी भाषेतील कोणत्या शब्दावरून 'पारधी' हा शब्द तयार झाला.

८) गावगाडा हा ग्रंथ कोणी लिहिला.

९) कोणत्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात दलित, शोषित, आदिवासी, भटक्या-विमुक्ताची आंदोलने झाली.

## ४.४ सारांश :

आदिवासी समाजाप्रमाणेच पारधी जमात ही अद्याप मानवी विकासापासून कोसोदूर आहे. अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, अशा अनेक समस्यानी ग्रस्त असणारी जमात ही आज आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अगदी काही प्रमाणात स्थिर होताना दिसून येते. त्याच्या सबलीकरणासाठी शासनाने अनेक उपक्रम राबविले असले तरी ते लाभ त्यांच्यापर्यंत पोहचताना दिसून येत नाहीत. त्यांच्या उत्थानासाठी अनेक चळवळीने योगदान दिलेले आहे. प्रस्तुत घटकात पारधी जमातीसाठी सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक जीवन या विषयी सविस्तर लिहून चर्चा केली आहे.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

१) पारधी

२) १९३७ च्या के.एम. मुन्शी कमिशनने

३) गुजराती, मारवाडी, हिंदी

४) मध्ययुगीन

५) मातृप्रधान

६) निशाद

७) पारध

८) त्रि. ना. अत्रे

९) नजुबाई गावीत, एकनाथ आव्हाड, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, वाहरू सोनवणे इत्यादी.

## ४.६ सरावासाठीचे प्रश्न (दीर्घ उत्तरे लिहा)

१) पारधी समुदायाचे सामाजिक सांस्कृतिक जीवन आणि परंपरा याविषयी विश्लेषण करा.

२) पारधी समुदायाचे आर्थिक जीवन आणि परंपरा व परिवर्तन याविषयी चर्चा करा.

३) पारधी समुदायाचे धार्मिक जीवनाचे परीक्षण करा.

४) पारधी समुदायाच्या विकासासाठी सामाजिक चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) लक्ष्मण माने - विमुक्तायन- महाराष्ट्रातील विमुक्त जमाती: एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९९७

२) संग्रामसिंग सोळंके- परसंग- आदिवासी पारधी टाकणकार समाजाचा प्रातिनिधिक धार्मिक ग्रंथ, वळेखण आदिवासी विकास संघ

३) संग्राम सोळंके -वळेखण संस्कृती, रजधूळ प्रकाशन, अकोला, २०१९


❑❑❑